
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. वा.
दा. क्र. 5322

IRBK-0105322
IRBK-0105322

समाजाच्या दगडी पावलाखालीं
चुरडलेल्या अभागी जीवनाची
ही कथा

रंजल्या गांजल्या अनाथ अपंगांना
हृदयाशीं धरणाऱ्या



गाडगेबाबांच्या

IRBK-0105322

IRBK-0105322

# सत्य आणि साहित्य

'श्यामची आई' या चित्रपटाचें चित्रण चालू असतां एक चोवीस-पंचवीस वर्षांची तरुण स्त्री माझ्याकडे आली. आणि चित्रपटामध्यें एकादें बारीकसारीक काम असलें तर द्या, असें म्हणूं लागली.

रंगानें ती उजळ, अन् नाकींडोळीं नीटस होती. पण तिचे गाल बसलेले आणि चेहरा ओढलेला होता. तिची बोली थोडीशी कुणबाऊ होती. म्हणून हिला कसलें काम देतां येणार अशी शंका माझ्या मनांत येते न येते, तोंच ती किंचित् हसून म्हणाली, "साहेब, मी तुमची गांववाली हाये."

"कुठली, सासवडची?" मीं विचारलें.

"न्हाई कोढितची!" ती म्हणाली.

कोढित हें एक लहानसें खेडें आहे. सासवडपासून दोन कोसांवर. आम्ही अत्रे मूळचे कोढितचे. कोढित सोडून आम्हांला पन्नास-पंचावन्न वर्षे होऊन गेलीं. तेथें आमचें घर होतें. पण आज त्याची बखळ झाली आहे.

ह्या घराच्या मागल्या बाजूला कांहीं मराठ्यांचीं घरें आहेत. त्यांपैकींच एका घरांतली ती होती असें तिच्या सांगण्यावरून मला समजलें. तिचें आडनांव माझ्या चांगल्याच माहितीचें होतें. कारण खेडेगांवांत ब्राह्मण झाले काय किंवा मराठे झाले काय, त्यांचीं आडनांवें दोन-तीनांपेक्षां जास्त नसतात.

इतकें जवळचें 'नातें' दाखवून दिल्यानंतर आतां आपल्याला नक्की काम मिळेल अशा अपेक्षेनें ती माझ्याकडे पाहूं लागली. तिला काय उत्तर द्यावें हें मला कळेना.

"कोढितची तूं!" मी म्हणालों, "अन् इतक्या लांब मुंबईपर्यंत कशी येऊन पोहोंचलीस?"

माझा हा प्रश्न ऐकून तिच्या डोळ्यांला एकदम पाणी आलें. तिचा खालचा ओठ थरथर कापूं लागला.

"सांगन मी कवा तरी!" ओठांतल्या ओठांत ती म्हणाली.

तिच्या डोळ्यांतल्या आणि स्वरांतल्या कारुण्यानें क्षणभर माझें हृदय कंपित झाल्यावांचून राहिलें नाहीं.

कसलें तरी काम द्यावयाचें मीं तिला कबूल केलें. पदराच्या टोकानें डोळे

पुशीत पुशीत ती निघून गेली.

कामाच्या निमित्तानें किंवा एऱ्हवीं भेटण्यासाठीं म्हणून वरचेवर ती माझ्याकडे येऊं लागली. अधूनमधून स्वतःबद्दल एकादा-दुसरा शब्द ती बोलूं लागली. हळू हळू मला तिची माहिती कळूं लागली. पण तेवढ्यापुरतीच. विशेष नाहीं.

मुंबईच्या गिरणगांवांत मधूनमधून जीं नाटकें होतात, त्यांच्यांत तिला काम मिळत असे. त्यावर ती कशीबशी आपली उपजीविका करीत होती, हें मला तिच्या सांगण्यावरून समजलें. ही खेडवळ मुलगी नाटकांत काय काम करीत असावी ह्याचा मी अचंबा करीत राहिलों.

पुढें कित्येक दिवस ती माझ्याकडे आलीच नाहीं. मीं म्हटलें, कुठें ही मुलगी गेली कुणास ठाऊक? पण एके दिवशीं ती माझ्या हपिसाबाहेरच्या बाकावर माझी वाट पाहात असलेली दिसली. तिचा चेहरा पूर्वीपेक्षां पुष्कळच खंगलेला दिसला. आणि डोळेही बरेच खोल गेलेले होते.

"कां ग, आजारीबिजारी होतीस कीं काय?" मीं विचारलें.

"न्हाई," ती मंदपणें हसून म्हणाली, "माझी धाकटी मुलगी लई शिक होती."

मी चकित झालों. तिला मुलें आहेत हें तोंपर्यंत मला माहीतच नव्हतें.

"किती मुलं आहेत तुला?" मीं विचारलें.

"दोन मुली अन् योक मुलगा!" खालीं पाहात ती उत्तरली.

"मग आतां बरी आहे ना तुझी मुलगी?" औपचारिकपणें बोलत बोलत मी माझ्या खोलीकडे जाऊं लागलों. ती कांहीं न बोलतां माझ्या मागून आंत आली.

"साहेब—" एकदम कांहीं तरी डोक्यांत विचार आल्यासारखा चेहरा करून कांहीं वेळानें ती म्हणाली, "ह्या पोरांना कुठं ठेवतां येनार न्हाई का हो या मुंबईत?"

"म्हणजे?" मी चमकून तिच्याकडे बघूं लागलों.

"म्हंजी माझ्याबरोबर ह्या पोरांचे हाल व्हाया नगत!" दीनवाण्या स्वरानें ती म्हणाली, "माझं मपलं पघून घेईन कशी तरी. पन ह्या पोरांची कुटं तरी सोय लावाया व्हवी!"

"त्यांचा बाप कुठंय?" मीं भीत भीत विचारलें.

क्षणभर ती कांहीं बोलली नाहीं. मान खालीं घालून ती हळूच म्हणाली,

"ते पुन्याला असत्यात. त्यांच्या घरांतनं बाहेर पडून मला आतां तीन वर्सं व्हतील—"

ती मुलगी आपल्या नवऱ्याला सोडून घरांतून बाहेर पडलेली असेल अशी तोंपर्यंत माझी कल्पना नव्हती. चेहऱ्यावरून तर ती अगदींच मेंगळी वाटत होती.

"कां, नवऱ्याचं घर कां सोडलंस?" जरा कठोर स्वरांत मीं विचारलें.

"मी कशाला सोडतेंय?" चटकन् तिनें उत्तर दिलें, "त्यांनीं घरांत एक गुजराथीन आनून ठेवली. तिच्या नादानं ते मला न् माझ्या पोरांना मारहाण करूं लागले. तवा एक दिस मी पोरांना घेऊनशान बाहेर पडलें. अन् एका मानसाच्या बरोबर इथं मुंबईला आलें."

"मग नवऱ्यावर पोटगीची फिर्याद कां करीत नाहींस? त्याचं नांव अन् पत्ता दे. मी त्याला माझ्या वकिलाकडून नोटीस पाठवतों." तिच्या अडचणींतून जणुं कांहीं आपण तिला नक्की वाट काढून देतों आहोंत अशा आत्मविश्वासानें मी म्हणालों, "तूं आणि तुझीं तीन मुलें मिळून कमींत कमी तुला चाळीस-पन्नास रुपये तरी महिन्याचे मिळतील!"

"तें खरं—" ती रेंगाळत म्हणाली, "पन त्यांच्यावर मला फिर्याद कशी करतां येईल?"

"कां नाहीं करतां येणार?" मी चिडून ओरडलों.

खालीं पाहात ती म्हणाली, "त्यांचं न माझं लगीन नव्हतं झालं!"

मी डोळे फाडून तिच्याकडे बघूं लागलों. एखाद्या रहस्यमय चित्रपटाप्रमाणें तिच्या जीवनामधल्या एकेक गोष्टी क्रमवार प्रकट होऊन माझ्या जिज्ञासेला विलक्षणच ताण देऊं लागल्या. माझ्या समोरचे टेबलावरचे कामाचे कागद मीं बाजूलाच सारले.

"म्हणजे लहानपणापासून तुझं लगीनच झालं नाहीं?" मीं श्वास रोधून विचारलें.

"झालं व्हतं." ती हळूहळू बोलूं लागली. तिचे डोळे अंतर्मुख झाले. जणुं कांहीं मागलें जीवन तिच्या अंतःचक्षूंसमोरून सरकत होतें. "शेजारच्याच गांवीं मला दिली व्हती. पन नवऱ्याला तमाशाचा नाद लागला. घरांतून तो पळून गेला. जातांना त्यानं माझ्या गळ्यांतली पुतळ्यांची माळ तोडून नेली. मी देईना, म्हून त्यानं माझ्या गळ्यावर इथं चाकू मारला—"

आपल्या डोक्यावरचा पदर खालीं उतरवून ती आपल्या गळ्याची डावी बाजू मला दाखवूं लागली. चांगला पांचसहा बोटें लांबीचा चिंचोळा लालपिंगट व्रण तेथें होता. मला तो बघवेना.

"आन् विहिरीमंदी मला ढकलून दिलं." डोक्यावर पुन्हा पदर घेऊन ती पुढें म्हणाली, "मरता मरतां मी वाचलें—"

जीवनाची एक विलक्षण कहाणी माझ्यापुढें हळूहळू उलगडत चालली होती. माझी जिज्ञासा अगदीं अनावर झाली.

मी तिला म्हणालों, "यशोदा—" यशोदा नांव होतें तिचें. "फारच भयंकर आहे तूं एकेक सांगतेस तें—"

"अजून साहेब, मीं कांहींच सांगितलं न्हाई तुम्हांला!" माझ्याकडे रोखून पाहात यशोदा म्हणाली. तिच्या खोल गेलेल्या डोळ्यांत निराळेंच कांहीं तरी पाणी चमकत असल्याचें मला दिसलें.

मी माझ्या खुर्चीवरून उठलों. म्हणालों, "चल माझ्याबरोबर."

ती मुकाट्यानें माझ्यामागून आली.

मी तिला माझ्या मोटरींत बसविलें आणि आम्ही सरळ जुहूला आलों.

दुपारचे बारा वाजले होते. मला कुठें तरी जेवायचेंच होतें.

समुद्रकांठीं नारळीच्या गर्द हिरव्या झाडांनीं वेष्टिलेल्या 'पामग्रोव्ह' हॉटेलच्या रुंद व्हरांड्यांत आम्ही जाऊन बसलों.

ज्या ठिकाणीं मी यशोदेला घेऊन आलों होतों, तसलें स्थळ जन्मांत तिनें कधीं पाहिलें नव्हतें. पण त्याच्याकडे तिचें लक्ष नव्हतें. ती स्वतःच्याच नादांत धुंद होती.

अंगांत एकादा संचार व्हावा त्याप्रमाणें एका शब्दासाठींही न अडखळतां हळू हळू तिनें आपल्या आयुष्याची सारी गोष्ट मला सांगितली. जवळजवळ एक तास लागला तिला सांगायला.

ज्याच्या अस्तित्वाची तोंपर्यंत मला जाणीवसुद्धां नव्हती अशा एका निराळ्या जगाचें दर्शन त्या दुर्दैवी मुलीनें मला घडविलें.

मी भानावर आलों तेव्हां बाहेर वारा जोरानें सुटला होता. नारळीचीं झाडें अंगाला आळोखे देत होतीं. समुद्राच्या लाटा मोठमोठ्यानें आदळत होत्या.

मीं जेवण मागवलें. 'वेटर' टेबलावर एकेक जिनसा आणून ठेवूं लागला.

तशी यशोदा ओशाळा चेहरा करून म्हणाली, "मी तिकडं खालीं जेवाया बसतें—"

"तसं नाहीं बसतां यायचं!" मी किंचित् हसून म्हणालों, "इथंच बस."

यशोदा फारसें जेवलीच नाहीं. इतकें चांगलें जेवण असून ती कां खात नाहीं याचें मला नवल वाटलें.

"कां ग, तुला आवडलं नाहीं का हें जेवण?" मीं तिला सहज विचारलें.

ती विषण्णपणें हसली. "इतकं चांगलं जेवन कशाला मीं पघितलंय, साहेब!"

तिच्या गरिबीच्या उल्लेखानें मीच ओशाळा झालों.

"मग जेवत कां नाहींस?" मीं भावनेनें तिला विचारलें.

"मला जात न्हाई—" रुद्ध स्वरानें ती म्हणाली. मी आश्चर्यानें तिच्याकडे बघूं लागलों.

"भूक नाहीं तुला?" मीं हळूच विचारलें.

"चार दिवस जेवलें न्हाई, साहेब." आवंढा गिळून ती म्हणाली.

तोंडांतला घास तिच्या घशांत अडकल्यासारखा वाटला. असहाय दृष्टीनें ती माझ्याकडे बघूं लागली. तिच्या गरिबीची त्या ठिकाणीं तरी तिला आठवण होऊं नये म्हणून मी प्रयत्न करीत होतों. पण एकाद्या हडळीसारखी ती तिच्या मानगुटीस बसली होती. ती कांहीं तिला सोडीत नव्हती.

"मग जेवत कां नाहींस?" मनांतली खळबळ आवाजांत प्रकट न होईल अशा सावधगिरीनें मीं तिला विचारलें.

"पोटांत लई भूक असली न—" डबडबलेल्या डोळ्यांनीं उपासमारीचा एक महत्त्वाचा सिद्धांत यशोदा मला समजावून सांगूं लागली, "म्हंजी अन्नच जात न्हाई पघा—आंतडीं मरून जात्यात!"

त्यापुढें त्या विषयावर तिच्याशीं बोलणेंच मुळीं शक्य नव्हतें.

जेवण संपून आम्ही उठूं लागलों, तशी टेबलावर उरलेल्या कांहीं पावाच्या तुकड्याकडे पाहात यशोदा भीत भीत म्हणाली, "साहेब, कागदामंदी पाव मी बांधूनशान घेऊं का?"

"कशाला?"

"माझ्या पोरांना पाव लई आवडतो!" गुळचट स्वरांत यशोदा म्हणाली.

यशोदा ही आई होती हें मी विसरलोंच होतों. मी वेटरला दोन पाव कागदामध्यें बांधून आणावयाला सांगितलें.

परत येतांना मोटरींत पुन्हा यशोदेनें मला केविलवाण्या आवाजांत आपल्या मुलांविषयीं सांगितलें, "काय वाटल तें करून साहेब, तुम्ही ह्या माझ्या पोरांची यवस्था लावा."

"बरं—" तोंडांतल्या तोंडांत मी पुटपुटलों.

उपासमारीच्या उंबरठ्यावर वावरणारी ही दुर्दैवी मुलगी आपल्या तीन मुलांना घेऊन मुंबईसारख्या शहरांत कसें आपलें जीवन कंठीत असावी हाच एक विचार माझ्या कल्पनेचे लचके तोडीत होता.

एक कोडें मात्र तिच्याबद्दलचें अद्याप मला उलगडलेलें नव्हतें.

तिच्या अंगावर कपडे चांगले होते. पातळ तर उत्तमच होतें. पायांत बूट होते अन् हातांत बॅग होती. तिच्या संस्कृतीशीं आणि परिस्थितीशीं तिचा पोषाख सर्वस्वीं विसंगत होता.

तिला त्याबद्दल विचारावेंच असें मला वाटलें.

"यशोदा," मी म्हणालों, "तुला कपड्यांचा बराच शोक दिसतो आहे."

यशोदा एकदम हसली. इतक्या वेळांत एकदांही ती हसली नव्हती. म्हणून तिचें तें हसणें मला चमत्कारिकच वाटलें.

"माझे न्हाईत हे कपडे!" मुद्रा गंभीर करून ती म्हणाली.

डोळे फाडून मीं एकदम तिच्याकडे बघितलें.

"एक गोव्याची मुलगी माझ्या ओळखीची आहे." ती पुढें सांगूं लागली, "तिच्याकडून रोज मी हें सगळं उसनं घेऊन येतें. अन् संध्याकाळीं तिला परत करतें. तीच मला म्हनते, 'येश्वदा, मुंबईंत काम मागायला जायचं म्हंजी अंगावर चांगलीं कापडं पाहिजेत. खरं हाये तिचं सांगनं! माझ्या सोताच्या कापडांमंदी जर मी तुमच्याकडे आलें, तर तुम्ही देखील साहेब, मला बसा म्हून सांगनार न्हाईत!"

काळजाचा एकादा पापुद्रा कुणीं तरी सोलून काढावा तशा तिचे ते शब्द ऐकून मला यातना झाल्या. भांडवलशाही समाजांतलें ढोंग किती सहज पण किती अचूक तिनें उघडें करून दाखवलें होतें.

लालबागच्या रस्त्यावर मीं कुठें तरी तिला सोडलें.

पुन्हा दोनचार दिवसांनीं ती घरीं आली. अशी सकाळचीच. एका अनाथ

आश्रमाच्या चालक वर्गातले एक गृहस्थ माझ्या ओळखीचे होते.--तिच्या मुलांना आश्रमांत घेण्याबद्दल मीं त्यांना एक चिठ्ठी लिहून तिला दिली.

पांचसहा दिवसांनीं ती परत आली.

"काय, दिलीस चिठ्ठी त्यांना?" बहुतेक काम झालें असावें अशा विश्वासानें मीं तिला हसून विचारलें.

ती कांहीं बोलली नाहीं. तिचा चेहरा एकदम गोरामोरा झाला. अन् तिचे डोळे भरून आले. पदरानें डोळे पुशीत ती म्हणाली, "साहेब, तुमच्या जवळ एकादं मरायचं औषध असलं तर तें तरी मला द्या!"

मी घाबरून तिच्याकडे बघूं लागलों. आज ही अशी कां बोलते आहे हें माझ्या ध्यानांत येईना.

"पण माझ्या चिठ्ठीचं उत्तर तर घेऊन यायचंस?" मीं जरा कठोर स्वरांत विचारलें.

"ते म्हनाले, अनाथ मुलांसाठीं आमचा आश्रम आहे." यशोदा कांपऱ्या आवाजांत म्हणाली, "तुम्ही जिवंत आहांत म्हून तुमच्या मुलांना घेतां येत न्हाई."

पुन्हा तिचें हृदय भरून आलें. अन् हातांनीं तोंड झाकून तिनें हुंदका दिला.

'चांगुणा' कादंबरीची रूपरेषा त्याच क्षणीं माझ्या डोक्यांत तयार झाली. त्यानंतर ती लिहून काढणें हें काम फारच सोपें होतें. मला कल्पनेनें फारसें लिहितां येत नाहीं. जीवनच जेव्हां आपण होऊन माझ्याकडे स्वतःच्या पावलांनीं चालत येतें, तेव्हां मी असें कांहीं तरी लिहूं शकतों.

आजकालचे आम्ही लेखक स्वतःला वास्तववादी म्हणवतों खरें. पण जीवनांतली खरीखुरी वास्तवता चितारण्याची हिंमत आहे का आमच्या अंगांत? यशोदेनें जेव्हां मला 'मरण्याचें औषध' मागितलें तेव्हां तिला तें देण्याचें धैर्य माझ्यांत नव्हतें. पण कादंबरींतल्या 'चांगुणे'ला मीं सहज मारून टाकलें. बरोबर आहे, ती मेल्याखेरीज तिची ही गोष्ट कशी संपणार?

पण यशोदा अजून जिवंत आहे. आपल्या तीन मुलांना घेऊन कुठें तरी भटकते आहे. आणि जीवनाशीं झगडतेच आहे.

जवळजवळ दोन वर्षांनीं कालच तिचें मला पत्र आलें आहे. तिच्या मुलीनें तें लिहिलेलें आहे—"साहेब, यापूर्वीच मी तुम्हांला भेटायला आलें असतें.

पण मला सहा महिन्याचा मुलगा आहे. म्हणून येऊं शकलें नाहीं. आम्हांला आतां काम पाहिजे. द्याल ना ?”

खऱ्या ‘चांगुणे’च्या जीवनाची कादंबरी अजून संपलेली नाहीं. ती कशी संपेल ह्याची कल्पनाही करण्याची शक्ति माझ्या प्रतिभेंत नाहीं.


छे, छे ! जीवन फार भयंकर आहे. . .

तें आपणाला समजत नाहीं, म्हणूनच आपण जगतों आहोंत.

९ ऑगस्ट १९५४
मुंबई

प्रल्हाद केशव अत्रे

# १.



सासवडपासून साडेतीन मैलांवर चांबळी नांवाचें एक खेडें आहे. सगळा मिळून शें-दोनशें उंबरा असेल तिथें. ब्राह्मणाचें घर एकादें-दुसरेंच. गुरवांचीं, सुतारांचीं अन् न्हाव्यांचीं मिळून तीन-चार घरें. आणि बाकी सारीं मराठ्यांचीं. गांवाच्या एका टोकाला एक मुसलमानाचें आणि दोनचार महाराचांभारांचीं काय घरें असतील तेवढींच.

पुरंदरचे किल्लेदार सरनाईक ह्यांचा हा गांव. पूर्वी गांवांत त्यांचे सात वाडे होते. ते जमीनदोस्त होऊन त्यांच्या आतां बखळी उरल्या आहेत. त्यामुळें गांवाला कांहीं कळा नाहीं. बहुतेक घरें आपलीं पडलेलीं. नोकरीधंद्याच्या निमित्त कित्येक गांवकरी घराचीं दारें बुजवून जे परागंदा झाले, ते पुन्हा परतच आले नाहींत.

गांवाच्या अगदीं जवळून नदी वाहते. तिचेंही नांव चांबळीच. नदी कसली, झराच तो. तिच्या पलीकडच्या कांठाला थोडीशी झाडी आहे. तिच्यांतलीं कांहीं कांहीं वडाचीं न् चिंचेचीं झाडें दोन-दोनशें वर्षांचीं आहेत. ह्याच झाडींत

ज्ञाणेश्वराचें देऊळ आहे. त्याची बांधणी हेमाडपंती आहे असें म्हणतात.

देवळाचें आवार ऐसपैस आहे. त्यांत दोनचार झाडें आहेत. बेलाचीं नि बकुळीचीं. बकुळीच्या झाडाखालीं चिमुकल्या पिंगट फुलांचा सडा नेहमीं सांडलेला असायचा. उंच दगडी पायऱ्या चढून देवळाच्या फरसबंद आवारांत पाऊल टाकलें कीं पहिल्यानें ह्या फुलांचा सुवास आल्यावांचून राहात नाहीं. पावसाळ्यांत बेलाच्या फुलांचा मंद वास त्यांत हमखास मिसळलेला असायचा. चांगुणा पाणी भरायला नदीवर आली कीं तपेलें वाळूत ठेवून बकुळीचीं फुलें गोळा करायला ती देवळाकडे धावली नाहीं असें कधीं होत नसे.

चांगुणा ही राघू कामठ्याची सगळ्यांत धाकटी मुलगी. तिची थोरली बहीण गोजा ही कोढितच्या बडघ्याकडे दिली होती. अन् मधली बहीण सगुणा. तिची भिवडीच्या पवाराशीं सोयरीक झाली होती. चांगुणा सगळ्यांत धाकटी लेक. म्हणून ती आपल्या आईची लई लाडकी होती. बारावें वरीस संपून तिला श्रावणांत चांगलें तेरावें लागलें, तरी तिचें लगीन करण्याची गोष्ट आपल्या नवऱ्याच्या समोर राही कधीं काढीत नसे.

चांबळीच्या अलीकडच्या कांठाला अगदीं नदीला लागून राघूचें घर होतें. अन् घरालगतच त्याची बिघाभर जमीन होती. चारदोन वर्षांत एकदां तरी चांबळीला मोठा पूर येई. तेव्हां पुराच्या पाण्यांत राघूची अर्धी जमीन बुडून जाई. पुरामधून गाळही खूप वाहून येई. पण पूर ओसरला कीं नदीच्या पात्रांत घोटाभर देखील पाणी राहात नसे. म्हणून राघूनें शेताच्या कांठावर एक 'बुडखी' विहीर बांधली होती. त्यामुळें पाण्याची त्याला कधीं तूट नसे.

इन मीन तीन माणसांचा तर राघूचा संसार. जमीन थोडी असली तरी त्याचें तिजवर उत्तम भागे. तो आणि त्याची बायको राही इरभळ त्या तुकड्यावर राबत. कांहीं ना कांहीं त्यांचें आपलें तेथें सारखें चाललेलें असे.

गांवाकडच्या बाजूला कमरेइतक्या उंच अन् मधून मधून पडलेल्या पांढुरक्या मातीच्या लांबलचक भिंतीचा त्या जमिनीला आडोसा होता. ह्या भिंतीच्या आंतल्या अंगाला अडुळशाच्या अन् कोरफडीच्या झुडपांची बरीच गर्दी वाढली होती. त्यामुळें औषधासाठीं अडुळशाचीं पानें अन् कोरफड मागायला गांवांतल्या आयाबाया आपल्या नेमक्या तिथें यायच्या. अन् अडुळशाचीं फुलें तोडून त्यांच्या देठांतला गोड रस चोखायला भिंतीवरून चढून येणाऱ्या पोरट्यांचा त्रास काय कमी होता म्हणतां ?

दक्षिणेच्या अंगाला हिरव्या शेरांच्या झाडांचें दाट कुंपण होतें. तर नदीच्या बाजूला पांढऱ्या आणि तांबड्या कण्हेरीचें दाट बनच तयार झालें होतें. एका कोपऱ्यांत पांढऱ्या चाफ्याचीं तीनचार झाडें. दुसऱ्या कोपऱ्यांत पिवळया फुलांच्या बिऱ्यांचीं हिरवींगार झाडें. अन् घराकडच्या अंगाला दोनचार उंच शेवग्याचीं झाडें. ह्यामुळें राघूचें तें परडेंवजा शेत नेहमीं टवटवीत आणि शोभिवंत दिसे.

सगुणेचें लगीन झालें तेव्हां चांगुणा नऊ वर्षांची होती. तेव्हांपासून ती आपल्या आईला घरांत अन् शेतांतल्या साऱ्या कामांत बरोबरीनें मदत करूं लागली. घरांतलें पाणी तीच भरी. वासराला पाणी पाजायला नदीवर घेऊन जाई. शेरड्यांसाठीं आकडी घेऊन ती बाभळीचीं पानें बाहेरून तोडून आणी. घराच्या भिंताडावर चढून शेवग्याच्या शेंगा ती काठीनें झोडपून पाडी. चाफ्याच्या झाडावर फुलें तोडायला तर ती मांजरासारखी सरसर चढे.

आई तिच्या अंगावर नेहमीं ओरडे—"अग, चाफ्याच्या झाडावर नग चढूंस. फांदी एकाद येळीं तुटल. खालीं पडशील. हातपाय मोडून घेशील."
पग चांगुणा कुठली तिचें ऐकायला !

चाफ्यांच्या फुलांचा एक पांढरा सफेत झुबका झाडाच्या अगदीं शेंड्याला लागला होता. तो तोडायसाठीं एकदां चांगुणा नेट धरून अगदीं वरपर्यंत चढली. झुबका आतां आटोक्यांत आला असें बघून तिनें हात पुढें केला. तोंच त्याच्या खालच्या फांदीला वेटोळें घालून बसलेल्या एका कवड्या सापानें आपलें निमुळतें तोंड एकदम तिच्यापुढें वर उचललें.



एका क्षणाचा विचार न करतां चांगुणेनें आपलें अंग झाडावरून एकदम खालीं सोडून दिलें. धबकन् ती आदळली. पण ओरडली नाहीं कीं आरडली नाहीं. खालीं दगडबिगड नव्हते म्हणून बरें झालें. जमिनीवर ती तशीच पांचदहा मिनिटें निपचित पडून राहिली. अन् मग मुकाट्यानें

उठून आपल्या पायीं घरांत चालत गेली. चारदोन दिवस तिचें अंग असें ठणकत होतें म्हणतां. पण आपलें दुःख अक्षरानें सुद्धां तिनें आईला सांगितलें नाहीं.

फुलांचा तिला भारी नाद. एकदां कण्हेरीचीं फुलें तोडायला ती झुडपांच्या गर्दीत शिरली. खालीं चांगलीच पाणथळ होती. अन् चिखलही पुष्कळ होता. त्यांत ठिकठिकाणीं खेकड्यांचीं बिळें होतीं. त्यांतून कुठूनतरी एक खेकडा बाहेर आला. आणि त्यानें तिच्या पायाची करंगळीच पकडली. पण तिनें हूं का चूं सुद्धां केलें नाहीं. फुलें तोडायचीं होतीं तीं शांतपणें तोडलीं. अन् बाहेर कोरड्यावर येऊन तिनें तो खेकडा तटकन् तोडून काढला. बोटांतून रक्त भळभळां वाहूं लागलें. त्यावर माती घालून तिनें तें बंद केलें.

कुठें झाडावर चढ, कुठें धावतांना पड, कुठें कांट्याकुट्यांत शीर. त्यामुळें चांगुणेच्या अंगावर नेहमीं लाललाल ओरखडे तरी उठलेले असायचे, नाहीं तर हातापायांच्या एखाद्या बोटाला मळकी चिंधी तरी बांधलेली असायची. पायांत कांटा मोडला नाहीं असा तर तिचा एक आठवडा जात नसे. मग घरांतून ती सुई घेऊन गुपचुप बाणेश्वराच्या देवळांत जाई. दीपमाळेच्या आडोशाला बसे. अन् हलक्या हातानें टोकरून टोकरून कांटा काढी. गुरवाच्या शंकरकडून नंदादीपामधलें तेल आणून तें दुखऱ्या जागेवर लावलें म्हणजे तिला जरा बरें वाटे.

सुताराची चंद्री आणि गुरवाचा शंकर ह्या दोघांशींच काय ती तिची मैत्री होती. चंद्री तिच्यापेक्षां दोन वर्षांनीं मोठी होती. शंकर मात्र अगदीं तिच्याच वयाचा होता. चंद्रीचें लगीन झालें अन् ती सासरीं निघून गेली. रडून रडून चांगुणेनें त्या दिवशीं आपले डोळे मुठीमुठीएवढे केले. तेव्हांपासून तिला शंकरखेरीज गांवांत दुसरा कोणी सोबतीच उरला नाहीं.

शंकरच्या बापाच्या अंगावरून वारें गेलें होतें. त्यामुळें बाणेश्वराच्या देवळा-तलें सकाळ-संध्याकाळ पूजेचें काम शंकरलाच करावें लागे. जेवायपुरता शंकर काय घरीं जात असेल तेवढाच. नाहीं तर बहुतेक सारा वेळ तो देवळांतच असे.

चांगुणेला बकुळीचीं फुलें आवडत. म्हणून रोज सकाळीं शंकर झाडावर चढून ताजीं ताजीं फुलें तिच्यासाठीं तोडून ठेवी. पाणी भरायला चांगुणा नदीवर आली कीं धावत धावत ती देवळांत जाई. तेथें ओंजळींत फुलें घेऊन नदीच्या पायरीवर शंकर आपला बसलेला असे. आपल्या विटक्या परकराचा

ओचा चांगुणेनें पुढें केला कीं शंकर हसत हसत आपली सुवासिक ओंजळ एकदम त्याच्यांत उपडी करी.

शेरडीसाठीं पाला तोडायला चांगुणा दुपारीं घरांतून बाहेर बाहेर पडली कीं आकडीनें वडाचीं पानें तोडून आधीं शंकरला तीं देवळांत नेऊन देई. पत्रावळी लावायचा शंकरच्या बापाचा धंदा होता. पण बाप पंगू झाल्यापासून शंकरलाच पत्रावळी लावाव्या लागत. चांगुणा त्याला चोया करून देई.

दर सोमवारीं संध्याकाळीं बाणेश्वराच्या नंदादीपासाठीं तेलाची वाटी घेऊन चांगुणा नेमानें जाई.

आई तिला बजावी, "अंधार करूं नगस. बिगी बिगी ये."

चांगुणा म्हणे, "मला नाय अंधाराची भ्या वाटत. मला कोण खातंय?"

शंकर तिची वाट पाहात नंदादीपापाशीं बसलेला असे. देवळांत एकादें-दुसरेंच माणूस जाणारें-येणारें असे. गाभाऱ्याच्या अंधारांत दिव्याच्या प्रकाशा-मध्यें चमकत असलेली आडव्या गंधाची बाणेश्वराची पिंडी आणि तिच्याजवळ शंकरचा हसतमुख चेहरा लांबून चांगुणेला दिसे. तो बघून तिला असा कांहीं आनंद होई!

चांगुणेच्या हातांतली तेलाची वाटी घेऊन शंकर ती नंदादीपांत ओती. अन् मग देवापुढें कोणीं ठेवलेला एकादा गुळाचा खडा किंवा साखरफुटाणा शंकर हळूच चांगुणेच्या हातांत देई. चांगुणा तो चटकन् तोंडांत टाकी.

ओठ मिटवून तो खातां खातां चांगुणा नुसत्या दृष्टीनें शंकरला विचारी, "खाल्लास?"

शंकरहि डोळ्यांनीं उत्तर देई, "नाहीं. तुझ्यासाठीं मीं तो ठेवलाय."

चांगुणेपेक्षां शंकर उंच होता. टांचा उंच केल्या कीं त्याचा हात घंटेला पोहोंचे. तो चांगुणेला घंटा वाजवून दाखवी. घंटेचा आवाज साऱ्या देवळांत भरून घुमूं लागला म्हणजे चांगुणेच्या सर्वांगांतून हर्षाच्या उकळ्या फुटत. कोपऱ्यांत एक नगारा असे. तोही शंकर धुडुम धुडुम वाजवून तिला दाखवी.

अशी शंकरची आणि चांगुणेची किती दिवसांची तरी गट्टी होती. एकदां देवळाच्या मागल्या बाजूच्या उंच पाख्याला मधमाशांचें एक मोहोळ लागून राहिलें होतें. दगडी मोहोळ होतें तें. चांगलें बैलाच्या वशिंडासारखें लोंबत होतें. किती दिवसांपासून तरी शंकरनें तें हेरून ठेवलें होतें.

फुलें घ्यायला नेहमींसारखी चांगुणा एकदां आली. तेव्हां शंकर तिला

म्हणाला, " मधाचं मोहोळ पाहिलंस का ग तूं चांगुणा ? "

" नाय बा ! " आश्चर्यानें तोंड अर्धवट उघडीत चांगुणा म्हणाली.

" दुपारची ये. तुला गंमत दाखवतों. " शंकर हसून म्हणाला.

मोट उसवली होती. ती शिवून घ्यायला राघूनें चांभाराला बोलावलें होतें. त्याच्यापाशीं तो विहिरीवर बसला होता. राही भोपळ्याच्या बिया सोलीत पडवींत बसली होती. तिचा डोळा चुकवून चांगुणा चटकन् बाहेर पडली. आणि तडक देवळांत गेली. शंकर तिची वाट पाहात होताच.

शंकर तिला घेऊन देवळाच्यामागें गेला. मधमाशांचें मोहोळ चांगुणेनें कधींच पाहिलें नव्हतें. शंकरनें तिला बोटानें तें दाखवलें. चांगुणा कलती मान करून वर पाहूं लागली. तिच्या रुंदावलेल्या डोळ्यांतल्या बुबुळाच्या पांढऱ्या कोपऱ्याकडे शंकर टक लावून बघूं लागला.

" निसत्या माशाच दिसतात ? मध कुठंय ? " कांहीं वेळानें चांगुणेनें विचारलें.

" आंतमधीं पोळं असतं. अन् त्याच्यांत मध असतो ! " शंकर माहितगाराचा आव आणून तिला गंभीरपणें सांगूं लागला.

मधाची आठवण होतांच चांगुणेच्या ओठांच्या कडा ओल्या झाल्यासारख्या दिसल्या. त्यांवरून जिभेचें टोक फिरवीत लचळ स्वरांत चांगुणा म्हणाली, " मध लई गोड असतो न्हाय का रे शंकर ? "

" हो ना ! " शंकरही अगदीं वितळून म्हणाला, " अगदीं गुळाच्या पाण्यावाणी ! "

इतकें मधाचें वर्णन ऐकल्यावर चांगुणेला धीर कुठून राहाणार ?

" मला देतोस का पाडून मध ? " शंकरचा हात चटकन् धरून चांगुणा लाडिक मुद्रेनें म्हणाली.

पलीकडे एक अणकुचीदार निळा दगड पडला होता. शंकरनें तो पटकन् उचलला आणि भिंगर्दिशीं मोहोळावर भिरकावला.

चुलींतून मोठा धुराचा काळा लोट बाहेर पडावा, त्याप्रमाणें मोहोळाचा एक कोपरा एकदम घोंगावत उसळला. आणि क्षणार्धांत काळ्या ढगाप्रमाणें त्यांच्या भोंवतीं पसरला.

चांगुणेनें शंकरचा दंड पकडला आणि गपकन् डोळे मिटले.

मधमाशांचा गराडा चोंहींकडून आपल्या डोक्यावर उतरतो आहे हें

शंकरच्या तात्रतीव्र लक्षांत आलें.

"चांगुणा, पळ!" तो घाबरून मोठ्यानें ओरडला. आणि चांगुणेचा हात धरून त्यानें जोरानें धूम ठोकली.



चांगुणा कोलमडत त्याच्यामागें गेली. काय झालें हेंच तिला मुळीं कळेना.

देवळांत शिरतां शिरतां शंकरनें मागें दृष्टि फेकली. तों मधमाशांचा एक ढग जोरानें त्यांच्या मागोमाग येत होता.

नगाऱ्याच्या कोपऱ्यांत अंधार होता. अन् भिंतीमध्यें तेथें ओवरी होती. त्या ओवरीच्या रोखानें शंकरनें धाव घेतली. इतक्यांत चांगुणेचें मनगट त्याच्या हातांतून निसटलें. अन् चांगुणा खालीं आदळली. तिला उठवायला शंकर वळतो, तेवढ्यांत एक मधमाशी येऊन तिच्या कानाला अशी कांहीं कडकडून डसली म्हणतां! एवढ्या जोरानें चांगुणा किंचाळली कीं तिच्या त्या किंचाळीचे अनेक पडसाद कोपऱ्या कोपऱ्यांतून उठले. आणि किती वेळ तरी ते साऱ्या देवळांत घुमत राहिले.

अंगांत होतें नव्हतें तेवढें बळ एकवट करून शंकरनें तिला दोन्ही हातांनीं उचललें. अन् ओवरीच्या तोंडाशीं नेऊन ठेवलें. ओणवा होऊन आपण आंत शिरला अन् आपल्या मागोमाग त्यानें तिला ओढून घेतलें.

आंत अगदीं अंधार गुडुप होता. पाकोळ्यांच्या लेंड्यांची कुबट घाण आंत-

मध्यें पसरली होती. फुलांचें आणि वेलाच्या पानांचें निर्माल्य बरेचसें सांठून राहिलें होतें. चांगुणा जोरजोरानें विव्हळत होती. तिच्या कानाची आग आग झाली होती. शंकरनें तिला जवळ ओढून घेतलें. आणि तिच्या पाठीवर ममतेनें हात फिरवून, न बोलतां तो तिची समजूत घालूं लागला.

शंकरच्या खांद्यावर डोकें ठेवून चांगुणा किती वेळ तरी मुसमुसत होती. तिच्या आंसवांनीं त्याचा खांदा ओलाचिंब झाला होता. तिच्या दुखावलेल्या कानावर त्याचे उष्ण सुस्कारे एकसारखे उतरत होते. त्यामुळें त्याची आग हळू-हळू बरीच कमी झाली. तेवढ्यांत तिचा डोळा लागला. त्या ओवरीच्या अंधारांत एकमेकांना बिलगून तशा स्थितींत तीं दोघें किती वेळ बसलीं होतीं कोणास ठाऊक ?

देवळांत घंटेचा आवाज झाला. तशी चांगुणा एकदम दचकून उठली. शंकरही भानावर आला.

"शंकर—" अंधारांत त्याला चापशीत चांगुणेनें विचारलें.

"आहें मी. भिऊं नकोस !" शंकरचा आवाज तिच्या कानांजवळून आला.

"मला घरीं जायचंय—" चांगुणा विव्हळत म्हणाली.

"ये बाहेर !"

चांगुणेचा हात धरून शंकर सरकत सरकत ओवरीच्या तोंडाशीं आला. आणि बाहेर पडून चांगुणेला हलकेच त्यानें वर उठवलें.

घंटेच्या खालीं उभा असलेला शिदू न्हावी डोळे फाडून फाडून त्यांच्या-कडे बघत होता. ओवरींतून दोघांना बाहेर पडतांना त्यानें आपल्या डोळ्यांनीं बघितलें. घंटा वाजवतां वाजवतां तिच्यांतल्या लोळीवर त्याचा हात तसाच अर्धवट थबकून राहिला.

शिदू न्हावी चमत्कारिक दृष्टीनें आपल्याकडे बघतो आहे, ह्याची दोघांनाही जाणीव नव्हती. चांगुणा त्याच्या अंगावरून सरकन् निघून गेली. अन् नंदा-दीपांत तेल घालायला शंकर गाभाऱ्याकडे वळला.

दुसरे दिवशीं सकाळीं राघू कामठ्याची 'डोकी' करतां करतां शिदू न्हाव्यानें त्या 'विषां'तले चारदोन थेंब हळूच त्याच्या कानांत सोडून दिले. शिदूजवळ नुसतें हाताचेंच कसब नव्हतें. जिभेचेंही पण होतें.

राघू स्वभावानें भारी संतापी होता. त्याच्या सर्वांगाचा भडका उडाला. पुराच्या पाण्याप्रमाणें त्याचे डोळे गढूळ झाले.

"असा जाऊनशान त्या गुरवाच्या कारट्याचं टकोरंच फोडून येतों." राघू अर्धवट उठत म्हणाला.

शिदूनें त्याला हात धरून खालीं बसवलें.

"त्येच्यांत काय शेनपना हाय राघूदा ? आपल्याच नांवाचा खराबा व्हायचा न् दुसरं काय ?" राघूचें डोकें पुन्हा गुडघ्यावर वाकवीत शिदू म्हणाला.

राघू थरथर कांपत होता. त्याच्या गळ्याच्या शिरा करंगळीएवढ्या फुगल्या होत्या.

डोकी झाली. फडक्यांत केस भरतां भरतां शिदू पुटपुटला—"त्यो सासवडचा खाशाबा जगतापाचा अंकुशा हाय लगिनाचा. उद्यां मी जानार हाय बाजाराला. बघतों इचारून—"

राघू कांहीं बोललाच नाहीं. धोपटी गळ्यांत अडकवून शिदू निघून गेला.

वासराला नदीवर घेऊन जाण्यासाठीं चांगुणा गोठ्यांत गेली अन् त्याचें दावें सोडूं लागली.

डोळे गरागरा फिरवीत अन् दात कराकरा चावीत राघू तरसासारखा चांगुणेच्या अंगावर धावला. अन् काडकन् त्यानें तिच्या मुस्काटांत भडकावली.

"कुठं जातीस टवळे ? देवळामंदी त्या गुरवाच्या काटर्यास्नी भेटाया ?"

एकादी वेल मोडून पडावी तशी चांगुणा खालीं कोलमडली. तिच्या डोळ्यांपुढें काजवे चमकले. बापाचा चेहरा तिला ओळखतांच येईना. आजपत्तर राघूनें तिच्या अंगाला बोट देखील कधीं लावलें नव्हतें.

गालाची आग हातानें दाबीत भरल्या गळ्यानें नि डबडबल्या डोळ्यांनीं ती विव्हळली, "शंकर लई चांगला आहे दादा. त्यो रोज मला बकुळीचीं फुलं देतो—"

"बकुळीचीं फुलं!" काळजाला इंगळी डसावी तसा राघू एकदम किंचाळला. वळचणीला खोचलेलें एक कळकाचें दांडकें त्यानें झटकन् उपसलें.

पडवींतून राही मोठ्यानें ओरडली अन् घारीसारखी धावली.

पण ती गोठ्यांत पोहोंचायच्या आंतच राघूनें चांगुणेच्या डाव्या दंडावर एवढ्या जोरानें तडाखा मारला कीं दावें काडकन् तोडून वासरूं एकदम दाराबाहेर उधळत गेलें.

राहीनें चांगुणेला एकदम आपल्या कवेंत घेतलें. आईच्या गळ्याला मिठी मारून अन् तिच्या कुशींत तोंड खुपसून चांगुणा गद्गदून मुसमुसूं लागली

तापलेल्या सांडसानें चरचर डाग द्यावा तसा तिच्या दंडाचा भडका उडाला होता.

"फार दीस न्हाई राह्यची ती आतां घरांत !" राही तळतळून म्हणाली. तिच्या डोळ्यांमधून पाणी ठिबकूं लागलें.

"अन् तिला ठिवतोंय कशाला आतां मी ह्या घरांत ? तुज्या न् माज्या तोंडाला डांबर फासाया ?" हातांतल्या दांडक्यानें गोठ्याच्या खांबाला दुसरा तडाखा मारीत राघू ओरडला.

राही डोळे वासून राघूच्या तोंडाकडे पाहातच राहिली.

नदीच्या वाळवंटांत चांगुणेचें वासरूं भेदरल्यागत इकडे तिकडे पाहात उभें होतें. पाणी प्यायचें जणुं तें विसरूनच गेलें.

त्राणेश्वराच्या देवळांत नदीच्या पायरीवर ओंजळींत बकुळीचीं फुलें घेऊन शंकर किती तरी वेळ चांगुणेची वाट पाहात बसला होता.

● ● ●

## .२.



पण फुलें घ्यायला चांगुणा कांहीं देवळांत आली नाहीं.

त्या दिवशीं आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं आली नाहीं. तिसऱ्या दिवशींही आली नाहीं. रोज ठरलेल्या वेळीं शंकर बकुळीचीं फुलें जमा करी अन् चांगुणेची वाट बघत नंदीच्या पायरीवर तासन् तास ताटकळत बसे.

चांद्रळीचें पात्र तेथून नीट दिसे. वाळूमधून हरणासारख्या उड्या मारीत चांगुणा आतां येईल, मग येईल, म्हणून टक लावून बघतां बघतां त्याचीं बुबुळें दुखूं लागत. अन् मान अवघडून येई.

डाव्या खांद्यावर आकडी अन् उजव्या काखेंत वडाच्या पानांचा भारा घेऊन दुपारची तरी एकादे वेळीं चांगुणा येईल, म्हणून देवळाच्या अगदीं दारांत जाऊन शंकर उभा राही. पण उन्हें उतरायला लागलीं अन् सावल्या वाढायला लागल्या कीं दीनवाणें तोंड करून शंकर जड पावलांनीं आंत जाई.

नंदादीपाला तेल घालायला सोमवारीं संध्याकाळीं कांहीं ती आली नाहीं.

बाणेश्वराच्या देवळांत आपण एकटे आहोंत असें शंकरला कधीं वाटलें नाहीं. पण त्या रात्रीं मात्र त्याला भेदरल्यागत वाटलें. आरतीच्या वेळीं खूप जोरजोरानें

त्यानें घंटा वाजवली. चांगुणा आजारी असती तर घंटा ऐकून तिच्या जिवाला बरें वाटेल, असा विचार त्याच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. आरती संपल्यावर नगारा वाजवून अन् गाभाऱ्याचें दार बंद करून शंकर देवळांतून बाहेर पडला.

चहूंकडे काळोख पडला होता. शंकरच्या पायांखालचा रस्ता होता नेहमींचा. चांबळीच्या पात्रांतली वाळू पायाला लागली, तेव्हां घशाला कोरड पडल्याची त्याला आठवण झाली. वाळवंटांत पलीकडे कोणी तरी लहानसा झरा खांडून ठेवला होता. गुडघ्यावर ओणवा होऊन शंकर ओंजळीनें त्यांतलें पोटभर पाणी प्याला. पाण्याला नागरमोथ्याचा वास येत होता. त्यानें त्याच्या जिवाला थोडेंसें बरें वाटलें.

गांव कधींच झोपलें होतें. लांबून कुठून तरी कुत्रें भुंकल्याचा आवाज येत होता. चांगुणा आतां झोपली असेल नाहीं? का ती देखील अजून जागी असेल? कुणास ठाऊक! तिच्या घराकडून जाऊन बघावें तर खरें, असा मनांत विचार यायच्या आधींच शंकरचीं पावलें त्या बाजूला वळलीं. अन् झपाझपा चालूं लागलीं.

चांगुणेचें घर फार दूर नव्हतें तेथून. दक्षिणेच्या अंगानें नदी जिथें वळसा घालते, तिथून दहावीस पावलांवर तिच्या घराचें भिंताड सुरू होत होतें. तिकडून जायचें शंकरला कधींच काम पडत नसे. त्याचें घर वरच्या आळीला होतें. चावडीच्या समोर. हिवऱ्याला जायच्या वाटेवर.

चांगुणेच्या घराचें दार उघडें असल्याचें लांबूनच शंकरला दिसलें. दारापुढें एक टेंभा ढणढणा जळत होता. अन् चारदोन माणसें कानावरून धोतरें ओढून ओट्यावर उकिडवीं बसलीं होतीं.

दारासमोर तट्ट्याची एक बैलगाडी सोडलेली होती. तिच्या मागल्या बाजूला अंधारांत दोन बैल संथपणें कडब्याचीं ताटें चावीत उभे होते.

रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें शंकर दबत दबत पुढें जाऊं लागला. तों दारासमोर यायला अन् आंतून संबळ कडान्कड वाजायला एकच गांठ पडली. शंकर थबकून उजवीकडे पाहूं लागला. तोंच राघू कामठ्याच्या अंगणांत हातांत पेटलेला दिवटा घेऊन खड्या आवाजांत गात अन् नाचत असलेला दाजा गोंधळी त्याला दिसला.

सुदिन सुवेळ। तुझा मांडिला गोंधळ वो,

पंचप्राण दिवटे। दोन्ही नेत्रांचे हिल्लाळ वो!
पंढरपूर निवासे। तुझे रंगणीं नाचत वो,
तिभुंवनामंदी। तुझा मांडिला देव्हारा वो!

गोंधळ्याच्या आजूबाजूला दहाबारा माणसें कांबळ्या टाकून बसलीं होतीं. अन् वर पडवींत चारपांच बाया बसल्या होत्या; पण त्यांत चांगुणा नव्हती.

चांगुणेच्या घरांत गोंधळ कसला हें शंकरला उमजेना. डोळे वासून तो तसाच अंधारांत उभा राहिला.

इतक्यांत डाव्या बाजूला एका घराचें दार उघडून एक हाडकुळी म्हातारी आपल्या पांचसात वर्षांच्या नागव्या नातीला कडेवर घेऊन बाहेर आली. गोंधळ दाखविण्यासाठीं म्हातारीनें आपल्या नातीलां झोपेंतून मुद्दाम उठविलें होतें.

डोळ्यांवर लोंबणाऱ्या झिपऱ्यांसकट मुठीनें डोळे चोळीत पोरीनें विचारलें, "काय हाय आजी तें?"

"आपल्या राघूदाची चांगुणा हाय ना," एकेक शब्द तोडून म्हातारी आपल्या नातीला समजावून सांगूं लागली. शंकरची मान झटकन् तिच्याकडे वळली. राघूदाची चांगुणा! तिचें काय?

"तिचं आतां," म्हातारी पुढें म्हणाली, "लगीन हाय. त्येचा ह्यो गोंधळ!"

"माझं कवा हाय ग लगीन आजी?" डाव्या मनगटानें नाकाचा शेंबूड आडवा पुशीत नातीनें विचारलें.

"चल चावनटे!" आजी हात उगारून तिला म्हणाली, "नागवी नाचतीस साऱ्या गांवभर, अन् म्हनं लगीन कवा हाय माझं?"

पण शंकरला तें बोलणें मुळीं ऐकूंच आलें नाहीं. त्याला आतां तो गोंधळ तरी कुठें ऐकूं येत होता?

चांगुणेचें लगीन? चांगुणेचें लगीन! कधीं ठरलें? कोणाशीं ठरलें? मग बकुळीचीं फुलें घ्यायला आतां चांगुणा देवळांत नाहीं येणार? बाणेश्वराच्या नंदादीपांत सोमवारीं सांजची चांगुणा नाहीं आतां तेल घालणार?

त्या दिवशीं मोहोळांतून उठलेल्या मधमाशा जशा संतापून घोंघावत होत्या तसा आवाज आपल्या डोक्यामध्यें होतो आहे असा शंकरला भास झाला. त्याचे पाय आपोआप घराकडे वळले.

शंकरची आई त्याची वाटच पाहात बसली होती.

"एवढा कां रे उशीर केलास?" कडी काढतांना आईनें विचारलें, "नगारा होऊन तर किती वेळ झाला."

शंकर कांहीं बोललाच नाहीं. हातांतलें धोतराचें लहानसें गाठोडें त्यानें कोपऱ्यांत टाकलें.

आई ताट वाढूं लागली.

अंगांतला सदरा काढीत शंकर म्हणाला, "मला किनई आज भूक नाहीं ग आई."

"दोन घास तरी खा कीं. उपाशी रे कशाला झोपतोस?"

"नको ग. माझं डोकं दुखतंय." क्षीण स्वरानें शंकर म्हणाला. अन् कोपऱ्यांत फाटकासा सुताडा पडला होता त्यावर जाऊन तो कलंडला सुद्धां.

पातेल्याखालीं अन्न तसेंच झाकून आई उठली. अन् खुंटीवरचें आपलें जुनेरें काढून त्याच्या अंगावर तिनें घातलें. पोटाशीं पाय मुडपून शंकर एका कुशीवर झोपला होता. त्याच्या उशाशीं बसून आई त्याचें डोकें हळूहळू दाबूं लागली. खरेंच, त्याचें कपाळ चांगलेंच कढत लागत होतें.

कोपऱ्यांत शंकरचा बाप असहायपणें एका रकट्यावर पडला होता. त्याला बोलतां येत नव्हतें. त्याचे डोळे नुसते टकटक करीत होते.

सकाळीं शंकर कांहीं लौकर उठला नाहीं. झुंजुमुंजु होऊं लागलें कीं एऱ्हवीं तो जागा होई. पांघरुणांत हळूच हात घालून आईनें चापसलें. त्याचें अंग चांगलेंच तापलें होतें.

शंकर एकदम उठून बसला, "आई, मला ओकारी आली."

आईनें पितळी आणून त्याच्यापुढें धरली. शंकर भडाभडा ओकला. थोड्या वेळानें त्याला आणखीन दोनतीन उलट्या झाल्या. अन् मग तोंडावर पांघरूण घेऊन तो मुरमुसून झोपला.

"मी जरा जाऊन येतें," थोडया वेळानें नवऱ्याकडे बघून शंकरची आई म्हणाली अन् बाहेर पडून तिनें दार ओढून घेतलें.

समोरून शिदू न्हावी चालला होता.

"काय शंकरची आय, कुटं निघालात?" थोडेंसें थबकून शिदू म्हणाला.

"राघूदाच्या परड्यांतून अडुळशाचीं पानं घेऊन येतें जरा. शंकरला पित्त झालंय. सकाळपासून चारदा ओकला त्यो. अन् रात्रीपासून तापहि अंगांत हाय त्याच्या." शंकरची आई चालतां चालतां म्हणाली.

"माझ्याबी घरांत पोरं ताप-खोकल्यानं आजारी हायेत ना!" शिदू तिच्या-बरोबर चालूं लागला. "औंदाचं उन्हच लई खराब पघा!"

शंकरच्या आईनें नुसताच हुंकार दिला.

"मीबी राघूदाकडंच जातोंय. त्याच्या चांगुनाचं लगीन हाय ना तेरवाच्या दिशीं!" शंकरच्या आईला शिदूनें बातमी दिली. "मुलगा सासवडच्या जग-तापाचा हाय—"

"असं व्हय?" शंकरची आई म्हणाली, "छान झालं!"

"तुमच्या शंकरचंबी लगीन करून टाका आतां—" तंबाखूची चिमटी तोंडांत टाकतां टाकतां शिदूनें सुचविलें, "सासवडच्या निळू गुरवाची एक पोरगी हाय—"

"ते कसलं आमच्या घरांत मुलगी देनार?" शंकरची आई खिन्नपणें हसून म्हणाली.

"न द्याया काय झालं?" शिदू आवेशानें म्हणाला, "मुकी तर हाय पोरगी!"

इतक्यांत राघूदाचें घर आलें. राघूदा अंगणांतच राखुंडीनें दांत घाशीत उभा होता.

शंकरच्या आईला बघून त्यानें भोकराएवढे डोळे केले.

"सकाळच्या पारीं कशाला धिंडका आली गुरवीणबाईची?" राघू तिच्या अंगावर खेकसून म्हणाला.

"पोरीचं लगीन हाये ना आतां तुमच्या?" शंकरची आई बळेंच हसून म्हणाली. "तवा म्हटलं विचारावं पत्रावळी किती लागतील तें. अन् शंकर-लाही पाठवून देईन परवांच्या दिशीं वाजंत्री वाजवाया—"

"कांहीं नग!" शंकरचं नांव काढतांच राघू एकदम भडकला. "गुरवाची वाजंत्री वाजवाया हें का बामनाचं लगीन हाय? मी म्हाराची वाजंत्री सांगून ठिवलीय! तुमचीं वाजंत्री नग अन् पत्रावळी बी नगत!"

रागारागानें राघू घरांत चालता झाला. शंकरच्या आईचा चेहरा खरकन् उतरला. ती शिदू न्हाव्याकडे पाहूं लागली. पण तो धोकटींतला आरसा काढून वेडेंवाकडें तोंड करीत त्यांत बघत होता.

मान खालीं घालून परत जायला शंकरची आई वळली. इतक्यांत आंतून राही आली.

"कशाला आलता गुरवीणबाई?" राहीनें विचारलें.

"शंकरला पित्त झालंय," आवंढा गिळून शंकरची आई म्हणाली. "अडुळशाचीं पानं हवीं होतीं."

"जा ना घेऊन." राही म्हणाली, "चांगुनाला बी कालपून बरं न्हाई!"

अडुळशाचीं पानें तोडून शंकरची आई गपचिप घराकडे परतली. राघूचें बोलणें तिच्या जिवाला फार लागून राहिलें.

शंकरच्या घरासमोर चावडीला लागून शेंडकर पाटलाचें घर होतें. जगतापांच्या वऱ्हाडानें तिथें जानोसा दिला होता. नवरा मुलगा शेंडकरांच्याच नात्यांतला होता.

दुसऱ्या दिवसापासून महाराचा डफ अन् वाजंत्री जोरजोरानें तिथें किंचाळूं लागलीं. दुपारच्या उन्हांत कोरीं लुगडीं नेसलेल्या बायका खालच्या आळींतून वरच्या आळींत अन् वरच्या आळींतून खालच्या आळींत अनवाणी पायांनीं वाजत गाजत जातांना दिसूं लागल्या.

दोनतीन दिवसांनीं शंकरचा ताप उतरला. पण त्याला अशक्त वाटत होतें. तो घरांत अंथरुणावर पडून होता. देवळांतलें काम आई करीत होती.

नवरीकडे जायला नवरामुलगा निघाला, तेव्हां त्याला पाहायला फाटकेंसें धोतर पांघरून शंकर आपल्या दारांत येऊन बसला. उन्हाकडे त्याला नीटसें बघवत नव्हतें.

चांगुणेचा नवरा एकोणीस-वीस वर्षांचा होता. अंगानें चांगला उंचापुरा होता. रंगानें निमगोरा होता. त्याच्या गालावर नि गळ्यावर शिबें उठलेलें होतें. डोक्यावर पांढरें पागोटें घातलें होतें. आणि त्यावर बेगडाचें न् आरशाचें उंच बाशिंग बांधलें होतें. आणि अंगावर वाघटोपीची लाल सखलादी खोळ त्यानें पांघरली होती. अन् कागदी लिंबू टोचलेली कट्यार त्यानें हातांत धरली होती.

रस्त्यानें जाणारीं चारदोन माणसें शंकरच्या दारापुढें थबकून नवऱ्यामुलाकडे बघूं लागलीं.

"म्हंजी, ह्यो अंकुशा तर न्हवं?" एक आश्चर्यानें उद्गारला.

"व्हय ना, सासवडच्या खाशाबा जगतापाचा!" दुसऱ्यानें उत्तर दिलें.

"च्यायला, ह्याला र कोणी पोरगी दिली हितं?" पहिला चुकचुकून म्हणाला.

"कां?" तिसऱ्यानें विचारलें.

"साऱ्या मुलखाचा वांड हाय ह्यो!" पहिला पुटपुटला, "नशीब ओढवलं त्या पोरीचं—"

डोळे फाडून शंकर त्या माणसाकडे बघूं लागला. पण तोंपर्यंत तो पुढें निघून गेला होता.

शंकरच्या डोळ्यांत पाणी आलें. त्याला अंकुशाचा चेहरा दिसेनासा झाला. तो अंथरुणावर आला. अन् तोंडावर पांघरूण ओढून झोपीं गेला.

लगीन संपलें. मुलीला घेऊन नवऱ्यामुलाचें वऱ्हाड सासवडला जायला निघालें. बिनतट्टयाच्या तीनचार बैलगाड्या वऱ्हाड्यांनीं भरल्या.

बाहेरचा गलगा ऐकून शंकर दारांत आला. अन् डोकावून बघूं लागला. नवरा पहिल्या गाडींत बसला होता. अन् नवरी मागल्या गाडींत होती. पण शंकरला चांगुणाचा चेहरा कांहीं दिसला नाहीं. बाशिंगाच्या कागदी फुलांच्या लालपांढऱ्या झुबक्यानें तिचें सारें तोंड झाकून गेलें होतें. अन् तिच्या भोवतालीं बायका-पोरांची पुष्कळ दाटी होती.

शंकरला वाटलें कीं मोठ्यानें ओरडून चांगुणेला हाक मारावी. पण त्याच्या गळ्यांतून आवाजच निघेना. छातींत कांहीं तरी दाटून आल्यासारखें त्याला वाटलें.

रोज सकाळीं हसत हसत आपल्याकडे येणारी, आपल्या ओंजळींतून बकुळीचीं फुलें घेणारी, आपल्या हातून गुळाचा खडा अन् साखरफुटाणा खाणारी आपली मैत्रीण चांगुणा लगीन होऊन आपल्या नवऱ्याबरोबर सासरीं निघाली. पण दारासमोरून जातांना ती आपल्याशीं बोलली देखील नाहीं. आपल्याकडे ढुंकून तिनें पाहिलें देखील नाहीं. आतां पुन्हा आपल्याला ती कधीं भेटेल का? भेटली तरी आपल्याला ओळखील का? ह्या विचारानें शंकरच्या काळजाची अगदीं उलघाल झाली. अन् त्याचे डोळे डबडबून आले.

आई म्हणाली, "नको बघूंस बाहेर. उजेडाकडे बघून बघून तुझ्या डोळ्यांतून पाणी यायला लागलें."

गाड्या निघून गेल्या. शेवटची गाडी अगदीं दिसेनाशी झाली. चिमणीसारखें तोंड करून शंकर आंत वळला.

त्याला एकदम वाजंत्रीची आठवण झाली. किती दिवस झाले, त्यानें वाजंत्री वाजवलीच नव्हती. वडिलांच्या अंगावरून वारें गेल्यापासून त्यानें तिला मुळीं हातच लावला नव्हता.

माळ्यावर वाजंत्री धूळ खात पडली होती. ती त्यानें वरून खालीं काढली. फडक्यानें तिची पिपाणी पुसून साफ केली. आणि जिभेनें ओठ ओले करून तो ती वाजवूं लागला.



तो ती वाजवीत होता हें त्याचें त्याला कळत नव्हतें. वाजंत्रीच्या लाकडावर जीव नसल्यावाणी त्याचीं बोटें खालीं-वर होत होतीं. पण तिच्यांतून निघणाऱ्या सुराकडे त्याचें मुळीं लक्षच नव्हतें.

आई म्हणाली, "मी देवळांतून जाऊन येतें."

शंकरनें फुगीर गालांनीं तिच्याकडे नुसतें पाहिलें.

बाहेर जातांना तिनें दार ओढून घेतलें.

शेंडकर पाटलाची बायको चावडीसमोर उभी होती. शंकरच्या आईला तिनें विचारलें, "एवढ्या मोठ्यानं रडतंय कोन तुमच्या घरामंदी गुरवीनबाई?"

"रडतंय कोण?" शंकरची आई म्हणाली, "शंकर वाजंत्री वाजवतोय."

● ● ●

## .३.



अंकुशाचा बाप खाशाबा जगताप हा चांगुणेच्या बापासारखाच एक शेतकरी होता. सासवडच्या दुनाखे सावकाराची जमीन तो खंडानें करीत असे. कोढितच्या रस्त्यावर रानमळा लागतो, तिथें त्याचें शेत होतें.

खाशाबाचें घर सासवडला सोपानदेवळाच्या बाटेवर होतें. पण तो, त्याचे थोरले लेक, त्यांच्या बायका एवढी सगळीं मंडळी शेतावरल्या पडळीमध्यें राहात असत. अन् खाशाबाची बायको, त्याची विधवा लेक अन् अंकुशा, इतकीं जणें सासवडच्या घरांत राहात.

दुसऱ्या यत्तेंत असतांनाच अंकुशानें शाळा सोडून दिली. कित्येक वर्षं तो घरींच बसून होता. कांहीं दिवस त्याला तालमीचा नाद लागला, पण तालमीनें शक्ति यायच्याऐवजीं त्याच्या अंगांत मस्तीच वाढली. आणि टवाळ लोकांच्या संगतींत तो भटकूं लागला. खाशाबांनीं त्याला शेतावर आणायचा पुष्कळ प्रयत्न केला. पण अंकुशाला मनापासून कशाचा तिटकारा वाटत असेल तर तो अंगमेहनतीच्या कामाचा.

पुण्याच्या एका इराणी कंत्राटदाराचा दारूचा गुत्ता होता सासवडांत. गुत्त्यावर गिऱ्हाइकांच्या नेहमीं मारामाऱ्या होत. म्हणून त्याला एक तगडा पोऱ्या पाहिजे होता.

सतरा-अठरा वर्षांचा गोरागोमटा, उंचापुरा अन् मजबूत बांध्याचा अंकुशासारखा मराठ्यांचा मुलगा बघून इराणी खूष झाला. आणि महिना पंधरा रुपयांवर त्यानें त्याची दुकानावर नेमणूक केली.

पंधरा रुपयांच्या नोकरीनें अंकुशाचें डोकेंच फिरलें. गांवांत आपल्यापेक्षां जास्त पगार कोणालाच नाहीं अशी त्याची समजूत झाली. मुंडेछाट सदरा घालून अन् डोळे लाल करून तो पोळासारखा गांवांत फिरूं लागला.

गुत्त्यावर दारू पिणाऱ्यांच्या मारामाऱ्या थांबवण्याऐवजीं तो गुत्त्यांतली दारू पिऊन स्वतःच गिऱ्हाइकांबरोबर मारामाऱ्या करी अन उरल्यासुरल्या गांवांत घेऊन येई. त्यामुळें गुत्त्यांतली त्याची नोकरी दोन अडीच महिन्यांपेक्षां जास्त टिकूं शकली नाहीं.

एक दिवस कंत्राटदारानें त्याला सरळ धक्के मारून गुत्त्याबाहेर काढलें. गुत्त्यामधली त्याची नोकरी सुटली. पण दारू मात्र त्याला चिकटली. कधीं चारसहा आणे हातांत पडले कीं तो छटाक पावशेर बेवडा झोकून आल्यावांचून राहात नसे.

खाशाबाला ह्या पोराचें काय करावें हेंच कळेना. अंकुशाचे दोघे थोरले भाऊ तर त्याचें तोंड पाहायला तयार नव्हते. पांचसहा महिने घरीं बसल्यावर सासवड म्युनिसिपालिटीच्या एका नाक्यावर कारकुनाच्या हाताखालीं खाशाबांनीं त्याला नोकरी मिळवून दिली. तिथें अंकुशा कसा तरी एक महिनाभर टिकला.

एक दिवस जकातीच्या पैशांतले दहापंधरा रुपये त्यानें तमाशांतल्या एका बाईच्या बरोबर दारू पिण्यांत उडवले. दुसऱ्या दिवशीं पोलिसांनीं त्याला अटक केली. आईनें धावपळ करून पैसे भरले अन् फौजदाराच्या नाकदुऱ्या काढल्या. तेव्हां मराठ्याचा मुलगा म्हणून त्यानें अंकुशाला सोडून दिलें. नाहीं तर त्याच वेळीं महिना दीड महिना तरी तुरुंगाची हवा खाऊन आल्यावांचून तो खचित राहिला नसता.

एवढें होऊनहि त्याचे डोळे उघडण्याचा कांहीं रंग दिसेना. चैत्राच्या महिन्यांत दिव्याच्या कातोबाचा उत्सव असतो. त्या वेळीं कुस्त्यांचा हगामा भरतो. तो पाहायला म्हणून एका मैत्राबरोबर अंकुशा तिथें गेला. पण कुस्त्यांना कांहीं मौज येईना, म्हणून कंटाळून दुपारचेच दोघेही परतले. आणि मोठ-

मोठ्यानें हसत खिदळत वाटेनें जाऊं लागले.

मध्येंच कुठें एका नांदुरकीच्या झाडाखालीं वैदूची एक तरणी बाई एकटीच बसलेली त्यांना दिसली. आजूबाजूला कोणी नाहीं अशी खात्री करून अंकुशानें तिला बेधडक डोळा मारला.

त्याबरोबर मारक्या म्हशीसारखी ती एकदम अंकुशाच्या अंगावर धावून आली. अंकुशाच्या मैत्रानें घाबरून मागच्या मागेंच कुठें पळ काढला. पण अंकुशाला आपल्या शक्तीची गुर्मी होती. तो तसाच फाजीलपणानें तिच्याकडे पाहात उभा राहिला.



पण वैदिणीचा हिसका त्याला माहीत नव्हता. तिनें सरळ त्याच्या धोतराच्या निऱ्यांनाच हात घातला. अंकुशा झटकन् मागें सरकला. पण तिच्या मुठीमधून त्याचें धोतर कांहीं सुटलें नाहीं. दोघांचीहि झोंबाझोंबी झाली.

वैदीण आपल्या कोंगाड्या भाषेंत मोठमोठ्यानें ओरडत अन् किंचाळत

होती. अंकुशानें जंगजंग केले. पण दोन्ही हातांनीं तिनें ओढून धरलेलें धोतर कांहीं तिच्या पकडींतून त्याला सोडवतां आलें नाहीं. दहापांच मिनिटांच्या आंत पंधरावीस वैदू स्त्रीपुरुषांचें टोळकें मोठमोठ्यानें आरोळ्या ठोकीत तिथें धावत आलें. त्यांना पाहतांच अंकुशाचे हातपायच्च गळाले.

एका क्षणांत दगडाधोंड्यांचा अन् काठ्यांचा अंकुशाच्या डोक्यावर असा कांहीं जबरदस्त मारा झाला, कीं अंकुशा जमिनीवर गडबडां लोळून दोन्ही हातांनीं बोंबलूं लागला. पण वैदिणीशीं फाजीलपणा करणारा पुरुष असा कचाट्यांत सापडल्यावर वैदू लोक इतक्या थोडक्यामध्यें त्याला थोडेंच सोडून देणार ?

अंकुशाचें सगळें अंग रक्तबंबाळ झालें अन् तो बेशुद्ध पडला. तेव्हां वैदू लोक घाबरले. अन् रस्त्यावर त्याला तसाच टाकून देऊन ते आडवाटेनें पसार झाले.

कुस्त्या संपवून लोक संध्याकाळीं परत जाऊं लागले. तेव्हां अंकुशा रस्त्यांत पडलेला त्यांना दिसला. सासवडच्या लोकांनीं त्याला ओळखलें. तो मेला असावा असेंच पहिल्यानें त्यांना वाटलें. पण त्याच्या छातींत थोडी धुगधुगी होती.

डोली करून लोकांनीं त्याला सासवडला आणलें. अन् सरकारी दवाखान्यांत टाकलें. नशिबानें हात दिला म्हणूनच अंकुशा वांचला. दोन महिने तो दवाखान्यांत पडून होता. त्यानंतर मात्र तो खडखडीत बरा झाला. जसें त्याला कांहीं झालेंच नाहीं.

पण तेव्हांपासून तो घराबाहेर पडेनासा झाला. चोवीस तास तो घरांत बसून राही. कामावांचून कोणाशीं बोलत नसे. दोन्ही वेळचें जेवण जेवी अन् इरभळ आपल्या झोपा काढी. आईला वाटलें, पोरगा पस्तावला. बापालाहि वाटलें, पोरगा बदलला.

थोरली बहीण म्हणूं लागली, "अंकुशा लई सुधारला. आतां त्याचं लगीन करून टाकलं, म्हंजी कंदीबी बिघडायचा न्हाई."

पण सासवडांत अंकुशाला कोण पोरगी देणार? गांवांत त्याची कीर्ति लोकांना माहीत झाली होती. झालाच कोणी त्याला पोरगी द्यायला तयार, तर तो चार-दोन मैलांच्या पलीकडचा कोणी तरी होईल, हें का खाशाबाला माहीत नव्हतें?

पंचक्रोशीमध्यें त्यांच्या ओळखीचीं जीं दहापांच माणसें होतीं, जातींतलीं अन् जातीबाहेरचीं, त्यांना खाशाबांनीं सांगून ठेवलें होतें. चांबळीचा शिदू

न्हावी सोमवारच्या बाजाराला आलेला असाच जगू हलवायांच्या दुकानासमोर अचानक त्यांना भेटला.

त्याला सांगितल्यापासून पंधरा दिवसांच्या आंत राघू कामठ्याच्या चांगुणेशीं त्यानें अंकुशाचें लगीन जमवलें. खाशाबाचा जीव भांड्यांत पडला. त्याच्या डोक्यावरचा जणुं डोंगरच उतरला. शिदू न्हाव्याला त्यांनीं कंदी पागोटें बांधलें.

लगीन आटोपून खाशाबाचें वऱ्हाड चांबळीहून सासवडला आलें. चारदोन दिवस पाव्हण्याराबळ्यांची घरांत गर्दी होती. तोंपर्यंत अंकुशा गपचिप होता. मग जिकडचीं तिकडे माणसें पांगलीं. खाशाबा अन् त्याचे लेक शेतावर निघून गेले.

अंकुशाला घरांत मोकळीक मिळाली. वैडूच्या हातचा मार खाल्ल्यापासून त्याचें डोकें वचकून होतें. पण बायको मिळाल्यापासून तें फुरफुरूं लागलें.

एक दिवस तो आईला म्हणाला, "जेजुरीच्या खंडोबाला जाऊन येतों आम्ही दोघं. लगीन झाल्यावर खंडोबाच्या पायां पडूनशान यावं म्हनत्यात!"

आईला भारी आनंद झाला. खरेंच पोरगा सुधारला. खंडोबाची आठवण झाली त्याला.

आई म्हणाली, "भीमीला बी संगं घेऊन जा!"

भीमी म्हणजे अंकुशाची थोरली बहीण. विधवा होती ती. अंकुशा मनांत चरकला.

पण भीमीच आपण होऊन म्हणाली, "मी न्हाई जात. मला रंडकीला काय करायचाय खंडोबा?"

नवऱ्याबरोबर एकटें गांवाला जायचें ह्या नुसत्या विचारानेंच लाजून लाजून चांगुणा अर्धीमेली झाली. नवऱ्याबरोबर बोलायचें काय अन् कसें? हेंच तिला मोठें संकट पडलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बैलाच्या छकड्यांतून नवराबायको जेजुरीला निघालीं. अंकुशानें अंगांत पांढऱ्या पैरणीवर लालभडक जाकीट घातलें. अन् हिरवा पटका बांधून त्याचा पाठीवर मोठा शेपटा काढला. चांगुणेनें लग्नांतलेंच लाल करवती काठाचें पिवळेंधमक लुगडें नेसलें. नाकांत नथ अन् गळ्यांत पुतळ्यांची माळ घातली.

"कसा खंडोबा न् म्हाळसेवानी जोडा दिसतोया!" डबडबलेल्या डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहात म्हातारी म्हणाली. "जपून जा ग पोरी!"

गुडघ्यांत मान घालून अन् डोक्यावर पदर ओढून चोरट्यासारखी चांगुणा

छकड्यांत बसली होती. बिळांतून ससा जसा बघतो तशी पापण्यांची मित्री उघडझाप करून हळूच तिनें आपल्या सासूकडे एकवार बघितलें.

जेजुरीच्या रस्त्यावरच सासवडचा ताडीदारूचा गुत्ता आहे. अंकुशाच्या घशाला बऱ्याच दिवसाची कोरड पडली होती. छकडेवाल्याला त्यानें छकडा उभा करायला सांगितलें. आणि आंतून उडी मारून तो लगालगा दुकानाकडे गेला. दुकानाचा नोकर फळ्या उघडीत होता. विक्रीला सुरुवातही झाली नव्हती.

अंकुशानेंच भवानी केली. पावशेर वेवडा तीन घोटांतच त्यानें संपवला. पैसे देऊन उजव्या पंज्यानें तोंड पुशीत पुशीत तो बाहेर पडला. आणि शेजारच्या दुकानांतून त्यानें दीड आण्याची शेव अन् चणे विकत घेतले. अन् त्याचा मोठा बोकाणा चावीत चावीत तो छकड्यांत येऊन बसला.

मूठभर शेव चांगुणेच्या पुढें करीत अंकुशा म्हणाला, "घे!"

चांगुणा कांहीं बोललीच नाहीं. तिनें अंग घुसळून डोक्यावरचा पदर अधिकच खालीं ओढला.

"आतां किती दिस लाजशील ग?" असें म्हणून अंकुशानें तिचा पदर फरकन् बाजूला फेकला. नाकातोंडांत पाणी जावें तसे चांगुणेचे डोळे घाबरे झाले.

तेवढ्यांत आपल्या उजव्या मुठींतील शेव पटकन् त्यानें चांगुणेच्या तोंडांत कोंबली. त्याबरोबर त्या हाताला लागलेला वेवड्याचा वास वसकन् तिच्या नाकांत शिरला. अन् एकदम तिला ओकारी आल्यासारखें वाटलें. तिनें तोंडांत गेलेली सर्व शेव थुंकून टाकली.

अंकुशा दांत विचकून हिडिसपणें हसूं लागला. छकडेवाल्याच्या पाठीवरही शहारा उठला.

तिला एकदम शंकरची आठवण झाली. त्याच्या हाताला चंदनाच्या गंधाचा, वेलाच्या पानांचा, नाहीं तर बकुळीच्या फुलांचा नेहमीं वास यायचा. एकदां त्यानें आपल्या हातानें खोबऱ्याचा तुकडा तिच्या तोंडांत घातला होता. त्या वेळीं त्याच्या हाताला किती सुरेख वास येत होता. अजून तो वास तिच्या डोक्यांत दरवळत होता.

आणि त्यामुळें दुर्गंधीच्या हातानें नवऱ्यानें दिलेल्या शिळ्या शेवेचा पहिलाच घास तिला फारच घाण वाटला. तिच्या पोटांत एकदम गरंदळून आलें. छे, छे, अशी घाण जन्मांत तिला माहीत नव्हती.

अन् अंकुशा तोंड उघडून जसा मोठमोठ्यानें गायला लागला, तसा त्या

घाणीचा वसकारा चांगुणेला आणखीनच येऊं लागला. तिनें आपला पदर नाका-तोंडावर गच्च आवळून घेतला. आणि अंकुशाकडे पाठ फिरवून मुरमुसा मारला.

उन्ह जसें तापूं लागलें, तसा अंकुशाच्या डोक्यांतल्या वेवड्याला जास्त जास्त कढ येऊं लागला. आणि मग त्याच्या लावण्यांना असा कांहीं रंग चढला म्हणतां!

तुझें झालें संग्रवर
आम्हां आला गहिवर
कसा पिकला ग गहूं-हरभरा

येथून जो त्यानें प्रारंभ केला तो—

लाजूं नको लाजूं नको
आतां माझे साळू,
इष्काची फुगडी आतां
आपण दोघं खेळूं!

येथपर्यंत येऊन तो थडकला!

असलीं वेडींविद्रीं गाणीं चांगुणेनें जन्मांत कधीं ऐकलीं नव्हतीं. त्यामुळें तिच्या डोक्यांत शिरलेली घाण आणखीनच वाढली. छकड्यांतून खालीं उडी मारून कुठें तरी पळून जावें असें तिला वाटलें.

त्याबरोबर तिला आईची आठवण झाली. तिची आई रोज पहाटे जात्यावर किती गोड गाणीं गायची?—

लाडक्या लेकीला
आंदण आंबराई
मागें सोन्याची सनई.
लाडक्या लेकीला
गोड लाडवाचं खाजं,
झालं गाडीवर ओझं.
लाडकी माझी लेक
नका नेऊं बाई गांवा
उन्हाच्या लागे झांवा!

आईच्या त्या गाण्याचा अर्थ चांगुणेला आतां पहिल्यानें उमगला आणि तिला एकदम भडभडून आलें. आईच्या कुशींत तोंड खुपसून आणि तिच्या कमरेला मिठी मारून ढसढसां रडावें असें तिला वाटलें. पण आई तिथें कुठें होती?

शंकरला पण एक छान गाणें येत होतें, नाहीं ? एका गुराख्याच्या पोरानें तें त्याला शिकविलें होतें.

मला जेवायला घाल ग आई,
दूर रानांत गेल्या माझ्या गाई ग.
येळ पुराणाच्या पोळीला नाहीं,
दे भाकर अन् थोडंसं दहीं ग
मला जेवायला घाल ग आई.
समद्या गवळ्यांच्या नऊलाख गाई,
वाहे तुडुंब यमुनाबाई ग
मला जेवायला घाल ग आई.
कान्हा येऊन दारीं उभा राही
मुरली वाजवतो गोड गोड लई ग
मला जेवायला घाल ग आई.

बाणेश्वराच्या देवळांत बकुळीच्या झाडाखालीं शंकर बसला आहे. कृष्णासारखा पोषाख करून तो मुरली वाजवीत आहे. आणि त्या मुरलीचे सूर आपल्या सर्वांगांतून घुमत आहेत. असा क्षणभर चांगुणेला भास झाला. त्या गोड तंद्रींत अंकुशाचे हातवारे, त्याचा भसाडा आवाज, आणि छकड्याची खडखड कुठल्या कुठें विरघळून गेली. आणि तिचा डोळा लागला.

चांगुणा एकदम दचकून जागी झाली. पाहते तों अंकुशा तोंड उघडून घोरत होता. अन् त्याचें डोकें छकड्याच्या तट्टयावर खालीं-वर आदळत होतें.

आपल्या नवऱ्याचा चेहरा पुरता न्याहाळून बघायची संधि तिला पहिल्यानेंच मिळाली. लगीन झालें तेव्हां कांहीं तिनें त्याच्याकडे डोळे वर करून नीट पाहिलें नव्हतें. पण त्या वेळीं तो तिला चांगला वाटला. अन् आज ?

आज तिला एकदम त्याची किळसच वाटली. आणि भयही पण वाटूं लागलें. तिनें त्याच्याकडे पाहायचें सोडून दिलें.

जेजुरीला तीं पोहोंचलीं तेव्हां बारावर एक वाजून गेला होता. चांगुणेच्या पोटांत कावळे ओरडत होते. अंकुशाचा बेवडा पार उतरून गेला होता. त्याच्या घशाला पुन्हा कोरड पडली होती.

झाडाची चांगलीशी सावली पाहून छकडेवाल्यानें आपला छकडा सोडला. अन् भाकर खायला तो बाजूला जाऊन बसला.

चांगुणेच्या सासूनें खायचें पुष्कळ करून त्यांच्याबरोबर दिलें होतें. अंकुशा म्हणाला, "मला न्हाई भूक. मी जरा जाऊन येतों. तूं घे खाऊन."

"अन् खंडोबाला कवा जायचं?" चांगुणा लुगड्याचा पदर दांतांनीं चावीत हळूच पुटपुटली. नकळतच ते शब्द तिच्या तोंडून निघून गेले.

पण अंकुशाला ते ऐकूं आले नाहींत. तो आधींच निघून गेला होता. चांगुणा गांगरून गेली. ती तशीच छकड्यांत बसून राहिली. तिला काय करावें हेंच कळेना.

नवऱ्यानें खाल्लें नाहीं. मग आपण कसें खावें? ते खाऊन घे म्हणाले खरें. पण म्हणून काय झालें?

तीनचार तास छकड्यांत बसून तिचे पाय अवघडून गेले होते. म्हणून पाय मोकळे करायला ती खालीं उतरली. समोरच असलेला जेजुरीचा उंच डोंगर, त्यावर चढत गेलेल्या दगडी पायऱ्याच पायऱ्या आणि जणुं कांहीं आभाळांतच बांधलेलें आहे असें वाटणारें टोकावरचें खंडोबाचें देऊळ बघून चांगुणा आपलें भानच विसरली.



शेतांत मळणीचें काम करतांना जें गाणें म्हणतात, त्यांतलें एक कडवें आपोआप तिच्या ओठांवर उमटलें.

**नऊ बाई लाखाची पायरी**
**आंत देव नांदतो मल्हारी**

डोळे मिटून तिनें खालूनच मल्हारी म्हाळसाकांताला नमस्कार केला.



पलीकडे एक म्हातारा 'वाघ्या' पिवळ्या फडक्याला बांधलेल्या दोन घंटा वाजवीत वाजवीत गात होता—

म्हाळसा बाणाई भांडती
मल्हारी मार्तण्ड हासती

त्याच्या कपाळाला पिवळा भंडारा होता. आणि मानेवर चांदीचें ब्रोंड असलेला गेटा आणि खंडोबाचा टाक त्यानें गळ्यांत बांधला होता. वाघाच्या पिवळ्या कातड्याची पिशवी त्याच्या पोटावर लोंबत होती.

चांगुणेनें वाघ्या कधीं पाहिला नव्हता. तिला त्याची फार मौज वाटली. ती कौतुकानें त्याच्याकडे बघूं लागली. तोही गातां गातां तिच्याकडे प्रेमळ दृष्टीनें पाहूं लागला.

चांगुणेला काय वाटलें कोणास ठाऊक. पुढें जाऊन ती त्या वाघ्याच्या पायां पडली. त्याबरोबर वाघ्यानें मोठ्यानें "येळकोट मल्हार' केला. अन् पिशवींतून भंडारा काढून तिच्या कपाळीं लावला.

"बाबा, मजजवळ पैसा न्हाई." चांगुणा ओशाळें तोंड करून म्हणाली, "ह्ये ग्येलेती—पन भाकर हाय—"

"मला भाकर हवी. पैसा नग." वाघ्या हसून म्हणाला, "पैशानं कुटं पोट भरतं? अन् त्यो चावाया मला दात बी कुटं हायती?"

वाघ्याचें तें गंमतीदार बोलणें ऐकून चांगुणेला हसूं आलें. तिनें छकड्यांतून भाकरीचें गाठोडें बाहेर काढलें. अन् खालीं बसून ती तें सोडूं लागली.

"तूं खाल्लीस भाकर माझे बाय?" खालीं बसतां बसतां वाघ्यानें इतक्या गोड आवाजांत विचारलें, कीं तिच्या डोळ्यांत एकदम पाणी आलें. कांहीं न बोलतां तिनें नुसती मान हलवली.

"आर देवा देवा, अजून न्हाई खाल्लीस?" वाघ्या हळहळून म्हणाला, "अन् आतां कवा खानार? उन्हानं न् भुकेनं कसं चिमनीवानी तोंड झालंय माझ्या बयेचं!"

वाघ्याच्या तोंडांतून आपली आईच बोलते आहे असें क्षणभर चांगुणेला वाटलें. तिनें आंतल्या आंत आवंढा गिळला. भोपळ्याच्या पानावर भाकरी अन् कोरड्यास घालून तिनें मुकाट्यानें वाघ्याच्या पुढें केलें.

"मला नग." हात आडवा हलवीत वाघ्या म्हणाला, "पोराच्या आधीं कुटं बाप खातो व्हय?"

चांगुणेच्या काळजाचा वाघ्यानें चिमटाच घेतला. ती त्याच्या तोंडाकडे टकमक बघत राहिली. वाघ्याचें सोंग घेऊन हा खंडोबा तर आला नसेल?

"बरं बाबा!" चांगुणेच्या तोंडून एकदम शब्द निघून गेला, "मीबी तुमच्या संगं खातें भाकर—मंग झालं ना?"

वाघ्याचें सुरकुतलेलें तोंड आनंदानें चमकूं लागलें.

"मी पानी घेऊन येतों. मला भांडं दे ग माझे बाय!" वाघ्या म्हणाला.

चांगुणेनें त्याला कासंडी दिली. धर्मशाळेपाशीं पायऱ्यांची चौकोनी दगडी विहीर होती. तिच्यांतून तो पाणी घेऊन आला.

भाकर खातांना वाघ्या गंमतीगंमतीचें बोलत होता. तें ऐकून चांगुणा पोट धरधरून हसली अन् पोटभर जेवली. अंकुशाची तिला आठवणसुद्धां राहिली नाहीं. जणुं कांहीं ती वाघ्याबरोबरच जेजुरीला आली होती.

जेवण झालें. चांगुणेनें भाकरीचें गाठोडें बांधून परत छकड्यांत ठेवलें. वाघ्या म्हणाला, "जातों, माझे बाय."

"तुमचं घर कुठंय वाघ्याबाबा?" चांगुणेनें त्याला सहज विचारलें.

वाघ्या हसला. "आम्ही खंडोबाचीं मानसं. आम्हाला कुटलं घर न कुटलं दार?"

चांगुणेला नवल वाटलें. "मंग राहता कुटं बाबा?"

"त्या तिथं!" समोरच्या बाणाईच्या देवळाकडे हात करून वाघ्या म्हणाला. "कधीं तिथं अन् कधीं कुटं!"

वेडेवाकडे हातवारे करीत अन् हातांतल्या घंट्या वाजवीत वाघ्या निघून गेला.

अंकुशाचा अजून पत्ता नव्हता. उन्हें उतरायला लागलीं. खंडोबाला कधीं जायचें! छकडेवाला खळखळ करायला लागला.

"ह्याच्यापुढं तुम्ही वर कधीं जानार अन् परत कवा निघनार?"

पण चांगुणा त्याला काय उत्तर देणार? ती अगदीं रडकुंडीस आली.

दिवेलागण व्हायची वेळ आली, तरी अंकुशा आला नाहीं. तेव्हां मात्र चांगुणेचा धीर सुटला. छकडेवाला तिच्यासमोरच सासवडला जाणाऱ्या स्वाऱ्यांची चौकशी करूं लागला.

इतक्यांत एक फाटक्यातुटक्या अंगाचा अन् कावऱ्याबावऱ्या चेहऱ्याचा इसम दबकत दबकत चांगुणेच्या रोखानें आला. आणि इकडे तिकडे पाहून त्यानें हळूच तिला विचारलें, "चांगुणाबाईच ना तुम्ही?"

"हां!" चांगुणेनें भीत भीत उत्तर दिलें. त्या माणसाचा चेहरा बघून चांगुणेच्या अंगावर कांटाच उभा राहिला.

"अंकुशरावांनीं तुम्हांला तिकडंच बोलावलं आहे!"

घोगऱ्या आवाजांत तो माणूस म्हणाला.

"तिकडं कुटं?" थोडासा धीर करून चांगुणेनें विचारलें.

"त्या ह्यांच्या घरीं!" तो माणूस तोंडांतल्या तोंडांत पुटपुटला.

"ह्यांना कशाला घेऊन जाताय? त्यांनाच इकडे पाठवून द्या कीं!" छकडेवाला मध्येंच त्या माणसाला चिडून म्हणाला, "दुपारीं आलं तसं जे गेलंत तेंचा अजून पत्त्या नाहीं! हें काय जानं म्हनत्यात! वाट पघता पघता ह्या बाईची मान तुटून गेली! आतां ह्याच्यापुढं निघायचं कवा?"

"ते नाहीं येनार!" तो माणूस एकदम बोलून गेला.

"म्हंजी काय?" छकडेवाला ओरडून म्हणाला, "रातभर काय आम्ही इथं बसायचं?"

"तें तुम्ही त्यांनाच इचारा." बेपर्वाईनें तो उत्तरला आणि 'चला हो' असें चांगुणेला मानेनें सांगून तो आल्या वाटेनें चालूं लागला.

त्याच्यामागून जावें कीं न जावें ह्याचा विचार करायला तरी तिला कुठें वेळ होता? छकड्यांतलें आपलें बोचकें घाईघाईनें उचलून ती त्या माणसाच्या मागून मुकाट्यानें चालूं लागली.

छकडेवाला मोठ्यानें ओरडला, "मी हा चाललों हो बाय!—सांगा तुमच्या कारभाऱ्यांना!"

छकडेवाल्याची आरोळी चांगुणेला ऐकूंच आली नाहीं. तिचें डोकें सुंद झालें होतें. तिला तें गांव माहीत नव्हतें. तो माणूस माहीत नव्हता. कुठें

जातो तें ठाऊक नव्हतें. ती अंधारांत मुकाट्यानें ठेचाळत त्याच्या मागून जात होती.

चारदोन वळणें इकडेतिकडे वळल्यानंतर तो माणूस एका अरुंद बोळाच्या तोंडाशीं आला. आणि किंचित् थबकला. मागून चांगुणा येते कीं नाहीं हें त्यानें वळून पाहिलें. ती जवळ आल्यावर तो पुन्हा पहिल्यासारखा चालूं लागला.

बोळांत अंधार गुडुप होता. चिटपाखरूं देखील दिसत नव्हतें. चांगुणेला वाटलें कीं जाऊं नये. परत फिरावें. पण परत तरी कुठें फिरणार? तो माणूस तर एक अक्षर बोलत नव्हता. झपझप पुढें चालला होता. त्यामुळें चांगुणेला जास्तीच भय वाटूं लागलें.

बोळाच्या दुसऱ्या टोकाशीं एक पडकें घर होतें. त्याला दरवाजा नव्हता. पायऱ्या वेड्यावाकड्या होत्या. त्या चढतांना चांगुणा खालीं बघूं लागली. तोंच आंतून तिला तुणतुण्याचा अन् ढोलकीचा आवाज ऐकूं आला.

ती एकदम थबकली. "इथं कुटं?"

"इथंच." तो माणूस म्हणाला.

अंगणांत वीत वीत गवत उगवलें होतें. तें ओलांडून ते पलीकडे गेले. पडवीच्या एका ठेंगण्या दारामधून वाकून तो माणूस आंत शिरला.

तुणतुण्याच्या अन् डफाच्या अधिक मोठ्या झालेल्या आवाजामधून एका बाईचाही तारस्वर उमटला—

**राया, चला घरीं**
**सख्या, चला घरीं**
**झोप येईना पलंगावरी!**

चांगुणेच्या अंगावर तरतरून कांटा उभा राहिला. दुपारीं छकड्यांत अंकुशाच्या तोंडून जीं गाणीं ऐकलीं तसलाच त्या गाण्यांचा ढंग होता.

पडवींत अंधार होता. पुढें आणखी दोन खोल्या होत्या. शेवटच्या खोलीच्या दारापाशीं मात्र उजेड दिसला. तिथें दाराच्या चौकटीवर हात ठेवून तो माणूस उभा राहिला. तेव्हां चांगुणा थबकली अन् दोन पावलें मागेंच सरकली.

गाणें एकदम थांबलें. राठ आवाजानें आंतून कोणीतरी विचारलें, "आली?" तो अंकुशाचाच आवाज होता. चांगुणेनें ओळखला.

"ही काय!" तो माणूस हात मागें वळवून म्हणाला.

"तिकडं काय करतीस चांगुणा? आंत ये ना!"

घोगऱ्या आवाजानें आंतून अंकुशा ओरडला.

पण चांगुणेचा पाय पुढें सरकेना. तो आवाज तिला फारच चमत्कारिक वाटला.

"ममते, जा घेऊन ये तिला." अंकुशानें कोणाला तरी सांगितलें. "लाजतियां ती!" अंकुशा भेसूरपणें हसत म्हणाला.

घुंगरें खुळ खुळ खुळ वाजलीं. अन् अठरावीस वर्षांची एक काळी ढुस्स पोरगी ठुमकत अन् लचकत दारांत आली. तिनें पिवळसर अन् पांढऱ्या रंगाचें पातळ काचा मारून नेसलें होतें. अन् कपाळाला भंडाऱ्याचें मळवट भरलें होतें.

"अव, या कीं" ती दांत विचकत चांगुणेला म्हणाली.

तिचा तो लवळपणा चांगुणेला हिडिस वाटला. ती आणखीन् दोन पावलें मागें सरकली. तशी ती पोरगी तरातरा पुढें आली. अन् चांगुणेचें मनगट धरून तिनें तिला आंत ओढीत नेलें.

एका फाटक्या हतरीवर मळक्या वळकटीला टेकून अंकुशा अस्ताव्यस्त पडला होता. त्याचा पटका अन् जाकीट त्याच्या अंगाखालीं चुरमडलेलें होतें. त्याचे डोळे तारवटलेले होते अन् तोंड खालीं लोंबत होतें.

त्याच्या बाजूला थोड्या अंतरावर पांढरीं पातळें नेसलेल्या अन् कपाळाला भंडारा लावलेल्या दोन प्रौढ वयाच्या बाया बसलेल्या होत्या. त्यांपैकीं एकीच्या हातांत तुणतुणें अन् दुसरीच्या हातांत टाळ होता. समोरच्या बाजूला एक म्हातारा माणूस ढोलकें घेऊन बसला होता.

चांगुणेला कळेना आपण कुठल्या जगांत आलों आहोंत, अन् हें काय बघतों आहोंत. त्या पोरीनें तिला ओढीत ओढीत थेट अंकुशाच्या शेजारीं नेऊन आदळलें. त्या फाजीलपणाचा चांगुणेला असा कांहीं राग आला—

पण अंकुशानें तिच्या गळ्यांत हात घालून एकदम तिला जवळ ओढलें. लाजेपेक्षां त्याच्या अंगामधून निघणाऱ्या दुर्गंधीनें तिला अधिक मेल्याहून मेलें झालें. तीच ती घाण! सकाळीं तिला छकड्यांत आलेली. पण सकाळपेक्षां किती तरी भयंकर! चांगुणेनें डोळे गच्च मिटून घेतले. आणि श्वास रोधून धरला.

"ममते, कशी हाय माझी बायकू?" अंकुशा विचकटपणें हसून त्या काळ्या पोरीला म्हणाला.

तशी ममती फणकाऱ्यानें नाक उडवीत अंकुशाच्या समोर जाऊन बसली. अन् म्हणाली, "माझ्याशीं नका बोलूं. मी नाहीं बोलत तुमच्यासंगं."

त्याबरोबर अंकुशानें चांगुणेला सोडून दिलें, आणि दोन्ही हातांनीं ममतीच्या गळ्यांत मिठी मारून तिला जवळ ओढलें.

"असं कां ग?" अंकुशानें तळमळून तिला विचारलें.

"बायकूच्या गळ्यांत पुतळ्यांची माळ अन् माझ्या गळ्यांत?" ममती मोटा हुंदका देत म्हणाली.

"नग रडूंस!" ममतीला आणखीन् कुरवाळीत अंकुशा म्हणाला, "तुला पुतळ्यांचीच माळ पाहिजे ना? ही घे!"

अंकुशाचा हात एकदम चांगुणेच्या गळ्यावर पडला. तसे तिनें भेदरून एकदम डोळे उघडले. तिचें सर्वांग लटलट कांपूं लागलें. आपली पुतळ्यांची माळ दोन्ही हातांनीं तिनें गच्च आवळून धरली.

"काढतीस कीं नाहीं माळ गळ्यांतली?" तिच्या मानेवर थप्पड मारीत अंकुशा भेसूर मुद्रेनें ओरडला.

"मी पाया पडत्यें तुमच्या—सासूबाई मारत्याल मला!" अंकुशाचे पाय धरून गयावया करीत चांगुणा म्हणाली. तिच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहूं लागल्या.

"चुलखांडांत गेलीस तूं न् तुझी सासूबाई! काढ माळ गळ्यांतली नाहीं तर डोकसंच फोडतो तुझं!" असं म्हणून पलीकडे मोकळी पडलेली एक मोठी काळी बाटली दांतओठ खात अंकुशानें चांगुणेच्या डोक्यावर उगारली.

त्याबरोबर गळ्यांतली पुतळ्यांची माळ पटकन् काढून चांगुणेनें अंकुशाच्या अंगावर फेकली, अन् दोन्ही हातांनीं तोंड झाकून ती ढसाढसा रडत कोपऱ्यांत जाऊन बसली.

ममतीच्या गळ्यांत पुतळ्यांची माळ घालतां घालतां अंकुशा तिचा गालगुच्चा घेऊन म्हणाला, "ममते, आतां झाली पाहिजे!"

त्याबरोबर ढोलक्यावर कडकडून थाप पडली. तुणतुणें न् टाळ एकदम वाजूं लागलीं. छुम् छनन् करीत ममतीनें गरकन् एक गिरकी मारली. अन् कानावर हात ठेवून चढ्या सुरांत अशी कांहीं तिनें ललकारी सोडली म्हणतां—

सोडा, सोडा, मानेची सख्या मिठी
बुचड्याची बिघडलि माझ्या पटी!

ते सूर अंकुशाच्या काळजांतून आरपार गेले. चांगुणेला बोलवायला आलेल्या माणसानें बेवडयाची आणखीन् एक बाटली अंकुशाच्या पुढें ठेवली. ती त्यानें सरळच तोंडाला लावली.

ढोलकी कडकडत होती. ममती गात होती. अंकुशा पीत होता. अन् चांगुणा रडत होती. असा किती वेळ गेला कोणास ठाऊक.

ममतीचें गाणें थांबलें नाहीं कीं अंकुशाचें पिणें संपलें नाहीं.

पण शेवटीं चांगुणेचें रडें मात्र सरलें. रडून रडून ती किती रडणार?

तिनें हळूच मागें वळून पाहिलें. तिच्याकडे कुणाचेंच लक्ष नव्हतें. तिच्या-पलीकडचें एक दार उघडें होतें. ती सरकत सरकत तेथपर्यंत गेली. अन् पटकन् आंत शिरली.

आंत अंधार होता. त्यांत चाचपडतां चाचपडतां तिला आणखीन् एक दार सांपडलें. तें बंद होतें. आंतून त्याला कडी होती. ती काढून दार उघडतांच बाहेरून वाऱ्याची झुळुक आली. तेव्हां तिकडे अंगण आहे असें तिच्या लक्षांत आलें.

अंगणांत आल्यावर दरवाजा सांपडायला कांहीं तिला फार वेळ लागला नाहीं. दरवाज्यांतून बाहेरच्या बोळांत आल्यावर तिनें एकदम जोरानें धूम ठोकली.

अंधाराचें आतां आपल्याला भय वाटत नाहीं असें तिला आढळून आलें. वाट फुटेल तिकडे ती पळत सुटली. दहापंधरा मिनिटांनीं घरांच्या चक्रव्यूहां-तून ती बाहेर पडली आणि एका मोकळ्या पटांगणांत आली. तेव्हां तिला हायसें वाटलें.

आजूबाजूला ती बघूं लागली. तों दुपारीं तिनें पाहिलेलें जेजुरीच्या डोंगरावरचें खंडोबाचें देऊळ तिला अंधारांत सुद्धां अगदीं स्पष्ट दिसलें. खंडोबाचें देऊळ बघून तिला इतका धीर आला. हात जोडून पुन्हा तिनें त्याला नमस्कार केला.

दुपारीं आपण कुठें उतरलों होतों हें तिच्या मग लक्षांत आलें. पण तिथें आतां छकडा दिसत नव्हता.

"गेला असावा परत—" ती मनांत म्हणाली.

तिनें डाव्या बाजूला पाहिलें तों वाघ्यानें दाखवलेलें बाणाईचें देऊळ तिला दिसलें. तिथेंच वाघ्या राहतो ना?—तो विचार मनांत येतांच ती त्या देवळा-कडे धावत सुटली.

देवळांत बाणाईजवळ दिवा मिणमिण जळत होता. बाहेर दगडी मंडपांत चारपांच माणसें इथें तिथें झोपलेलीं होतीं.

चांगुणा बाहेरून मोठ्यानें ओरडली, "वाघ्याबाबा—वाघ्याबाबा!"

त्यावर झोपलेला एक माणूस चटकन् उठून बसला.

"कोन हाय?" त्यानें विचारलें.

चांगुणेनें वाघ्याचा आवाज बरोबर ओळखला—तोच तो. असा आनंद झाला तिला. ती तीरासारखी आंत धावली.

"मी चांगुणा—दोपारीं तुमच्या संगं भाकर खाल्लेली—"

वाघ्या एकदम उठला अन् कळवळून म्हणाला, "इतक्या रातीची कुटं फिरतेस ग माझे बाय?"

चांगुणेनें वाघ्याच्या कमरेला एकदम मिठी मारली. आणि ती ढसढसून रडूं लागली.

● ● ●

.४.



अंकुशाची आई छकडेवाल्याकडे आ वासून पाहातच राहिली.

"म्हंजी काय? अन् माझा ल्योक अन् सून कुठैत?" तोंडावर बोटें ठेवीत तिनें आश्चर्यानें विचारलें.

"आपल्या कानीं सात बाळ्या, खंडोबाच्या आरोळ्या! आपऱ्याला कायबी ठाऊक नाहीं."

छकडेवाल्यानें कानांवर हात ठेवले अन् तो चालता झाला.

"भिमे," अंकुशाच्या आईनें आपल्या लेकीला विचारलें, "आतां ग काय करायचं?"

"तूं कशाला आपळं डोकसं पिकवतेस?" भिमी म्हणाली, "अंकुशा काय आतां ल्हान हाये? बायकूला घेऊन गेलाय देवाला. राहील दोनचार दिवस तिथं. येईल परत."

पण म्हातारीला कांहीं चैन पडेना. दिवसभर ती आपली दाराकडे बघत होती. तिला सारखें वाटत होतें, अंकुशा आतां येईल—मग येईल.

संध्याकाळचे सुमारास एक गाडी येऊन दारापुढें उभी राहिली.

"अग भिमे, अंकुशा आला ग—"

पण गाडींतून एक वाघ्या बाहेर पडला. त्याच्या मागोमाग चांगुणा उतरली. अन् अंकुशा? म्हातारी डोळे फाडून फाडून बघूं लागली. अंकुशा कुठें दिसेचना.

"अंकुशा कुटं हाय गं?" म्हातारीनें आंतूनच विचारलें.

चांगुणा कांहीं बोललीच नाहीं. तिनें आपला पदर तोंडावर आडवा धरला. आणि ती उंबरा ओलांडून आंत आली. तिच्या पाठोपाठ वाघ्या आला.

वाघ्या म्हणाला, "माझे माय, त्या गाडीला दीड रुपया द्यायचा हाय."

"पन अंकुशा कुठंय?" चांगुणेच्या दंडाला धरून म्हातारी मोठ्यानें ओरडली. तिला कांहीं तरी संशय आला.

"ते तिथंच राहिलेत!" चांगुणा खालीं पाहात क्षीण आवाजांत म्हणाली.

"तिथं कुठं?" म्हातारीचा एकदम आवाजच बसला.

"मला नाय ठावं." मान हलवीत दीनवाण्या स्वरानें चांगुणा म्हणाली.

"अन् तूं कशाला आलीस हितं त्याला सोडूनशान?" पडवीमधून भिमी संतापून ओरडली.

"मी घेऊन आलों तिला माझे माय!" वाघ्या आपल्या गुळचट आवाजांत मध्येंच म्हणाला, "एकटी रस्त्यावर कुठं राहनार ही तरनीताठी पोर?"

भिमी गप्प बसली. म्हातारी तिच्या तोंडाकडे टकमक बघूं लागली. दोघीं-नाही वाटलें, कांहीं तरी भानगड आहे.

म्हातारी म्हणाली, "भिमे, त्या देवळींतल्या मडक्यांतला दीड रुपया दे ग त्या गाडीवाल्याला."

भिमी पैसे देऊन आली. तोंपर्यंत म्हातारी बोललीच नाहीं. भिंतीकडे तोंड करून चांगुणा गपचिप पडवीमध्यें बसली होती. वाघ्याही पडवीच्या खांबाला टेकून उकिडवा बसला होता.

म्हातारी चांगुणेच्या जवळ जाऊन बसली. आणि तिच्या पाठीवर हात फिरवून बारकाईनें तिला न्याहाळूं लागली.

"चांगुणा!" एकदम आठवण होऊन घोगऱ्या स्वरांत म्हातारीनें विचारलें, "अन् तुझं बोचकं कुठं हाये?"

"तें त्यांच्या जवळच तिथं राहिलं—" चांगुणा तोंडांतल्या तोंडांत पुटपुटली.

"आतां काय ह्या कर्माला सांगावं?" म्हातारी स्वतःशींच विव्हळली. इतक्यांत तिचा हात चांगुणेच्या गळ्यापाशीं गेला. विंचू डसावा तसा झटकन् तिनें आपला हात बाहेर काढला. आणि ती मोठ्यानें ओरडली, "अग रांडं, तुझी माळ कुटं हाय गळ्यांतली?"

चांगुणा एकदम गळा काढून रडूं लागली. म्हातारी तिचा गालगुच्चा धरून किंचाळली, "रडतेस काय टवळे? सांग सांग. कुटं गमावलीस माझी पांच तोळ्यांची माळ?"

"ती बी त्यांनींच काढून घेतली—" शेवटीं हुंदके देत देत चांगुणेनें सांगितलें.

"त्यो लाख काढून घेईल. तूं कशाला त्या मेल्याला घेऊन दिलीस?" चांगुणेच्या पाठींत एक जोरानें धपाटा मारून म्हातारी म्हणाली. तिचा संताप आतां अगदीं अनावर झाला.

"नागवेलीच्या पानावानी पोर हाय ती!" वाघ्या कळवळून म्हणाला, "तिला नगा मारूं माझे माय!"

म्हातारीला अन् भिमीला कळून चुकलं, कीं अंकुशानें कांहीं तरी घोटाळा केला.

"अन् मंग जेवलीस कुटं?" आठवण होऊन म्हातारीनें विचारलें.

"काल दोपारीं तिनं न् मी संगं भाकर खाल्ली." वाघ्यानें सांगितलें. "मींच बळं बळं तिला खाऊं घातली. तवापासून आतापतर पोरीच्या पोटांत पान्याचा थेंब न्हाई माझे माय!"

तेव्हां म्हातारीनें चांगुणेला कळवळून एकदम पोटाशीं धरलें.

"जा ऊठ, आर्धी दोन घास खाऊन घे." चांगुणेचें तोंड कुरवाळीत म्हातारी म्हणाली, "कशी सुकून गेली जाईची येल!"

भिमी आंत गेली. चांगुणा रडत रडत तिच्या मागून गेली.

"अन् भिमे," म्हातारी बाहेरून ओरडली, "वाघ्याबाबालाबी भाकर अन् कोरड्यास आन ग!"

वाघ्या पोटभर जेवला. पाणी प्यायला. डोळ्यांत पाणी आणून म्हातारी त्याला म्हणाली, "बाबा, तुम्ही व्हतां, म्हून माझी पुतळ्याची ही माळ तरी परत आली."

"आम्ही खंडूबाचीं मानसं!" वाघ्या कळवळून म्हणाला, "ज्याची भाकर

खाऊं त्याच्या पायांत आमच्या कातडयाचं जोडं करून घालूं!"

म्हातारीच्या कपाळाला भंडार लावून अन् 'येळकोट मल्हार' करून वाघ्या निघून गेला.

रात्रीं अंथरुणावर पडल्या पडल्या म्हातारीनें अंकुशाबद्दल चांगुणेला खूप खोदून खोदून विचारलें, "तो कुटं गेला? कवा गेला? पुतळ्याची माळ त्यानं कां म्हून घेतली?"

पण पहिल्यानें चांगुणेनें जें एकदां सांगितलें त्याहून एक अक्षरही अधिक ती बोलली नाहीं. रात्रभर म्हातारी तळमळत पडली.

दोन दिवस झाले. चार दिवस झाले. चांगले आठ दिवस होऊन गेले. पण अंकुशाचा पत्ता नाहीं. त्याच्या काळजीनें म्हातारी अगदीं खंगून गेली. तिनें शेतावर खाशाबालाहि कळविलें नाहीं.

"त्यांना कळालं म्हंजी त्ये सारं गांव डोक्यावर घेत्याल." म्हातारी भिमीला म्हणाली.

मागें मार खाऊन जसा अंकुशा दवाखान्यांत येऊन पडला, तसें तर पुन्हा कांहीं झालें नाहीं? हें एकच म्हातारीला भय होतें. ती रोज मनांतल्या मनांत खंडोबाला नवस करीत होती.

दहाव्या दिवशीं पहाटे एक गाडी दारासमोर येऊन उभी राहिली. तिच्या चाकाचा आवाज म्हातारीनें ऐकला. तशी पटकन् ती अंथरुणावर उठून बसली. तिनें इकडे तिकडे पाहिलें. भिमी अन् चांगुणा झोपल्या होत्या.

भीत भीत म्हातारी उठली. पाय न वाजवतां दाराशीं गेली. अडसर काढून तिनें दार उघडलं. अन् तें किलकिलें करून ती बाहेर बघूं लागली.

दाराच्या चौकटीकडे खालवर पाहात एक माणूस उभा होता. दारांतून कोणी तरी बघते आहे असें पाहून त्यानें विचारलें, "खाशाबा जगतापाचं घर ह्येंच ना?"

दार उघडून म्हातारी चटकन् बाहेर आली. अंकुशाचीच बातमी घेऊन तर हा आला नाहीं, ना? तिला शंका आली.

"हां ह्येच," तोंडाला पदर लावून म्हातारी म्हणाली. आणि तो पुढें काय बोलतो आहे ह्याची ती वाट पाहूं लागली.

पण तो कांहीं बोललाच नाहीं. तो गाडीच्या मागल्या बाजूला गेला अन् गाडीवाल्याला म्हणाला, "गाडीवाले, तुम्ही धरा त्यास्नी तिकडून!"

तुम्ही धरा त्यांस्नी तिकडून ? म्हणजे काय ? म्हातारीच्या छातींत धस्स झालें.

"कोन हाय गाडींत ?" म्हातारी एकदम ओरडली.

"तुमचं कुशाबा !" गाडींतल्या माणसाचे पाय अर्धवट बाहेर काढीत तो माणूस शांतपणें म्हणाला.

म्हातारी गाडीपाशीं धावली. अंकुशाच होता तो ! गाडीमध्यें निपचित पडला होता.

त्याची मान एका बाजूला कलली होती. अन् हात अस्ताव्यस्त पडले होते.

त्याचे गुडघे दोन्ही हातांनीं धरून म्हातारी त्याला हलवूं लागली, "अंकुशा— अंकुशा—"

पण अंकुशानें कांहीं हालचाल केली नाहीं. म्हातारीनें घाबरून त्या माणसाला विचारलें, "म्हंजी, झालंय काय ह्याला ? मारलं बिरलं तर न्हाई कुनी ?"

"मारतंय कोन ? लई बीमार हाय त्यो !" तो माणूस विव्हळत म्हणाला.

गाडीवाल्यानें न् त्यानें अंकुशाला हलकेच गाडींतून खालीं उतरवलें. आणि दोघांनीं दोहींकडून उचलून त्याला घरांत आणलें.

बाहेरचा आवाज ऐकून भिमी अन् चांगुणाही जाग्या झाल्या होत्या. अंकुशाला आंत आणतांना बघून भिमीनें माजघरांतलें अंथरूण उचलून बाहेर पडवींत आणलें. त्यावर त्या दोघांनीं अंकुशाला अलगद ठेवलें.

अंकुशाला कशाचें भानच नव्हतें. त्याचा चेहरा पार बदलून गेला होता. तोंडाचें कातडें करपल्यासारखें एकदम लाल अन् काळें पडलें होतें. श्वास घेतांना त्याला कष्ट पडल्यासारखें दिसत होतें. तो मधून मधून कण्हत होता.

अंकुशाची अवस्था बघून म्हातारीच्या जिवाचें पाणी पाणी झालें. त्याच्यावरचा तिच्या मनांतला राग कुठल्या कुठें वितळून गेला. त्याच्या अंगांतलें नुसतें धोतर अन् पैरण बघून म्हातारीनें त्या माणसांना हलकेंच विचारलें, "अन् ह्याचीं दुसरीं कापडं काय झालीं ?"

"देवास ठावं !" तो माणूस तोंड वेडेंवाकडें करून म्हणाला. "जेजुरीच्या धर्मशाळेंत ह्यो चार दिस पडून होता. सासवडच्या एका माणसानं त्याला वोळाखलं अन् पोलिसपाटलाला वर्दी दिली. जेजुरीहून आमची गाडी इकडे यायची होती. पाटील म्हंगाले ह्याला घरीं पोहोंचवा !"

म्हातारीनें पाटलाला अन् त्या माणसांना तोंड भरून दुवा दिला. ते निघून गेले.

अंकुशाच्या उशाशीं येऊन म्हातारी बसली. अन् त्याच्या कानाशीं तोंड नेऊन हाका मारूं लागली. "अंकुशा, अंकुशा—"

अंकुशानें अर्धवट डोळे उघडले, आईकडे बघितल्यासारखें केलें. अन् पुन्हा डोळे मिटून मोठ्यानें कण्हूं लागला.

"काय दुखतंय पोराचं कुनास ठावं?" अंकुशाच्या कपाळावर हात फिरवीत म्हातारी पुटपुटली. त्याचें कपाळ थोडेंसें ऊन लागत होतें. पण अंगांत कांहीं ताप नव्हता.

भिमी आंतून एका बुटकुल्यांतून दूध घेऊन आली. म्हातारीनें तें त्याच्या तोंडांत थेंब थेंब करून ओतलें. तो तें गपचुप प्याला.

संध्याकाळपर्यंत त्याच्या तोंडांत बरेंचसें दूध गेलें. तेव्हां त्याचें कण्हणें थांबलें. श्वासही कमी झाला. भैरोबाच्या देवळांतून म्हातारी अंगारा घेऊन आली. तिनें तो त्या रात्रीं त्याच्या कपाळाला लावला. अन् अंथरुणाभोवतीं फुंकला.

रात्रीं अंथरुणावर पडल्या पडल्या भिमी म्हातारीच्या कानांत हळूच म्हणाली, "मी सांगतें आय. कुनी तरी फसवून तिथं दारू पाजली हाये. म्हून त्याच्या पोटांत एवढी आग पडली दिसतीया. उद्यां सकाळपत्तर चांगला बरा होईल ह्यो!"

म्हातारीलाही तसेंच वाटलें. मनांतल्या मनांत तिनें खंडोबाला नवस केला. "मल्हारीराया, माझ्या पोराला बरं वाटूं दे रे बाबा. म्हंजे चंपासटीला जेजुरीला येऊन मी तुझं बगाड घेईन."

दुसरे दिवशीं सकाळीं उन्हें पडलीं, तरी तोंडावर पांघरूण घेऊन अंकुशा झोपला होता. म्हातारी त्याच्या उशाशीं किती तरी वेळ बसून होती. तिला वाटलें, अंकुशाला चांगली झोप लागली आहे म्हणून. तिला मनांतून खूप आनंद झाला.

भिमी दूध घेऊन आली. म्हणाली, "उठीव त्याला आतां." म्हातारीनें 'अंकुशा' म्हणून हाक मारली. आणि तोंडावरचें पांघरूण हलकेंच बाजूला केलें.

अंकुशा जागा होता. त्याचे डोळेही पण उघडे होते. म्हातारी त्याच्याकडे पाहून हसली. पण त्याच्या चेहऱ्यावरचें कातडें कांहीं हललें नाहीं. तो नुसता टकटक तिच्याकडे पाहात होता.

म्हातारीला त्याचें तोंड कांहीं तरी निराळेंच दिसलें.

"भिमे," ती म्हणाली, "जरा इकडे ये ग." भिमी जवळ आली.

"ह्याच्या तोंडावर ग काय हें आलंय?" म्हातारीनें हळूच विचारलें.

अंकुशाचें तोंड बघून भिमी एकदम दचकलीच. त्याच्या साऱ्या तोंडावर चवलीपावलीसारखे वाटोळे अन् लाल लाल चट्टे उमटले होते.

भिमीनें त्याचें पांघरूण काढलें अन् पैरण वर करून पाहिलें.

त्याच्या साऱ्या पोटावर अन् छातीवर तसलेच लाल लाल डाग होते.

पायांवर पाहिले, पायांवरही होते. हातांवर पाहिले, हातांवरही होते. पायापासून डोक्यापर्यंत त्याचें सारें अंग लाल चट्टयांनीं अगदीं फुलून गेलें होतें.

म्हातारी अन् भिमी मनांतल्या मनांत खूपच घाबरून गेल्या. पण बाहेरून त्यांनीं कांहीं दाखविलें नाहीं.

"देवीबिवी तर न्हाईत?" म्हातारीनें विचारलें.

"पित्ताचं दिसतंय काय तरी!" भिमी म्हणाली.

चारदोन दिवसांनीं अंकुशाच्या अंगावरचे ते चट्टे जास्त जास्तच लाल होत चालले. अन् त्यांतले कांहीं तर पिवळे होऊन फुटले, अन् वाहूं लागले. अंकुशाच्या सर्वांगाला तडस लागली. अन् तो मोठमोठ्यानें विव्हळूं लागला.

तेव्हां म्हातारीचा धीर सुटला. अंकुशाचें हें दुखणें आपल्या एकट्याच्या हातून निभायचें नाहीं, हें तिच्या लक्षांत येऊन चुकलें. तिनें खाशाबाला निरोप पाठवून ताबडतोब बोलावून घेतलें.

बायकोच्या तोंडून अंकुशाची इत्थंभूत हकीकत ऐकून खाशाबाची कंबरच मोडली. तो कपाळाला हात लावून तसाच किती वेळ तरी गप्प बसला. अंकुशाला काय झालंय ह्याची थोडीशी कल्पना त्याच्या मनाला चाटून गेली. अन् त्याचें काळीज थरं झालें.

"उद्यां डाक्तरालाच दावा त्याला." म्हातारीनें हळूच सुचविलें.

"नग!" खाशाबा जोरानें मान हलवीत म्हणाला, "इथलं कोनी नग!"

खाशाबाच्या डोक्यांत कांहीं तरी दुसराच विचार चालला आहे हें म्हातारीच्या ध्यानांत आलें. त्यावरून अंकुशाचें दुखणें त्यांना कांहीं तरी निराळें वाटतें आहे हें तिला उमगलें.

"तरी मी भिमीला त्या वक्तीं म्हंगालें कीं तूं त्यांच्या संगं जेजुरीला जा म्हून!" म्हातारी हळहळून म्हणाली.

"आतां मला तरी टवळीला काय माहीत हें असं व्हईल म्हून!" भिमी

कपाळावर हात मारून म्हणाली.

"बम्र्यानं जें लिहून ठिवलंय कपाळीं तें का कधीं कुनाला टळलंय?" खाशाबा वर पाहात सुस्कारा टाकून म्हणाले.

दुसऱ्या दिवशीं पहाटे खाशाबा गराडयाला गेले. अन् तेथून गराडकर वैद्याला घेऊन आले. वैद्यबुवांनीं अंकुशाची सारी हकीकत विचारून घेतली. अन् तासभर त्याला तपासलें.

गंभीर चेहरा करून वैद्यबुवा उठले. अन् खाशाबाला पडवीच्या दुसऱ्या बाजूला घेऊन गेले. खाशाबाच्या खांद्यावर हात ठेवून त्यांच्या कानांत कांहीं तरी त्यांनीं सांगितलें.

खाशाबाला जें भय वाटत होतें तेंच खरें ठरलें. त्यांच्या हातापायाला मुंग्या आल्या. अन् त्या डोक्यापर्यंत सरसर चढत गेल्या. डाव्या हातानें त्यांनीं पडवीच्या खांबाचा आधार घेतला.

"त्याचं लग्न झालंय का?" वैद्यबुवानें हळूच विचारलें.

"एक महिनाबी अजून झाला न्हाई. काय सांगावं!" डोळ्यांत पाणी आणून खाशाबा म्हणाले.

"मग असं करा. त्या मुलीला इथं ठेवूं नका. तुमच्याबरोबर शेतावर घेऊन जा तिला." वैद्यबुवांनीं सांगितलें.

"बरा न्हाय व्हायचा त्यो?" भीत भीत खाशाबांनीं विचारलें.

"होईल. पण फार वेळ लागेल त्याला." वैद्यबुवा चिंतातुर स्वरांत म्हणाले, "फार वाईट रोग आहे हा. मजजवळ औषध आहे चांगलं. पण गुण येणं हा सर्व प्राक्तनाचा भाग आहे."

दोनतीन महिन्यांचें औषध बांधून देऊन वैद्यबुवा निघून गेले.

त्यांना दाराबाहेर पोहोंचवून जड पावलांनीं खाशाबा परत आले. म्हातारी अन् भिमा मोठ्या आशेनें त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागल्या. पण खाशाबांनीं त्यांच्याकडे बघितलें नाहीं. ते तसेच आंत घरांत गेले.

चुलीपाशीं चांगुणा एकटीच बसली होती. गुडघ्यावर हनुवटी ठेवून दीनवाण्या दृष्टीनें ती खालीं पाहात होती. आणि पायाच्या आंगठ्यानें जमिनीचा पोपडा उकरीत होती.

खाशाबांनीं तिच्याकडे नुसतें पाहिलें मात्र. मटकन् ते खालींच बसले. आणि दोन्ही हातांनीं तोंड झाकून एकदम लहान मुलासारखे गळा काढून रडूं लागले.

म्हातारी न् भिमी मागून धावल्या. खाशाबांना रडतांना बघून त्यांनाहि भडभडून आलें. एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून त्या ढसाढसा रडूं लागल्या.

चांगुणा एकदम भेदरून उठली. वळवाच्या पावसावाणी तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या. धावत येऊन तिनें सासऱ्याच्या पायांवर लोळण घेतली. अन् हंबरडा फोडून ती म्हणाली, "मामा, नका असं रडूं वो!"

त्याबरोबर खाशाबाच्या दुःखाला आणखी भरतें आलें. तिला उचलून त्यांनीं जवळ घेतलें.

अन् हुंदके देत ते म्हणाले, "पोरी, कसं होनार तुझं? कुठून मला अवदसा आठवली ह्या पोराचं लगीन करायची? म्यां चांडाळानं तुझा गळा कापला ग गळा कापला!"

असें म्हणून आसवांनीं ओल्या झालेल्या आपल्या गालावर ते फडाफडा मारून घेऊं लागले.

तेव्हां म्हातारीनें पुढें होऊन खाशाबांचा हात पकडला.

"तुम्हीं असा धीर सोडल्यावर आम्हीं कुनाच्या तोंडाकडं पघायचं?" म्हातारी रडत म्हणाली, "काय झालं तें तर आम्हास्नी सांगाल?"

"काय सांगायचं तुम्हास्नी डोसकं?" कपाळावर हात मारून खाशाबा म्हणाले, "खंडोबाला जाऊनशान त्या पोरानं ह्या पोरीच्या जलमाचा चांगलाच खेळखंडोबा केलान्, दुसरं काय?"

● ● ●

## ५.



चांगुणेला घेऊन दोनचार दिवसांनीं खाशाबा शेतावर गेले.

वैद्यबुवांनीं सांगितल्याप्रमाणें म्हातारी न् भिमी अंकुशाला औषध देऊं लागल्या. महिन्या दोन महिन्यांनीं त्याच्या अंगांवरचे चट्टे पुष्कळच कमी झाले.

पण कांहीं कांहीं चट्ट्यांचे व्रण झाले. आणि ते व्रण कांहीं केल्या भरून येईनात. उलट त्यांचा आकार दिवसेंदिवस वाढूं लागला.

ते व्रण रोज धुवून काढायचे. वैद्यबुवांनीं सांगितलेलें चूर्ण त्या व्रणांवर टाकून त्यावर फडकीं बांधायचीं. हें काम कांहीं सोपें नव्हतें. तें काम करतां करतां दोघांचा जीव अगदीं मेटाकुटीस आला.

अंकुशाचें पहिलें रूप पार बदलून गेलें. त्याचा निमगोरा रंग निघून गेला. कातडी खरखरीत काळी पडली. मांस झडून गेलें. बरगड्या बाहेर पडल्या. पाठीचा कणा वाकला. अन् डोक्याचे केस तर खराट्याच्या काड्यांसारखे निर्जीव दिसूं लागले.

अंकुशाला ज्यांनीं पूर्वीं पाहिलें होतें, त्यांना तर तो ओळखूंही आला नसता. पण, घरांतल्या घरांत तो फिरूं लागला. पहिल्यासारखा बोलूं लागला. बारकीं-सारकीं कामेंही करूं लागला. त्याच्या अंगावचे सारे व्रण भरून यायला जवळ-जवळ वर्ष लागलें.

दर तीन महिन्यांनीं खाशाबा किंवा त्यांच्या दोघा थोरल्या लेकांपैकीं कुणी-तरी गराड्याला जाऊन औषधें घेऊन येत. वर्षभर औषधें घेऊन घेऊन अंकुशा अगदीं कंटाळून गेला. मूळचाच त्याचा स्वभाव लहरी आणि अविचारी. त्यांत आजारीपणाची भर पडल्यापासून तर दिवसेंदिवस तो जास्त हेकट आणि चिडखोर बनला.

एक दिवस त्यानें आपल्या औषधाच्या पुड्या अन् गोळ्या उचलल्या आणि दारासमोरच्या गटारांत फेकून दिल्या.

"मी न्हाई आतां औषध खानार!" त्यानें आपल्या आईला निक्षून सांगितलें, "मला अक्षी चांगलं वाटतंया."

म्हातारीनें अन् भिमीनें त्याच्या खूप विनवण्या करून पाहिल्या. पण तो कांहीं ऐकेना.

दर आठ दिवसांनीं अंकुशाला पाहायला खाशाबा शेतावरून घरीं येत. पोरगा औषध घेत नाहीं हें म्हातारीनें त्यांना सांगितलें.

"असं नग करूस माज्या बाबा!" गयावया करून खाशाबा त्याला म्हणाले, "वैद्यबुवा म्हनत्यात आनखी सहा महिने औषध खाल्लं म्हंजी शाप बरा व्हशील!"

"मला काय बी झालं न्हाई!" अंकुशा त्यांच्या अंगावर ओरडून म्हणाला,

" तुम्ही मला तरास द्याल तर अफू खाऊन जीव देईन!"

जीवच देण्याची गोष्ट त्यानें केल्यावर मग खाशाबा काय बोलणार? ते घाबरून चीप बसले.

" जें काय कर्मांत असल तें व्हईल!" कपाळाला हात लावून खाशाबा आपल्या बायकोला म्हणाले.

आपली बायको आपल्यापासून आईबापांनीं दूर ठेवावी अन् वरीस झालें तरी तिचें नख देखील त्यांनीं आपल्याला दाखवूं नये, हें अंकुशाच्या जिवाला सगळ्यांत जास्त लागून राहिलें. त्या विचारानें त्याच्या सर्वांगाचा अतिशय भडका होई. पण तें त्याला उघडपणें कांहीं बोलून दाखवतां येत नसे.

दिवसेंदिवस तो जास्त चिडखोर होत चालला. कुठें कांबरुणें फाड, कुठें भांडीं फेकून दे—असा उद्योग त्यानें घरांत सुरू केला. म्हातारीला शिवीगाळ केली नाहीं अन् भिमीच्या अंगावर कुत्र्यासारखा धावून गेला नाहीं असा त्याचा एक दिवस जात नसे. त्यामुळें त्या दोघींना कुठें तरी पळून जावें असें वाटे.

खाशाबा शेतावरून घरांत आले म्हणजे तर अंकुशा मोठमोठ्यानें जमिनीवर डोकें आपटून घेई आणि गुरासारखा ओरडायला लागे. तेव्हां तर म्हाताऱ्यानें पुढें पुढें घरांतच यायचें मुळीं सोडून दिलें.

अंकुशाचे थोरले भाऊ साधू नि अर्जुना हे पहिल्यापहिल्यानें गराड्याहून कधीं औषध घेऊन आले तर सासवडच्या घरांत येत. पण ते अगदीं उभ्या-उभ्या. म्हातारीशीं दोन शब्द बोलले कीं ते आपले चालायला लागायचे. अंकुशाशीं तर कित्येक वर्षांपासून ते कधीं बोलत नसत. पण त्याचा कहार घरांत पुढें वाढूं लागल्याचें जसें त्यांनीं ऐकलें, तसें त्या दोघांनीं तिकडे जायचेंच बंद केलें.

एक दिवस अर्जुन्याची बायको बाळंतपणांत एकाएकीं वारल्याची शेतावरून बातमी आली. म्हातारी अन् भिमी गळा काढून रडूं लागल्या.

" तिच्या बाळंतपनाला मी तिथं गेल्यें न्हाई, म्हून पोरगी मेली!" असा म्हातारी स्वतःलाच दोष देऊं लागली.

" आतां पुन्हा कशाचं त्याचं लगीन व्हायचं?" असें म्हणून भिमी शोक करूं लागली.

" अन् त्यास्नी हवं कशाला आतां लगीन?" अंकुशा अचकट स्वरांत म्हणाला.

म्हातारी न् भिमी त्याच्याकडे बघतच राहिल्या.

"म्हंजी काय?" भीमी म्हणाली.

"म्हंजी हेंच!" भेसूरपणें हसत अंकुशा म्हणाला, "माझी बायकू हाय की त्यास्नी तिथं!"

भिमी त्याच्या अंगावर एकदम धावूनच गेली.

"मेल्या, तुझ्या जिभेला कांहीं हाड हाये कीं न्हाई?"

अंकुशा दात काढून मोठमोठ्यानें हसूं लागला. हसतां हसतां त्याला दम लागला.

"भिमे," धापा टाकीत कांहीं वेळानें अंकुशा म्हणाला, "तुझा नवरा मेला म्हून तूं रंडकी. अन् माझी बायकू जिती असून मी रंडका. अर्जुन्याची साल्याची मातर चैन हाये!"

स्वतःच्या बोलण्यावर खूष होऊन अगदीं उबळ आल्यासारखा अंकुशा हसूं लागला. आणि हसणें अनावर होऊन शेवटीं तो जमिनीवर पडला. नि गडबडां लोळायला लागला.

इतक्या घाणेरड्या आजारांत म्हातारीला अंकुशाची कधीं शिसारी आली नाहीं. पण तें त्याचें बोलणें ऐकून मात्र आली. त्याचें पुन्हा तोंड पाहूं नये असें तिला वाटलें. कानांवर गच्च हात दाबून ती उसळून उठली अन् तरातरा मागल्या दारीं गेली.

औषध घ्यायचें सोडून दिल्यानंतर चारसहा महिन्यानें अंकुशाच्या रोगानें पुन्हा उचल खाल्ली. त्याच्या अंगावरचे चारदोन व्रण पुन्हा उकलले अन् वाहूं लागले. त्याच्या एका डोळ्यामध्यें फूल आलें. अन् नाकाचा उंच वासा मध्येंच हळू हळू बसूं लागला.

म्हातारीला न् भिमीला तर त्याच्या चेहऱ्याकडे बघवेना. गांवांतल्या सगळ्या देवांना नवस करून म्हातारी दमून गेली.

घरांत बसून राहायचें अंकुशाच्या अगदीं जिवावर आलें. बाहेरही कुठं कोणाकडे जायची त्याला चोरी झाली. जो तो त्याला टाळी. आणि हिडिस फिडिस करी. गांवाबाहेर नदीकांठीं संगमेश्वराच्या देवळामागें एक वैराग्याची मठी होती. तिथें त्याच्या धुनीभोवतीं गांवांतले चार चंगीभंगी लोक गांजा ओढायला जमत. तिथें जाऊन अंकुशा रोज बसूं लागला. पुढें पुढें तर एक-दोन दोन दिवस तो घरींही येईनासा झाला.

बावाजींच्या धुनींत लाकडें टाकून तीं सारखीं पेटवत ठेवायचीं. त्यांच्या

जटांत घालण्यासाठीं राख वस्त्रगाळ करून ठेवायची. त्यांच्या छाटयांना मधून-मधून कावेचा रंग द्यायचा. अन् बाजारांतून त्यांच्यासाठीं रोज गांजा घेऊन यायचा. हीं बावाजींचीं निवडक कामें अंकुशाकडे आलीं. आणि चार-दोन महिन्यांत तो त्यांचा चेलाच बनला.

संध्याकाळीं धुनीच्या भोवतीं बावाजींची नित्याची बैठक बसली, अन् गांजाची चिलीम वाटोळीं फिरूं लागली, म्हणजे अंकुशाची 'बिमारी' हा त्यांच्या गप्पांचा अगदीं ठरलेला विषय असे.

"बावाजी, कुच भी करो ना!" चिलमीचा झुरका मारतां मारतां कुणी तरी म्हणायचे.

"क्यों नहीं? ज्यरूर!" अंकुशाच्या बसक्या नाकाकडे आणि डोळ्यांतल्या फ़ुलाकडे आपली धुंद दृष्टि दयार्द्रपणें लावून मान हलवीत बावाजीनें म्हणायचें.

बावाजीपाशीं कांहीं तरी जबरदस्त जडीबुटी आणि इलमें आहेत, अशी सर्वांची समजूत होती.

चारसहा महिन्यांनीं एक दिवस अंकुशाची बिमारी दुरुस्त करण्याचें बावाजींनीं खरोखरच मनावर घेतलें कीं. आपल्या एका भक्ताला दोन-तीन रुपयांची कांहीं औषधें स्वखर्चानें बाजारांतून खरेदी करून आणण्याची त्यांनीं आज्ञा केली.

याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं तो तीं औषधें भक्तिभावानें घेऊन आला. बावाजींनीं त्याचें रसायन बनविण्याचें काम लागलींच सुरू करून एका आठ-वड्याच्या आंत पुरें केलें.

'कैलासनाथजीकी वो दवाई' अंकुशाला विधिपूर्वक देण्याचा समारंभ एका संध्याकाळीं बावाजींच्या मठांत भरला.

नेहमींप्रमाणें धुनीभोवतीं सगळी मंडळी आपापल्या स्थानावर विराजमान झाली. बावाजींनीं अंकुशाला नदीवरून आंघोळ करून एक मंत्र मनांतल्या मनांत शंभर वेळा जपायला सांगितलें.

चिलमीच्या धुराचे भपकारे नाकातोंडांतून बाहेर सोडीत बावाजींनीं त्या दवाईची दिव्य कथा आपल्या भक्तांना सांगायला सुरुवात केली.

"जब इंद्रजीको सरगमें एक बखत ऐसी बिमारी हुवी, तब भगवान शंकर-जीने इस दवाई पहिले बनाई और इंद्रजीको दे दी. क्या समझे? उसके बाद शंकरजीने यह दवाई शृंगी को दी. शृंगीने वह भृंगी को दी. और भृंगीके पाससे यह दवाई हमारे गामका एक भंगी था उसने चुराई, और हमारे

दादाका एक चचा था उनको लाके दे दी."

"वाह्वा, वाह्वा! क्या कहने!"

सारे भक्त बेहोष होऊन माना डोलवूं लागले. चिलीम भराभरा वर्तुळांत फिरूं लागली.

अंकुशाचा जप पुरा झाल्यावर तो हात जोडून बावाजींच्या समोर येऊन बसला. एक कटोराभर दुधांत भांग तयार करून त्यांत तें रसायन बावाजींनीं कालवलें होतें.

अंकुशाच्या तोंडाला कटोरा लावून बावाजी ओरडले, "बोलो बं–भोलानाथ!"

सारे एकदम ओरडले—"बं–भोलानाथ!"

अंकुशानें एका दमांत सारा कटोरा गट गट गट पिऊन टाकला आणि बावाजींच्या पायांवर डोकं ठेवलं.

त्याच्या पाठीवरून हात फिरवीत बावाजी म्हणाले, "जा बेटा. घरमें जाकर आरामसे सोना. तेरा भला हो जायगा. एक हप्तेके अंदर तूं सचही हनुमानजी बनेगा!"

घरीं येईपर्यंत अंकुशाला भांग चांगलीच चढली होती. आठ दिवसांच्या आंत आपण हनुमानजी होणार, ह्या विचाराच्या आनंदांत त्याला ताबडतोब झोप लागली.

बावाजींनीं त्याला दोनचार दिवस स्वस्थ पडून राहायला सांगितलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं दिलेला मंत्र मनांतल्या मनांत पुटपुटत डोळे मिटून तो शांतपणें पडवींत पडून राही. त्याच्या वर्तनांत हा एकदम झालेला बदल बघून म्हातारीला न् भिमीला अचंबा वाटला.

'एका आठवड्याच्या आंत तूं हनुमानजी होशील!' हा बावाजींचा आशीर्वाद चौथ्या दिवसाच्या सकाळपासूनच खरा ठरायला सुरुवात झाली.

अंकुशा आपल्या अंथरुणांतून एकदम आरोळ्या मारीतच उठला आणि साऱ्या घरभर उड्या मारीत सुटला. त्याच्या सर्वांगाची आग आग होऊं लागली. घरांत होतें नव्हतें तेवढें पाणी तो भडाभड अंगावर ओतून घेऊं लागला.

त्याला कसें आवरावें अन् कसें थांबवावें हेंच म्हातारीला आणि भिमीला मुळीं कळेनासें झालें. अंकुशाला वेड लागलें ह्याबद्दल त्यांची अगदीं खात्री झाली.

घराचें दार त्यांनीं बंद केलें. आणि आंतून कडी लावून त्या एका खोलींत जाऊन बसल्या.

चारदोन तासांनंतर अंकुशाच्या आरोळ्या जशा ऐकूं येईनातशा झाल्या, तशा दोघीजणी खोलीचें दार उघडून हळूच बाहेर आल्या. आणि पाहूं लागल्या. तेव्हां स्वयंपाकघरांतल्या चिखलांत हातपाय पाखडत बेहोष पडलेला अंकुशा त्यांना दिसला.

त्यांनीं त्याला उचललें आणि धुवून पुसून साफ करून अन् कपडे बदलून त्याला पडवींत आणून एका कांबळयावर झोपविलें.

संध्याकाळपर्यंत त्याच्या शरीरांत झपाट्यानें बदल झाल्याचें त्यांना दिसून आलें. त्याच्या अंगाचें कातडें घिरड्याप्रमाणें एकदम जाड झालेलें आणि ठिकठिकाणीं सुरकुतून गांठी झालेलें त्यांना दिसलें. आणि चेहरा तर सुजून अक्षरशः मारुतीसारखा फाटून गेला.

दुसऱ्या दिवशीं म्हातारीनें खाशाबाला बोलावून आणलें. तोंपर्यंत अंकुशाच्या अंगावर जागोजाग उठलेल्या गांठी फुटून त्यांतून चिकट लस वाहूं लागली. आणि त्याच्या सर्वांगाला घाण मारूं लागली.

गराडयाला जाऊन खाशाबा गराडकर वैद्यांना घेऊन आले. वैद्यबुवांनीं अंकुशाला बघितल्याबरोबर सांगितलें कीं, "त्याच्या पोटांत पारा गेला आहे. त्याला आतां दुरुस्त करणें असाध्य आहे. तेव्हां आतां त्याला घरांतून हालवून कुठें तरी लांब बाजूला नेऊन ठेवा. इथें ठेवूं नका."

घराचें आढें डोक्यावर पडावें तसा चेहरा करून खाशाबा वैद्यबुवांकडे बघूं लागले. वैद्यबुवा जायला निघाले तेव्हां त्यांचा हात धरून कांपऱ्या आवाजांत खाशाबा त्यांना म्हणाले,

"वैद्यबुवा, मी म्हनतो, ह्या पोराच्या हातनं एक वेळ चूक झाली असंल. न्हाई असं न्हाई. पन ह्या जगामंदी काय न्याव हाय की न्हाई? सोन्यावानी त्याचं शरीर व्हतं अन् त्याचं आज असं मढं झालं. एवढं का देवाचं पातक त्यानं केलं व्हय? आपन समदीं परमेश्वराचीं लेकरं असं तुम्ही शेनी मानसं सांगतां. ह्या पोराला जलम देनाऱ्या आम्हा आईबापास्नी त्याचं हें दुःख पघवत न्हाई. अन् समद्या जगाला जलम देणाऱ्या त्या परमेश्वराला त्याचं दूख कसं पघवतं? न्हाई, मी म्हनतो, एवढ्याशा पोराचा इकता छळ करनं त्या देवबापाला सोसतं का व्ह?"

वैद्यबुवांचे डोळे भरून आले. ते [illegible] म्हणाले, "देवापेक्षां दैवाला

एक मात्रा जास्त आहे खाशाबा. दुसरं काय म्हणायचं?"

रानमाळ्याच्या वाटेवरचें खाशाबांचें शेत मोठें होतें. दहाबारा बिघ्यांचें. रस्त्याच्या तोंडालाच त्यांची पडळ होती. त्याच्या नेमक्या विरुद्ध कोपऱ्याला एक चिंचेचें मोठें झाड होतें. त्याच्या खालीं खाशाबांनीं एक लहानशी खोप बांधली. अन् त्याच्यांत अंकुशाला आणून ठेविलें.

खालीं गवत टाकून त्याच्यावर एक जाड तरट अन् गोधडी अंथरली. आणि त्याजवर त्याला झोपविलें. अंगावर घोंगडी पांघरून अंकुशा आपला नेहमीं तिथें पडलेला असायचा.

पाणी पिण्यासाठीं त्याच्या उशाला एक पाण्याचें मडकें आणि नरोटी ठेवलेली असे. सकाळ-संध्याकाळ दोन्ही वेळां त्याला भाकर घेऊन स्वतः खाशाबा जात. तें काम दुसऱ्या कोणालाही ते सांगत नसत.

अंथरुणावर पडल्या पडल्या अंकुशाच्या डोक्यांत अष्टौप्रहर एक विचार चाललेला असे. आपल्या बायकोचा. चांगुणेचा. आपल्या नासलेल्या शरीराचें आणि किळसवाण्या रोगाचें त्याला एवढें दुःख वाटत नसे. त्याचा आतां त्याला सराव झाला होता. त्यांच्या यातनाही त्याला विशेष जाणवत नव्हत्या. त्यांचा विचारच करायचें त्यानें जवळ जवळ सोडून दिलें होतें.

पण आपली लग्नाची बायको. आपल्या हक्काची चांगुणा. ती कां आपल्याकडे येत नाहीं? ती कां आपल्याला दिसत नाहीं? ती कां आपल्याला टाळते? मडक्यांतलें पाणी भरायला किंवा दोन्ही वेळची भाकर घेऊन तो थेरडा कशाला रोज रोज येतो? चांगुणा कां येत नाहीं? ह्या एका विचारानें त्याच्या सर्वांगाचा अगदीं भडका उडून जात असे.

चांगुणेचा चेहरा आतां त्याला आठवतही नव्हता. कशी दिसत होती बरें ती? आपल्यापेक्षां उजळ होती, नाकींडोळीं नीटस होती, नाहीं का? लगीन झालं तेव्हां तिची मुंडी गुडघ्यांतच होती. जेजुरीला जातांना ती छकड्यांत आपल्या शेजारींच बसली होती. पण डोक्यावर पदर ओढून अन् पाठ फिरवून.

शेवेचा घास आपण तिच्या तोंडांत कोंबला अन् मग तोंड वेडेंवाकडें करून तिनें तो घास थुंकून टाकला. हें चित्र जणुं कांहीं कालच आपण पाहिलें असें त्याला वाटे. आणि कशी आपण त्या वेळीं तिची गंमत केली ह्या विचारानें त्याला हसूं येई.

पण त्या गडबडींत आपण तिचा चेहरा कसा होता हें पाहायचें विसरलों ह्याचें त्याला वाईट वाटे. अरे हो—पण आपण त्या वेळेला तें प्यालों होतों नाहीं का?

—कशाला प्यालों?

त्या मुरळीच्या घरांत चांगुणा आली होती ह्याची त्याला अंधुक अंधुक याद होती—पण त्या वेळीं ती कशी दिसत होती ह्याची जेव्हां तो आठवण करूं लागे, तेव्हां पुतळ्यांची पित्रळी माळ गळ्यांत घातलेल्या ममतीचा काळा-ठुस्स चेहरा आपले पांढरे फटफटीत दांत विचकून हसत आहे, हेंच चित्र पुन्हा पुन्हा त्याच्या डोळ्यांसमोर उभें राही. अन् तो डोळे गपकन् मिटून घेई.

ह्यानंतर पुढें अंधारांत चांगुणा जणुं कांहीं गडपच होऊन गेली असें त्याला वाटे. त्याच्या आजाराला आतां दोन वर्षें होऊन गेलीं होतीं. पण ह्या काळांत एकदां देखील ती कधीं त्याच्या दृष्टीस पडली नव्हती.

आपण घरीं कुजत अन् तडफडत पडलों होतों. तेव्हां आपल्या बापानें आपल्यापासून तिला दूर नेऊन तिकडे शेतावर ठेवावें ह्याच्या आठवणीनें त्याचा संताप अनावर होई. आपल्याजवळ त्या वेळीं ती राहिली असती तर काय मेली असती?

अन् आतां आपण शेतावर येऊन इतक्या जवळ तिच्यापासून राहतों आहोंत, पण एकदां देखील कधीं ती आपल्या खोपेंत डोकावली नाहीं. किंवा आपण मेलों आहोंत का जिवंत आहोंत हें एकदां देखील तिनें येऊन कधीं पाहिलें नाहीं. हिला काय बायको म्हणायचें?

आपला बाप न् भाऊ लाख तिला सांगत असतील कीं नवऱ्याकडे जाऊं नकोस म्हणून. पण तिला स्वतःला आपल्या नवऱ्याबद्दल कांहीं वाटतें आहे कीं नाहीं? का अर्जुन्याचें न् तिचें—हा विचार त्याच्या मनांत आला कीं तो कराकरा दांत-ओठ खाऊं लागायचा! त्या दिवशीं तो सहज चिडून भिमीला तसें म्हणाला खरा. पण तेव्हांपासून तो संशय मात्र त्याच्या डोक्यांत कायमचें ठाण मांडून बसला.

अर्जुन्या त्याच्यापेक्षां चार वर्षांनीं वडील होता. लहानपणापासून त्या दोघांचें भांडण होतें. अर्जुन्यावर त्याचा फार राग होता. इतके दिवस ती इथें राहते आहे त्याच्याबरोबर. तो काय लेकाचा तिला तसें राहून देईल?—अन् ती तरी तशी कशी राहील?

दिवसांतून तो चारदोन वेळ तरी अर्जुन्याचा अन् चांगुणेचा खून करण्या-साठीं मनांतल्या मनांत त्यांच्यावर धावून जाई. चांगुणा समोर तर येऊं दे, तिच्या मुस्काटांत मारून तिला विचारीन, "बोल, हें खरं आहे कीं नाहीं?"

चांगुणा आपल्या हातांत सांपडायला मात्र पाहिजे. पण ती आपल्याला दिसत सुद्धां नाहीं. मग सांपडणार कशी ?

चांगुणा कुठें दिसेल अन् कशी सांपडेल हा एकच ध्यास त्याच्या मनाला लागून राहिला. तो आपल्या खोपेंतून उठून हळूहळू बाहेर येऊन बसूं लागला. आजूबाजूला हिंडूंफिरूंही लागला. कोणाचीं पावलें वाजताहेत का ? कोणाची चाहूल लागते आहे का ? ह्याचा तो सारखा कानोसा घेऊं लागला. त्याच्या खोपेसमोरचा दहावीस पावलांचाच पट्टा काय तो मोकळा होता. तेथून पुढें अर्धा बिघा एकजात डोक्याएवढा ऊस लागून राहिला होता. त्यामुळें त्या खोपेला एक मोटा आडोसा निर्माण झाला होता. म्हणून त्या बाजूला सहसा कोणी फिरकत नसे.

एक दिवस सकाळीं उन्हांत खोपेच्या समोर हातापायाला फडकीं बांधीत तो बसला असतां, पलीकडे कुंपणाच्या शेजारीं कांचेची एक मोठी फुटकी बाटली पडलेली त्याला दिसली. उन्हांत ती चमकली म्हणून त्याचें लक्ष तिच्याकडे गेलें.

उठून अंकुशा ती घेऊन आला. उगीचच. कांहीं कारण नव्हतें. अर्जुन्याच्या डोक्यांत घालायला ही फुटकी बाटली चांगली आहे, हा विचार मात्र ती हातांत घेतल्यावर त्याच्या डोक्यांत येऊन गेल्यावांचून राहिला नाहीं.

पण अर्जुन्याला मारून चांगुणा आपल्याकडे कशी येणार ? मग कोणाला मारलें म्हणजे ती आपल्याकडे येईल बरें ? अंकुशा विचार करूं लागला. रोज सांजसकाळ आपल्याला भाकर घेऊन येणाऱ्या आपल्या त्या थेरड्याचाच कांटा काढला तर ? मग झक मारीत चांगुणेलाच भाकर घेऊन यावें लागेल आपल्याकडे. नाहीं तर मग दुसरें कोण आणणार ?

ह्या विचारानें अंकुशा स्वतःशींच खदखदून हसूं लागला. आतांपर्यंत ही युक्ति आपल्याला कशी सुचली नाहीं ह्याचेंच त्याला आश्चर्य वाटलें. पण मागाहून त्याच्या डोक्यांत दुसरा एक विचार आला. छेः, एवढ्यासाठीं त्या म्हाताऱ्याला मारायलाच कशाला पाहिजे ? त्यापेक्षां असेंच करावें—

उठून त्यानें दोन दगड आणले. आणि हळूहळू ती बाटली फोडून तिचे चांगले बोटाबोटाएवढे अणकुचीदार तुकडे केले. अन् ते एका फडक्यांत बांधून तो परत आपल्या खोपेंत येऊन पडला.

त्या दिवशीं रात्रीं कांहीं तरी वशट केलें होतें. म्हणून तें घेऊन यायला खाशाबाला जरा उशीरच झाला. बाहेर चांगला अंधार पडला होता.

एका हातांत जेवणाचें भगुलें अन् दुसऱ्या हातांत कंदिल घेऊन खाशाबा खोपेकडे येतांना पाहिल्यावर अंकुशानें झटकन् तोंडावर पांघरूण ओढलें. आणि कान टवकारून बाहेर काय होतें ह्याची तो वाट पहात बसला.

खोपेच्या दारांत पाय टाकल्याबरोबर 'अयाई' करून खाशाबा ओरडले. त्यांच्या उजव्या पायांत कांचा घुसल्या. म्हणून त्यांनीं झटकन् डावा पाय पुढें टाकला. तों त्याही पायांत कांचा घुसल्या. त्याबरोबर ते मटकन् खालीं आदळले. पण तेही पुन्हा कांचांच्याच तुकड्यांवर.

खाशाबाचें सर्व अंग रक्तबंबाळ झालें. आणि ते मोठमोठ्यानें विव्हळूं लागले. पण अंकुशानें आपल्या तोंडावरचें पांघरूण कांहीं काढलें नाहीं. त्यांचें विव्हळणें ऐकून त्याच्या सर्वांगांतून हर्षाच्या अगदीं उकळ्या फुटत होत्या.

हातांतला कंदील खाशाबांनीं कसा तरी सांवरून धरला. पण अन्नाचें भांडें मात्र खालीं पडून सगळें सांडलें. अंगांत घुसलेले कांचेचे तुकडे हळूहळू काढून खुरडत खुरडत अन् लंगडत लंगडत खाशाबा परत पडळीवर कसे पोहोंचले, हें त्यांचें त्यांनाच ठाऊक !

अंकुशानें अटकळ केल्याप्रमाणेंच दुसऱ्या दिवशीं सकाळपासून खाशाबांनीं अंथरूणच धरलें. कमरेपासून तळपायापर्यंतचा त्यांचा सर्व भाग सुजून ठणकूं लागला. त्यांना उठतां येईना कीं बसतां येईना.

पण अंकुशाची दुसरी अटकळ मात्र साफ चुकली. त्याला वाटलें होतें कीं त्या दिवशीं नक्की चांगुणाच भाकर घेऊन येईल म्हणून. तेवढ्यासाठीं तोंडावरचें पांघरूण किलकिलें करून त्यांतून खोपेच्या दाराकडे सारखी टक लावून अंकुशा बसला होता. पण चांगुणा कांहीं आली नाहीं. अंकुशाच्या थोरल्या भावाचा—साधूचा—वडील मुलगा संतू दहा-बारा वर्षांचा होता. तो भाकरीचें गांठोडें घेऊन आला. अन् खोपेच्या दाराबाहेरूनच त्यानें गांठोडें आंत फेकून दिलें. अन् तशीच मागल्या पावलीं धूम ठोकली.

अंकुशाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यानें भाकरीचें गांठोडें बाहेर फेकून दिलें. तो त्या दिवशीं मुळीं जेवलाच नाहीं. त्या रागाच्या धुंदींत दुपारभर तो सुंद होऊन आपल्या अंथरुणावर पडला होता. सारखा कांहीं तरी बेत त्याच्या डोक्यांत खदखदत होता.

तिन्हीसांजच्या सुमारास तो खोपेंतून उठला. अन् समोरच्या उसांत घुसला. ऊस असा दाट अन् मस्त वाढला होता. त्याच्या फडांतून तो आवाज

न करतां, कधीं उभ्यानें तर कधीं ओणव्यानें, असा हळू हळू जाऊं लागला. अर्धा बिघा ऊस ओलांडायला त्याला पुष्कळच वेळ लागला.

उसाचा पेरा आतां संपला, असें त्याच्या ध्यानांत आल्यावर तो एकदम तिथें थबकला. आणि उसांच्या ताटामध्यें दडून तो बाहेरची टेहळणी करूं लागला.

तेथून पांचपन्नास पावलांवर विहीर होती. तिच्या धावेची उतरण अंकुशाच्या उजव्या बाजूला होती. आणि त्याच्या समोरच्या बाजूकडूनच विहिरींत उतरायला पायऱ्या होत्या. विहिरीवरून पलीकडे जायचा रस्ता, अंकुशा दडला होता तेथून दहाबारा पावलांच्या अंतरावरून डावीकडे गेला होता.

अजून अंधार फारसा पडला नव्हता. मोट नुकतीच सुटलेली दिसत होती. विहिरीवर चिटपांखरूंही नव्हतें. पाणी भरायला एखादे वेळीं चांगुणा यायची विहिरीवर, असा विचार एकदम अंकुशाच्या मनांत आला. पडळीच्या बाजूकडून येणाऱ्या रस्त्याकडे चटकन् त्याचे डोळे वळले.

इतक्यांत समोरून अंकुशाच्या कानावर कसला तरी आवाज आला. अंकुशा दचकला. अन् कान देऊन ऐकूं लागला. पुन्हा तो आवाज आला. दोन-चार वेळां आला. कसला आवाज हा? धुण्याचा. विहिरींतूनच येत आहे. म्हणजे विहिरींत कुणी तरी धुतें आहे.

चांगुणा तर नसेल? अंकुशाच्या काळजांतून एकदम कंप उठला. अस्वस्थ होऊन त्याच्या हाताचे पंजे आजूबाजूची ओली माती उकरूं लागले. त्याबरोबर त्याच्या डाव्या हाताला कसला तरी लोखंडाचा एक तुकडा लागला. तो चटकन् हातांत घेऊन तो बघूं लागला. एक गंजलेलें खुरपें होतें तें.

विहिरींतून येणाऱ्या आवाजाकडे श्वास रोधून आणि टक लावून तो बघूं लागला. धुण्याचा आवाज थांबला. पाण्यांत भांडें बुडविल्याचा आवाज घुमला. अंकुशाची छाती धडधड करूं लागली.

दोनचार मिनिटांच्या आंतच विहिरीमधून एक घागर वर येत असल्याचें त्याला दिसलें. तिच्यामागून हिरव्या लुगड्याचा पदर घेतलेलें डोकें, खांद्यावर धुतलेल्या कपड्याचा ओला पिळा, पदराखालून लोंबणारा बांगड्यांचा हात— अंकुशा तटकन् उभा राहिला. कोण आहे ती?

अजून तिचा चेहरा आडवाच होता. विहिरीच्या वरच्या पायरीवर आल्यावर ती डावीकडे वळली. अन् बाहेर दोन पावलें येऊन क्षणभर थबकली. कपाळावर निथळणारें पाणी तिनें हाताच्या पंजानें निपटून झटकलें. अन्

तोंड समोर करून ती अंकुशाच्या रोखानें हळूहळू येऊं लागली.

अंकुशा आपला उजवा डोळा फाडून तिच्याकडे पाहूं लागला. तजेलदार हिरव्या ताटांत लपेटलेल्या भरदार अन् पिवळ्या धमक उसाच्या कांड्याप्रमाणें तिचा बांधा उंच अन् उफाड्याचा होता.

अंकुशाची नजर तिच्या तोंडावर ठरेना. तिनें आपलें लुगडें गुडघ्यापर्यंत वर खोचलेलें होतें. त्यामुळें तिचे पाय आणि पोटऱ्या मक्याच्या कणसाप्रमाणें निमुळत्या अन् लुसलुशीत दिसत होत्या.

अंकुशाला तिची ओळख पटली नाहीं. पण ती चांगुणाच आहे ह्याबद्दल मात्र त्याची मनोमन खात्री झाली.

इतक्या दिवसांचे त्याचे सुस्कारे, इतक्या रात्रींची तगमग, इतक्या महिन्यांचा त्याचा जळफळाट, एवढें गोंडस रूप धरून असे समोरून त्याच्या चालत येतील याची त्याला कल्पनाही नव्हती. धगधगणारे निखारे एकदम पाण्यांत पडावेत, तसा तिच्यावर सांठवून ठेवलेला त्याचा राग तिच्या डोळ्यां-तल्या पाण्यांत विझून त्याचे कोळसे झाले.

त्याची जीभ हावरेपणानें त्याच्या ओठांवर ळळळूं लागली. त्याचीं बोटें अधाशासारखीं थरथर कांपूं लागलीं. त्याच्या अंगांतलें सारें रक्त त्याच्या डोक्यामध्यें जमा होऊन उसळ्या मारूं लागलें.

आली. चांगुणा आली. जवळ आली. अगदीं जवळ आली. तिचे रसरशीत लाल ओठ अंकुशाला अगदीं टळक दिसूं लागले. पण इतक्यांत ती उजवीकडे वळली. त्याबरोबर ताडकन् उडी मारून अंकुशा उसाबाहेर आला. अन् घोगऱ्या आवाजानें ओरडला, "चांगुणा !—"

चांगुणेचीं पावलें तिथल्या तिथेंच थिजलीं. तिच्या पायापासून डोक्यापर्यंत थंडगार शिळक उठली. डोक्यावरच्या भरलेल्या घागरीनें जड झालेली आपली मान किंचित् डाव्या बाजूला वळवून तिनें आपल्या डोळ्यांच्या कोपऱ्यांतून हळूच बघितलें. अन् तिच्या डोक्यावरची घागर एकदम कोलमडून खालीं पडली.

नाक बसलेलें. डाव्या डोळ्यांतलें फूल बाहेर आलेलें. तोंडाचें सुजून अन् फाटून धिरडें झालेलें. हाताला न् पायाला मळक्या चिंध्या बांधलेल्या—

अशी अंकुशाची ती भेसूर मूर्ति आपल्याकडे बघून केविलवाण्या तोंडानें हसते आहे. हें पाहून चांगुणेनें गपकन् दोन्ही हातांनीं आपले डोळे झाकून घेतले.

"तोंड कशाला झाकून घेतेस ?" चांगुणेच्या अगदीं पुढयांतून अंकुशाचा

आवाज उमटला. चांगुणेनें भेदरून डोळ्यांवरचे हात बाजूला केले. तोंच अंकुशाच्या हाताची पकड तिच्या मनगटावर पडली. आपल्याला पाहून तिनें तोंड झाकावें ह्याची त्याला फार चीड आली.

"नवऱ्याची लाज वाटते व्हय तुला! पण पघ माझ्याकडे! पघ कसा दिसतोंय मी!" असें म्हणून अंकुशा आपल्या डोळ्यांतलें फूल तिच्यापुढें ओवाळीत विकटपणें हसूं लागला.

भीतीनें चांगुणा लटलट कांपूं लागली.

"बोल, माझी भाकर कां घेऊनशान येत न्हाईस? कशाला त्यो थेरडा रोजरोज येतो?" चांगुणेच्या हाताला हिसडा मारीत अंकुशानें विचारलें.

"उद्यां येईन. जाऊं द्या मला." गयावया करीत चांगुणा म्हणाली. शेवटीं कसे तरी तिच्या तोंडून शब्द उमटले.

"कुठं जातीस?" अंकुशा ओरडला, "आतां माझ्या हातामंदी गावल्यावर मी तुला सोडतो व्हय?" असें म्हणून चांगुणेचा हात अंकुशानें गच्च आवळून धरला. आणि उसाकडे तो तिला फरफटत नेऊं लागला.

एकदम मोठ्यानें ओरडावें असें चांगुणेला वाटलें. पण तिच्या घशांतून मुळीं आवाजच निघेना. दांतांत कालवड धरून जसा एकादा तरस तिला ओढीत नेतो, तसा अंकुशा तिला घेऊन जाऊं लागला. इतक्यांत पडळीच्या बाजूनें कुणी तरी मोठ्यानें ओरडलें.

"इकता येळ काय करतीस ग यिहिरीवर, चांगुना?"

त्याबरोबर अंकुशा एकदम थबकला. त्याच्या हाताची पकड ढिली पडली.

"कोन हाय?" श्वास रोखून त्यानें विचारलें.

"धाकटं भावजी!" असें म्हणून चांगुणेनें झटकन् त्याच्या हातांतून हात उपसला अन् जोरानें तिकडे धाव घेतली.

अर्जुन्याचें नांव ऐकतांच अंकुशाच्या सर्वांगाचा भडका उडाला. चित्त्यासारखी तिच्या अंगावर झेप घेऊन त्यानें तिला खालीं पाडलें. अन् डाव्या हातांतलें खुरपें खसकन् मानेंत खुपसलें.

चांगुणेची किंकाळी करवतीसारखी त्या तिन्हीसांजच्या अंधारांतून कापीत वर गेली.

• • •

# ६.



चांगुणेचें लगीन होऊन ती सासरीं निघून गेल्यापासून राघूनें तिची एकदां-सुद्धां चौकशी केली नाहीं.

चांगुणेची आठवणसुद्धां स्वतःला तो होऊं देत नसे. कारण ती झाली म्हणजे मग शिदू न्हाव्यानें सांगितलेली ती भयंकर गोष्ट त्याच्या डोळ्यांसमोर उभी राही आणि त्याच्या अंगाचा भडका उडे.

चांगुणेवर राघूचा फार राग आहे हें राही ओळखून होती. म्हणून चांगुणेची गोष्ट सहसा ती त्याच्याशीं काढीत नसे. काढायचीच झाल्यास ती फार जपून काढी.

महिन्यांतून एखादीदुसरी तरी राघूची सासवडला खेप असे. राघू सास-वडला जायला निघाला कीं पडवीच्या खांबाशीं उभी राहून राही हळूच म्हणे, "पोरीला भाजी देऊं का बांधूनशान थोडीशी!"

तिच्याकडे न पाहतां राघू घुम्यासारखा तोंडांतल्या तोंडांत पुटपुटायचा, "तिकडं जाया मला येळ न्हाई व्हायाचा!"

अंकुशाच्या आजारीपणाची बातमी चांबळीपर्यंत पोहोंचायला चारदोन महिने

लागले. पण तो कशानें आजारी आहे हें कांहीं समजलें नाहीं.

"चांगीच्या नवऱ्याच्या जिवाला बरं न्हाई म्हनत्यात," राघूला वाढतां वाढतां एकदां राही हळूच पुटपुटली.

राघू कांहींच बोलला नाहीं. तो डाव्या हातानें कांदा फोडूं लागला.

"ती कटक्याची म्हातारी काल म्हनाली. तिचीबी नात सासवडला जगतापाकडे दिली हाय." स्वतःशींच बोलल्यासारखी राही कांहीं वेळानें म्हणाली.

तरी देखील राघू बोलला नाहीं. त्यानें मिरचीचा एक मोठा तुकडा कचकन् दांतांनीं तोडला.

"सासवडला जाल म्होरल्या येळेला तवा पघून या!—" राहीनें हळूच सुचविलें.

राघूनें कालवणाचा एक भला मोठा भुरका मारला.

यावर राही काय बोलणार? ती गप्प बसली.

कांहीं दिवसांनीं शेतावर काम करायला चांगुणेला तिचा सासरा घेऊन गेला आहे ही बातमी देखील तिला समजली. शेतांत खुरपणीचें काम चाललें होतें, त्या वेळीं राहीनें राघूला ती बातमी सांगितली. ती ऐकून राघूनें थोडेंसें हसल्यासारखें केलें. मनांतून त्याला बरें वाटलें.

शेतांतल्या कामाचा रगाडा डोक्यावर पडला म्हणजे पोरगी आपसुख ताळ्यावर येईल अशी त्याची भावना होती.

ह्याही गोष्टीला वर्ष सहा महिने होऊन गेले. चांगुणेची न् तिच्या नवऱ्याची कांहींच बातमी येईना, तेव्हां राहीला काळजी लागून राहिली. राघूला तर कांहीं सांगायचीच सोय नव्हती.

गुरवाच्या शंकरचें लगीन सासवडच्या निळू गुरवाच्या पोरीशीं ठरलें. चार-आठ दिवसांत शंकर सासवडला जाणार होता. पाणी भरायला राही नदीवर गेली होती, तेव्हां त्यानेंच तिला स्वतः सांगितलें.

तेव्हां राही चटकन् शंकरला म्हणाली, "तूं आतां जातोच हायेस सासवडला, तर चांगीच्या घरून जाऊनशान ये. लई दिवसांत तिची अन् तिच्या नवऱ्याची खबर न्हाई म्हून सांगतें."

शंकरनें ती गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली. लगीन लावून शंकर चांबळीला परत आल्यानंतर चारदोन दिवसांनीं तो राहीला चावडीसमोर सहज भेटला. शंकर राहीला चुकवीत होता. पण राहीनेंच त्याला पाहिलें. अन् हाक मारली.

"गेलतास चांगीकडे?" राहीनें उत्सुकतेनें विचारलें.

"नाहीं!" खालीं पाहात शंकर पुटपुटला. राहीचा चेहरा एकदम उतरला. तिची फार निराशा झाली.

"तुला कशाची सई राह्यला?" राही विव्हळून म्हणाली.

"चांगुणा शेतावर आहे असं समजलं." शंकर लागलाच म्हणाला. "तेव्हां मी नाहीं गेलों तिच्या घराकडे. पण तिचा नवरा—"

शंकर एकदम थबकला. त्याला पुढें काय बोलावें हें कळेना. राही चमकून त्याच्या तोंडाकडे बघूं लागली.

"बरा हाये ना त्यो?" चटकन् तिनें प्रश्न केला.

"त्याच्या तोंडाला कांहीं तरी झालंय." शंकर थांबत थांबत हलक्या आवाजांत म्हणाला, "अन् तो एका बावाजीच्या नादीं लागला आहे म्हणतात. नेहमीं त्याच्याच मठींत आपला बसलेला असतो."

राहीला तें ऐकून धक्काच बसला. घरीं येईपर्यंत तिच्या डोक्यांत नाना तऱ्हेचे विचार येऊन गेले. चांगुणेच्या नवऱ्याला काय झालें तरी काय असेल? त्याचें डोकें बिकें तर फिरलें नाहीं? पण ज्या अर्थी तो बावाजीच्या मठींत जाऊन बसतो, त्या अर्थी तो इतका कांहीं आजारी नसला पाहिजे. ह्या विचारानें मात्र तिच्या मनाला थोडेंसें बरें वाटलें.

नवऱ्याला ह्याबद्दल सांगण्याची कांहीं सोयच नव्हती. तेव्हां स्वतःच सासवडला जाऊन यायचें तिनें ठरविलें.

मार्गेसराच्या महिन्यांत सोपानदेवाची जत्रा असते. ती जत्रा दहाबारा दिवसांवरच आलेली होती. तेव्हां त्या जत्रेचें निमित्य करून सासवडला जायचें अन् काय खरा प्रकार आहे तो बघून यायचें असा तिनें मनाशीं बेत केला.

"उद्यां सोपानकाकाची जत्रा आहे. तवा सासवडला जाऊनशान येत्यें." जायच्या आधल्या दिवशीं राहीनें राघूला विचारलें. त्या नेहमींप्रमाणें कांहीं न बोलतां नुसती मान हलवली.

चांगुणेचें सासर सोपानदेवळाशेजारींच होतें. तेव्हां सोपानकाकांना जायच्या आधीं पहिल्यानें राही तिथेंच गेली. घरांत चांगुणेची सासू अन् नणंद होती. सासू आजारीच होती. तिच्या डोक्यांत भ्रम झाला होता. चांगुणेची आई आली आहे हें तिला समजलेंच नाहीं. ती राहीच्या चेहऱ्याकडे नुसती टकटक पाहात राहिली.

"म्हातारपनीं हें असं होतंच. माझी बी आई अशीच करायची!" राहीनें भिमीची समजूत घातली.

चांगुणेबद्दल अन् तिच्या नवऱ्याबद्दल भिमी एक अक्षर काढत नाहीं हें बघून राहीला जरा चमत्कारिकच वाटलें. शेवटीं आपण होऊन तीच म्हणाली, "सोपानकाकांच्या पायां पडाया आलें व्हतें. म्हनलं, चांगुनाला न् तिच्या नवऱ्याला पघून जावं. लई दीस झाले—"

"ते दोघंबी शेतावर हायती!" भिमीनें पटकन् मध्येंच सांगितलें.

राहीला पाहिजे होती ती माहिती मिळाली. चांगुणेचा नवरा शेतावर आहे म्हणजे त्याची प्रकृति चांगली असली पाहिजे. अन् तो बावाजीच्या नादीं लागला आहे ही शंकरनें सांगितलेली बातमीहि मग खोटीच दिसते आहे. मग आणखीन् विचारून काय करायचें आहे?

राहीच्या मनाचें समाधान झालें. भिमीहि जास्त कांहीं बोलेना. किंवा राहा-जेवा म्हणून आग्रह करीना. तेव्हां मग राही कांहीं फार वेळ तिथें थांबली नाहीं. तिनें त्यांचा निरोप घेतला. अन् सोपानकाकांचें दर्शन घेऊन निर्धास्त मनानें ती लगोलग चांबळीला परतली. परत येतांना तिला सोबतही त्या दिवशीं पुष्कळ मिळाली.

चांगुणेच्या नवऱ्याची इतके दिवस काळजी वाटत होती, ती तरी एकदांची मिटली. बरें झालें. असा विचार करीत करीत राहीनें घरांत पाऊल टाकलें. तोंच समोर पडवींत गुडघ्यांत मान घालून बसलेला आपला नवरा राघू अन् पलीकडे कपाळाला हात लावून बसलेला आपल्या थोरल्या लेकीचा नवरा पर्वती वडवे ह्या दोघांना पाहून राहीच्या काळजांत धस्स झालें. तिचा चेहरा एकदम पडला. क्षणभर ती तिथेंच थबकली.

त्यांच्याकडे पाहात जड पावलांनीं ती पडवींत आली. आणि थांबून पुन्हा त्यांच्याकडे बघूं लागली. तोंच माजघराच्या दारांत रडत बसलेली तिची थोरली लेक गोजा मोठमोठे हुंदके देत एकदम तिच्याकडे धावली. अन् तिच्या गळ्याला मिठी मारून तिनें मोठ्यानें हंबरडा फोडला, "आपल्या चांगीचा तिच्या नवऱ्यानं खून केला ग आई!"

गोजा रडायला लागली, तशी राहीही रडूं लागली. पण तिला कांहीं या बातमीचा उमग पडेना. सकाळींच आपण सासवडला गेलों होतों. त्या वेळीं चांगुणेची नणंद त्याबद्दल एका अक्षरानेंही बोलली नाहीं. चांगुणा अन् तिचा

नवरा शेतावर आहेत, असें तिनें सांगितलें. का तिलाही ही गोष्ट माहीत नसावी? कुणास ठाऊक? असेल, कदाचित् तसेंही असेल.

राहीचें आपल्या तिघीही मुलींवर प्रेम होतें. पण चांगुणा धाकटी असल्यानें तिचा तिला अधिक लळा होता. लगीन झाल्यानंतर ती घरांतून जी बाहेर पडली ती पुन्हा कांहीं दिसली नाहीं आणि आतां ह्यापुढें कधींही दिसणार नाहीं, ह्या एका विचारानें राहीला एकदम भडभडून आलें. आणि ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

रडण्याचा पहिला भर संपल्यानंतर राही म्हणाली, "सकाळींच मी गेलते कीं तिच्या घरीं. पण तिची नणंद कायबी बोलली न्हाई."

"ती रांड कशाला बोलल?" गोजा चिडून म्हणाली, "त्याचीच भईन ती!"

पर्वती सांगूं लागला, "आठ का धा दिसांमागं हें झालं म्हनत्यात. समद्या कोढितभर पसरलंय हें. जो तो मला येऊनशान सांगाया लागला. रानमळ्यांत त्याच्या पल्याडचं शेत आमच्या कोढितचा खैरे करतो. त्यो खैऱ्याचा थोरला ल्योक सांजचा अशी मोट सोडून बैलाला वैरन टाकीत व्हता. तवा त्यानं ह्या पोरीची आरोळी ऐकली. त्यांनं तिचा आवाज बराबर वळखला. अन् दुसऱ्या दिसापासून ती पोरगी गहाळच झाली. कुठंच दिसंना. अवो, रोजची शेतावर काम करनारी पोरगी एकदम आपली गडप झाली. त्ये लोकांच्या ध्येनांत आल्याबिगर कसं राहील? खैऱ्याच्या म्हातारीनं तिच्या थोरल्या जावंला इच्यारलं बी. पन ती काय बोलनार!"

"अन् चांगीचा नवरा कुटंय?" राघूनें मध्येंच विचारलें.

"त्यो बी तिथंच कुठं दडूनशान बसला हाय!" पर्वती म्हणाला, "त्याला म्हारोग का रघतपिती झाली हाय म्हनत्यात!"

"किडं पडून मरल मेला!" गोजा कडाडली, "तसा कसा मरल त्यो?"

राघू घुमसत म्हणाला, "त्याला फासावरच नेऊन चढवतों मी!"

चांगुणेच्या खुनाची बातमी ऐकून राघूच्या सर्वांगाचा भडका उडाला होता. अन् हा खून दाबून टाकण्याचा तिच्या सासरचीं माणसें प्रयत्न करीत आहेत, हें बघून तर त्याचा संताप अगदीं अनावर झाला.

सबंध रात्रभर त्याला झोप लागली नाहीं. नाना तऱ्हेचे बेत तो मनामध्यें रचीत होता. सकाळीं उठल्यावर त्यानें ठरवलें कीं सरळ चांगुणेच्या सासऱ्याला

जाऊन त्याच्या शेतावर भेटायचें. अन् त्याला जाब विचारायचा. अन् त्यानंतर मग सासवडला जाऊन फौजदाराला वर्दी द्यायची.

राही आपल्या जाबयाला हळूच म्हणाली, "तुम्ही बी त्यांच्या संगं जा. अन् त्यास्नी संभाळा. त्यांचं डोकं लई खराब हाय—"

राघू अन् पर्वती घरांतून बाहेर पडताहेत तोंच शिदू न्हावी त्यांना भेटला.

"काय राघूदा, कुटं निघालांत इकत्या सकाळचं?" शिदूनें हसून विचारलें.

राघू त्याच्या अंगावर धावून गेला. अन् त्यानें काडकन् त्याच्या मुस्काटांत भडकावली.

"भडव्या, तूं माझ्या पोरीचं वाटोळं केलंस!"

शिदूची बोबडीच वळली. गाल चोळीत तो बघूं लागला, तों राघू त्याच्याकडे पाठ फिरवून चालूं लागला होता.

दोन तासांचा रस्ता होता रानमळ्याचा. खाशाबाचें शेत जसें जवळ आलें तशी पर्वतीची छाती धडधड करूं लागली. आतां पुढें काय प्रकार होणार ह्याची त्याला कल्पना होईना. खाशाबांच्या शेतासमोर वाटेवर एक मोठें आंब्याचें झाड होतें. त्याच्याखालीं राघू बसला.

आणि त्यानें पर्वतीला सांगितलें, "मी न्हाई पाय टाकनार त्येंच्या शेतावर. त्या म्हाताऱ्यास्नी सांग मी इथं येऊन बसलोंय म्हून!"

पर्वती पडळीमध्यें जाऊन सांगून आला. थोड्या वेळानें खाशाबा काठी टेकत टेकत अन् कण्हत कण्हत बाहेर आले.

त्यांचा चेहरा उतरला होता. ते आजारी दिसत होते. त्यांना पाहून राघू पाठ फिरवून बसला. खाशाबा येऊन बसले, तरी तो त्यांच्याशीं कांहीं वेळ बोललाच नाहीं.

तेव्हां खाशाबांनीं आपण होऊनच बोलायला सुरुवात केली, "बरं आलांत. आज-उद्यां मी तुमास्नी निरोपच पाठवनार व्हतों. मी बी आजारीच हाये!"

"पोरगी मेल्यावर पाठवा निरोप!" राघू संतापून म्हणाला.

खाशाबांना वाईट वाटलें. ते क्षणभर कांहीं बोललेच नाहींत. कांहीं वेळानें ते खिन्न स्वरांत म्हणाले, "आतां थोडंसं बरं वाटतंय तिला!"

"तिला—तिला बरं वाटतंय? ती कोण?" राघू गर्रकन् फिरला अन् खाशाबाकडे पाहूं लागला. पर्वतीनेंही डोळे वासले.

"हाय कुटं ती?" राघू ओरडला.

"पडून हाय तिकडं अंथरुनावर ती. आज धा दीस झालं!" खाशाबा क्षीण आवाजांत उत्तरले.

राघू अन् पर्वती एकमेकाकडे टकमक बघूं लागले.

"समद्या कोढितांत पसरलंय कीं तुमच्या पोरानं तिचा खून केलाय म्हून!" पर्वती हलक्या आवाजांत म्हणाला.

"तशी येळ आली व्हती खरी!" खाशाबा एक लांबलचक सुस्कारा टाकून म्हणाले, "पण देवानं वांचवलं पोरीला."

चांगुणा मेलेली नाहीं, ती जिवंत आहे हें ऐकून राघूच्या डोक्यांतली आग एकदम शांत झाली. त्याची छाती हलकी झाली. अन् त्याचा श्वास पुन्हा पहिल्यासारखा मोकळेपणानें चालूं लागला. बराच वेळ कोणी कोणाशीं बोललें नाहीं.

कांहीं वेळानें खाशाबानें अंकुशाची कर्मकथा सांगायला सुरुवात केली.

"काय सांगावं राघूदा," खाशाबा हळहळून म्हणाले, "मागील जलमीं काय पाप केलं आम्हीं, म्हून ह्यो असला खवीस आमच्या पोटीं आला. त्यानं समद्या



शरीराचा सत्यानाश केला अन् ह्या पोरीचं वाटोळं केलं. आमच्या घराला डांबर फासलं वो त्यानं! दिवसांतून धा येळ मी रडतों या पोरीसाठीं! तुमचा

लई मोठा गुन्हा घडला आमच्या हातनं. तुम्ही माराल तेवढं जोडं आम्हांला मुकाट्यानं खाया पाहिजेत!"

खाशाबाचें हें बोलणें ऐकून राघूचा राग शांत झाला. आपल्या पोरीबद्दल त्याला वाईट वाटलें. पण म्हाताऱ्याची त्याला फार दया आली.

"चांगलीं पोरं पोटीं येनं ही देवाची फार मोठी दया हाय वरं राघूदा!" राघूचा हात हातांत धरून खाशाबा तळमळून म्हणाले. भावनेनें राघूचा ओठ किंचित् थरथरला.

थोड्या वेळानें खाशाबा त्यांना पडळींत घेऊन गेले. चांगुणा अंथरुणावर शांतपणें पडली होती. तिच्या मानेभोवतीं फडक्याचें जाडजूड वेटोळें बांधलें होतें. बापाला न् मेव्हण्याला बघून ती रडूं लागली.

पर्वतीनें शेजारच्या खैऱ्यांच्या शेतामधली तट्टयांची बैलगाडी जुंपली. राघूनें चांगुणेला आपल्या पाठीवर उचलून गाडींत आणून ठेविलें. आणि खाशाबांचा त्यांनीं निरोप घेतला.

गाडी हलली तशा खाशाबांच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या.

"लक्ष्मी घरांत आपल्या पावलानं चालत आली व्हती ती गेली!" स्फुंदत स्फुंदत ते स्वतःशींच म्हणाले, "आतां पुन्हा न्हाई ती डोळ्यास्नी दिसायची."

गाडी दारासमोर थांबली. अन् चांगुणेला पाठीवर घेऊन जेव्हां राघू आपल्या घरांत शिरला, तेव्हां राहीला हर्षवायूच व्हायचा काय तो बाकी राहिला.

चांगुणेला हृदयाशीं धरून ती खूप रडली.

• • •

# .७.



अंकुशानें मारलेल्या खुरप्याची चांगुणेच्या उजव्या मानेला चांगलीं चार बोटें आंत शिरतील एवढी मोठी जखम झाली होती.

चांगुणेच्या जावेनें त्या जखमेंत पानकणसें भरलीं न् वर चिकणमातीचा लेप देऊन ती जखम बांधून ठेवली, म्हणून ती नासली नाहीं. तरी पण ती जखम पुरती भरून यायला चांगले दोन महिने लागले.

पहिला महिना चांगुणा अंथरुणावरच निजून होती. नंतर मग ती उठून हळूहळू घरांत हिंडूंफिरूं लागली. तिच्या जिवावरचें एक संकटच गेलें मोठें.

अंकुशाच्या रोगाची हकीकत थोडीशी राघूनें राहीला सांगितली. चांगुणेला त्याची कांहींच माहिती नव्हती. पण जेजुरीला घडलेली हकीकत मात्र तिनें आईला सगळीं सांगितली. आणि रानमळ्यांतल्या शेतावर एका बाजूला खोपेंत

त्याला कसें ठेवलें होतें न् रोज आपला सासरा त्याला भाकर घेऊन कसा तिथें जायचा ही माहितीही आईला तिनें दिली. त्यवारून त्याच्या रोगाची राहीला नीट कल्पना आल्यावांचून राहिली नाहीं.

आतां आपल्या पोरीचें पुढें कसें होणार हा एकच प्रश्न राहीच्या समोर सारखा उभा होता. सोळा वर्षांची ही तरणीताठी पोर. हिनें आपला सारा जल्म काय नवऱ्यावांचून आईबापाच्या घरांत काढायचा? सारा वेळ तिनें करायचें काय? बाहेर तिला कुठें पाठवायचीही सोय नव्हती.

खेडेगांवचे लोक. कोण काय बोलतील अन् कोण काय करतील ह्याला कांहीं नेम आहे का? राघूचा स्वभावही तिला माहीत होता. पोरीच्या हातून जरा कांहीं चुकलें, अन् तिचें वागणें जरा कांहीं बिघडलें, तर राघू दांडकें घेऊन तिच्यावर उठल्यावांचून राहणार नाहीं, हेंही ती पुरतें ओळखून होती.

असा तिच्या जिवाला चांगुणेचा नुसता घोर लागून राहिला. तिला कुणाशीं बोलतां येईना किंवा कुणाला हें सांगतांही पण येईना. ती आपली मनांतल्या मनांत कुढे. नाहीं तर अंथरुणावर पडल्या पडल्या स्वतःशींच रडे.

तिच्या डोळ्यांतलें पाणी पाहिलें कीं चांगुणा तिला विचारी, "कां ग आय रडत्येस?" तें ऐकल्यावर तिच्या डोळ्यांतून आणखीनच पाणी वाहायला लागे.

चांगुणेसारखी लगीन झालेली न्हातीधुती पोर एक वरिस झालें तरी आपल्या आईबापाच्याच घरीं राहते आहे, आपल्या नवऱ्याकडे जात नाहीं, ह्या गोष्टीकडे गांवाचें लक्ष गेल्यावांचून कसें राहील?

खेडेगांवांतल्या लोकांचें असें आहे. त्यांचें एकदां लक्ष गेलें एकाद्या गोष्टी-कडे म्हणजे फार जातें. एवढेंसें टीचभर तर तें गांव. तिथें एकादी बातमी पसरायला वेळ तो कितीसा लागणार? चांवळीमध्यें घरोघर चांगुणेबद्दल कुजबुज सुरू झाली.

कुणी म्हणत, नवऱ्यानें चांगुणेला टाकून दिलें. कुणी म्हणत, तीच नवऱ्या-च्या घरून पळून आली. कुणी तिच्या सासूसासऱ्यांना शिव्या देऊं लागले. तर कुणी तिच्या आईबापांना नांवें ठेवूं लागले. पण सर्व दोषांचें खापर शेवटीं स्त्रीच्याच डोक्यावर येऊन फुटतें. ह्या न्यायानें राघू कामत्याची पोरगीच वंगाळ असा सर्व गांवकऱ्यांनीं एकमतानें निर्णय दिला.

हें लोकमत घडवण्याच्या कामीं शिदू न्हाव्याचा फार मोठा हात होता. राघूच्या हातून मुस्काटांत खाल्ल्यानंतर चांगुणा आणि राघू ह्या दोघांच्या विरुद्ध

शिदूनें एक मोहीमच उघडली होती. बाणेश्वराच्या देवळांत गुरवाच्या शंकर-बरोबर चांगुणेनें कोणकोणते प्रकार केल्याचें आपण प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं कसें पाहिलें ह्याचें अत्यंत चटकदार आणि रसभरित वर्णन रोज तो आपल्या गिऱ्हाइकांच्या कानांत ओतीत असे.

ह्या पोरीचें लगीनसुद्धां कधीं झालें नसतें; पण आपण तें जमवून आणलें. उत्तम नवरा मिळवून दिला. पण बापाची तिला फूस असल्यामुळें ती आपल्या नवऱ्याबरोबर आतां नांदत नाहीं, अशी स्वतःची तारीफ करून पोरगी बिघड-विल्याचा सारा ठपका तो राघूवर ठेवी.

"माझी पोरगी नवऱ्याच्या घरू नअशी पळून आली असती तर मीं तिचं पेकाट मोडलं असतं अन् तिचा कान धरून तिला फरफटत नवऱ्याकडे नेली असती!" असा वस्तऱ्याला धार लावतांना चटफट आवाज करीत शिदू आपल्या 'पुराणा'चा जेव्हां आवेशपूर्ण समारोप करी, तेव्हां त्याचीं गिऱ्हाइकें अक्षरशः दिपून जात.

त्यावर कोणाला बोलायला सुचलेंच तर तो शिदूला हळूच विचारी, "मंग आताबी ती जात असल संकरकडे देवळांत—"

"म्हंजी काय?" शिदू गंभीर चेहरा करून मिष्किल सुरांत उलट विचारी, "आतां तर अक्षी राजरोस! अवो, देवळांत कशाला! पराच्या दिशीं रातीं तर मी तिला संकऱ्याच्या घरांतून भायेर पडतांना डोळ्यांनीं पघितली!"

"संकऱ्याच्या घरांत?" ऐकणारा तोंडाचा आ वासून शिदूकडे टकटका बघूं लागे. "पन संकऱ्याच्या घरांत तर—"

"हाय कोन संकऱ्याच्या घरांत आतां?" शिदू मध्येंच त्याला तोडून म्हणे, "आई व्हती ती गेली. बायकू मुकी. ती बी त्यास्नी कुठं मिळत व्हती? मी तें जमवलं म्हून मिळाली. ती काय बोलनार? अन् बापाच्या अंगावरून वारं गेलेलं! त्ये बसतं आपलं खोकत कोपऱ्यांत. मग संकऱ्याला न् तिला हाय कोनाचं भ्या?"

चांगुणा आणि शंकर ह्यांच्या चोरट्या संबंधाच्या ह्या एकेक भयंकर कथा शिदूच्या तोंडून ऐकून सारें चांबळी गांव हादरून गेलें. हीं दोघेंजणें म्हणजे 'गांवावरचं एक फार मोठं संकट आहे' असें हळूहळू लोकांना वाटूं लागलें.

ह्याला आतां आळा घालायचा कसा ही गांवांतल्या सुरकुतलेल्या डोक्यांना फार मोठी चिंता पडली. चार म्हातारे एके टिकाणीं जमले कीं त्यांच्या

आपल्या ह्याच कानगोष्टी चालत.

गांवांत धुमसत असलेल्या ह्या आगीची धग राघूला लागल्यावांचून कशी राहील? तो कामाबिगर बाहेर कधीं कोणाकडे फारसा जात नसे. पण कधीं गेलाच कुठें, तर वाटेंत लोक त्याच्याकडे हळूच चोरून पाहात. कुणी त्याला बघून तोंड फिरवीत. तर कुणी गालांतल्या गालांत हसत.

आधींच राघू साऱ्या मुलखाचा चिडका. त्याच्याकडे बघून कुणी नुसतें खोकलें तरी तो वर्दळीवर यायचा. मग गांवकऱ्यांच्या वागणुकीची ही नवीन तऱ्हा पाहून तर त्याच्या काळजाची केवढी जळफळ अन् उलघाल झाली असेल तें काय सांगायला हवें?

घरांत पाऊल टाकलें रे टाकलें कीं तो गवरीच्या पेटलेल्या खांडासारखा धुमसायला लागायचा. अन् त्याचा धूर राहीच्या न चांगुणेच्या डोळ्यांत शिरून त्यांचा जीव अगदीं घुसमटून जायचा. बसतांना, जेवतांना, झोपतांना तो सतरा वेळां कातवायचा न् जाजवायचा.

एकदां पडवीच्या खांबावर कुत्रें मुतलें. तेव्हां त्याच्या अंगावर त्यानें इतक्या जोरानें लाकूड भिरकावलें कीं त्याच्या तंगडीचें हाड मोडून तें जन्माचें जायबंदी झालें. दोन दिवस बिचारें दाराबाहेर केंकाटत अन् रडत बसलें होतें.

एकदां धार काढतांना गाईनें जरा लाथ वर उचलली. तर हातांतली कासंडी त्यानें तिच्या डोक्यावर इतक्या जोरानें मारली कीं ती कासंडीही चिंबली अन् तिचें शिंगही मोडलें.

नवऱ्याची भीति आणि पोरीची काळजी ह्या जात्याच्या दोन तळ्यांत राहीच्या जिवाचें न् अंगाचें रोजच्या रोज भरडून नुसतें पीठ पडत होतें. माळावरच्या गवताप्रमाणें चांगुणेच्या अंगांत तर अष्टौप्रहर कांपरें भरलेलें असे. राघूनें घरांत पाय टाकला कीं ती चटकन् पालीसारखी कुठें तरी भिंतीला चिटकून बसे. नाहीं तर सापसुरळीसारखी सुळकन् पळून दूर जाई.

चांबळीला येऊन तिला चांगलें वरीस दीड वरीस होऊन गेलें, तरी बापाच्या या धाकानें अन् भीतीनें तिनें आपल्या घराचा उंबरा म्हणून ओलांडला नाहीं. नवऱ्यानें तिच्या मानेंत खुपसलेल्या खुरप्याची कळ ती कधींच विसरून गेली होती. पण कळकाच्या दांडक्यानें तिच्या डाव्या दंडावर बापानें मारलेला तडाखा मात्र चार वर्षं झाली तरी तिच्या डोक्यांत ठणकत होता.

रोज तिन्हीसांजा बाणेश्वराच्या देवळांतून ऐकू येणारा घंटेचा नि नगाऱ्याचा

गोड आवाज एवढा एकच तिच्या जिवाचा विरंगुळा होऊन बसला होता. दिवेलागण झाली कीं नदीपलीकडून घंटा वाजायला लागायची. आणि चांगुणेचा सारा जीव तिच्या कानांत येऊन बसायचा.

माजघराच्या जाळींशीं कान देऊन अंधारांत ती किती वेळ तरी तशीच उभी राहायची. घंटेच्या त्या आवाजामधून तिला बाणेश्वराची पिंडी आणि शंकरचा हसरा चेहरा दिसायला लागायचा. आणि त्याबरोबर बकुळीच्या फुलांचा न् बेलाच्या निर्माल्याचा वासही तिच्या डोक्यांत एकदम दरवळायला लागायचा.

घंटेच्या अन् नगाऱ्याच्या आवाजानें रोज घरबसल्याच तिला बाणेश्वराचें असें दर्शन घडे. अन् शंकरची पण भेट होई. मग आपल्या घराचा उंबरा ती कशाला ओलांडील ?

श्रावणाचा महिना होता. सातआठ दिवस पावसाची चांगलीच झड लागून राहिली होती. अन् मग दोनचार दिवस उघडीप पडली. एक दिवस राघू असा सकाळचाच एखतपुराला गेला. त्याची मावळण तिथें दिली होती. तिला वाखा झाल्याचें कळलें. म्हणून तो घाईघाईनें तिकडे गेला.

दुपारपासून पाऊस पुन्हा जोरानें सुरू झाला. राहीला त्या दिवशीं बरें नव्हतें. ती अंथरुणावरच पडून होती. घरांतलें काम चांगुणा करीत होती. राघू घरांत नसल्यामुळें दोघींनाही अगदीं मोकळें मोकळें वाटत होतें. त्यांच्या मनांवर कसलेंच दडपण नव्हतें. त्यामुळें मायलेकींच्या प्रेमाला त्या दिवशीं निराळेंच भरतें आलें होतें.

चांगुणेनें आपल्या आईसाठीं मुद्दाम गुळाचा सांजा केला. आणि आपल्या हातांनीं ती तिला खाऊं घालूं लागली.

"ह्यें ग काय येड्यावानी ?" राहीनें हसून तिचा हात धरला, "मी काय इक्ती आजारी हाय व्हय ?"

"न्हाई, आज माझ्या हातनंच तूं खाया हवं !" चांगुणेनें तिच्यापाशीं अगदीं हट्टच धरला, तेव्हां राही कबूल झाली.

राहीच्या तोंडांत सांजाचा घास घालीत चांगुणा म्हणाली, "आय ग, मी एक गानं म्हनूं का ?"

"चांगे, आज तुला येडबीड तर न्हाई लागलं ?" चांगुणेच्या चेहऱ्याकडे टवकारून पाहात राही म्हणाली.

"लागलं बरं, लागलंय मला येड. कुनाचं म्हून इचार." चांगुणा क्षणभर

थांबली. आणि सांजाचा दुसरा घास चटकन् आईच्या तोंडांत घालीत म्हणाली, "माझ्या आयचं—तुझं—"

सांजाचा तो घास राहीच्या घशांत थोडासा घोटाळला. तिचे डोळे एकदम डबडबून आले.

तेवढ्यांत चांगुणेनें आपलें गाणें म्हणायला सुरुवातही केली होती—

मला जेवायला घाल ग आई
दूर रानांत गेल्या माझ्या गाई—ग

येळ पुरणाच्या पोळीला न्हाई
दे भाकर अन् थोडंसं दही—ग
मला जेवायला घाल ग आई.

समद्या गवळ्यांच्या नऊ लाख गाई
वाहे तुडुंब यमुनाबाई—ग
मला जेवायला घाल ग आई!

दारीं कान्हा येऊन उभा राही
मुरली वाजवतो गोड गोड लई—ग
मला जेवायला घाल ग आई!

चांगुणेचें गाणें संपलें अन् वाटींतला सांजाही पण संपला.

राहीच्या गालांवरून आसवांचे ओघळ वाहात होते. पण चांगुणेचें तिच्याकडे लक्ष नव्हतें. गाणें संपलें तशीं तिचीं बुबुळें निश्चळ झालीं. तिच्या ओठाचे कोपरे किंचित् उजळले.

तिला शंकरची सई झाली. त्यानेंच तिला तें गाणें शिकवलें होतें. समोरच्या भिंतीचा पोपडा उडाला होता. त्यांतून शंकर आपल्याकडे पाहून हसतो आहे, असा क्षणभर तिला भास झाला.

बाहेर पावसाची झिमझिम सुरू होती. हवेंत चांगलाच गारठा सुटला होता. आभाळ दगाळून गेल्यानें उजेड अंधुकला होता. अन् घरांत तर अंधारच पडला होता.

चांगुणा आपल्या आईच्या गोधडींत घुसली. अन् तिच्या पाठीशीं अगदीं मांजरासारखी गुरगुटून झोपली. पण तिचा डोळा लागला नाहीं. डोळे झाकून

ती आपल्या लहानपणच्या गोष्टी आठवूं लागली एकेक.

तोंच नंदीच्या पायरीवर तोंड गोरेमोरें करून खालीं फरशीकडे पाहात शंकर बसलेला तिला दिसला.

चांगुणा अगदीं त्यांच्याजवळ येऊन उभी राहिली. तरी त्यानें वर तिच्याकडे बघितलें नाहीं. तेव्हां चांगुणा चिडली. त्याचा दंड हातानें धरून तिनें चांगला हलवला. त्याच्या हातांत रोजच्याप्रमाणें आपलीं बकुळीचीं फुलें नाहींत हें बघून तिचे डोळे एकदम भरून आले.

'माझी फुलं कुठैत!' तिनें रडक्या स्वरांत विचारलें.

'मी नाहीं देणार आतां तुला फुलं!' शंकर चांगलाच रागावला होता तिच्यावर.

हातांनीं तोंड झाकून चांगुणा रडूं लागली.

तेव्हां शंकर नरमला. त्याचे ओठ थरथरूं लागले.

'मग इथून कशाला तूं गेलीस?' सद्गदित स्वरांत शंकरनें विचारलें.

चांगुणा एकदम गुडघे टेकून त्याच्यापुढें बसली. आणि त्याचे हात आपल्या हातांत घेऊन म्हणाली, 'ही काय मी आल्यें. आतां न्हाई जानार कध्धीं इथून.'

तेव्हां शंकरचा राग गेला. तो एकदम हसूं लागला. त्यानें आपली ओंजळ तिच्यापुढें केली. शीग भरून तिच्यांत बकुळीचीं फुलें होतीं.

तेव्हां चांगुणा मोठमोठ्यानें हसूं लागली.

"ए, येडे!" चांगुणेला हातानें हलवीत राही म्हणाली, "झोपेंत ग काय हसतेस?"

चांगुणेनें दचकून डोळे उघडले. तिच्या ओटांतून हसूं अजून सांडतच होतें. डोळे उघडूं नयेत असेंच तिला क्षणभर वाटलें.

बाहेर अंधार पडलेला पाहून मात्र चांगुणा धडपडत एकदम उठली. तिन्हीसांजा झाल्या होत्या. पाऊसहि थांबला होता. इतका वेळ कशी आपल्याला झोप लागून राहिली कुणास ठाऊक. चांगुणा स्वतःशींच पुटपुटली.

चांगुणेनें दिवा लावला. अन् आईच्या उशाशीं ठेवला. इतक्यांत राहीला आठवण झाली. "चांगे, अग घरांत पानी न्हाई. नदीवरून घागर तरी भरूनशान आन."

स्वयंपाकघरांतून चांगुणेनें घागर उचलली. अन् डोक्यावर पदर ओढून ती राहीच्या अंगावरून तरतर निघून गेली.

"चांगे, बिगि बिगि ये ग!" आंतून आईची आरोळी तिच्या कानांवर पडली.

"व्ह ऽ!" उंबरा ओलांडतांना मागें बघून चांगुणेनें साद दिली.

नदीवर कुत्रें देखील नव्हतें. सगळा कांठ उघडा पडला होता. चिखलांत बेडक्या घसा खरडून ओरडत होत्या. म्हणून चांगुणेला एकटें असल्याचें भय कांहीं वाटलें नाहीं.

चांबळीचें पात्र थोडेंसें भरलें होतें, अन् वाहूं लागलें होतें. पण कडेला तरी पाणी घोटयाहून अधिक खोल नव्हतें.

पात्राच्या मधोमध गुडघ्याइतक्या पाण्यांत जाऊन चांगुणा उभी राहिली. अन् घागर अर्धवट पाण्यांत बुडवून ती हातानें विसळूं लागली. तोंच बाणेश्वराच्या देवळांतली घंटा घणघण वाजूं लागली. चांगुणा वाकली होती. ती एकदम ताठ झाली. तिच्या सर्वांगावर कांटा फुलून आला.

देवळांत शंकर आहे? शंकर—आपला शंकर! किती वरसं झालीं त्याला भेटून? हा विचार मनांत येऊन पुरा होईपर्यंत ती पलीकडच्या कांठावरसुद्धां जाऊन पोहोंचली होती. पायाला जमीन लागतांच हातांत घागर घेऊन ती बाणेश्वराच्या देवळाकडे तडक धावत सुटली.



ताडताड पायऱ्या चढून ती दारांमधून आंत कधीं गेली अन् आंतलें फरसबंद आवार ओलांडून नंदीच्या अंगावरून ती थेट मधल्या मंडपाच्या कमानीखालीं जाऊन कधीं उभी राहिली, हें तिचें तिलाच समजलें नाहीं.

ती समोर बघूं लागली. गाभाऱ्यांत नंदादीप तेवत होता. त्याचा पिवळा स्वच्छ प्रकाश बाणेश्वराच्या पिंडीवर पडला होता. अन् गाभाऱ्याबाहेर टांगलेली मोठी घंटा देवाकडे तोंड करून शंकर संथपणें वाजवीत पाठमोरा उभा होता.

पण शंकर इतका उंच कसा झाला? अन् त्याची पाठ अन् दंडही मोठ्या माणसासारखे पिळदार कधीं झाले? शंकरच तो. दुसरें कोण असणार? पापण्या न मिटवतां एकसारखी त्याच्या रुंद पाठीवर टक लावून किती तरी वेळ ती निश्चलपणें तिथें उभी होती.

ती आकृति आणि तो आवाज आपापल्यांत साठवून घेण्यासाठीं जणुं कांहीं तिच्या देहांतले सारे कण तिच्या डोळयांत अन् कानांत येऊन बसले होते.

घंटा थांबली. शंकरचा हात खालीं आला. तो उजव्या बाजूच्या कोपऱ्यां-तल्या नगाऱ्याकडे जाऊं लागला.

तोंच 'शंकर' अशी मागून अस्पष्ट हाक आली.

शंकर दचकला. आणि एकदम मागें वळून बघूं लागला.

"कोण आहे?"

चांगुणा हळूहळू अंधारांतून चालत त्याच्यापुढें उजेडांत आली. अन् त्याच्याकडे पाहून हसली. "मी—चांगुणा!"

चांगुणा!

शंकरचा चेहरा एकदम उजळला. त्याच्या पापण्यांचा थरकांप उडाला. त्याचीं बुबुळें निश्चळ झालीं.

"चां—" त्याला बोलवेना. पुढचीं अक्षरें त्याच्या ओठांतच अडलीं. त्यानें घुटका गिळला.

तो तिच्याकडे नुसता बघतच राहिला.

देवळाच्या दाराजवळ एक जास्वंदीचें उंचेलें रोपटें होतें. लालभडक फुलांनीं तें नेहमीं डंवरलेलें असायचें. तेंच जणुं आपल्यापुढें येऊन उभें राहिलेंय असा क्षणभर त्याला भास झाला.

चांगुणेचेहि डोळे शंकरच्या तोंडावर खिळून राहिले होते. गेंदावाणी त्याचा चेहरा भरला होता. अन् फुलला होता. त्याच्या ओठांवरची लव जाऊन, तिथें मिशीची काळी रेघ दिसूं लागली होती. त्याच्या गळ्यांत बारक्याशा पोवळ्यांची शेंदरी माळ होती. ती त्याला किती शोभून दिसत होती!

"देवाला आली होतीस?" शेवटीं शंकरच्या तोंडून शब्द फुटले.

चांगुणेनें मान हलवली. "न्हाई, तुला—"

शंकर खालीं बघूं लागला. त्याचा खालचा ओठ एकदम थरथरला.

"जातें मी." चांगुणा भानावर आली. अन् चटकन् वळलीसुद्धां ती.

"चांगुणा, फुलं घेऊन जा ना—" शंकर मागून ओरडला.

चांगुणा थांबली. मागें बघूं लागली. उजव्या बाजूच्या ओवरीमधून मूठभर फुलें शंकर चटकन् घेऊन आला.

"घे." तिच्यापुढें मूठ उघडून शंकर म्हणाला.

बकुळीचीं फुलें होतीं तीं. सुकलेलीं होतीं.

चांगुणेचे ओठ उमलले. अन् डोळे चमकूं लागले.

तिनें आपल्या हातांतली घागर खालीं ठेवली. अन् पदर पुढें केला.

"बकुळीचीं फुलं काढतोस तूं अजून?"

"रोज सकाळीं!" तिच्या पदरांत फुलें टाकीत शंकर म्हणाला, "ओंजळ-भर फुलं काढतों. दिवसभर नदीच्या पायरीवर ठेवतों. अन् संध्याकाळ झाली म्हणजे ओवरींत टाकून देतों."

चांगुणेचे डोळे एकदम डबडबले. थरथरत्या बोटांनीं तिनें फुलें पदरांत बांधलीं. अन् कांहीं न बोलतां घागर उचलून ती भरकन् बाहेर पळाली.

"थांब, मी आलों—" शंकर तिच्यामागून धावला.

बाहेर अंधार पडला होता. देवळाच्या दारापुढच्या पायऱ्या उतरून दोघें खालीं आलीं. शंकर थबकला. चांगुणेनें नदीकडे धाव घेतली.

तोंच मागून शंकर मोठ्यानें किंचाळला, "चांगुणा, थांब."

चांगुणेचे पाय जागच्या जागींच रुतले. मागें वळून ती शंकरकडे बघते, तोंच शंकरनें तिचा दंड धरला.

"तें बघ!" समोर बोट दाखवून शंकर ओरडला.

चांगुणा डोळे फाडून बघूं लागली. डाव्या बाजूनें 'सों सों' करीत पुराचा मोठा लोंढा चांबळीच्या पात्रामधून उड्या मारीत खालीं येत होता. त्याच्या विक्राळ जबड्याच्या फेसाळ कडा अंधारांत तिला स्पष्ट दिसल्या.

हाताला हिसडा मारून चांगुणा जोरानें पुढें धावली.

पण शंकरनें तिचें मनगट आपल्या हातांत गच्च आवळून धरलें होतें.

"सोड मला—" चांगुणा मोठ्यानें ओरडली, "जाऊं दे. घरीं आय माझी तिकडं वाट पघत असल रे शंकर!"

चांबळीचें सारें पात्र पुरानें भरून गेलें होतें. आणि खदखदूं लागलें होतें.

शंकरच्या खांद्यावर चांगुणेनें मान ठेवली. अन् अंधारांत ती ढसढसा रडूं लागली.

• • •

## ८

अनुक्रम २८१·८५
विभाग बाल वाङ्मय
क्रमांक १३४०
दि. 31/3/61



घागर घेऊन चांगुणा नदीवर गेली त्याला बराच वेळ झाला. अजून कां ती आली नाहीं?—या विचारानें राही थोडीशी अस्वस्थ झाली. ती दाराकडे बघूं लागली. अशी पोरगी आहे किनई ही? एकदां गेली कीं तिकडेच. मागलें मुळीं भानच नाहीं.

तरी जातांना मीं तिला बजावून सांगितलें होतें—'चांगे, लवकर ये बरं.' चांगलें मोठ्यानें ओरडून सांगितलें. अन् तीही म्हणाली, 'हो, मी येतें.' आणि बघा अजून पत्ता आहे का तिचा? तरी बरें. आज कारभारी घरांत नाहींत म्हणून. एवढ्यांत जर का ते आले, तर मग तिची धडगत नाहीं आज.

इतक्यांत दारांत कांहीं तरी खुट्ट वाजलें. राहीला वाटलें आली चांगुणा. ती दाराकडे पाहूं लागली. पण बाहेरून एक मरतुकडें मांजर आंत डोकावून

बघत होतें. राही अशी चिडली त्याच्यावर. तिच्या हाताशीं कांहीं असतें, तर तिनें तें त्याच्या अंगावरच्च मारलें असतें. पण राहीकडे पाहून इतक्या केविलवाण्या स्वरांत तें 'म्यांऊं' म्हणालें, कीं राही एकदम विरघळली.

हो, म्हणे म्यांऊं. तुझें ठीक आहे. तूं अगदीं वेळेवर आलीस. तुला वाटलं सैंपाक झाला असेल. पण तिचा अजून पत्ता आहे का? जा, तिला बोलावून आण नदीवरून. मागून राही स्वतःशींच खजील झाली. चांगुणेला बोलावून आणायला आपण त्या मांजरीला काय सांगतों आहोंत?

आतां ही पोरगी येणार तरी कधीं? धार कधीं काढणार? चूल कधीं पेटवणार? सैंपाक केव्हां करणार? ह्या वेळेला हिला भेटलं तरी कोण नदीवर? ही का बोलत बसायची वेळ आहे? कुठून आपण हिला घागर भरून आणायला नदीवर पाठविली असें राहीला होऊन गेलें.

किती वेळ होऊन गेला हेंही कळायला तिला कांहीं मार्ग नव्हता. पुष्कळ वेळ झाला एवढी बरीक तिला जाणीव होती. कांहीं वेळानें पाऊस पडायला सुरुवात झाली. कौलें वाजायला लागलीं. राहीला वाटलें, आतां मात्र चांगुणा लौकर परत येईल. पावसांत भिजत किती वेळ बोलत उभी राहील ती कुणाशीं? इतकी कांहीं वेडी नाहीं ती.

तरी देखील चांगुणा आली नाहीं. मग मात्र राहीचा धीर सुटला. तिच्या तोंडचें पाणी पळालें. ही तरणीताठी पोर. रात्रीची आपण एकटी नदीवर पाठवली. कारभाऱ्यांचें गांवाशीं कांहीं नीट नाहीं. त्यांच्या वाईटावर कुणी असेल. त्यानें त्यांच्यावर दावा उगवण्यासाठीं कांहीं भलतेंसलतें तर केलें नसेल पोरीला?

का, पाणी आणायला म्हणून बाहेर पडली अन् पोरीनें कुठें झुकांडी दिली? पोरीचें डोकेंबिकें तर फिरलें नाहीं? खरेंच, दुपारपासून पोरगी असें वेड्यासारखें काय बरें करत होती? मला आपल्या हातानें गुळाचा सांजा काय खाऊं घातला. गाणें काय म्हणाली. अन् झोपेंत मोटमोठ्यानें काय हसली! दुपारीं तिनें केलेल्या एकेक गोष्टी राही जशी आठवूं लागली, तसें तिला त्यांचें नवल वाटायच्या ऐवजीं रडूंच येऊं लागलें.

चांगुणा तान्ही होती, तेव्हां तिच्या पाळण्याला झोके देतांना राही एक गाणें म्हणत असे. तें तिच्या पटकन् ओठांवर आलें. अन् भरल्या डोळ्यांनीं अन् थरथरत्या गळ्यानें तें ती स्वतःशीं गुणगुणूं लागली—

माझी गुनाची चांगुना ग
  तिचा सोन्याचा पाळना.
जसा चांदीच्या वाटींत
  लाल डाळिंबाचा दाना.
हिच्या वठांत पिकला
  हिऱ्यामोत्याचा वाटाना.
हिला कडेवर घ्याया,
  झाला चांदोबा ठेंगना.
देव आले हो अंगना,
  माझी बघाया चांगुना—
माझी गुनाची चांगुना !

गाणें संपलें. पण राहीला आपलें रडूं आवरेना. तिच्या डाव्या दंडावरची चोळीची बाही भिजून गेली.

छे, छे, माझी गुणाची चांगुणा असें भलतेंसलतें कसें करील ? आपल्या आईला दुःख होईल असें कधीं तिच्या हातून व्हायचें नाहीं.

मग चांगुणा कां अजून आली नाहीं ? राहीनें अंगावरची गोधडी फेकून दिली अन् ती ताडकन् उठून बसली. आईचें आंतडें तिला का झोपूं देईल ? आपलें दुखणें ती चटसारें विसरून गेली. चांगुणा कुठें गेली ? ती कधीं येईल ? हें एकच आतां तिचें दुखणें होऊन बसलें.

ती उठून पडवींत आली. पाऊस आतां थांबला होता. अंगणांतून ती दारांत आली. दाराच्या दोन्ही फळ्या उघड्याच होत्या. डोळे फाडून फाडून ती बाहेरच्या अंधारांत डोकावून बघूं लागली. तिला काय दिसणार ? रस्ता अगदीं काळाशार होता. कुठें कोणी चिटपांखरूं नव्हतें. आतां हाक तरी कोणाला मारायची ? अन् सांगायचें तरी कोणाला ?

ती खालीं उंबऱ्यांत बसली. तिला जरा अशक्त वाटूं लागलें. मनांत म्हणाली ती, गांवांत इतकीं माणसें आहेत. पण वेळप्रसंगीं कुणी कुत्रेंही आपल्या उपयोगी पडायचें नाहीं.

इतक्यांत तिच्या हाताला कांहीं तरी मऊमऊ अन् कोंबट लागलें. ती खालीं वाकून बघूं लागली. राघूनें लंगडें केलेलें कुत्रें उंबरठ्यावर ठेवलेला तिचा हात

बाहेरून प्रेमानें चाटीत होतें. राहीनें त्याच्या ओल्या डोक्यावरून मोठ्या ममतेनें हात फिरवला. नाहीं बाबा, उगाच तुला बोललें रे. तुझीच तेवढी मला सोबत आहे बरें.

समोरच्या घरांत कटक्याची म्हातारी राहात होती. घराचें दार बंद होतें. म्हातारीला रात्रीची झोप येत नव्हती. राहीला माहीत होतें तें. पण ती थोडीशी बहिरी होती. आपण हाक मारली तर तिला ती ऐकूं कशी येणार ?

घरांत तिचा मोठा मुलगा सीताराम होता. त्याची बायको होती. एखादे वेळीं ते आपल्या हाका ऐकून जागे होतील.

"नागीची आजी—अवो, नागीची आजी." आपल्या दारामधून मोठमोठ्यानें राही हाका मारूं लागली.

थोड्या वेळानें समोरचें दार उघडलें. अन् आंतून पुरुषाचा आवाज आला, "कोन हाका मारतंय?"

"मी चांगुनाची आय, सीतारामदादा!" राही कळवळून म्हणाली.

सीताराम दारांतून चटकन् बाहेर आला. त्याला राहीचा आवाज चमत्कारिक वाटला.

"काय झालं राहीबाय?" त्यानें घाबरून विचारलें.

"ह्ये गेल्याती सकाळचं एखतपुराला. त्यांची मावळन वाख्यानं आजारी हाय म्हून. घरांत आम्ही दोघीच आव्हत. पानी आनाया ही पोरगी आवशींच नदीवर गेली घागर घेऊन. वादूळ झाला. अजून परत न्हाई आली. म्हून तुम्हास्नी उठावलं!"

सीतारामच्या तोंडचें पाणीच पळालें. त्यानें घरांत जाऊन आपल्या बायकोला न् म्हातारीला उठवलें. त्यांना दिवा लावायला सांगितला. आणि पैरण घेऊन तो राहीच्या ओट्यावर येऊन जरासा टेकला.

राहीला काय सांगावें हेंच त्याला कळेना. तो भीत भीत म्हणाला, "पन राहीबाय, चांबळीला तर लई पानी आलंया. मी मघाशींच तिकडून आलों. घा वर्सांत असं पानी न्हाई आलं—भिकू राजगिऱ्याची गाय न् म्हैस वाहून गेली—त्याच्याच म्हातारीपाशीं तर इकता वेळ मी बसलों व्हतों."

सीताराम काय सांगत होता तें राहीला समजत होतें, पण ऐकूं येत नव्हतें. आपल्या साऱ्या अंगांत सुया शिरताहेत असें एकदम तिला वाटलें.

भिकू राजगिऱ्याच्या गाई न् म्हशीवाणी आपली चांगुणा चांबळीच्या

लोंढयांत वाहून चालली आहे आणि ती मोठमोठ्यानें ओरडून आपल्याला हाका मारते आहे, असें चित्र राहीच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें.

तिच्या आरोळ्या तिच्या कानांत शिरल्या. आणि तिच्या डोक्यांत असंख्य कळा उठल्या. "चांगुणा ग—" असा तिनें हंबरडा फोडला आणि छाती पिटून मोठमोठ्यानें ती रडूं लागली.

सीतारामची बायको न् म्हातारी धावल्या. आणि राहीला आवरून धरून त्या तिची समजूत घालूं लागल्या.

"नवऱ्यानं मेल्यानं तिच्या मानंत खुरपं खुपसलं, त्याच वक्तीं ती मरायची," रडतां रडतां राही शोक करूं लागली, "पन तवा ती वाचली. अन् म्यां रांडनं आज तिला पानी आनाया सांगून तिला चांबळीच्या पुरामंदी व बुडवली!" असें म्हणून राही फडाफडा आपल्या गालांवर मारून घेऊं लागली. तिला आवरतां आवरतां त्या दोघां बायांची अगदीं पुरेवाट झाली.

त्या गडबडींत राघू अंधारांत मागें येऊन कधीं उभा राहिला हें कुणाला कळलेंच नाहीं. आपल्या घराच्या दारांत चाललेला हा प्रकार बघून तर तो सर्दच झाला. काय झालें हेंच मुळीं त्याला समजेना.

एखतपुराची त्याची मावळण दुपारींच गमावली. तिचें सगळें उरकून तो तिनिसांजचा तडक तेथून निघाला. पावसापाण्यांत अन् चिखलांत सातआठ मैलांचा रस्ता तुडवीत तुडवीत घरीं येईपर्यंत, त्याला हा वेळ झाला. त्याचीं कापडें भिजून चिंब झालीं होतीं. अन् अंग अगदीं आंबून गेलें होतें.

"काय झालं?" राघूचा निबरट अन् रागीट आवाज मागून उमटला.

सगळेजण चमकले. राहीच्या रडण्याचा सूर खालीं आला. सीताराम कटके उठून राघूच्या जवळ गेला. आणि हलक्या आवाजांत त्यानें राघूला सगळें सांगितलें. राघू एकदम सुंद झाला. त्याचा श्वास क्षणभर थांबला. दांतांनीं खालचा ओठ चावीत अन् हातानें हनुवटीचें टोक चुरडीत डोळे मिटून तो तसाच उभा राहिला.

राघू कांहींच बोलेना. तसें राहीचें रडूं थांबलें. ती चपापली. पोरीच्या दुःखापेक्षां तिला नवऱ्याचेंच भय जास्त वाटूं लागलें.

"तूं जा घरांत!" कांहीं वेळानें गंभीर स्वरांत राघू आपल्या बायकोला म्हणाला, "मी येतों पघून. चल सीताराम."

राघूच्या त्या बोलण्यानें राहीला केवढा धीर आला. जणुं काय तो चांगुणेला

आतां घेऊन येणार असें तिला वाटलें. कण्हत कण्हत ती उठली. दोघी बायांनीं तिला धरून आंत नेलें.



चांदळींचा अवतार बघून राघूच्या छातींत धसकाच बसला. वाळवंट पार बुडून गेलें होतें. अन् पाणी गांवांतल्या रस्त्यापर्यंत आलें होतें. टीचभर ओढ्यानें समुद्राचें सोंगच घेतलें होतें जणुं. पलीकडच्या कांठावरचें कांहीं दिसत नव्हतें. पाण्याचा आवाज तर असा कांहीं चालला होता कीं जशा त्याच्या सगळ्या अंगाला जिभाच फुटल्या होत्या.

राघू मटकन् रस्त्यावर खालीं बसला. अन् म्हणाला, "सीताराम, पोरगी गेली र!"

सीताराम काय बोलणार? त्याची तर खात्री झाली होती. दोघेही कांहीं न बोलतां अंधारांत किती वेळ तरी तसेच बसले होते. पाण्याचा आवाज बाहेर एवढ्या मोठ्यानें चालला होता, कीं त्यांच्या डोक्यांतले विचार सुद्धां त्यांना स्वतःला ऐकूं आले नसते.

मधून मधून पुराचा फुंफाट थोडासा उतरल्यासारखा वाटे. त्या वेळीं नदीच्या पलीकडून कसला तरी आवाज येतो आहे, असा राघूला एकदोन वेळां भास झाला.

" सीताराम, " राघूनें मध्येंच एकदां विचारलें, " देवळांतून कांहीं आवाज येतो का र ? "

" कसला ? " सीतारामनें विचारलें.

" नगाऱ्याचा न् घंटेचा ? "

सीताराम कान देऊन ऐकूं लागला. " नाहीं बा ! "

" मला आपलं वाटलं ! " राघू पुटपुटला अन् गप्प बसला.

" राघूदा " थोड्या वेळानें त्याच्या खांद्यावर हात ठेवून सीताराम म्हणाला, " मी जरा आपल्या मानसांना बोलावून आनतों. "

राघू कांहीं बोललाच नाहीं. सीताराम उठून गेला. अर्ध्या तासाच्या आंत दहापंधरा माणसें घेऊन तो आला.

गांवांतलीं मराठ्यांचीं माणसें होतीं तीं. कांहीं राघूच्या नात्यांतलीं होतीं. गपचिप येऊन तीं राघूच्या आजूबाजूला अंधारांत बसलीं. सीतारामनें सांगितलेली बातमी ऐकून सगळे हादरून गेले होते. राघूशीं काय बोलावें अन् त्याची कशी समजूत घालावी हेंच त्यांना मुळीं कळेना. आपल्या घरांतलेंच माणूस जणुं गेलें अशी हळहळ त्यांना वाटत होती.

दुःखाचा पहिला हिसळा कमी झाला, तशी त्यांच्यांत थोडीशी हालचाल सुरू झाली. कुणीं तरी लांब सुस्कारा टाकला. कुणीं खोकलें. कुणी नाक शिंकरलें. हळूहळू वातावरण पुष्कळ सैल झालें.

" इतक्या वरसांत कधीं असं झालं नव्हतं !— " शेवटीं एकजण हळूच विव्हळत म्हणाला.

" मी लहान व्हतों, तवां बामनाची एक बाई अशीच वाहून गेली व्हती पघा " एका म्हाताऱ्यानें सांगितलें.

" नाट लावला आज गांवाला ह्या नदीनं ! " चांदळीच्या पुराकडे पाहात तिसरा चिडून बोलला, " पघा कसा हडळीला चेव आलाय ! "

कुणी कांहीं, कुणी कांहीं आपलें बोलत राहिलें. राघूचें दुःख तेवढेंच हलकें झालें. बुऱ्यांतून कांहीं तरी बरें काढायचें, हा माणसाचा मुळीं स्वभावच आहे. राघू मनांतल्या मनांत म्हणाला, ' पोरीची मोठी काळजी होती. ती देवानें अशी मिटवली. चला, तीही सुटली अन् आपणही सुटलों. '

पहाट फटफटली तसें पुराचें पाणी झपाट्यानें उतरूं लागलें. झुंजूमुंजू झालें, तसें वाळवंट उघडें पडूं लागलें. अन् उगवतीला झेंडू फुटला तेव्हां

सारें पात्र रिकामें झालें. काठावरल्या वडाच्या न् चिंचेच्या झाडांवर उन्हें हसूं लागलीं, तेव्हां आदल्या दिवसासारखा वावभर रुंदीचा झरा वाळवंटाच्या मधोमध खळखळ करीत वहात असलेला दिसूं लागला. रात्रीं एवढा पूर येऊन गेल्याची नांवनिशाणी कुठें उरली नाहीं.

वाळवंटाच्या कडेकडेनें सीताराम आणि बाकीचीं माणसें सुन्न पावलांनीं इकडे-तिकडें बघत फिरत होतीं. कुठें एकाद्या झुडपांत किंवा दगडाच्या कपारीला कांहीं अडकलेलें एकादे वेळीं दिसेल कीं काय असें आपलें मनांतून त्यांना वाटत होतें. पण कांहीं कुठें दिसलें नाहीं.

"कशाचं काय मिळायचंय!" हताश स्वरानें कुणी तरी म्हणालें, "त्या पान्याचा जोर क्यवढा अन् ती प्वार क्यवढी!"

"राघूदा, चला आतां—" एक म्हातारा क्षीण आवाजांत म्हणाला, "तिचं आपलं जें व्हतं तें संपलं!"

"देवानं दिलं—देवानंच नेलं!" सुस्कारा टाकून तिसरें कुणी तरी म्हणालें.

राघू कांहीं बोलला नाहीं. एका रात्रीमध्यें त्याचीं गालफडें बसून गेलीं होतीं. मुदतीच्या तापामधून उठल्यागत त्याचा चेहरा खप्पड दिसूं लागला.

माणसें वळलीं. अन् चालूं लागलीं. तसा तोही वळला.

इतक्यांत सीतारामनें त्याचा हात जोरानें दाबला. राघू दचकून त्याच्याकडे बघूं लागला.

'मागं पाहा' असें सीतारामनें त्याला डोळ्यांनीं खुणावलें. झटकन् मान वळवून राघूनें तिकडे पाहिलें.

बाणेश्वराच्या देवळाच्या पायऱ्या चांगुणा हळू हळू उतरत होती. तिच्या हातांत घागर होती. अन् डोक्यावर पदर होता. तिच्या मागें दगडी दारांत शंकर गुरव शांतपणें उभा होता.

आपण जागे आहोंत का स्वप्नांत हेंच मुळीं राघूला कळेना. डोळे फाडून फाडून तो त्या दोघांकडे बघूं लागला—

हो, चांगुणाच होती ती. आणि तिच्या मागें उभा असलेला तोही शंकरच होता. सर्व प्रकार त्याच्या ध्यानांत येऊन चुकला. कपाळावर हात मारून तो मटकन् खालींच बसला.

"सीताराम, साऱ्या गांवाच्या समूर ह्या पोरीनं माझ्या तोंडाला डांबर

फासलं र डांबर!" रात्रभर राघूच्या डोळ्यांतून पाणी आलें नाहीं, तें आतां त्याच्या गालांवरून वहात असलेलें सीतारामनें पाहिलें. "पोर पुरामंदी वाहून गेली म्हून सारी रात मी रस्त्यावर डोकसं धरून बसलों व्हतों. पन आतां हें पवितल्यावर ती पुरामंदी वाहून गेली न्हाई म्हून डोकसं फोडून घ्यायची येळ आली हाये."

राघू मागें कां राहिला म्हणून पुढें गेलेलीं माणसें मागें वळून पाहूं लागलीं. तेव्हां त्यांचेंहि लक्ष एकदम चांगुणेकडे आणि शंकरकडे गेल्यावांचून राहिलें नाहीं. तीं 'आ' वासून त्या दोघांकडे बघतच राहिलीं.

ह्या पोरीनें आपल्या बापाला अन् आपणां सगळ्यांना 'गाडाव' बनवलें ह्याची त्या सर्वांना फार चीड आली.

"च्यायला, म्हंजी सारी रात झोपेचा खराबा करून हितं आपन टाळक्याचं क्यास जाळींत बसलों व्हतों, अन् ही हडळ—"

दांतओठ खात कुणी तरी ओठांतल्या ओठांत पुटपुटलें. पण दुसऱ्यानें त्याला डोळ्यांनीं दाबलें. तेव्हां तो तेवढ्यावरच थांबला.

"तो शिदू न्हावी सांगतो तें समदं खरं आहे. पोरीनं आपल्या जातीचं नाक काटलं—चला—" तिसरा म्हणाला.

माना खालीं घालून ते मुकाट्यानें चालूं लागले. राघूशीं बोलायला त्यांना आतां तोंडच नव्हतें. काय बोलणार ते? पोरगी मेली असती तर त्याची कांहीं तरी समजूत घालतां आली असती. आतां कशी घालतां येणार?

सारी रात राही आपल्या पडवींत बसून होती. सारखी दाराकडे टकटक बघत होती. पण पहाट झाली तरी राघू आला नाहीं. किंवा कोणीच आलें नाहीं. सकाळ झाली. तेव्हां सीतारामची बायको नि म्हातारी निघून गेल्या. चांगुणेची आशा तिनें कधींच सोडून दिली होती. पण राघू अजून कां आला नाहीं ही एक तिला नवीन काळजी लागून राहिली. अन् त्यामुळें तिला धाप लागली.

उन्हें पडलीं, तरी कुणाचा पत्ता नव्हता. राहीला वाटलें, आतां आपणच खुरडत खुरडत नदीपर्यंत जावें, म्हणजे कळेल तरी सगळें. असा विचार तिच्या मनांत यायला आणि हातांत मोकळी घागर घेतलेली चांगुणा दारांत उभी असलेली तिला दिसायला एकच गांठ पडली.

निर्जीव बुबुळांनीं ती तिच्याकडे बघूं लागली.

चांगुणेला वाटलें कीं रात्रभर आई आपली काळजी करीत बसली असेल. म्हणून आपल्याला बघून तिला फार आनंद होईल. धावत धावत येऊन ती आपल्याला मिठी मारील. आणि आपल्या पाठीवर आसवांचा सडा घालील.

पण राही उठली नाहीं. हसली नाहीं. कीं रडली नाहीं. चांगुणा अंगणांतून हळूहळू पडवींत आली. आणि भीतभीत आईच्या शेजारीं येऊन बसली. पण आई तिच्याशीं बोलली नाहीं. तिच्या तोंडाकडे नुसती बघतच राहिली.

"माझ्यावर रागवलीस तूं ?" रडका चेहरा करीत चांगुणेनें विचारलें.

"चांगे, ह्ये कुटं हायेत?" निर्जीव स्वरांत राहीनें उलट तिलाच विचारलें.

चांगुणा घाबरली. "दादा आलं गांवाहून ?"

"रातचंच !" राहीनें सांगितलें. "अन् आलं तसं तुलाच शोधाया जे नदीवर गेलंत ते अजून आलं न्हाईत."

चांगुणेची दांतखिळीच बसली. आतां बाप घरीं आल्यावर तो अंगाची साल न् साल सोलून काढल्याबांचून सोडणार नाहीं, ह्या विचारानें तिच्या डोळ्यांपुढें अंधारी आली. अन् ती बसल्या जागींच थरथर कांपू लागली.

"चांगे—पोरी," आपला हाडकुळा हात चांगुणेच्या पाठीवरून फिरवीत राही म्हणाली, "दूख तरी किती देनार हायेस तूं आपल्या आईला ? आतां रडायचंबी बळ न्हाई राह्यलं माझ्या अंगांत !"

आपल्या आईचा हात हातांत धरून ती स्फुंदत म्हणाली, "असं नग बोलूस आय ग. घागर भरून मी तशीच येनार व्हतें. इकऱ्यांत देवळांतली घांट म्यां ऐकली. तवा वाटलं, संकरला पघून यावं. म्हून देवळांत अशी उभ्या उभ्या गेलें अन् परत याया निघालें. त्योच चांबळीला पानी आलं—"

राहीचा चेहरा एकदम पांढरा फटफटीत पडला.

"म्हंजी, तूं न् शंकर देवळांत व्हतां समदी रात ?" राहीच्या तोंडून शब्दही नीट उमटेना. तिला जोराची धाप लागली. आपली आई एवढी कां घाबरली हें चांगुणेला उमगेना.

"व्हय्, त्यो नगारा वाजवीत व्हता. अन् मी घांट वाजवीत व्हतें. तूं न्हाई ऐकलीस ? चांबळीचं पानी उतरूं दे, म्हून समदी रात आम्ही देवाला जागवीत बसलों व्हतों."

सारी रात्र आपण देवापुढें जागत बसलों होतों हें ऐकून तरी आपल्या आईला आनंद होईल असें चांगुणेला वाटलें होतें. पण राहीचा चेहरा आणखीनच उतरला.

"चांगे, आतां लहान का तूं हायेस?" तिचा गालगुच्चा उपटून राही म्हणाली, "तुला कळायचं तरी कवां? सांगूं तरी नगस हें आतां कुनाला. जा, ऊठ, ते यायच्या अदुगर त्रिगित्रिगी धार काढ अन् चूल पेटव."

बापाच्या रागाचा चांगुणेला सराव होता. पण आईच्या रागाची तिला ओळखही नव्हती. जलमांत कधीं आईनं तिचा असा गालगुचा उपटला नव्हता. इतकें आपण सांगितलें तरी सुद्धां आईनें आपल्यावर एवढें रागवावें ह्याचें तिला वाईट वाटलें. रडवें तोंड करून ती उठली अन् कामाला लागली.

दुपार होऊन गेली, तरी राघू घरीं परत आला नाहीं. चांगुणेनें सैंपाक करून ठेवला. पण तो खाणार कोण? राहीच्या तोंडचें तर पाणीच पळालें. तिचा आजार अन् रात्रीचा सारा शीण कुठल्या कुठें नाहींसा झाला.

चांगुणा न् शंकर रात्रभर देवळांत होतीं ही गोष्ट राघूला माहीत झाली असली पाहिजे हें तिला पुरतें कळून चुकलें. त्या संतापाच्या भरांत आपल्या जिवाचें कांहीं बरेंवाईट करून घ्यायला तर ते कुठें गेले नसतील ना अशी शंका तिच्या मनाला येऊं लागली. अन् जसा जसा दिवस वाढूं लागला तरी देखील राघू परत येण्याचें चिन्ह तिला दिसेना, तसतशी मनांतली ती शंका बळावत जाऊन, तिच्या काळजाचा ठावच सुटला.

वणव्यांत सापडलेल्या ससासारखी चांगुणेच्या मनाची स्थिति होऊन गेली. बाप बाहेरून कां येत नाहीं हेंही तिला कळेना. आणि आई उपाशी पोटीं असा चमत्कारिक चेहरा करून कां गपचिप बसली आहे, हेंही पण तिला समजेना. मग ती तरी कशी जेवणार?

सैंपाकघरांत बसून बसून ती अगदीं कंटाळून गेली. शेवटीं दिवस मावळायची जेव्हां वेळ आली तेव्हां ती उठली. अन् अंगावर गोधडी घेऊन माजघरांत जाऊन निजली. आधली सबंध रात्र तिला जाग्रण घडलें होतें. म्हणून डोळे मिटतांच तिला एकदम गाढ झोप लागली.

अंधार पडला अन् दिसेनासें झालें, तेव्हां राघू एकदाचा घरांत आला. पडवींत दिवा लावून राही वाट पाहात बसलीच होती. त्याला डोळ्यांनीं बघितलें, तेव्हां तिचा जीव भांड्यांत पडला.

राही त्याच्याशीं बोललीच नाहीं. त्याच्या तोंडाकडे पाहायचा सुद्धां तिला धीर झाला नाहीं. आतां पुढें काय ऐकायला न् बघायला मिळतें ह्या भयानें ती आपलें काळीज अगदीं मुठींत धरून बसली.

"कारभारनी, भाकर कर ग, मला भूक लागलीय." अगदीं शांत स्वरांत राघूनें तिला सांगितलें.

राही त्याच्याकडे पाहातच राहिली. जळत्या निखाऱ्यावर पाय पडावा अन् तो थंडगार लागावा, तितकें तिला नवल वाटलें.

"चांगीनं दुपारींच भाकर करून ठेवलीय." राही म्हणाली.

"ती नग. तूं ताजीच कर." राघूनें सांगितलें.

राही लगालगा सैंपाकघरांत गेली. तिनें चूल पेटवली. अन् बाजरीचें पीठ भिजवून ती मळूं लागली. भाकर थापून तिनें तव्यावर टाकली. तोंच राघू सैंपाकघरांत आला. अन् राहीच्या शेजारीं उकिडवा येऊन बसला.

राहीला तें चमत्कारिकच वाटलें. राघू असा तिच्याजवळ येऊन मागें कधीं बसला नव्हता.

"चांगी झोपलीय वाटतं?" राघूनें हळूच विचारलें.

"व्हय. मायंदळ तिनं वाट पगितली. अन् मंग तशीच ती उपाशी झोपली." राही कळवळून म्हणाली.

तव्यावरून पहिली भाकर काढून तिनें चुलीपुढें लावली. अन् परातींत ती दुसऱ्या भाकरीचा उंडा मळूं लागली. तोंच राघूनें आपल्या धोतरांतून एक पुरचुंडी बाहेर काढली. अन् ती सोडून तिच्यांत बांधलेला कसलासा चुरा भरंकन् त्या पिठामध्यें ओतला.

राही दचकून एकदम ओरडली, "ह्यें काय?"

राघूनें डोळे वटारून चटकन् आपला हात तिच्या तोंडावर ठेवला. "काचंचा कुट्टा हाय ह्यो. मोठ्यानं नग बोलूस?"

राहीच्या डोक्यांत लखकन् प्रकाश पडला. तिची बोबडीच वळली. तिचें सारें अंग थरथर कांपूं लागलें.

घोगऱ्या स्वरांत राघू म्हणाला, "देवळांतनं बाहेर येतांना त्या दोघांस्नी समद्या गांवानं आज सकाळीं पघितलं हाये. आतां बोल. कामठ्याच्या कुळाचं न् मराठ्याच्या जातीचं नाक कापलंय तिनं. एक ती तरी मरल, न्हाई तर मी तरी मरन!"

तोंडांत पदराचा बोळा कोंबून राही ढसढसा रडूं लागली. 'माझ्या पोरीला मारायला नका हो मला सांगूं—' असं तिच्या डोळ्यांतलीं बुबुळें दीनवाण्या दृष्टीनें राघूला जणुं सांगूं लागलीं. त्यांची भाषा राघूला समजल्यावांचून राहिली नाहीं.

तो ताडकन् उठला. "ठीक हाय. मंग मीच विहिरींत जाऊन जीव देतों आतां. मग हो रंडकी अन् हिंड गांवभर घेऊन खुशाल तिला!"

त्याबरोबर राही पुढें वाकली अन् भरभर परातींतलं पीठ मळूं लागली. तिच्या डोळ्यांतल्या आसवांची धार परातीवर सांडूं लागली. तिच्या हातांतल्या उंड्याकडे नजर लावून राघू खालीं बसला.

राहीचें मन तिच्या शरीरांत होतेंच कुठें? एकाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें तिची सारी हालचाल चालली होती. दुसरी भाकरी तिनें तव्यावर टाकली. पाण्याचा हात तिच्यावरून फिरवला, अन् चुलींतल्या जाळाकडे ती बघूं लागली.

आपल्या पोटच्या गोळ्याला त्या जाळांतच जणुं कांहीं आपण भाजतों आहोंत असें तिला वाटलें. मोठ्यानें ती किंचाळणारच होती. पण लाल लाल डोळे करून राघू आपल्याकडे बघतो आहे हें लक्षांत येतांच, तिची जीभच तिच्या टाळ्याला चिकटून बसली.

तव्यावरून तिनें भाकरी खालीं काढतांच राघूनें चटकन् ती उचलली आणि एका ताटांत घालून ती बाजूला काढली.

"चांगे—ए चांगे—" राघूनें मोठ्यानें हाक मारली.

बापाचा आवाज ऐकून चांगुणा खडबडून झोपेंतून जागी झाली. अन् थरथर कांपत ती सैंपाकघरांत आली.

"दुपारीं उपाशी झोपलीस, पोरी. घे भाकर खाऊन!" राघू जिव्हाळ्याच्या स्वरानें म्हणाला.

इतक्या आपलेपणानें भाकर खायला चांगुणेला तिच्या बापानें कधींच बोलावलें नव्हतें. बाप आपल्यावर रागावला असेल ह्या कल्पनेनें दुपारपासून ती बिचारी भेदरून गेली होती. म्हणून त्याच्या आवाजांतला प्रेमळ स्वर ऐकून छातीवरचा धोंडाच जणुं कांहीं खालीं उतरला इतका तिला आनंद झाला.

ती चटकन् गुळणा करून आली. आणि पाण्याची तपेली भरून बापाच्या समोर येऊन बसली. राघूनें आपल्या जवळची ताटली तिच्यापुढें सारली.

पहिल्यानें केलेली भाकर थाळींत घालून राहीनें राघूपुढें सारली. अन् दुपारचेंच कालवण अन् कोरड्यास दोघांना वाढलें. रात्रीपासून चांगुणा जेवली नव्हती. तिला कडकडून भूक लागली होती. म्हणून बापानें जशी खायला सुरुवात केली, तसा आपल्या ताटलींतला भाकरीचा एक मोठा थोरला तुकडा

तोडून चांगुणेनें आपल्या तोंडांत घातला.

राहीनें डोळे मिटून गुडघ्यावर मान ठेवली.

काल दुपारीं पोरीनें एवढ्या प्रेमानें गुळाचा सांजा करून स्वतःच्या हातांनीं आपल्याला खायला घातला. आणि आज आपण काचा कुटून तिला भाकरींतून खायला घालतों आहोंत. मांडीवर डोळे मिटून झोपलेल्या स्वतःच्या लेकराचा कसायासारखा गळा कापतों आहोंत. ह्या विचारानें राहीचीं आंतडीं आंतल्या आंत तटतट तुटत होतीं.

उघड्या डोळ्यांनीं चांगुणेकडे बघवेना, म्हणून तिनें मान खालीं घालून डोळे मिटून घेतले. पण 'मला जेवायला घाल ग आई' ह्या तिनें आधल्या दिवशीं म्हणून दाखविलेल्या गोड गाण्याचे सूर तिच्या कानांत घुमूं लागले. अन् तापलेलें तेल कोणी तरी त्यांत ओततें आहे असें तिला वाटूं लागलें.

भाकर चावतांना चांगुणेला कचकच लागूं लागली. कसेंसेंच तिनें तोंड केलें. ती बोलणार होती आईला, पण बाप आपल्या चेहऱ्याकडे डोळे वटारून बघतो आहे, हें लक्षांत येतांच तिनें पाण्याची तपेली आपल्या तोंडाला लावली.

भाकरीचा तुकडा अन् पाण्याचा एक घोट असें करून कशीबशी तरी तिनें आपली भाकर संपविली. अन् ती आपल्या आईकडे बघूं लागली. गुडघ्यावर मान ठेवून आई रडते आहे हें तिच्या लक्षांत आलें. तेव्हां तिला चमत्कारिक वाटलें.

राघूचेंहि जेवण तितक्यांत संपलें. तो हात धुवायला बाहेर गेला.

तेव्हां चांगुणा हळूच म्हणाली, "कां ग रडतेस तूं आय?" राहीनें गुडघ्यावरून आपली मान उचलली आणि अशा कांहीं व्याकुळ दृष्टीनें तिनें चांगुणेकडे पाहिलें कीं चांगुणेच्या काळजांतून कळ उमटली.

इतक्यांत राघू आंत आला. आणि राहीला म्हणाला, "मी भैरोबाच्या देवळांत जाऊन येतों. मला येळ लागल." राघू मान खालीं घालून निघून गेला.

बाहेरचें दार वाजलें.

तशी राही ताडकन् एकदम तिथून उठली आणि चांगुणेचा हात धरून ओरडली, "रांडं, जा इथून अन् मर बाहेर जावून कुटं तरी. पन माझ्या डोळ्यासमोर मरूं नकोस. म्या हडळीनं तुला भाकरींतून काच खाया घातली. माझी बोटं झडत्याल. माझ्या सर्व्या अंगाला किडं पडत्याल. ऊठ, बघतीस काय? तुझा बाप मानूस न्हाई. राक्षस हाय!"

असें म्हणून राहीनें चांगुणेला फर फर ओढीत पडवींतून अंगणांत नेलें. आणि अंगणामधून मारीत मारीत तिला दारांत नेऊन जोरानें बाहेर ढकलून दिलें. पायरीवर पाय घसरून चांगुणा रस्त्यांत पडली. राहीनें खाडकन् घराचें दार बंद करून टाकलें.

अंधारांत चांगुणा किती वेळ तरी तशीच रस्त्यावर पडून राहिली. काय झालें हेंच तिला कळलें नाहीं. तिचें डोकें आणि अंग अगदीं सुंद होऊन गेलें होतें.

कांहीं वेळानें ती भानावर आली. आणि उठून झोपेंत चालणाऱ्या माणसा-प्रमाणें पाय नेतील तिकडे अंधारांत चालूं लागली.

राघूच्या दारापाशीं बसलेलें लंगडें कुत्रें मोठ्यानें एकदम गळा काढून रडूं लागलें.

# . १ .



आभाळ भरून आलें होतें. अंधार पडला होता. रात्र चिनचिन करीत होती. आणि भुतानें झपाटल्यासारखी चांगुणा चालली होती.

गांवाची शीव ओलांडल्यावर काळींभोर शेतें लागलीं. वाट खालीं दिसतही नव्हती. पण तिचे पाय झपझप चालले होते. बाभळीचीं कांटेरी झुडपें वाटेच्या कडेनें अंग चोरून बसलीं होतीं. जणुं कांहीं अंधारांत बसायचें त्यांना भयच वाटत होतें. पण बाहेर अंधार आहे हें चांगुणेला माहिती तरी कुठें होतें!

तिला कांहीं दिसत नव्हतें. अन् कांहीं भासत नव्हतें. फक्त आईचे शब्द तिच्या डोक्यांत एकसारखे घुमत होते.

'जा, जा, बाहेर जाऊन कुठें तरी मर जा. इथं मरू नकोस.'

आपण मरायला कुठें तरी लांब चाललोंत एवढा एकच विचार तिच्या पायापासून डोक्यापर्यंत भिनला होता. ती मरायला चालली होती.

हिवऱ्याची वेस ओलांडून ती सासवडच्या वाटेला लागली. पायाला जसे

डोळेच फुटले होते. असा वेग आला होता त्यांना. पण मरायला जायचें म्हणजे कुठें जायचें? कुठें जायचें?

'कुठं, तरी!' आईचा आवाज एकदम तिच्या डोक्यांतून ओरडला. 'कुठंतरी जा. अन् मर. मर मर!'

तो आवाज तिच्या डोक्यांत वाढत वाढत जाऊन एवढ्यानें किंकाळ्या मारूं लागला कीं तिनें आपले कान हातांनीं गच्च दाबून धरले. आणि ती जोरानें धावत सुटली.

समोरून एक बैलगाडी येत होती. तिच्या साटीखालीं लोंबणाऱ्या धुरकट कंदिलाचा मिणमिणता उजेड तिला दिसला. तेव्हां तिचीं पावलें मंदावलीं. अन् ती हळू हळू चालूं लागली. गाडीवानानें तिला अंधारांत बघितलेंच नाहीं. तो गाडीत पेंगत होता. बैलानें फक्त ओझरतें तिला पाहिलें. पण तिला पाहून तो काय बोलणार?

मरणें म्हणजे काय कुणास ठाऊक? तो शब्द किती वेळां तरी तिच्या कानावर पडला होता. म्हातारीं माणसें मरतात एवढेंच तिला ठाऊक होतें. मग आईनें कसें आपल्याला मरायला सांगितलें?

तिचे डोळे एकदम भरून आले. जलमांत आईनें आपल्या अंगाला कधीं हात लावला नाहीं. आणि आतां एवढ्या जोरानें पाठीवर धपाटे मारून तिनें आपल्याला उंबऱ्याबाहेर ढकलून दिलें. अन् खाडकन् दार लावून घेतलें. म्हणाली, 'मर मर. कुठं तरी जा. अन् मर—'

तिला भडभडून आलें. चालतां चालतां हुंदके देऊन ती रडूं लागली. आईनें आपल्या घरांतून बाहेर हाकलून दिलें. जगांत आतां आपल्याला कोणी नाहीं.

कोणी नाहीं. आई नाहीं. घर नाहीं. आई नाहीं. घर नाहीं.

त्या शब्दांच्या तालावर तिचीं पावलें झपझप पडूं लागलीं.

कुठें राहायचें? कुठें बसायचें? कुणाच्या कुशींत झोपायचें? हेंच तर मरण नसेल ना? हो, हो. बरोबर हेंच तें मरण. घर नाहीं. आई नाहीं. हेंच हेंच मरण.

चालतांना तिच्या पोटांतून कळ निघाली. ती एकदम खालीं बसली. आणि दोन्ही हातांनीं तिनें आपलें पोट गच्च आवळून धरलें. तिच्या डोक्यांत झिण-झिण्या उठल्या. अन् त्यांतून आईचा आवाज ओरडूं लागला, "म्या हडळीनं तुला भाकरींतून काच खायला घातली. माझ्या अंगाला किडे पडतील ग!"

चांगुणेच्या अंगावर शहारा उठला. ती डोळे फाडून फाडून समोरच्या

अंधारांत बघूं लागली. तों अंधारांतून तिच्या बापाचा चेहरा डोळे वटारून तिच्याकडे पाहतो आहे, अन् दांतओठ खाऊन सांगत आहे, "खा ती भाकर —खा ती भाकर!" असा तिला भास झाला.

ती भेदरून थरथर कांपूं लागली. तोंच बापाच्या डोळ्यांतलीं बुबळें एकदम मोठीं होत होत तिच्या समोर येऊं लागलीं. त्यांतल्या एका बुबुळांत तिनें पाहिलें कीं, आई बसलेली आहे. आणि ती हंबरडा फोडून आपल्याला सांगते आहे, "चांगे, तुझा बाप माणूस नाहीं. राक्षस आहे!"

दोन्ही हातांनीं डोळे झाकून चांगुणा एकदम किंचाळत उठली. आणि जोरानें समोर धावत सुटली. किती वेळ ती तशी धावत होती कुणास ठाऊक? मधून मधून ती हळू चाले. आणि पुन्हा जोरानें धावत सुटे.

आभाळ थोडेंसें निवळलें होतें. आणि वाराही गार सुटला होता. त्यामुळें चांगुणेला थोडेंसें बरें वाटलें. चालतां चालतां तिनें पदरानें आपल्या कपाळाचा घाम पुसला. ती वर पाहूं लागली.

वर चांदण्या चमचम करीत होत्या हें तिला माहितही नव्हतें. त्यांना बघून तिला हायसें वाटलें. आणि धीरही आला. हो, त्यांची तरी निदान आपल्याला सोबत आहे.

चौघड्याचा आवाज तिच्या कानीं आला तेव्हां ती भानावर आली. आणि तिला कळलें कीं आपण सासवडाच्या शिवेंत येऊन पोहोंचलोंत. मध्यरात्र झाली होती. भैरोबाचा चौघडा शांतपणें वाजत होता. धिड धांग, धिंड धांग. चौघडा ऐकून तिला शंकरची आठवण झाली. पण झटकन् तो विचार तिनें आपल्या डोक्यांतून काढून टाकला.

आतां ह्या वेळीं कोणाची कांहीं आठवण नको. घराची नको, आईची नको नि शंकरचीही नको. मरायला जातांना इतक्या चांगल्या माणसाची आठवण कशाला? मग कदाचित् आपल्याला मरायची इच्छाही होणार नाहीं.

तिचीं पावलें एकदम थबकलीं. तिचा रस्ता संपला. ती भानावर आली. सासवडांतल्या आपल्या सासऱ्याच्या घराच्या पायरीवर आपण उभें आहोंत हें तिच्या ध्यानांत आलें. तिला नवल वाटलें.

बायकांचें जिणें हें गोठ्यांतल्या गुरासारखें आहे हें तिला काय ठाऊक? कोंडवाड्यांतून सुटलेलं गुरूं गोठ्याकडेच यायचें. आणि गोठ्यांतून त्याला हाकून दिलें कीं तें परत कोंडवाड्याकडेच जायचें. तसें सासर सुटलें कीं माहेर.

अन् माहेर तुटलें कीं सासर.

दाराची कडी वाजवीत चांगुणा हाका मारूं लागली, "जिजी, अवो जिजी!" अंकुशाच्या थोरल्या बहिणीला घरांत जिजी म्हणत असत.

बऱ्याच वेळानें आंतून चिडका अन् तारवटलेला आवाज तिच्या कानावर पडला. "कोन हाय?"

"मी चांगुना—" बाहेरून चांगुणेनें साद दिली.

दाराशीं भूत आलें असतें तरी भिमीला एवढें आश्चर्य वाटलें नसतें. इतक्या दिवसांनीं अन् अशा भलत्या वेळीं ही पोरगी एकाएकीं कां परत आली? घाईघाईनें येऊन तिनें दार उघडलें. पाहते तों चांगुणा पायरीवर एकटी उभी आहे. भिमीच्या छातींत धस्स झालें.

"म्हंजी, तूं एकटीच! अन् आलीस कुठून?"

"चांबळीहून!" चांगुणेनें सांगितलें.

भिमीनें एकदम तोंडच वासलें. "इतक्या रात्रीची तूं एकटी चांबळीहून आलीस? काय येडबीड तर न्हाई लागलं तुला?"

"आईनीं मला घरांतून हाकून दिलं—" रडक्या आवाजांत चांगुणा सांगूं लागली, "ती म्हंगाली जा कुठं तरी अन् मर."

"म्हून तूं इथं आलीस व्हय मराया?" दांतओठ खात भिमीनें विचारलें. "चल चालती हो! नवऱ्याला रोग लावून बापाकडे गेली. अन् बापाचं वाटोळं करूनशान नवऱ्याकडे आली. मोठ्या पायगुनाचीच कि न्हाई? उंडगी मेली!"

भिमीचें पाय धरायला चांगुणा पुढें वाकणार, तोंच झटकन् तिनें दार देखील लावून घेतलें. चांगुणा पुन्हा आपली रस्त्यावर एकटी ती एकटीच.

आईनेंच घरांतून आपल्याला हाकून दिलें. आतां कोण आपल्याला जगामध्यें घरांत घेणार? रक्तालाच जिथें विसर पडला तिथें पाण्याला कुठून प्रेम वाटणार?

डोकें अडून बसलें, म्हणजे पाय वाट काढतात. शरीर म्हणजे एक मौज आहे. चांगुणेचे पाय पुन्हा चालूं लागले.

चांगुणेला नवल वाटलें. आपले पाय आपल्याला नेताहेत तरी कुठें. पण पाय थोडेंच बोलतात? ते आपलें काम करतात. चावडीवरून अन् बाजारपेठें-तून तिच्या पायांनीं तिला थेट गांवाबाहेर दिवेनाक्यापाशीं आणून सोडलें.

नाक्यावरून पांच-सात बैलगाड्या ओळीनें अगदीं हळू हळू चाललेल्या होत्या. त्या पाहिल्याबरोबर चांगुणेच्या मनांत कांहीं तरी विचार आला. ती

पळत सुटली आणि शेवटची जी गाडी होती तिच्यांत मागल्या बाजूनें दोन्ही बाजूंच्या कठड्यांचे दांडे धरून चटकन ती वर चढली.

आंतमध्यें पुष्कळशीं पोतीं रचलेलीं होतीं. तिनें तपासून पाहिलीं. बटाटे होते आंत. पोत्यांवर ओणवी होऊन तिनें आपले दोन्ही पाय हळूहळू वर घेतले. आणि पुढें पुढें सरकत सरकत ती अगदीं वर जाऊन पोहोंचली. तिथें पुष्कळच ऐसपैस जागा होती. अगदीं हातपाय ताणून तिला झोपण्याइतकी.

पुढच्या बाजूला तिनें खालीं डोकावून पाहिलें. हातपाय मुडपून गाडीवान खुशाल आडवा झोपीं गेला होता. चांगुणेचेंही शरीर झोपेसाठीं आसुसलें होतें. म्हणून त्याला पडायला थोडासा आधार मिळतांच तिचा कधीं डोळा लागला तें तिला कळलेंच नाहीं.

पोटांतून खूप कळा यायला लागल्या, म्हणून चांगुणा एकदम तडफडून जागी झाली. बघते तों गाडी चाललीच होती. बैलांच्या गळ्यांतल्या घंटा वाजत होत्या.

बाहेर फटफटूं लागलें होतें. चांगुणेच्या पोटांत विलक्षण आग पडली होती. तिच्या घशालाही आंतून ओढ लागली होती. कांहीं तरी प्यावें, असें तिला एकदम वाटूं लागलें. पण तिथें गाडींत तिला काय मिळणार? तिचे हात अंगाखालचीं पोतीं इथें तिथें चापसूं लागले.

एका पोत्याची शिवण एका ठिकाणीं उसवली होती. त्या फटींतून तिचीं बोटें चटकन् पोत्यांत शिरलीं. आणि आंतून त्यांनीं तीन-चार बटाटे भरभर बाहेर काढले. अधाशासारखे तिनें ते सारे कचाकचा खाऊन टाकले. तेव्हां मग तिच्या पोटांतली आग अन् तोंडाची कोरड कुठें शांत झाली. तिला थोडेंसें बरें वाटूं लागलें. आपण कुठें आलोंत अन् कुठें चाललोंत ह्याचा विचारच करावयाचा तिनें सोडूनच दिलें. पहाटेच्या थंड वाऱ्यानें पुन्हा तिला झोप लागली.

"ए बया, अग ऊठ ना!"

कुणी तरी जोरजोरानें हलवून तिच्या कानांत ओरडत होतें. आपण कुठें आहोंत अन् कोण आपल्याला एवढ्या मोठ्यानें हाक मारून उठवतें आहे ह्याचा किती वेळ झाला तरी तिला उमजच पडेना. तिच्या पापण्या शिशा-सारख्या जड झाल्या होत्या. डोक्यांत हातोड्याचे घाव पडत होते. आणि आंतड्यांना आंतून शेकडों मुंग्या डसताहेत असें वाटत होतें.

मोठ्या कष्टानें तिनें डोळे उघडले. अन् जड बुबुळांनीं ती इकडे तिकडे



बघूं लागली. गाडी थांबली होती. उन्हें पडलीं होती. आणि बाहेर कसला तरी गलगा अन् गडबड चालली होती.

"हितं कुटं गाडी थांबली?" तिला हलवणाऱ्या माणसाला क्षीण स्वरानें चांगुणेनें विचारलें.

"कुटं थांबली म्हंजी?" तो माणूस चिडून म्हणाला, "ही पुन्याची मंडई हाये मंडई. हितंच ही गाडी थांबायची. उतर आतां! फुकट गाडींत बसून आलीस ती आलीस. अन् आतां आमच्या कामाचा खोळंबा तरी नग करूंस!"

चांगुणा कशीबशी उठली. त्या माणसानें हात देऊन तिला खालीं उतरवली. तिला जमिनीवर उभें राहतां येत नव्हतें. आणि उन्हाकडे तिला बघवेनाही. आधींच तिचें डोकें ठणकत होतें. अन् त्यांत भोंवतालच्या लोकांची गर्दी आणि आरडाओरड.

त्या कलकलीनें तिचें डोकेंच फिरूं लागलें. दहा-वीस पावलांवर सावली होती. तेथपर्यंत ती हळू हळू कशी तरी गेली. तिथें तिला ओकारी आल्यासारखें

वाटलें. म्हणून ती खालीं बसली. तों तिला एकदम रक्ताची उलटी झाली. ती बघून तिचे डोळेच पांढरे झाले. आणि मागल्या मागें वेशुद्ध होऊन ती पडली.

रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला टोपली विणीत बसलेल्या भाऊ बुरडानें तें पाहिलें. तों समोरच्या घराकडे पाहून मोठ्यानें ओरडला, "अहो राधाबाई—"

एका ठेंगण्या घराच्या धुरकटलेल्या दारांतून एक पांढऱ्या केसांची बुटकी अन् जाडेली मराठ्याची विधवा बाई बाहेर डोकावली.

"काय रे भाव—" तिनें विचारलें.

"अहो, ती बघा ती कोण पडली हाय तुमच्या दारासमोर. तुमचीच जातवाली दिसतीया!" असें म्हणून भाऊ बुरूड स्वतः उठला.

राधाबाईनें समोर पाहिलें. आणि ती धावलीच—

तरणीताठी मराठ्याची पोरगी रस्त्यावर रक्त ओकून वेशुद्ध पडलेली पाहून राधाबाईचा जीव अतिशय कळवळला. तिच्या डोळ्यांत एकदम पाणी आलें.

"आय आय ग. कुनाची पोर हाय कुनास ठावं? कुनी मूठबीठ तर न्हाई मारली?" राधाबाई विव्हळून म्हणाली, "भाऊ, धर हिला—"

राधाबाईनें अन् भाऊ बुरुडानें हलकेच चांगुणेला उचलली. आणि राधाबाईच्या घरांत नेली. राधाबाई वरच्या मजल्यावर राहात होती आणि तळमजल्यावर तिची खाणावळ होती. बाहेरगांवाहून मंडईंत येणाऱ्या गाडीवाल्यांसाठीं 'बोलाईच्या मटणाची मराठी खाणावळ' तिनें काढलेली होती.

राधाबाईनें चांगुणेला आपल्या खोलींत नेऊन एका बाजेवर निजवली. तिचें तोंड नीट पाण्यानें धुतलें. आणि कपभर गरम दूध आणून चमचा चमचा तिच्या तोंडांत घातलें.

तासभरानें चांगुणेनें डोळे उघडले. राधाबाईचा प्रेमळ चेहरा आपल्याकडे बघून हसतो आहे, हें पाहून चांगुणेनेंही हसण्याचा थोडासा प्रयत्न केला. चांगुणेचा निमगोरा रंग, नीटस चेहरा अन् रेखीव बांधा बघून राधाबाईंना ती फार आवडली.

चांगुणेला अगदीं बोलवत नव्हतें. तिचीं आंतडीं आंतून ठणकत होतीं. राधाबाईनेंही तिला भलतेसलते प्रश्न विचारून त्रास दिला नाहीं. आपल्या पोटांत काचा गेल्या आहेत एवढें मात्र चांगुणेनें हलक्या आवाजांत राधाबाईला कसें तरी समजावलें.

"मुडदा गेला मेल्यांचा!" तें ऐकल्यावर राधाबाई भडकून म्हणाली,

22904 ता. 13.n4 93724 31/3/69

"एवढ्याशा पोरीच्या पोटांत काचा कुटून घालणाऱ्याच्या हाताला किडं पडत्याल किडं!"

चांगुणेची आई स्वतःवर संतापून अगदीं तसेंच म्हणाली होती. पण दुसऱ्यांनीं आपल्या आईला रागानें तशा शिव्या द्याव्यात, हें मात्र चांगुणेला आवडलें नाहीं. आईनें आपल्या भाकरींतून कांचा खायला घातल्या किंवा घरांतून हाकून लावलें तरी देखील तिच्यावर आपलें प्रेम होतें तसेंच आहे हें चांगुणेला त्यावेळीं कळून आलें.

राधाबाईच्या खाणावळीपलिकडे एका खणाच्या लहानशा खोलींत भगवे कपडे घालणाऱ्या एका दाढीवाल्या बाबांचा 'बैरागी दवाखाना' होता. त्याच्याजवळ नाना तऱ्हेच्या गोळ्या, मुळ्या नि पुड्या असत. मंडईत मोलमजुरी करणारे पुष्कळसे गरीब लोक अन् बायाबापड्या नेहमीं त्याच्याकडूनच औषध घ्यायच्या. त्यांना त्याचा गुण येई. राधाबाईनें स्वतः जाऊन त्याला सगळें सांगितलें. आणि त्याच्याकडून चांगुणेसाठीं एक चांगलें गुणकारी औषध ती घेऊन आली.

जवळ जवळ पंधरा दिवस चांगुणेच्या पोटांतून रक्त पडत होतें. पण बैरागी बाबाच्या औषधानें तें कमी कमी होत पुढें अजिबात बंद झालें. तरी पण तिच्या अंगांतली अशक्तता जायला आणि पूर्वीसारखी ती हिंडूंफिरूं लागायला आणखी एक महिना लागला.

राधाबाईचें आणि आपलें कसलेंही नातें किंवा ओळख नसतांना, तिनें आपल्यासाठीं एवढे कष्ट घ्यावेत, पैसे खर्च करावेत आणि मरणाच्या दाढेंतून आपल्याला वांचवावें ह्या विचारानें चांगुणेचा ऊर भरून येई.

राधाबाईंना खाणावळींतले सगळे लोक मावशी म्हणत.

चांगुणा तिला म्हणे, "तुम्ही मावशी न्हाई, तुम्ही माझ्या आय हात! आईनं एक जलम दिला. अन् तुम्हीं दुसरा जलम दिला."

राधाबाई आपल्या कानांवर अलायबलाय करून तिला म्हणत, "शंभर वरसं जग बरं पोरी. अग, म्या काय केलं? मागल्या जलमीं तूं मला वाचावलंस म्हून ह्या जलमीं मी तुला वाचावलं!"

अनेक गरीब माणसें कांहीं ना कांहीं तरी करून मंडईत पोट भरीत आहेत, हें बघून चांगुणेला एक दिवस असें वाटलें कीं आपणही मोलमजुरी करून इथेंच पोट भरावें. राधाबाईच्या अंगावर आतां आणखीन् किती दिवस जगायचें?

राधाबाईला तिनें सांगितलें, "मी एका येळचं खानावळीचं चार आनं देईन, आन् तिथंच कुठं तरी कोपऱ्यांत पडंन!"

भाऊ बुरुडाकडून उधारीवर तिनें एक पाटी विकत घेतली. अन् दुसऱ्या दिवसापासून मंडईत ती हेलपाटी करूं लागली.

पाटी घेऊन मंडईत कुठें तरी बसलें म्हणजे हेल मिळते अशी तिची जी कल्पना होती ती खोटी ठरली. पहिले चार-पांच दिवस तर तिला एक पैसा मिळाला नाहीं. कोणी तिच्याकडे बघेना किंवा कोणी तिला बोलाविना. आपण होऊन लोकांना कसें विचारावें हें तिला कळेना. तिला त्याची लाज वाटूं लागली.

संध्याकाळीं राधाबाई तिला हसून विचारी, "आज किती झाली कमाई चांगुणा?" त्यावेळीं चांगुणेच्या डोळ्यांत पाणी यायचें आणि ती खालीं मान घालायची.

राधाबाई तिला धीर द्यायची. म्हणायची, "अग, म्या खानावळ काढली, तवा पहिल्यानं एक मानूस बी माझ्याकडे येईना अन् आतां मीच त्यांना नग सांगतें."

सहाव्या दिवशीं हताश होऊन मंडईच्या घड्याळाखालीं ती एकटीच रडत बसली होती. इतक्यांत एका म्हाताऱ्या पाटीवालीनें तिला बघितलें. ती जवळ आली. आणि चांगुणेच्या पाठीवर प्रेमानें हात फिरवून म्हणाली, "कां ग रडतेस?"

"मला काम मिळत न्हाई!" चांगुणा स्फुंदत म्हणाली.

"हात येडे!" तिचा हात धरून तिला उठवत म्हातारी म्हणाली, "चल माझ्या संगं. मी तुला काम देतें. असं इथं रडत बसलं, म्हंजी काम मिळल व्हय?"

चांगुणा खुदकन् हसली. आणि पदरानें डोळे पुशीत ती म्हातारीच्या बरोबर जाऊं लागली. चालतां चालतां काम मिळवायच्या 'युगत्या' म्हातारी तिला सांगूं लागली.

"एका ठिकानीं बसूं न्हई. सारखं असं फिरत राहावं. समदीं गिऱ्हाइकं हेलपाटी करीत न्हाईत. हातांत झोळ्या पिशव्या घेऊन येनाऱ्या बाप्या मानसांच्या मागं फिरूं न्हाई. अन् बायामानसांच्या पाटीं तर कंदी जाऊं न्हाई. त्या परान गेला तरी पाट्या करनार न्हाईत. शाळाकालिजांतल्या पोराटोरांना इच्यारूं न्हई. तीं लई चहाटळ असत्यात. मोटं मोटं रुमालवालं, पगडीवालं,

गुजराती भाटं, मुसलमान दिसलं कीं त्यांच्या मागानं जावं. फळफळावळ, केळीचीं पानं, कांदंबटाटं जिथं इकत्यात तिथं फिरावं. मिरच्या कोथमिरीच्या बाजूला जाऊं बी न्हई."

हेलपाटीचें सारें 'शास्त्र' पांच मिनिटांत म्हातारीनें चांगुणेला सांगून टाकलें. त्याच दिवशीं तिला आठ आणे मिळाले. संध्याकाळीं तिनें ते पैसे राधाबाईच्या हवालीं केले. सणावारीं तिला रुपया बारा आणे मिळायचे. पण एरव्हीं आठ-दहा आण्यांपेक्षां जास्त कमाई होत नसे.

सर्वत्र दिवसभर वणवण करावी लागे. चांगलीं गिऱ्हाइकें मिळवण्यासाटीं बाकीच्या पाटीवाल्यांशीं भांडणें न् मारामाऱ्या कराव्या लागत. कांहीं कांहीं गिऱ्हाइकें लांब कुटल्या कुठें घेऊन जात. अन् एवढी पायपिटी केल्यावर आणा दोन आणे हातावर टिकवीत. मग तिथें कांहीं त्यांच्याशीं हुज्जत घालतां येत नसे.

केळीचीं पानें विकत घेणाऱ्या गिऱ्हाइकांच्या घरांत जेवणावळ असते हें तिला पुढें पुढें कळूं लागलें. ती मोठ्या आशेनें अशा गिऱ्हाइकाबरोबर जाई. तिला वाटे कीं आपण तिथें कांहीं वरकाम केलें तर आपल्याला थोडें गोडधोड मिळेल. पण हीं गिऱ्हाइकें अशीं इरसाल असत कीं झाडायचें, पत्रावळी मांडायच्या अन् उष्टीं काढायचीं, एवढीं कामें तिच्याकडून करवून घेऊन शेवटीं तिच्या हातावर तीनचार आणे टिकवीत. जेवायला तिनें मागितलें तर उलट ते तिच्याच अंगावर येत, "तूं पाटीवाली आहेस का भिकारीण आहेस?"

दुपारची चांगुणा जेवत नसे. फक्त अर्ध्या आण्याचा कपभर चहा अन् अर्ध्या आण्याचा पाव ती खाई. रात्रीच्या जेवणाचे चार आणे, आणि मागल्या कर्जाच्या फेडीपोटीं चार आणे, असे रोजचे आठ आणे ती राधाबाईला देई. असे दोन महिन्यांत तिनें राधाबाईचे वीस रुपये फेडले.

पण आठ दहा आण्यासाटीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकसारखे कष्ट आणि उन्हातान्हांत पायपिटी करायला ती कंटाळून गेली. तिच्या अंगाची अगदीं चोयटी झाली. कधीं डोक्यावरची पाटी सुटेल असें तिला होऊन गेलें.

एक दिवस दुपारीं दमूनभागून मंडईमध्यें एका आडोशाला ती बसली होती. हातापायाला थंडगार फरशी लागली तशी ती आडवी झाली. अन् तिचा डोळा लागला. कांहीं वेळानें तिच्या दंडाला धरून कुणीतरी तिला हलवून जागें केलें. उजव्या हातानें डोळे चोळीत ती वर बघूं लागली.

"ए, अग, झोपलीस काय? तुला कामबिम कांहीं नको का?" तो माणूस

थोडेंसें हसत तिला म्हणाला.

चांगुणा त्याच्याकडे बघूं लागली.

डोक्याला हरणाच्या कातड्याची उंच टोपी, कपालाला न् डोळ्याखालीं पुसट भस्माचे पट्टे, कानांत दोन लहान रुद्राक्षें, अंगांत पांढरे शुभ्र कपडे, पायाच्या दोन्ही आंगठ्यांत तांब्याचीं वेढीं, असा त्याचा पोषाख पाहून चांगुणा ओशाळें तोंड करून चटकन् उठली आणि मुकाट्यानें त्याच्या मागून गेली.

त्यानें दोनचार आण्यांचाच माल घेतला. आणि तो मंडईतून बाहेर पडला. चांगुणा हळू हळू त्याच्या मागून जाऊं लागली. तो लांब कुठें तरी नव्या पेठेंत राहात होता. किती चाललें तरी त्याचें घरच येईना. चांगुणा अगदीं कंटाळून गेली.

मधून मधून तो माणूस वळून न बघतां तिला प्रश्न विचारी. तूं कोण? कोठली? तुझें नांव काय? मंडईतून काम करायला येऊन तुला किती दिवस झाले? आजपर्यंत कोणींही गिऱ्हाइकानें तिला असे प्रश्न विचारले नव्हते. म्हणून तिला त्या प्रश्नांना उत्तर द्यायला लाज वाटली.

शेवटीं आलें त्याचें घर. एका अरुंद बोळामध्यें एक जुनाट दुमजली चाळ होती. आंत ऐसपैस चौकोनी अंगण होतें. आणि त्याच्या चारी बाजूला बिऱ्हाड-करूंच्या खोल्या होत्या. मधोमध एक आड होता. आणि त्याच्या जवळ केळींचीं चार-दोन उंच झाडें होतीं. दुपारची वेळ असल्यानें सर्वत्र शुकशुकाट होता. पुरुषमाणसें कामाला गेलीं होतीं. आडावर एक म्हातारी धुणीं धूत होती.

अंगणांतल्या एका अंधाऱ्या कोपऱ्यांत ह्या माणसाची खोली होती. कुलूप काढून त्यानें दार उघडलें आणि तो आंत गेला. चांगुणा त्याच्या मागोमाग आंत गेली. चांगुणा आंत आलेली पाहतांच तो माणूस आंतून दार लावून घेऊं लागला.

त्याबरोबर डोक्यावरची पाटी जमिनीवर फेकून देऊन ती ताडकन् दाराशीं आली. तो माणूस तिचा हात धरून आंत ओढूं लागला. तशी ती मोठ्यानें किंचाळली. आणि त्याच्या हाताला हिसका मारून एकदम दाराबाहेर आली.

बाईची किंकाळी ऐकतांच आजूबाजूच्या बिऱ्हाडांतलीं बायामाणसें आपापल्या खोल्यांतून भराभर बाहेर आलीं. आणि कोपऱ्यांतल्या त्या खोलीकडे आश्चर्यानें बघूं लागलीं. आडावरच्या म्हातारीनें आपलें धुणें थांबवलें. भेदरलेल्या चेहऱ्यानें थर थर कांपत त्या खोलीसमोर चांगुणा उभी होती.



तोंच तो माणूस तिची मोकळी पाटी हातांत हलवीत वाघासारखा तिच्या अंगावर चवताळून आला. आणि सर्वांना ऐकूं जाईल एवढ्या मोठ्या आवाजानें म्हणाला, "चल, तुला पोलिसाच्या ताब्यांत देतों. माझी चांदीची पळी चोरतेस? ह्या मंडईतल्या बायांना आतां घरीं आणायची मुळीं सोयच राहिली नाहीं. कपाटांतून पैसे काढायला जरा कुठं माझी पाठ वळली, तोंच कोनाड्यांतली चांदीची पळी हिनें उचलली. ती मी तिच्या हातांतून हिसकावून घ्यायला लागलों. तों केवढ्या मोठ्यानें किंचाळली. कोणाला वाटेल कीं मी जसा हिचा हातच धरला? जा, देत नाहीं तुझी पाटी!"

असें म्हणून त्या माणसानें ती पाटी जमिनीवर पालथी टाकली. आणि आपल्या दोन्ही पायांनीं तुडवून तिची चाळण केली. दोन महिने जिनें आपल्या पोटाला आधार दिला, त्या आपल्या पाटीची डोळ्यासमोर ती दशा होत असतांना बघून चांगुणा तोंड झाकून ढसाढसा रडूं लागली.

"अन् एवढें सगळें करूनच्या करून पुन्हा आपली माझ्यासमोर रडते

आहे! गोगलगाय न् पोटांत पाय!" असें म्हणून पाटीचा चुराडा त्यानें आपल्या लाथेनें उडवला. अन् आपल्या खोलींत जाऊन त्यानें दार बंद करुन घेतलें.

चांगुणेकडे तिरस्कारानें पाहात पाहात बिऱ्हाडकरूही आपापल्या खोल्यांत गेले. पुन्हा अंगण पहिल्यासारखें शांत झालें.

● ● ●

# .१०.



मान खालीं घालून रडत रडत चांगुणा बाहेर जाऊं लागली. तोंच कुणाचे तरी गोड शब्द उजवीकडून तिच्या कानीं आले.

"नग रडूंस. ये इकडं. तोंड धू. पानी पी. अन् मंग जा."

चांगुणेनें वळून पाहिलें. आडावर धुणीं धुणारी म्हातारी बाई प्रेमळ दृष्टीनें तिच्याकडे बघत होती. चांगुणा तिच्या चेहऱ्याकडे पाहातच राहिली. तिच्या डोळ्यांमधून कोणीतरी अतिशय ओळखीचें माणूसच जणुं कांहीं तिच्याकडे बघत आहे असें तिला वाटलें. तिचीं पावलें आपोआप तिच्याकडे वळलीं.

म्हातारीनें आडांतून बादलीभर पाणी काढलें. तपेलीनें चांगुणेच्या हातावर

ओतलें. थंडगार पाणी तोंडाला लागतांच चांगुणेला बरें वाटलें. तोंड धुतल्या-वर ओंजळींतून ती गटगट पाणी प्याली. अन् पदरानें तोंड पुशीत कृतज्ञतेच्या दृष्टीनें म्हातारीकडे बघूं लागली.

"खरंच, मीं न्हाइ घेतली त्यांची चांदीची पळी!" चांगुणेनें विव्हळून म्हातारीला सांगितलें.

"चोरी करनाराचं असं तोंड असतं व्हय?" तिचं तोंड कुरवाळीत म्हातारी आपल्या गुळचट स्वरांत म्हणाली, "त्या ब्रात्राला मीं काय वोळखीत न्हाई? दर चार दोन दिसानं त्याचं हेच धंदं चालत्यात इथं. त्ये मी आपली पघते गपचिप इथून. आज तूंच त्याला अशी भेटलीस. तुझ्या पाटीचा सत्यानास केला मेल्यानं. त्याच्या पायाला पिलेग व्हईल!"

म्हातारीजवळून उठूंच नये असें चांगुणेला वाटलें. अन् तिला तरी आतां काय काम होतें? पाटीबरोबर तिच्या धंद्याचाही निकालच लागला होता.

मनांत ती म्हणाली, "नाहीं तरी हेलपाटीचा मला वीटच आला होता ना? तेव्हां जें झालं तें देवानं बरंच केलं. चला, आतां पुन्हा डोक्यावरतीं पाटीच घ्यायला नको."

म्हातारीचें धुणें संपलें. ज्याच्या त्याच्या बिऱ्हाडांत जाऊन तिनें तें वाळत टाकलें. तोंपर्यंत चांगुणा तिथें बसूनच होती.

म्हातारी जायला निघाली. तशी कुणींतरी तिला हाक मारली.

"अहो गऊबाई, दुपारचा भात अन् भाजी थोडीशी उरली आहे, तेवढी घेऊन जा हो."

एका लहानशा भांड्यांत भातभाजी घेऊन गऊबाई आली. तिनें चांगुणेला विचारलें, "भाकर खाल्लीस?"

"दुपारची मी च्या पितें." चांगुणा खालीं पाहात म्हणाली.

"तवाच तर अशीं गालफडं बसवून घेतलीस!" गऊबाई प्रेमळ रागानें म्हणाली, "म्हनं च्या पिते! चल माझ्या घरीं. भाकर खाऊन जा थोडीशी."

गाईबरोबर वासरूं जातें, तशी गऊबाईच्या बरोबर चांगुणा गेली. म्हातारीचा तिला एकदम ळळाच वाटूं लागला.

चांगुणा मनांत अचंबा करीत राहिली. आपण तिथें आलों कुणाच्या मागें, आणि आतां चाललों कुणाच्या बरोबर? विषाच्या डबक्याजवळ अमृताची कुपी सांपडावी तसें झालें.

एका पडक्या वाड्यांत दोन दोन खणाच्या लहान लहान खोल्या, कांहीं ओळीनें तर कांहीं तुटक तुटक, अशा बांधलेल्या होत्या. मोलमजुरी करणारीं गरीब माणसें तिथें राहात असत. एका एका खोलीचें दोन दोन रुपये भाडें पडे. 'वाण्याची चाळ' म्हणत त्याला. तिथें गऊबाई राहात होती.

शेणानें सारवलेली आणि झाडून स्वच्छ ठेवलेली तिची लहानशी खोली बघून चांगुणा चकितच झाली. राधाबाईची खाणावळ म्हणजे भटारखाना होता. तिथल्या धुरानें आणि घाणीनें चांगुणेचें डोकें उठून जात असे. म्हणून गऊबाईची आरशासारखी लख्ख खोली बघून तिला फार आनंद झाला.

सकाळीं कामाला जाण्यापूर्वीच गऊबाईनें भाकर करून ठेवली होती.

चांगुणा म्हणाली, "मला भाकर नग. थोडासा भात अन् भाजीच द्या."

जेवतांना चांगुणेनें विचारलें, "गऊबाई, मला तुमच्यासारखं काम मिळल का हो? मला मंडईचा अक्शी कटाळा आलाय. अन् आतां माझ्याजवळ पाटीबी न्हाई!"

गऊबाईनें विचारलें, "अन् राहतेस कुठं तूं?"

"त्या राधाबाईच्या खानावळींत पडते कुठं तरी कोपऱ्याला." चांगुणा म्हणाली, "तुमच्यावानीच ती माऊली हाये बरं! तुम्ही मला काम द्याल तर मी राहीन कुठं तरी खोली घेऊनशान!"

"अन् इथंच राहिलीस म्हून काय बिघडलंय?" गऊबाई म्हणाली, "मी तरी एकटीच हाये. वीस वर्सामागं मोठा पिलेग झाला. त्यांत माझीं मानसं गेलीं. दोन ल्येक होते मोठे मोठे. एक पोरगी होती तुझ्यावानी. तीं बी समदीं गमावलीं. अन् देवानं मला ठिवलंय त्यांच्या मागं अजूनपत्तर लोकांचीं धुनीं धुवाया अन् भांडीं घासाया!"

बोलता बोलतां गऊबाईचे डोळे भरून आले. चांगुणेचेहि डोळे डबडबले. जेवण झाल्यावर गऊबाई म्हणाली, "जा, तुझं लुगडंबिगडं काय असंल तिकडं तें घेऊन ये इथं!"

"माझं कांहीं बी न्हाई तिकडं!" दीनवाणें तोंड करून चांगुणा म्हणाली, "ह्ये अंगावर हाये येवढंच!"

दोनतीन दिवसांत गऊबाईनीं चांगुणेला एक चांगलें काम मिळवून दिलें. पुण्याच्या कोडतांत गोहाड म्हणून एक शिरस्तेदार होते. शनवार पेठेंत अमृतेश्वराच्या बोळांत राहात असत ते. चार माणसांचें कुटुंब होतें. ते, त्यांची

बायको सावित्रीबाई आणि दोन मुलें.

सावित्रीबाईंना सहावा महिना लागला होता नुकताच. त्यांची प्रकृतीही फारशी चांगली नव्हती. स्वयंपाकाच्या पलीकडे त्यांना घरांतलें इतर काम होत नसे. म्हणून धुणें, भांडीं, झाडलोट ह्यासाठीं त्यांना एक मोलकरीण हवी होती पांचसहा महिन्यांसाठीं. जेवूनखाऊन चार रुपये द्यायचे कबूल केलें त्यांनीं चांगुणेला. वर आणखी एक लुगडेंही देईन म्हणाल्या.

सावित्रीबाई स्वभावानें फार चांगल्या होत्या. त्यांच्या तोंडांतून कधीं अक्षर निघत नसे उणेंदुणें. नेहमीं आपल्या हसतमुख असावयाच्या. कोणतें काम कसें करायचें हें चांगुणेला प्रत्येक वेळीं त्या नीट समजावून सांगत. जेवण्या-खाण्याबद्दल त्यांची कधीं खळखळ नसे. जें आपण खात तेंच चांगुणेला देत. त्यामुळें चारदोन दिवसाच्या आंतच तिचा बुजरेपणा गेला. आणि तिला त्या घरांत अगदीं मोकळें मोकळें वाटूं लागलें.

तसें त्यांच्या घरांत कामही फार कष्टाचें नव्हतें.. तीन खोल्यांचें तर त्यांचें बिऱ्हाड. रोजच्या झाडलोटीला कांहीं फार वेळ लागत नसे. आठवड्यांतून एक वेळ सर्व खोल्या सारवायच्या. त्यांचीं धुणीं आणि भांडींही पण बेताचींच असत.

सावित्रीबाईच्या यजमानांचें सोवळें मात्र कडक असे. सकाळीं दोन तास त्यांची पूजा चाले. त्यावेळीं चांगुणेला तर तिकडे फिरकायलासुद्धां मिळत नसे. म्हणून त्यांची पूजा सुरू व्हायच्या आंतच ती खोली तिला झाडून घ्यावी लागत असे. दहा वाजतां जेऊन ते कोडतांत एकदां गेले, म्हणजे घरांतलें सगळें काम अगदीं सावकाशीनें चाले.

थोरला मुलगा पंडित दहा वर्षांचा होता. अन् धाकटी बहीण त्रिवेणी पांच वर्षांची होती. दोन्ही मुलें बापाबरोबर जेवत. मुलगा अकरा वाजतां शाळेला गेला, म्हणजे मुलीला थोपटून झोपवण्याचें काम चांगुणेला करावें लागे. त्यानंतर मग ती धुणीं धुवी. सावित्रीबाईचें जेवण होईपर्यंत तें काम संपे. मग उष्टीं-खरकटीं भांडीं घासून, धुवून अन् पुसून स्वयंपाकघरांत जिथल्या तिथें ठेवून दिलीं, म्हणजे मग ती जेवायला बसे. सावित्रीबाईनें तिचें जेवण एका निराळ्या भांड्यांत काढून ठेवलेलें असे.

बारा साडेबाराच्या आंत हें काम आटपे. मग त्यानंतर तास दोन तास तिला शांतपणें झोपायला मिळत. हेलपाटीच्या कामांत तिला दिवसभर उपाशी

पोटीं रखडपट्टी करावी लागे. दुपारीं निवांतपणें कुठें तिला पडतांही येत नसे. म्हणून एकाच जागीं बसून करायचें हें आटोपशीर काम, वेळेवर मिळणारें सुग्रास अन्न आणि दुपारचा मनाला नि शरीराला मिळणारा विसावा हा तिच्या प्रकृतीला चांगलाच मानवला. खाशाबाच्या शेतावर असतांना ती जशी दिसत होती, त्याहीपेक्षां ती जास्त तजेलदार आणि टवटवीत एका महिन्याच्या आंत दिसूं लागली.

सावित्रीबाईंनीं तिला आपलें एक जुनें लुगडें अन् एक पातळ दिलें. सावित्रीबाईंचे यजमान वृत्तीनें अतिशय रुक्ष आणि स्वभावानें मोठे घुमे होते. त्यांना फारसें बोलायला लागत नसे. घरांत सावित्रीबाईंशीं किंवा आपल्या मुलांशीं ते क्वचितच बोलत. पण सावित्रीबाईंनीं दिलेलें आभाळी पातळ नेसून चांगुणा घरांतून इकडून तिकडे वावरूं लागली एकादे दिवशीं, म्हणजे एकदां तरी आपल्या चष्म्याच्या वरून ते तिच्याकडे हळूच चोरून पाहिल्यावांचून राहात नसत.

चांगुणा गऊबाईच्याच खोलींत राही. सकाळीं सात वाजतां ती सावित्रीबाई-कडे कामाला आली कीं जेवून रात्रीं नऊ वाजतां परत आपल्या खोलीवर जाई. गऊबाई तिची वाटच पाहात बसलेली असे. महिन्याच्या अखेरीस चांगुणेला पगाराचे चार रुपये मिळाले. ते तिनें गऊबाईजवळ ठेवायला दिले.

म्हातारीच्या डोळ्यांत पाणी आलें. ती म्हणाली, "रोजगार लागायच्या आधींच माझे दोन्ही ल्योक गेले. तवा त्यांचा पैसा कांहीं मला दिसला न्हाई. कामाचा पैसा माझ्या हातांत आनून देनारी तूंच पहिली मिळालीस ?"

एकदां सावित्रीबाईंची धाकटी मुलगी त्रिवेणी कांजण्यांनीं आजारी पडली. सावित्रीबाईंचा तेव्हां सातवा महिना संपून गेला होता. म्हणून त्यांना कांहीं रात्रीचें जागरण त्यावेळीं करतां येण्यासारखें नव्हतें. तेव्हां दहा-पंधरा दिवस चांगुणेला त्यांच्याच घरांत रात्रीचें राहणें भाग पडलें. त्यामुळें सावित्रीबाईंना तिची संवय लागली. त्रिवेणीचा ताप उतरला. आणि ती अंथरुणावर उठून बसूं लागली. तशी रात्रीं जेवण झाल्यानंतर चांगुणा आपल्या घरीं जायला निघाली.

तेव्हां सावित्रीबाई थोडयाशा कळवळून तिला म्हणाल्या, "चांगुणा, कशाला रात्रीची इतक्या लांब जातेस तिकडं ? झोप कीं इथं ! तूं असलीस म्हणजे मला किनई बरं वाटतं !" सावित्रीबाईंची प्रेमळ मुद्रा आणि त्यांच्या आवाजांतला

तो गोड कंप बघून चांगुणा विरघळली. त्या दिवसापासून रोज रात्रीं चांगुणा तिथेंच झोपूं लागली.

चारदोन दिवसांनीं दुपारचे वेळीं कधीं तरी ती गऊबाईला भेटून येई. सावित्रीबाईच्या घरांत इतक्या सुखानें आणि समाधानानें चांगुणा राहात आहे आणि काम करीत आहे, हें बघून गऊबाईला फार आनंद होई. चांगुणा डोळ्यांत पाणी आणून तिला म्हणे, "गऊबाई, तुम्ही माझ्या डोक्यावरची हेलपाटी काढलीत अन् तिथं ही सोन्याची पाटी ठेवलीत!"

सावित्रीबाईचा आठवा महिना सरला, तशा एक दिवस बाळंतपणासाठीं त्या आपल्या माहेरीं गेल्या. त्यांचें माहेर कठूसला होतें. त्यांच्याबरोबर त्यांचीं मुलेंही पण गेलीं. पंडितची वार्षिक परीक्षा झाली होती. आणि त्याच्या शाळेला सुट्टी मिळाली होती. सावित्रीबाई आणि मुलें निघून गेल्यावर घरांत गोहाड एकटेच राहिले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चांगुणा केर काढायला जेव्हां त्यांच्या खोलींत गेली तेव्हां ते तिला म्हणाले, "हें पाहा चांगुणा, आतां तूं केर काढतेस तो काढ अन् तुझे आजपर्यंतचे काय कामाचे पैसे झाले असतील ते घेऊन जा. सध्यां कांहीं तुझी आतां इथं जरूरी नाहीं. 'ही' बाळंतपणाहून परत आल्यावर मग बघूं!"

हातांत केरसुणी निर्जीवपणें धरून चांगुणा गोहाडांच्या चेहऱ्याकडे पाहातच राहिली. ते काय बोलतात त्याचा बोधच तिला झाला नाहीं.

"उभी काय राहिलीस बरं अशी माझ्याकडे बघत?" चष्म्यावरून तिच्याकडे पाहात गोहाड म्हणाले, "काय सांगितलं मीं तें कळलं ना तुला?"

"पन दादा, मी जाऊं कुठं?" भकास मुद्रा करून चांगुणेनें त्यांना विचारलें.

"आतां तें मी काय सांगूं बरं?" विषण्णपणें हसून गोहाड म्हणाले, "हा तुझा प्रश्न आहे."

इतक्यांत चांगुणेला कांहीं तरी आठवलें.

"पन दादा, तुम्ही जेवनार कुठं? मी करीन कीं तुमचा सैंपाक. अगदीं काकूवानी करीन!"

"तुझ्या हातचं मला कसं चालेल बरं चांगुणा?" गोहाड शांतपणें म्हणाले, "त्याचं मीं असं ठरवलं आहे, कीं आजपासून सकाळचा स्वयंपाक मी हातानंच

करीन. रात्रीं मी कांहीं जेवणारच नाहीं. नुसतीं दूध अन् केळीं घेईन!"

चांगुणेचें डोकें सुंद झालें. ह्या घरांतली नोकरी सुटली तर जायचें कुठें दुसरीकडे? का डोक्यावर पुन्हा हेलपाटी घ्यायची? नुसत्या त्या कल्पनेनेंच तिच्या सर्वांगाचा थरकांप झाला.

"आतां तूं विचारशील कीं इथला केर कोण काढणार अन् माझीं भांडीं कोण धुणार?" नवा मुद्दा आठवल्यासारखे गोहाड पुढें बोलूं लागले, "त्या कामाला शेजारच्या एका म्हातारीला महिन्याचे दोन रुपये देऊन मीं ठरविलें आहे. तेवढ्यासाठीं तुझं जेवण न् खाण अन् वर चार रुपये हा खर्च मला कसा परवडणार!"

चांगुणेनें हातांतली केरसुणी फेकून दिली. आणि गोहाडांचे जाऊन पाय धरले.

"दादा, मला तुम्हीं दोन रुपये दिले तरी चालतील. तुमचं काय उरेल तें मी खाईन. रातचं जेवण बी मला नग. पन ह्या घरामधून दुसरीकडं जायाला नगा सांगू मला!"

चांगुणेच्या गालांवरून आसवांचे ओघळ वाहूं लागले. गोहाडांनीं तिच्याकडे पाहिलें. एक सुस्कारा टाकला. तिच्या पाठीवरून हलकेच हात फिरवला. आपल्या उपरण्यानें तिच्या गालांवरचे अश्रू टिपले. आणि पुन्हा दुसरा सुस्कारा टाकून शांतपणें तिला सांगितलें, "ठीक आहे. लाग कामाला."

चांगुणेचा चेहरा एकदम उमलला. कृतज्ञतेनें तिनें गोहाडांकडे पाहिलें. आणि ती कामाला लागली. सावित्रीबाई येईपर्यंत ह्या घरांतली आपली नोकरी टिकण्यासाठीं आपणांला गोहाडांची मर्जी सांभाळली पाहिजे, हें तिच्या लक्षांत येऊन चुकलें.

त्यांच्या बारीकसारीक कामांकडे त्या दिवसापासून डोळ्यांत तेल घालून ती लक्ष देऊं लागली. त्यांच्या खोलींतून कांहीं आवाज झाला कीं त्यांना कांहीं पाहिजे कीं काय, हें बघण्यासाठीं लागलेंच ती धावत जाई आणि हळूच आंत डोकावून पाही.

त्यानंतर दोनचार दिवस असेच गेले. एके दिवशीं दुपारचेच कोडता-मधून गोहाड घाईघाईनें परत आले. आतांपर्यंत असे भलत्याच वेळीं ते घरीं परत आलेले चांगुणेला माहीत नव्हते. त्यांचा चेहरा गोरामोरा झालेला होता. आपल्या खोलींत येतांच त्यांनीं आपले कपडे भरभर काढून कोपऱ्यांत फेकून दिले. आणि अंगावर उपरणें ओढून ते सतरंजीवर पडले. थोड्या वेळानें

त्यांच्या कण्हण्याचा आवाज चांगुणेला स्वयंपाकघरांत ऐकूं आला.

खोलीच्या दारांतून तिनें डोकावून पाहिलें. दाराकडे त्यांची पाठ होती. त्यांच्या जिवाला बरें वाटत नसावें हें उघडच होतें. त्यांचें कण्हणें ऐकून ती घाबरून गेली. काकू असल्या तर त्यांनीं अशा वेळीं काय केलें असतें ह्याचा ती स्वतःशीं विचार करूं लागली. चटकन् ती त्यांच्या उशाशीं गेली. आणि आपल्या हातांनीं त्यांचें कपाळ चोळूं लागली.

गोहाड डोळे मिटून कण्हत होते. पण त्यांचें कण्हणें कांहीं वेळानें हळू हळू जसें कमी होऊं लागलें, तसें आपल्या कपाळ चोळण्यानें त्यांना बरें वाटत असावें हें चांगुणेच्या लक्षांत आलें. आणि त्यामुळें तिला समाधान वाटलें.

अर्ध्या तासानें गोहाडांनीं हळूच डोळे उघडले आणि तिच्याकडे पाहिलें. आपला हात तिच्या पाठीवर ठेवून ते किंचित् हसत म्हणाले, "जा. आतां बरं वाटतं मला. फार चांगलं डोकं चोळतेस तूं!" तेवढ्याच त्यांच्या उत्तेजक शब्दांनीं चांगुणेला किती आनंद झाला!

संध्याकाळीं 'मी पुराणाला जातों, रात्रीं उशिरां येईन,' असें सांगून गोहाड निघून गेले. अकरा-साडेअकराच्या सुमारास ते परत आले. चांगुणेनें दार उघडलें. आंत येतांच तिच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनीं हळूच विचारलें, "काय झोप लागली होती काय?"

चांगुणा लाजून म्हणाली, "न्हाई, जागीच व्हतें!"

तेव्हां तिचा गाल हलकेच उपटीत गोहाड म्हणाले, "वेडी, इतक्या वेळ कशाला जागत बसायचं, अं?"

त्यांचा दूध अन् केळ्यांचा फराळ होईपर्यंत चांगुणेनें त्यांचें अंथरूण घातलें.

"जा, झोप तूं!" अंथरुणावर पडतां पडतां गोहाड म्हणाले.

"डोकं दाबूं?" चांगुणेनें हळूच विचारलें.

"कशाला? दिवसभर काम करून तूं दमली असशील!" गोहाड तोंडांतल्या तोंडांत पुटपुटले. चांगुणा कांहीं न बोलतां त्यांच्या उशाशीं गेली. आणि दुपार-प्रमाणें आणि त्यांचें डोकें चेपूं लागली. चांगली तास दीड तास ती त्यांचें कपाळ दाबीत बसली होती.

डोळे मिटल्या मिटल्या गोहाड तिच्या पाठीवर मधूनमधून हात ठेवून हलके हलके थापटीत होते. पुष्कळ रात्र होऊन गेली. चांगुणा अगदीं कंटाळून गेली. तरी 'पुरे आतां' म्हणून गोहाड सांगेनात. शेवटीं तीच आपण होऊन

उठली. आणि स्वयंपाकघरांत जाऊन निजली.

हें असें दोनचार दिवस लागोपाठ चाललें. रोज कोडतांतून दुपारचे गोहाड परत यायचे. अन् खोलींत जाऊन कण्हायला लागायचे. मग चांगुणेनें जाऊन त्यांचें डोकें दाबायचें. पुन्हा रात्रीं ते पुराणाहून उशिरां यायचे. अन् मग खूप रात्र होईपर्यंत ती त्यांचें डोकें दाबत आणि हातपाय रगडत बसायची.

एके दिवशीं सकाळीं गोहाड चांगुणेला म्हणाले, "हें बघ, आजपासून तूं आतां असं कर. स्वयंपाकघराच्या एका कोपऱ्यांत शेगडीवर तूं आपला दोन्ही वेळेचा निराळा स्वयंपाक करीत जा. माझ्यामुळें तुझी आबाळ व्हायला नको. रात्रीची तूं उशिरां झोपतेस. हें कांहीं बरं नाहीं."

त्या दिवशीं कचेरींत जायच्या पूर्वी ते दारांत थबकले. आणि आपल्या जाकिटांतून एक रुपया काढून त्यांनीं तिला दिला. आणि हसून म्हणाले, "हा तुझ्या कामापैकीं नव्हे बरं का. हा आपला असूं दे. कधीं तुला कांहीं विकत घेऊन खावंसं वाटलं, तर आपलं घेऊन खात जा. काय? घेशील ना?"

चांगुणा लाजून खालीं पाहूं लागली. कांहीं बोलली नाहीं. तेव्हां तिच्या गालावर हलकेच चापटी मारून ते निघून गेले.

त्या दिवशीं ते दुपारचे आलेच नाहींत. संध्याकाळीं आले. आल्यावर त्यांनीं आपल्या उपरण्यांतून एक मुसुंबें काढून चांगुणेला दिलें.

"घे. खा. कोडतांत मला कोणीं तरी दिलें."

हातपाय धुवून ते पुराणाला गेले. अन् नेहमींप्रमाणें अकरा-साडेअकरा वाजतां परत आले. फराळ झाल्यावर हातपाय दाबायला चांगुणा त्यांच्या खोलींत गेली. दोनचार दिवसांच्या एकसारख्या जाग्रणानें चांगुणेला झोप नव्हती. दुपारींही तिला पूर्वीसारखें झोपायला मिळत नसे. कारण दुपारचे गोहाड घरीं येत असत. त्या दुपारीं जरी ते आले नव्हते, तरी चांगुणेला कांहीं पडायला मिळालें नाहीं. ती त्यांची वाट पाहात बसली होती.

चांगुणा अगदीं पेंगुळली होती. गोहाडांचें अंग दाबतां दाबतां ती सारख्या जांभया देत होती. मधून मधून तिला डुलकीही येऊं लागली. त्या वेळीं क्षणभर तिचा हात थांबल्यासारखा व्हायचा. अन् मग गोहाड जोरानें कण्हायला लागायचे. त्याबरोबर खडबडून ती जागी होई. अन् पुन्हा तिचा हात जोरानें चालूं लागे.

बरीच रात्र होऊन गेली. तरी तिचें हें काम चाललेंच होतें. कांहीं वेळानें

तिचा हात थांबला. गोहाड किलकिले डोळे करून पाहूं लागले. चांगुणेला झोप लागली होती. ती बसल्याच जागीं त्यांच्या शेजारीं आडवी झाली होती. हलकेच गोहाड पाय न वाजतां हळूच उठले.

आणि त्यांनीं दिवा मालवला.

दुसरे दिवशीं सकाळीं गोहाड जरा उशिरां उठले. अंथरुणावरूनच ते ओरडले, "अग, माझ्या पूजेचं मांडलंस काय?"

आंतून कांहींच उत्तर आलें नाहीं. तेव्हां त्रासिक चेहरा करून दाढीचे खुंट खाजवीत खाजवीत ते उठले. आणि मधल्या खोलींत आले. पण तिथला केर अजून निघाला नव्हता. तें बघून त्यांचा चेहरा थोडासा उतरला. पाय न वाजवतां ते स्वयंपाकघराच्या दाराशीं गेले. अन् हळूच डोकावून पाहूं लागले.

गुडघ्यांत मान घालून चांगुणा भिंतीशीं रडत बसली होती. तें बघून गोहाडांच्या छातींत धस्स झालें.

बाहेर आडावर जाऊन गोहाडांनीं भरभर आंघोळ केली. मोठमोठ्यानें कांहीं तरी स्तोत्र पुटपुटत ते घरांत आले. अन् सोवळें नेसून पूजेला बसले.

**मना, त्वांचि रे पूर्व संकल्प केले**
**अकस्मात् होणार होऊन गेलें!**

असें म्हणत म्हणत देवघरांतला एकेक देव ते ताम्हनांत काढूं लागले.

इतक्यांत स्वयंपाकघरांतून चांगुणा आली. तिनें डोक्यावर पदर घेतला होता. तिचे डोळे लाल झाले होते. चेहरा उतरला होता. तिच्या काखोटींत एक लहानसें बोचकें होतें. गोहाडांच्या तोंडचें पाणीच पळालें. हातांत लंगडा बाळकृष्ण धरून ते भेदरलेल्या दृष्टीनें तिच्या चेहऱ्याकडे टकमक बघूं लागले.

ती कांहीं बोलली नाहीं. तिनें त्यांच्याकडे बघितलेंही नाहीं. रुपया आणि मुसुंबें मुकाट्यानें तिनें त्यांच्यापुढें ठेवलें. आणि दाराकडे वळतांना ती पुट-पुटली "दादा, मी जातें—"

गोहाड ताडकन् आपल्या पाटावरून उठले. आणि घोगऱ्या आवाजांत म्हणाले, "चांगुणा, तूं जाऊं नकोस. मी तुझ्या पायां पडतों. पुन्हा असं व्हायचं नाहीं. कधीं व्हायचं नाहीं. हे बघ—माझ्या हातांतल्या ह्या बाळ-कृष्णाची शपथ आहे!"

चांगुणा थांबली. तिनें गोहाडांकडे पाहिलें. थरथरत्या हातांत बाळकृष्ण धरून अर्धवट वाकलेले गोहाड केविलवाण्या दृष्टीनें तिच्याकडे पाहात होते.

त्यांचें कपाळ घामानें डबडबलेलें होतें. चांगुणेनें बाळकृष्णाकडे पाहिलें. पुन्हा एकदां गोहाडांच्या चेहऱ्याकडे पाहिलें. आणि कांहीं न बोलतां ती परत स्वयंपाकघरांत गेली. मुकट्याच्या सोग्यानें कपाळाचा घाम पुशीत गोहाडही आपल्या पाटावर जाऊन बसले. त्यांची धाप जायला बराच वेळ लागला.

त्या दिवसानंतर गोहाडांनीं चांगुणेला आपल्या खोलींत पुन्हा कधीं बोलावलें नाहीं. ते तिच्याकडे बघतही नसत. कामापुरतें एकादें अक्षर बोलत. तीही आपलें काम नेहमींप्रमाणें करी. आणि रात्रीची मात्र आपल्या खोलीवर झोपायला जाई. चारदोन दिवसांनीं तें सगळें ती विसरूनही पण गेली.

तीन महिन्यांनीं सावित्रीबाई परत आल्या. त्यांना मुलगा झाला होता. वर्णानें तो सावळाच होता. पण नाकाडोळ्यांनीं मोहक आणि हसतमुख होता. चांगुणेला तर तो इतका आवडला कीं पुसूंच नका. अष्टौप्रहर तो आपल तिच्याच खांद्यावर आणि मांडीवर असे. सावित्रीबाईंना ती त्याला हात लावूं देत असे.

बाळंतपणानंतर सावित्रीबाईंची प्रकृति पुष्कळच सुधारली होती. म्हणून घरांतलें काम त्या स्वतःच हळूहळू करूं लागल्या. त्यामुळें पुढें पुढें मुलाला सांभाळण्याचेंच काम चांगुणेकडे आलें. चांगुणा त्या मुलाशीं तास न् तास खेळे. त्याला गुदगुल्या काय करी. त्याच्याबरोबर खदखदां काय हासे. बोबड्या भाषेंत त्याला गोष्टी काय सांगे. खांद्यावर अन् डोक्यावर घेऊन त्याला घरभर काय नाचे.

सावित्रीबाई आपल्या हातांतलें काम सोडून कित्येकदां तरी सस्मित मुद्रेनें त्या दोघांकडे पाहात उभ्या राहात. नवऱ्याच्या नि आईबापांच्या घरांतून बाहेर पडलेली. ही भाबडी गरीब पोर आपल्यापेक्षांही आपल्या मुलावर अधिक माया करून स्वतःला रिझविते आहे, हें बघून त्यांना तिची फार कणव वाटे. आणि त्यांच्या डोळ्यांत पाणी येई.

पण पूर्वी चांगुणा कांहीं इतक्या मोकळेपणानें वागत नव्हती. अशी मोठ्यानें बोलत नव्हती. इतक्या निःसंकोचपणें घरांतून वावरत नव्हती. तिच्या स्वभावांत आतां कांहीं तरी बदल झाला आहे असें सावित्रीबाईंना कांहीं दिवसांनीं वाटूं लागलें. पण पूर्वी घरांत लहान मूल नव्हतें. आतां तें आलें. अन् तें तिला सारखें खेळवावें लागतें. म्हणून तिच्या स्वभावांत बदल झाला असावा असें सावित्रीबाईंनीं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें.

पुढें पुढें तिच्या स्वभावाबरोबर तिच्या चेहऱ्यांत आणि शरीरांतही बदल होतो आहे, ही गोष्ट सावित्रीबाईंच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं.

मुलाला घेऊन एक दिवस चांगुणा अशी पाठमोरी झोपली होती. सावित्री-बाईंनीं सहज तिच्याकडे पाहिलें. त्यांची दृष्टि एकदम तिच्या नितळ आणि पुष्ट पाठीवर खिळून राहिली. ही चांगुणाच आहे कीं काय असा क्षणभर त्यांना भ्रम पडला.

सावित्रीबाईंनीं दिलेलें आभाळीं पातळ एक दिवस चांगुणा नेसली होती. सावित्रीबाई स्वयंपाकघरांत जेवत बसल्या होत्या. धाकटा मुलगा पाळण्यांत झोपला होता. त्रिवेणी पलीकडे खेळतां खेळतां जमिनीवर झोपीं गेली होती.

तेव्हां सावित्रीबाई म्हणाल्या, "अग चांगुणा, त्रिवेणीला उचलून तिकडच्या खोलींत सतरंजीवर निजव बघूं."

चांगुणा आली. आणि खालीं वाकून त्रिवेणीला उचलूं लागली. चांगुणेची डावी बाजू सावित्रीबाईकडे होती.

"हळूच उचल ग. नाहीं तर तिची झोपमोड होईल अन् मग ती भोकाड पसरील!" ताटांतला भात कालवीत कालवीत सावित्रीबाई म्हणाल्या. आणि त्यांनीं घास वर उचलला. चांगुणेकडे त्यांचें सहज लक्ष गेलें.

त्यांचीं बुबुळें एकदम थरकलीं. ओठ रुंदावले. अन् हातांतला घास गळून ताटांत पडला. त्या जेवल्या नाहींत. तशाच उठल्या. आणि त्यांनीं घाईघाईनें हात धुतला.

आपला थरथरता हात लुगड्याला पुशीत चांगुणेला त्यांनीं हलकेच हाक मारली, "चांगुणा—"

"काय काकू?" त्रिवेणीला बाहेर झोपवून चांगुणा चटकन् आंत आली.

"इथं बस पाहूं." सावित्रीबाई खालीं बसत म्हणाल्या. त्यांनीं चांगुणेकडे बघितलें नाहीं.

चांगुणा एकदम चपापली. त्यांचा स्वर तिला अपरिचित वाटला. भीत भीत ती त्यांच्या समोर बसली आणि खालीं पाहूं लागली.

तिच्या पाठीवर हलकेच हात ठेवून सावित्रीबाई म्हणाल्या, "चांगुणा, माझ्याकडे जरा बघ. अन् मी विचारतें तें अगदीं खरं खरं सांग."

चांगुणेची छाती धडधड करूं लागली. तिच्या पापण्यांची भराभर उघड-झाप होऊं लागली. सावित्रीबाईंचा चेहरा तिला अस्पष्ट दिसूं लागला.

आपल्या कोरड्या ओठांवरून जीभ फिरवीत सावित्रीबाईंनीं बिचकत बिचकत तिला विचारलें, "हें बघ, मी इथून गेल्यावर—"

दोन्ही हातांनीं एकदम चांगुणेनें आपलें तोंड झाकून घेतलें. आणि ती रडूं लागली.

त्या दिवशीं संध्याकाळीं दिवेलागणीच्या सुमारास सावित्रीबाईंनीं चांगुणेच्या हातावर तीस रुपये ठेवले. आणि सांगितलें, "उद्यांपासून तूं येऊं नकोस."

लुगड्याचा बोळा काखेंत घेऊन अन् खालीं मान घालून जड पावलांनीं चांगुणा मुकाट्यानें त्या घरांतून चालती झाली.

देवासमोर समईच्या उजेडांत गोहाड आपल्या थोरल्या मुलाला रामरक्षा शिकवीत होते.

● ● ●

संग्रहालय
अनुक्रम
दि.
क्रमांक
नों. दि.

पुढें पुढें तिच्या स्वभावाबरोबर तिच्या चेहऱ्यांत आणि शरीरांतही बदल होतो आहे, ही गोष्ट सावित्रीबाईंच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं.

मुलाला घेऊन एक दिवस चांगुणा अशी पाठमोरी झोपली होती. सावित्रीबाईंनीं सहज तिच्याकडे पाहिलें. त्यांची दृष्टि एकदम तिच्या नितळ आणि पुष्ट पाठीवर खिळून राहिली. ही चांगुणाच आहे कीं काय असा क्षणभर त्यांना भ्रम पडला.

सावित्रीबाईंनीं दिलेलें आभाळी पातळ एक दिवस चांगुणा नेसली होती. सावित्रीबाई स्वयंपाकघरांत जेवत बसल्या होत्या. धाकटा मुलगा पाळण्यांत झोपला होता. त्रिवेणी पलीकडे खेळतां खेळतां जमिनीवर झोपीं गेली होती.

तेव्हां सावित्रीबाई म्हणाल्या, "अग चांगुणा, त्रिवेणीला उचलून तिकडच्या खोलींत सतरंजीवर निजव बघू."

चांगुणा आली. आणि खालीं वाकून त्रिवेणीला उचलूं लागली. चांगुणेची डावी बाजू सावित्रीबाईकडे होती.

"हळूच उचल ग. नाहीं तर तिची झोपमोड होईल अन् मग ती भोकाड पसरील!" ताटांतला भात कालवीत कालवीत सावित्रीबाई म्हणाल्या. आणि त्यांनीं घास वर उचलला. चांगुणेकडे त्यांचें सहज लक्ष गेलें.

त्यांचीं बुबुळें एकदम थरकलीं. ओठ रुंदावले. अन् हातांतला घास गळून ताटांत पडला. त्या जेवल्या नाहींत. तशाच उठल्या. आणि त्यांनीं घाईघाईनें हात धुतला.

आपला थरथरता हात लुगड्याला पुशीत चांगुणेला त्यांनीं हलकेच हाक मारली, "चांगुणा—"

"काय काकू?" त्रिवेणीला बाहेर झोपवून चांगुणा चटकन् आंत आली.

"इथं बस पाहूं." सावित्रीबाई खालीं बसत म्हणाल्या. त्यांनीं चांगुणेकडे बघितलें नाहीं.

चांगुणा एकदम चपापली. त्यांचा स्वर तिला अपरिचित वाटला. भीत भीत ती त्यांच्या समोर बसली आणि खालीं पाहूं लागली.

तिच्या पाठीवर हलकेच हात ठेवून सावित्रीबाई म्हणाल्या, "चांगुणा, माझ्याकडे जरा बघ. अन् मी विचारतें तें अगदीं खरं खरं सांग."

चांगुणेची छाती धडधड करूं लागली. तिच्या पापण्यांची भराभर उघडझाप होऊं लागली. सावित्रीबाईंचा चेहरा तिला अस्पष्ट दिसूं लागला.

आपल्या कोरड्या ओठांवरून जीभ फिरवीत सावित्रीबाईंनीं बिचकत बिचकत तिला विचारलें, "हें बघ, मी इथून गेल्यावर—"

दोन्ही हातांनीं एकदम चांगुणेनें आपलें तोंड झाकून घेतलें. आणि ती रडूं लागली.

त्या दिवशीं संध्याकाळीं दिवेलागणीच्या सुमारास सावित्रीबाईंनीं चांगुणेच्या हातावर तीस रुपये ठेवले. आणि सांगितलें, "उद्यांपासून तूं येऊं नकोस."

लुगड्याचा बोळा काखेंत घेऊन अन् खालीं मान घालून जड पावलांनीं चांगुणा मुकाट्यानें त्या घरांतून चालती झाली.

देवासमोर समईच्या उजेडांत गोहाड आपल्या थोरल्या मुलाला रामरक्षा शिकवीत होते.

• • •

संग्रहालय
अनुक्रम
दिनांक
क्रमांक
नों. दि.

# .११.



त्या दिवशीं चांगुणा नेहमींपेक्षां लवकरच परत आलेली पाहून गऊबाईला आश्चर्य वाटलें. ती भाकर करीत होती. लुगड्याचा बोळा कोपऱ्यांत फेकून गऊबाईशीं कांहीं न बोलतां चांगुणा गुडघ्यावर हनुवटी टेकून गपचिप बसली.

"जाऊन आलीस ?" भाकर थापतां थापतां गऊबाईनें विचारलें. चांगुणेनें नाहीं म्हणून नुसतीच मान हलवली.

"मंग भाकर खातीस ?" पुन्हा गऊबाईनें विचारलें.

चांगुणा कांहीं बोललीच नाहीं.

गऊबाई चांगुणेकडे बघूं लागली.

"कां ग बोलत न्हाईस ? काय झालं ?"

त्याबरोबर डाव्या खांद्यावर मान टेकून चांगुणा रडूं लागली.

पिठानें भरलेल्या हातानें गऊबाई तशीच उठली आणि चांगुणेसमोर येऊन उभी राहिली. क्षणभर तिच्याकडे पाहिलें. आणि खालीं बसून डाव्या हातानें तिची हनुवटी आपल्याकडे वळवीत कळवळून गऊबाई म्हणाली, "अशी कशी ग तूं येडी?"

डबडबलेल्या डोळ्यांनीं गऊबाईकडे पाहात चांगुणा स्फुंदत म्हणाली, "काकू म्हनाल्या उद्यांपासून कामाला नगं येऊंस!"

तिच्या एका डोळ्यांतलें पाणी बोटांनीं निपटीत गऊबाई म्हणाली, "नगं तर नगं. मंग त्यासाठीं एवढं रडाया काय झालं? काकू गेली तर तिची मावशी धाकू मिळल! गांवांत कामाला ग काय तोटा हाये? मोलमजुरी करायंची म्हंजे सत्रा घरं फिरावींच लागत्यात. ती काय जल्मभर एकाच जागीं बसून करायची सरकारी नोकरी हाय व्हय?"

"पन काकू लई चांगल्या व्हत्या!" चांगुणा हळहळून म्हणाली, "त्यांचा माझ्यावर लई जीव होता. माझंच—"

चांगुणा पुढें कांहीं तरी बोलणार होती. पण ती अडखळली. गऊबाईनें तिच्याकडे हसून पाहिलें. आणि ती उठून चुलीजवळ गेली.

गऊबाईच्या बोलण्यानें चांगुणेला धीर आला. ती डोळे पुसून उठली. पण काम कसें मिळेल हा कांहीं ह्या वेळीं तिच्या मनांत विचार नव्हता. गऊबाईला तिला सांगायचें होतें तें निराळेंच. तें कसें तिला सांगायचें ह्याचें तिला भय वाटत होतें. आणि लाज वाटतही होती.

चार पांच महिन्यांपूर्वीच्या त्या रात्रीं गोहाडांचा तिला फार राग आला होता. संताप आला होता. त्यांचें पुन्हा तोंड पाहूं नये असें तिला वाटत होतें. गोहाडांनीं तिचे पाय धरले नसते आणि बाळकृष्णाची शपथ घेतली नसती, तर त्या घरांत एक क्षणभर देखील ती राहिली नसती. पण त्या दिवशीं सावित्रीबाईनीं तिला जें विचारलें आणि कांहीं सांगितलें तेव्हांपासून तिचें मन एका निराळ्याच जगांत वावरूं लागलें होतें.

आपल्या साऱ्या अंगांतून ऊन ऊन आणि गोड गोड भावनेचे झरे उचंबळत आहेत असें तिला वाटत होतें. एका निराळ्याच आनंदाचा आणि संतोषाचा अनुभव तिच्या हृदयाला जाणवूं लागला होता. सावित्रीबाईनीं आपल्याला कामावरून काढलें, ह्याचें तिला त्या वेळीं वाईट वाटलें खरें. पण तेवढ्यापुरतेंच तिचें तें दुःख होतें. कांहीं वेळानें ती तें विसरूनही गेली.

जग फार चांगलें आहे असें तिला एकाएकीं वाटूं लागलें. पूर्वीच्या सर्व जीवनाचा एकदम तिला विसर पडला. गोहाडांच्या बिऱ्हाडापासून वाण्याच्या चाळींतल्या आपल्या खोलीपर्यंत आपण कशा चालत आलों हें कांहीं तिला आठवे ना! एका सुंदर स्वप्नांतून आपण चालत जात आहोंत असा तिला भास होत होता. प्रत्येक गोष्ट तिला नवी नवी दिसूं लागली. गऊबाईची खोली एकदम इतकी कशी बदलली ह्याचें तिला आश्चर्य वाटलें.

"भाकर खाल्लीस का?" असें गऊबाईनें जेव्हां तिला विचारलें, तेव्हां ती भानावर आली. मग काम सुटल्याची तिला आठवण झाली. अन् तिला हुंदका आला.

पण तिचें तें रडूं कांहीं दुःखाचें नव्हतें. गऊबाईला आपल्याकडे ओढून आणण्याची तिच्या मनाची ती युक्ति होती. गऊबाई आपल्याला जवळ घेईल आणि तिच्या कुशींत मान घालून मग हळूच आपण तिला आपल्या काळजांतलें तें गुपित सांगूं असें तिला वाटत होतें.

गऊबाईनें हात धरून तिला भाकर खायला बसविलें, म्हणून अळेंबळें तिनें एक चतकोर तुकडा खाल्ला.

रात्रीं निजायच्या वेळीं सावित्रीबाईंनीं दिलेल्या तीस रुपयांची तिला आठवण झाली. कडोसरीला ते तिनें लावून ठेवले होते. हळूच तिनें ते चापसून पाहिले. सावित्रीबाईंनीं तिला तीस रुपये कां दिले हें आतां तिला उमगलें होतें. म्हणून गऊबाईला ते द्यायची तिला लाज वाटूं लागली. गऊबाईनें विचारलें तर? अंधारांत खुदकन् चांगुणा हसली.

त्याबरोबर गऊबाईचा हात तिच्या अंगावर पडला. तिचा दंड आपल्या बोटांनीं दाबीत गऊबाई म्हणाली, "ए येडे, काम गेलं म्हून हसतीस व्हय ग?"

गऊबाईनें आपलें हसणें ऐकलें हें बघून चांगुणा इतकी लाजली कीं चटकन् गऊबाईच्या जवळ जाऊन मांजराच्या पिलासारखी ती तिला बिलगली.

गऊबाईनें तिला ओढून घेतलें. चांगुणा कांहीं बोलली नाहीं. आपल्या कडोसरीचे तीस रुपये काढून तिनें हळूच ते गऊबाईच्या हातांत दिले.

"काकूंनीं दिलं!" ती पुटपुटली.

गऊबाईनें विचारलें, "किती हायेत?"

चांगुणा बोलली, "मला न्हाई म्हाईत."

गऊबाईनें हळूच तिच्या पाठीचा चिमटा घेतला अन् तिच्या कानाजवळ ती बडबडली, "तुझं प्वार तुझ्यावानीच येडं नगं व्हऊं दे म्हंजी झालं!"

चांगुणेचें सारें अंग लाजेनें थुसळलें. "ह्ये वो काय?" रडव्या सुरांत ती विव्हळली, "तुम्हांला कुनी सांगितलं?"

हलक्या हातानें तिचा गालगुच्चा उपटीत गऊबाई म्हणाली, "आईला ह्ये काय सांगाया लागतं व्हयं ग! तीन मुलाची आई व्हतें मी!"

गऊबाईच्या त्या शब्दांनीं चांगुणेच्या मनांतलें भय आपोआपच वितळून गेलें. आणि तिला धीर आला. त्या रात्रीं ती सुखानें झोपली. सावित्रीबाईच्या मुलाला आपण अंगाखांद्यावर खेळवतों आहोंत हें एकच स्वप्न सबंध रात्रभर तिला पडत होतें.

चार महिने बोल बोल म्हणतां निघून गेले. गऊबाईनें तिला कुठें काम करूं दिलें नाहीं किंवा बाहेरही पण जाऊं दिलें नाहीं. चांगुणेचा स्वभाव तिनें ओळखला होता. आणि गांवांतल्या लोकांचीं मनें तिला माहीत होतीं. अशा स्थितींत कुठें कोणाकडे तिला कामाला लावलें आणि वेडावाकडा प्रश्न जर कुणीं तिला केला, किंवा भलतें सलतें जर कुणी तिला बोललें तर पोरगी उगाच जिवाला लावून घ्यायची अन् त्याचा तिच्या शरीराला अपाय व्हायचा. ह्याची गऊबाईला कल्पना होती.

चांगुणेच्या कामाचे वीस रुपये अन् सावित्रीबाईनें तिला शेवटीं दिलेले तीस रुपये असे पन्नास रुपये गऊबाईपाशीं होते. तेवढ्यांत चार-सहा महिने कसे तरी निभतील अशी तिची समजूत होती. त्याखेरीज घरांत बसून करण्या-सारखीं कांहीं बाहेरचीं कामेंही गऊबाई चांगुणेसाठीं मधून मधून घेऊन येत होत्या. त्याचे महिन्याकाटीं रुपया दोन रुपये तिला मिळत.

चांगुणा नेहमीं आपली अर्धवट भ्रमांत असे. मुलाखेरीज तिच्या डोक्यांत दुसरा विचार नव्हता. सावित्रीबाईसारखाच आपल्याला मुलगा होईल आणि तसाच तो दिसेल असें तिला वाटे. त्याचा चेहरा आठवण्याचा ती सारखा प्रयत्न करी. आणि एकादे वेळीं त्याचे नाकडोळे पुसट पुसट तिच्या डोळ्यां-समोर उभे राहिले कीं ती पुटकन् स्वतःशीं हसे.

दिवसभर ती घरांतच असल्यानें आजूबाजूच्या बिऱ्हाडांतलीं लहान लहान मुलें हळूच तिच्या खोलींत डोकावून जात. त्यांपैकीं कित्येकांना हाका मारून ती त्यांच्याशीं तासन् तास खेळत नि बोलत बसे. मुलें तिला आवडूं लागलीं. तशी मुलांनाही पण ती आवडूं लागली.

एका मध्यरात्रीं ती बाळंत झाली.

गऊबाईनींच तिचें बाळंतपण केलें. सुईणपणाचीं पुष्कळ कामें तिनें पूर्वी केलीं होतीं. म्हणून चांगुणेबद्दल ती निर्धास्त होती.

हातीं पायीं चांगुणा नीट सुटली. तिला मुलगा झाला. रंगानें अन् तोंड-वळ्यानें तिच्याचसारखा होता. त्याचा चेहरा डोळे भरून तिनें नीट पाहिला. आणि ती शांतपणें झोपीं गेली. तिचें सारें अंग अगदीं थकून गेलें होतें.

सकाळीं तिनें जेव्हां डोळे उघडले, तेव्हां उन्हें पडलीं होतीं. कांहीं वेळ ती ग्लानींतच होती. मग तिला आठवण झाली. चटकन् तिचा हात शेजारीं गेला. आणि एकदम चमकून ती कुशीवर वळली.

तिकडे कांहींच तिला दिसेना. ती घाबरून गेली. घाईघाईनें पांघरुणांत ती इकडे तिकडे चाचपूं लागली. पण कुठेंच कांहीं तिच्या हाताला लागेना. क्षीण आवाजांत ती ओरडली, "गऊबाई—"

गऊबाई पाणी तापवीत होती. उठून शांतपणें ती चांगुणेच्या जवळ आली,



आणि शेजारीं बसली. भेदरलेल्या दृष्टीनें गऊबाईकडे पाहात व्याकुळ स्वरानें

चांगुणा म्हणाली, "ह्यो कुटाय?"

तिच्या पाठीवर हात ठेवून गऊबाई कांपत कांपत म्हणाली, "जोगेश्वरीच्या देवळांत मी त्याला ठेवूनशान आलें."

चांगुणेनें एकदम गळा काढला, "असं कसं वो तुम्हीं केलंत गऊबाई?"

गऊबाईचा उकिडवा पाय दोन्ही हातांनीं धरून चांगुणा ओक्साबोक्शीं रडूं लागली. तिला आवरतां आवरतां अन् समजावतां समजावतां गऊबाईच्या नाकीं नव आले. शेवटीं रड रड रडली अन् बिचारी झोपीं गेली.

दहा दिवस तिच्या डोळ्यांतलें पाणी म्हणून खळलें नाहीं. महिनेचे महिने, दिवसचे दिवस, तासचे तास जें स्वप्न तिनें डोक्यांत रचून ठेवलें होतें तें पटकन् कुठल्या कुठें मावळून होतें का नव्हतें असें होऊन गेलें. गऊबाई सारखी तिच्या शेजारीं बसून असे. दहा बारा दिवस तिला कुठें कामाला सुद्धां बाहेर जातां आलें नाहीं.

आपल्या मुलाला आपण पाहिलें देखील नाहीं नीट. आपल्या कुशीमध्यें कुरवाळूनसुद्धां घेतलें नाहीं प्रेमानें. त्याच्या गालावरच्या डाळिंबी ठिपक्याचा मुकाही घेतला नाहीं तोंड भरून. हृदयाशीं धरून त्याला पाजलें पण नाहीं एकदां ममतेनें.

ह्याचें चांगुणेला सर्वांत जास्त दुःख होई. आणि त्याच्या आठवणीमुळें ती विव्हळून विव्हळून रडे. आईनें घरांतून हाकून दिलें तेव्हांसुद्धां जितकें झालें नाहीं, तितकें दुःख मुलाची आणि आपली ताटातूट झाली म्हणून चांगुणेला झालें.

तिच्या त्या वेदना बघून गऊबाईच्या जिवाची अगदीं कालवाकालव होई.

सावित्रीबाईच्या तान्ह्या मुलाचें नांव दत्ता होतें. चांगुणेनेंही आपल्या मुलाला तेंच नांव देऊन टाकलें होतें. 'कां घेऊन गेलांत तुम्ही माझ्या दत्ताला?' अन् 'कुठं नेऊन ठेवलंत तुम्हीं माझ्या दत्ताला?' असें डोळ्यांत पाणी आणून दिवसांतून सत्रा वेळां चांगुणा गऊबाईला विचारीत असे. गऊबाई आपली गप्प बसे.

दोनतीन दिवसांनीं गऊबाई कामाला जाऊं लागली. त्यामुळें चांगुणेशीं बोलायला घरांत कुणीच नसे. शेजारपाजारचीं मुलें येऊन तिच्यापाशीं खेळत. त्यामुळें तिचें रडणें हळूहळू कमी झालें.

एक दिवस संध्याकाळी जेवतांना गऊबाईनें चांगुणेच्या पितळींत भाकर

वाटली. तिचा एक तुकडा तोडून चांगुणेनें तोंडांत घातला अन् खळकन् तिच्या डोळ्यांतून पाणी आलें. तसा तिच्या तोंडांतला तुकडा गळून खालीं पडला.

गऊबाई आश्चर्यानें तिच्याकडे बघूं लागली. "आं! ह्ये ग काय?"

"माझ्या आईनं भाकरींत कांचा घातल्या, त्याबी माझ्या पोटांत जिकल्या दुखल्या न्हाईत, तिकता तुमच्या हातच्या भाकरीचा ह्यो तुकडा माझ्या जिवाला खुपतोय." चांगुणा स्फुंदत म्हणाली, "जलम देणारी माझी ती आई तशी अन् लेकीवानी माझ्यावर माया करनाऱ्या तुम्ही आई बी अशा! आईचं प्यार कसं वो तुम्ही तोडून नेलंत?"

"आई व्हतें म्हून!" व्याकुळ स्वरानें गऊबाई म्हणाल्या, "येडे, पोराला जलम देनं सोपं हाये. पन पोराचा सांभाळ करनं लई कठीन. तें दूख तुझ्यानं नसतं पचवलं. मंग सत्रा येळां म्हनाली असतीस, कशाला ह्या पोरास्नी जलम दिला म्हून!"

गऊबाईचें बोलणें चांगुणेनें ऐकलें. पण तें तिला समजलें नाहीं. मान खालीं घालून ती हळू हळू जेवूं लागली.

चांगुणेचे पैसे संपत आले. तशा गऊबाई तिच्यासाठीं काम शोधूं लागल्या. पलीकडच्या एका खोलींत खारे चणे विकणारी एक बाई राहात होती. ती आजारी पडली.

तिनें गऊबाईला हाक मारून सांगितलें, "तुमची पोरगी माझी टोपली घेऊन फिरल, तर तिलाबी चारसहा आनं मिळत्याल, अन् मलाबी चारसहा आनं मिळत्याल!"

गऊबाईनीं चांगुणेला विचारलें. ती तयार झाली. कुणाच्याही घरांत काम करायचें तिला आतां भयच वाटत होतें. त्यापेक्षां हें बरें.

दुसऱ्या दिवसापासून खाऱ्या चण्यांचें टोपलें डोक्यावर घेऊन चांगुणा फिरूं लागली. सकाळीं अन् संध्याकाळीं दोन दोन तास फिरलें कीं तिची सारी टोपली खपून जात असे. दुपारीं उन्हांत हिंडायची जरुरीही नसे. पुढें पुढें तर चांगुणेला असें आढळून आलें कीं रस्त्यांतून फिरण्यापेक्षां कांहीं चार-दोन निवडक ठिकाणीं नुसतें बसलें, तरी सगळा माल जागच्या जागीं विकला जातो.

शुक्रवार पेठेंत एक गुत्ता होता. त्याच्या समोर संध्याकाळीं लोकांची खूप गर्दी असे. तिकडून एक दिवस चांगुणा सहज चालली होती. तिथें रस्त्याच्या कडेला शेव, चणे विकणारे दोघेचौघे बसलेले पाहून, तीही त्यांच्या ओळींत

जाऊन बसली. तिच्या टोपलींत कांहीं फार माल नव्हता. पण तो दहापंधरा मिनिटांच्या आंत खलास झाला. तें पाहून चांगुणेला नवलच वाटलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळची फेरी तिनें केलीच नाहीं. संध्याकाळीं सहा वाजतां सबंध टोपली घेऊन ती त्या गुत्त्यासमोरच जाऊन बसली. दिवे-लागणीच्या आंत तिची सारी टोपली संपून गेली.

त्या दिवसापासून ती तिथेंच जाऊन बसूं लागली. चार तास हिंडून पूर्वीं तिची जी विक्री होत नसे, ती तास दीड तासांत एका ठिकाणीं बसून होऊं लागली.

एके दिवशीं संध्याकाळीं समोरच्या खिडकीमधून तिला एक हाक ऐकूं आली, "ए चणेवाली—"

चांगुणेनें वर पाहिलें. एकोणीस वीस वर्षांची एक काळीसावळी बाई खिडकीच्या आडव्या दांड्यावर हात ठेवून सांगत होती, "अग, दोन आण्याचं चणं वर घेऊन ये ग!"

त्या बाईच्या कपाळाला बारीक काळें कुंकूं होतें. नाकांत चमकी लखलखत होती. अभ्रकाच्या खडीचें चमकणारें निळें पातळ ती नेसली होती. आणि तिच्या डोक्यावर एक पोपटाचा पिंजरा लोंबत होता.

दोन आण्यांचे चणे कागदांत गुंडाळून अन् शेजारच्या दुकानदाराला आपल्या टोपलीकडे पाहावयास सांगून चांगुणा रस्ता ओलांडून समोरच्या माडीवर गेली. चण्यांचा पुडा त्या बाईच्या समोर ठेवून, पैसे घेण्यासाठीं तिनें मान वर उचलली आणि त्या बाईकडे ती बघूं लागली.

कमरेची चवली काढून ती देण्यासाठीं म्हणून त्या बाईनें चांगुणेकडे पाहिलें मात्र, आणि विजेचा धक्का बसावा तशी ती दचकली.

चांगुणाही चमकली. आणि बुबुळें रोखून त्या बाईकडे बघूं लागली.

"चांगुणा!" श्वास आंत ओढून ती बाई एकदम उद्गारली.

"चंद्रे!" चांगुणेला तिची ओळख पटली. आणि चंद्रीच्या गळ्याला तिनें कडकडून मिठी मारली.

दोघीही एकमेकीच्या खांद्यांवर डोकीं ठेवून किती वेळ तरी हुंदके देत राहिल्या. सुताराची चंद्री इतक्या वर्षांनीं अशी अचानक भेटेल असें चांगुणेला स्वप्नांतही कधीं वाटलें नसेल. चार वर्षांपूर्वीं चंद्रीचें लगीन होऊन ती चाळींमधून गेली. त्यानंतर पुन्हा चांगुणेची तिची भेटही कधीं झाली नव्हती. किंवा तिची कांहीं बातमीही तिनें ऐकली नव्हती.

"चांगे, तूं इथं कशी?"

"चंद्रे, तूं इथं कशी?"

डोळे पुशीत दोघींनीं एकमेकांना एकाच वेळीं प्रश्न केले.

"नवऱ्यानं मारलं. आयबापानीं हाकून दिलं. तवा मोलमजुरी करून पोट भरायां मी इथं आलें!" चांगुणेनें सांगितलें.

"माझाबी नवरा मला मारी. म्हणून त्याच्या घरांतनं मी पळालें. गांवचा एक मुसलमान संगं आला. त्यानं मला इथं आणलं अन् हें दुकान घालून दिलं." कपाळावर हात मारून चंद्री म्हणाली.

चांगुणेनें हळूच खोलींतून नजर फिरवली. एका भिंतीवर एक मोठा आरसा अन् तीनचार रंगीत तसबिरी लावल्या होत्या. त्याच्या समोरच्या भिंतीला लागून लाकडाचा एक छपरी पलंग ठेवला होता. कोपऱ्यांत दोन तीन सोड्याच्या मोकळ्या बाटल्या आणि कांचेचीं ग्लासें पडलीं होतीं.

चंद्री काय बोलली हें तिच्या मुळीं ध्यानांतच आलें नाहीं. हें कसलें दुकान?

इतक्यांत जिन्यावर पावलें वाजलीं. चंद्री चटकन् सावरून बसली. अन् चांगुणेला म्हणाली, "जा तूं. माझं दुकान सुरू झालं. उद्यां सकाळीं दहा वाजतां तूं ये!

चांगुणा उठून जाऊं लागली. इतक्यांत विडा खात खात एक पिंजारलेल्या केसांचा नि लाल डोळ्यांचा माणूस हसत हसत दारांतून आंत आला. त्याच्या अंगावरून जातांना चांगुणेला अशी वसकन् घाण आली. जेजुरीला त्या नाचणाऱ्या बाईच्या घरांत अंकुशाच्या अंगाला जशी येत होती तशी. चांगुणेनें नाकाला पदर लावला. अन् भरभर जिना उतरून ती खालीं गेली.

तिच्या टोपलीसमोर चारदोन गिऱ्हाइकें उभीं होतीं. त्यांना चणे देतां देतां सहज चंद्रीच्या माडीकडे तिची दृष्टि गेली.

पण तिची खिडकी आतां बंद झाली होती. चण्यांची टोपली रिकामी झाल्यावर घरीं जायला जेव्हां चांगुणा निघाली, तेव्हां पुन्हा एकदां समोरच्या माडीकडे तिनें पाहिलें. चंद्रीच्या खोलींत दिवा झगझगत होता. अन् खिडकींतून तोंड काढून चंद्री चमत्कारिक दृष्टीनें बाहेर कुठें तरी बघत होती.

लहानपणींची आपल्या जिवाभावाची मैत्रीण ह्याच गांवांत आहे, हें कळल्या-पासून चांगुणेचा चेहरा एकदम उमलला. तिला आनंद वाटला. आणि धीरही पण आला.

आपल्याला ओळखणारें ह्या गांवांत एक कुत्रें देखील नाहीं, ह्या जाणिवेनें आतांपर्यंत चांगुणेला भेदरल्यासारखें वाटत होतें. गांवांत एवढीं माणसें असून-सुद्धां आपण एकट्या आहोंत ही भावना सतत तिच्या मनांत सलत असे. राधाबाईनीं आणि गऊबाईनीं तिला जिवापलीकडे सांभाळलें खरें, पण चंद्रीच्या गळ्याला लोंबकळून तिच्यापुढें आपलें हृदय जसें चांगुणेला उघडें करतां आलें असतें तसें त्यांच्यापुढें तिला करतां आलें असतें का ?

चंद्रीच्या माडीची ती खिडकी रात्रभर तिला स्वप्नांत दिसत होती. वर पिंजऱ्याच्या काड्यांमधून दिसणारा तो पोपट अन् खालीं खिडकीच्या गजामधून बाहेर बघणारी चंद्री—

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अकराच्या सुमाराला चांगुणा चंद्रीच्या माडीवर गेली. उद्यां एका गांववालीला भेटायला जायचंय, असें गऊबाईला तिनें आधल्याच रात्रीं सांगून ठेवलें होतें. चंद्री तिची वाटच पाहात बसली होती. तिच्या माडीची खिडकी बंद होती. त्यामुळें आंत अंधुक उजेड पडला होता. चंद्री एका मोडक्या कंगव्यानें आपले केस विंचरीत बसली होती. शेजारीं एक खोबरेल-तेलाची बाटली होती. तिचा चेहरा ओढलेला दिसत होता. आणि डोळ्यांतली झोंप अजून गेली नव्हती. काल संध्याकाळीं ती किती तरी चांगली दिसत होती !

पहिल्या भेटींतच त्यांच्या प्रेमाला पूर येऊन गेला होता. आणि अंतः-करणांतली खळबळ वाहून गेली होती. त्यामुळें कोरड्या डोळ्यांनीं आणि मोकळ्या गळ्यांनीं त्या एकमेकांशीं ह्या वेळीं बोलूं शकल्या. चांगुणेनें आपली सगळी गोष्ट चंद्रीला आळवून आळवून सांगितली. अगदीं लगीन झाल्यापासून अन् नवऱ्याबरोबर जेजुरीला गेल्यापासून तों मूल होईपर्यंत अन् जोगेश्वरीच्या देवळांत गऊबाईनें तें नेऊन ठेवीपर्यंत. ती ऐकतांना चंद्रीच्या डोळ्यांतून सारख्या पाण्याच्या धारा वाहत होत्या.

डोळे पुशीत चंद्री म्हणाली, "माझी गोष्ट घाण आहे. सांगण्यावाणी नाहीं. काल तुला सांगितली तेवढी पुरे. कशाला तुझं मन मी खराब करूं? चांबळीच्या पाण्यागत तूं अजून निर्मळ आहेस. पण माझीच वाट चालते आहेस. तुला सांभाळायची हीच येळ आहे. तूं माझ्यापाशीं येऊन राहा. मी वाईट झालें. पण तुला नाहीं वाईट होऊन देणार. माझ्या जिवांत जीव आहे तोंपत्तर तुला मी संभाळीन!"

त्या खोलीच्या एका भिंतीला दार होतें. तें बंद होतें. चंद्रीनें तें उघडलें.

अन् चांगुणेला आंत नेलें. आंत तशीच एक दुसरी खोली होती. आणि तिला मागल्या बाजूनें बाहेर जायला जिना होता. खोली अगदीं साधी, पण नीटनेटकी होती. कोपऱ्यांत चूल अन् भांडीं होतीं.

चंद्री म्हणाली, "चांगे, ही माझी सैपाकाची खोली. पण दहा दहा दिवस मी कधीं इथं पाऊल टाकीत नाहीं. बाहेरचं हॉटेलांतलं खातें. इथं येऊन तूं राहिलीस, म्हंजे तुझ्यामुळं माझ्याबी पोटांत एक वेळ तरी अन्नाचे दोन चांगले घास जातील."

चंद्रीच्या जवळ येऊन राहायची कल्पना चांगुणेला अतिशय आवडली. म्हणजे, कुणाचीं भांडीं घासायला नको कीं कुणाचे चणे विकायला नकोत. दोन वेळां सैपाक केला कीं झालें काम. गऊबाईला सोडायचें मात्र तिच्या जिवावर आलें. गांववाल्या मैत्रिणीच्या घरांत राहायला जातें, एवढेंच चांगुणेनें गऊबाईला सांगितलें. तें ऐकून म्हातारीला निर्धास्त वाटलें. दोन दिवसांनीं आपल्या सामानाचें लहानसें बोचकें हातांत घेऊन चांगुणा चंद्रीच्या त्या खोलींत राहायला आली.

चंद्री आपल्या माडींत चांगुणेला कधीं पाऊल टाकूं देत नसे. मधलें दार तिनें जवळ जवळ बंदच करून टाकलें होतें. सकाळीं आठ-नऊ वाजतां ती तें एकदां उघडी. अन् बारा वाजतां जेवण झालें कीं जें लावून टाकी, तें दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत. रात्रीं चंद्री जेवत नसे. अशी चांगुणेची अन् चंद्रीची दिवसांतून दोन-तीन तास काय ती गांठ पडे.

चांगुणेला वाटे कीं चंद्रीनें न् आपण तासन् तास एके ठिकाणीं बसावें अन् खूप खूप गप्पा कराव्यात. पण चंद्री सारखी आपल्या माडींत बसे. चांगुणेच्या खोलींत यायला तिला मुळीं वेळच मिळत नसे. कधीं कधीं तर तिची सबंध दिवस न् रात्र गांठ पडत नसे. घोड्याच्या गाडींत बसून आपण कुठें तरी बाहेर गेलों होतों, असें दुसऱ्या दिवशीं सकाळीं ती चांगुणेला सांगे.

सैपाकाखेरीज चांगुणेला दुसरें कांहींच काम नसे. दुपारची ती तास दोन तास चांगली झोप काढी. बाळंतपणानंतर तिला जी अशक्तता आली होती, ती चंद्रीकडे आल्यानंतर एका महिन्यांत नाहींशी झाली. आणि पुन्हा ती पहिल्यासारखी प्रफुल्लित दिसूं लागली.

हशम नांवाचा एक मुसलमान चंद्रीचा मित्र होता. सकाळीं मधलें दार उघडलें कीं कांहीं वेळानें तो आंत येऊन भाजीपाला, धान्य, मांसमच्छी

चांगुणेला देऊन जाई. चांगुणेशीं तो कधीं बोलत नसे. नुसता कधीं कधीं तिच्याकडे बघे. अन् थोडासा हसे.

चंद्री आपले पैसे रोज सकाळीं चांगुणेकडे ठेवायला देई. कधीं दोन रुपये तर कधीं पांच रुपये. अन् कधीं कधीं दहा रुपये. आंत एक फडताळ होतें. त्यामध्यें एका पत्र्याच्या डब्यांत ते पैसे ती ठेवी. पण महिना झाला कीं एक दिवस हशम येई. आणि ते सगळे पैसे घेऊन जाई.

त्या वेळीं चांगुणेला फार वाईट वाटे. तिला वाटे कीं, चंद्री एवढे पैसे मिळविते. अन् हशम ते सगळे घेऊन जातो. चंद्रीला विचारलेंसुद्धां तिनें एकदां त्याबद्दल. पण चंद्री कांहीं बोललीच नाहीं. तिनें तोंड रडवें केलें. तेव्हां आपल्या-इतकेंच चंद्रीलाही पण त्याबद्दल वाईट वाटतें आहे, हें चांगुणेनें मनांत ओळखलें.

चांगुणेजवळ फक्त दोन लुगडीं आणि एक पातळ होतें. त्यांतलें एक लुगडें तर अतिशय फाटून गेलें होतें. आणि दुसरें ठिकठिकाणीं विरलें होतें. हशमला सांगून चंद्रीनें तिच्यासाठीं दोन चांगलीं लुगडीं आणवलीं. इतकीं चांगलीं लुगड़ीं चांगुणेनें जन्मांत कधीं पाहिलीं नव्हतीं. तिला खूप आनंद झाला. चंद्रीची आपल्यावरची माया बघून तिच्या डोळ्यांत पाणी आलें.

चंद्री म्हणाली, "चांगे, तुझं तें फाटकं लुगडं कुठंय?"

कोपऱ्यांतल्या दोरीवर तें टांगलेलें होतें. मोठ्या प्रेमानें तें हातांत घेऊन चांगुणा म्हणाली, "माझ्या आयचं हाय तें!"

"चल, म्हणे आईचं आहे! मीं तें उद्यां भोवारणीलाच देऊन टाकतें!" असें म्हणून चंद्रीनें तिच्या हातांतून तें लुगडें हिसकलें.

त्याच्या पदराचें एक टोक चांगुणेच्या हातांत राहिलें. त्यांत कांहीं तरी बांधलेलें होतें. तें तिच्या बोटांना लागलें.

"थांब ग. म्यां यांत काय बांधलंय कुनास ठावं?" पदरांत बांधलेली ती पुरचुंडी चांगुणेनें घाईघाईनें सोडली.

तों आंतून वाळलेलीं फुलें भरभर खालीं जमिनीवर पडलीं. तेवढ्यांत चंद्रीनें लुगड्याचा बोळा करून कोपऱ्यांत फेकूनसुद्धां दिला. अन् ती आपल्या माडींत निघून गेली.

मधलें दार बंद झाल्यावर चांगुणा खालीं बसली. आणि तिनें तीं फुलें हलक्या हातानें वेचून आपल्या ओंजळींत घेतलीं. किती वेळां तरी ती त्यांच्याकडे बघत राहिली. असा गोड सुवास त्यांना येत होता किनई.

त्या रात्रीं बाणेश्वराच्या देवळांतल्या ओवरींतून शंकरनें काढून दिलेलीं तीं बकुळीचीं फुलें इतके दिवस आपल्या लुगड्याच्या पदरांत बांधलेलीं कशीं राहिलीं ह्याबद्दल तिला नवल वाटलें. आणि आतांपर्यंत आपल्याला त्यांची आठवणसुद्धां कशी झाली नाहीं ह्याचें तिला वाईट वाटलें.

त्या रात्रीं तीं फुलें आपल्या उशाखालीं ठेवून ती निजली. रात्रभर तिला चांबळीच्या पुराचीं, बाणेश्वराच्या पिंडीचीं, घंटेचीं आणि शंकरचीं गोड स्वप्नें पडत होतीं.

दुसरे दिवशीं सकाळीं चंद्री नटून थटून आंतल्या खोलींत आली. आणि म्हणाली, "चांगे, मी जरा चतुर्शिंगीला जाऊन येतें. नवरात्र आहे. दुपारीं तीनचार वाजतां येईन. मला कांहीं जेवायचं नाहीं. तूं जेवून घे."

दार बंद करून चंद्री निघून गेली. चांगुणेनें सावकाश सावकाश स्वयंपाक केला. अन् जेवून ती खुशाल झोपीं गेली.

तिचा डोळा लागून अर्धा-पाऊण तास झाला नसेल, तोंच मधलें दार उघडून हळूच कुणी तरी आंत आल्याची चाहूल तिला लागली. तशी ती एकदम खडबडून जागी झाली. पाहाते तों हशम हसून तिच्याकडे पाहात उभा होता. त्याच्या हातांत टिकल्याटिकल्यांचें पिवळें धमक रेशमी पातळ आणि हिरव्या साटीनची चोळी होती. ती तिच्या अंगावर टाकून हशम म्हणाला, "चंद्रीनं तुला तिकडं बोलावलंय. तुला घेऊन जायला माणूससुद्धां तिनें पाठवलाय. चल, कपडे कर हे लौकर. उशीर नको करूंस!"

इतके चांगले कपडे घालून चंद्रीनें आपणास चतुर्शिंगीला बोलावलें आहे, हें बघून चांगुणेला फार आनंद झाला. चटकन् उठून तिनें तोंड धुतलें. कुंकूं लावलें. केस नीट बांधले. अन् अंगांत ती हुकाची हिरवी चोळी घातली. ती तिला इतकी छान झाली! रेशमी सुळसुळीत पातळ नेसतांना तर तिच्या अंगाला साखरच्या गुदगुल्या होत होत्या. कपडे झाल्यावर आपण आंतूनबाहेरून अगदीं बदलून गेलों आहोंत, असेंच तिला वाटूं लागलें. ती दार उघडून लाजत लाजत बाहेर आली.

ऐटबाज फेटा बांधलेला आंकडेदार मिशांचा एक माणूस पलंगाच्या कडेवर बसला होता. तो तर डोळे फाडून आणि तोंड वासूनच चांगुणेकडे पाहात राहिला.

हशम खालीं सतरंजीवर बसून विडी फुंकत होता. नव्या कपड्यांत चांगुणा इतकी चांगली दिसूं शकेल अशी त्याचीसुद्धां कल्पना नव्हती.

तो चांगुणेला म्हणाला, "बस तिथें पलंगावर. लाजूं नकोस. तुला घेऊन जायला ह्यांनाच चंद्रीनं पाठविलें आहे.

चांगुणेनें त्या माणसाकडे पाहिलें न पाहिल्यासारखें केलें. अन् ती त्याच्याकडे पाठ फिरवून अन् मान खालीं घालून पलंगाच्या कोपऱ्यापाशीं मुकाट्यानें उभी राहिली.

हशमनें त्या मिशावाल्याकडे पाहिलें. आणि गालांतल्या गालांत तो हसला.

"मी गाडी घेऊन येतों आतां." असें म्हणत हशम चटकन् उठला. आणि जिन्याच्या दारांतून धडधड पावलें वाजवीत तो खालीं गेला.

तसा फेटेवाला इसम हलकेच उठला आणि त्यानें आंतून दार लावून घेतलें. चांगुणेनें चमकून तिकडे पाहिलें. पण त्यानें दार कां लावलें, तें तिच्या लक्षांतही आलें नाहीं. ती क्षणमात्र अस्वस्थ झाली.

त्यानंतर त्यानें आपला फेटा आणि कोट काढून शांतपणें खुंटीवर ठेवला. आणि चांगुणेच्या मागें येऊन तो उभा राहिला. क्षणभर तो विचारांत पडला. तिच्या गोऱ्या मानेवरचा केसाचा काळाभोर बुचडा बघून तो आपल्या जिभेचें टोक खालच्या ओठावरून फिरवूं लागला. चांगुणेच्या मानेवर कांटा उठला.



दबकत दबकत त्या माणसानें आपला उजवा हात वर उचलला. आणि पटकन् तिच्या खांद्यावर ठेवला.

"आतां लाजतीस कशाला?"

चांगुणा भुळकन् भिंतीपाशीं पळाली. आणि भेदरलेल्या डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहूं लागली. तिचें सर्वांग लटलट कांपूं लागलें.

धुंद डोळ्यांनीं तो

माणूस एकेक पाऊल टाकत टाकत आणि आपल्या मिशांना पीळ भरीत भरीत तिच्या जवळ येऊं लागला. तसें चांगुणेनें दोन्ही हातांनीं आपलें तोंड झाकून घेतलें. आणि मोठ्यानें किंचाळीं फोडली.

त्याच क्षणीं जिन्याच्या दारावर बाहेरून कोणी तरी धडाधड धक्के मारूं लागले.

"दार उघड—उघड दार!" चंद्रीचा आवाज होता तो.

चांगुणा एकदम धावत गेली. झटकन् तिनें कडी काढली.

चवताळलेल्या वाघिणीसारखी चंद्री आंत घुसली. चांगुणेला वसकन् घाण आली. चंद्रीचें तोंड अन् डोळे सडलेल्या उंबरासारखे भडक नि सुजलेले दिसत होते. क्षणभर चंद्री दारांत थबकली. गरगर डोळे फिरवीत तिनें चांगुणेकडे आणि त्या माणसाकडे बघितलें.

आणि काडकन् चांगुणेच्या मुस्काडींत मारली. चांगुणेच्या डोळ्यांपुढें काजवे चमकले.

"टवळे, एक दिवस माझी पाठ फिरली नाहीं तर हे धंदे तूं सुरू केलेस?"

मिशावाला माणूस हतबुद्ध होऊन जागच्या जागीं उभा होता. मांजरीसारखी दांत फिसकून चंद्री त्याच्या अंगावर धावली.

"मेल्या, हो बाहेर—"

"हशमला—मीं—वीस रुपये दिलेत!" घोगऱ्या आवाजांत तो म्हणाला, "वि—विचार त्याला."

चंद्री गरकन् मागें वळली.

जिन्याच्या दारांत डोक्यावर तिरपी टोपी ठेवून हशम उभा होता.

"तूं—तूं! वीस रुपये घेतलेस? माझ्या अब्रूची होळी केलीस अन् आतां हिच्या जलमाची धुळवड करतोस?"

नाकपुड्या फेंदारून हशम तिच्या रोखानें चालत आला. पण तेवढ्यांत कोपऱ्यांतली सोड्याची एक मोकळी बाटली उचलून फाडकन् चंद्रीनें त्याच्या डोक्यावर मारली.

डोळे पांढरे करून धाडकन् हशम खालीं कोसळला. तरीही खालीं वाकून त्याच्या डोक्यावर ती सोड्याची बाटली चंद्री ताड ताड मारीत सुटली. चांगुणेनें दोन्ही हातांनीं आपलें तोंड झाकून घेतलें.

पांच मिनिटांच्या आंत त्या माडीखालच्या रस्त्यावर लोकांची प्रचंड गर्दी जमली.

त्या गर्दीतून वाट काढीत घामाघूम झालेले दोन पोलिस जिना चढून वर आले. आणि चंद्रीला नि चांगुणेला त्यांनीं अटक केली.

रक्तबंबाळ झालेलें हशमचें भेसूर प्रेत वेडेंवाकडें होऊन खालीं सतरंजीवर पडलें होतें.

● ● ●

# .१२.



दोन महिन्यांनीं हशमच्या खुनाचा खटला पुण्याच्या सेशन कोर्टांत उभा राहिला.

आरोपीच्या पिंजऱ्यांत चंद्री आणि चांगुणा उभ्या होत्या. अभ्रकाच्या खडीचें निळें चीट चंद्रीच्या अंगावर चमकत होतें. तर हिरव्या साटीनची चोळी नि टिकल्याटिकल्यांचें पिवळें धमक पातळ चांगुणेनें नेसलें होतें. कोर्टांत लोकांची तुफान गर्दी झाली होती.

सगळ्यांच्या नजरा आरोपीच्या पिंजऱ्याकडे लागून राहिल्या होत्या. पण बुबुळें मात्र चंद्रीच्या चेहऱ्यापेक्षां चांगुणेच्या तोंडावरच जास्त खिळलीं होतीं.

चंद्रीच्या डोळयांभोवतीं कावळ्याचीं पावलें उमटलीं होतीं. अन् तिच्या खप्पड गालफडांतून दांतांच्या कवळ्या बाहेर डोकावत होत्या, तर चांगुणेच्या डोळ्यांत गोकर्णाचीं निळीं फुलें उमललेलीं होतीं. अन् तिच्या तोंडावर सोनचाफ्यांच्या पिवळ्या पाकळ्याच जणुं चुरडल्या होत्या.

मान खालीं घालून बसलेल्या चंद्रीचीं हाडकुळीं बोटें पिंजऱ्याच्या कठड्यावर थरथर कांपत होतीं, तर अर्धवट हात जोडून डबडबलेल्या डोळ्यांनीं समोर बघत बसलेल्या चांगुणेला उच्चासनावर काळा झगा घालून बसलेल्या न्यायाधीशाच्या चकचकणाऱ्या टकलामध्यें बाणेश्वराची पिंडी दिसत होती.

बावनखणींतल्या दोन तरुण वेश्यांनीं एका मुसलमानाचा खून केला या बातमीनें पुण्यांत जशी खळबळ उडवली, त्याप्रमाणें ह्या दोन बाया चांबळीच्या आहेत ही वार्ता देखील एखाद्या वणव्यासारखी त्या चिमुकल्या गांवांतील घराघरांत जाऊन घुसली. आणि तिच्या धगीनें साऱ्या चांबळीकरांचे डोळे पांढरे झाले.

चंद्रीचा बाप भिवा सुतार गांवांतून एकाएकीं परागंदा झाला.

आणि राघू कामठे घराचें दार आंतून बंद करून माजघरांत मुडद्यासारखा पडून राहिला. शिदू न्हाव्यानें तर आठ दिवस आपला धंदाच बंद केला.

खटल्याच्या पहिल्या दिवशीं चांगुणेनें इकडची मान तिकडे केली नाहीं. मिशांचे आकडेवाला माणूस समोरच्या एका पिंजऱ्यांत शिरलेला तिला दिसला. तेव्हां तिनें आपले डोळे गच्च मिटून घेतले.

दुसऱ्या दिवसापासून मात्र तिच्या डोळ्यांतल्या बाहुल्या डावी-उजवीकड थोड्याशा हालचाल करूं लागल्या. पण जिकडे पाहावें तिकडे वासलेलीं तोंडें अन् फाटलेले डोळे आपल्यावर रोखलेले आहेत हें पाहून तिच्या सर्वांगाला कांपरें सुटलें. गोगलगाईप्रमाणें लपायला पाठीवर एकादें लहानसें घर असतें तर बरें झालें असतें, असें तिला वाटूं लागलें.

क्षणभर कुठें तरी स्थिर व्हायला एकादा तरी ओळखीचा चेहरा दिसतो का म्हणून तिचे भेदरलेले डोळे पाकोळ्यांसारखे सभोवार भिरभिरूं लागले.

एक कां? चांगलीं दोन तोंडें तिच्या ओळखीचीं तिथें दिसलीं. ज्यूरीच्या कठड्यांत बसलेल्या माणसांमध्यें कानांत रुद्राक्ष आणि डोक्यावर हरणाची टोपी घातलेलें एक गोरेंगोबरें तोंड अन् न्यायाधीशाच्या उजव्या बाजूला एका टेबलावर डोक्याला रुमाल घातलेले आणि नाकावर चष्मा ठेवलेलें शिरस्तेदार

गोहाडांचें देवीच्या वणांचें दुसरें तोंड !

चांगुणा त्या दोन्ही तोंडांकडे आळीपाळीनें बघूं लागली. पण ते दोघेही तिच्याकडे बघत नव्हते. हरणटोपीवाला 'बुवा' अर्धवट डोळे मिटून कसला तरी जप मनांतल्या मनांत पुटपुटत होता. अन् गोहाड डाव्या आंगठ्यानें नाकाचा शेंडा खाजवीत मान खालीं घालून सारखें कांहीं तरी लिहीत होते.

चांगुणा एकसारखी आपल्या चेहऱ्याकडे पाहात आहे, हें गोहाडांच्या लक्षांत यायला कांहीं फार वेळ लागला नाहीं. टेबलाखालीं लपलेले त्यांचे गुडघे थरथर कांपत होते, आणि एकमेकावर आदळत होते. एकदां डाव्या डोळ्याच्या कडेनें हळूच त्यांनीं तिच्याकडे बघितलें. ती केविलवाण्या दृष्टीनें आपल्याकडे बघत आहे हें पाहून त्यांच्या अंगाला दरदरून घाम सुटला.

आपणच हिला बावनखणीची वाट दाखवली हा विचार इंगळींवाणी त्यांच्या काळजाला सारखा डसूं लागला. कदाचित् आपल्याकडे बोट दाखवून आपण त्या रात्रीं काय केलें तें साऱ्या कोर्टासमोर ही सांगेल, हें भय उंदरासारखें त्यांचीं आंतडीं आंतल्या आंत कुरतडूं लागलें. त्यामुळें लिहिण्याच्या कामांत त्यांच्या हातून सारख्या चुका होऊं लागल्या. आणि न्यायाधीश गरागरा डोळे फिरवीत मधून मधून त्यांच्याकडे बघूं लागले.

खटल्याच्या चौथ्या दिवशीं कोर्टाचें काम सुरू होऊन अर्धा तास झाला नसेल, तोंच गोहाड आपल्या खुर्चीवरून एकदम उडी मारून उठले आणि "मी पुन्हा करणार नाहीं—पुन्हा करणार नाहीं—" असें न्यायाधीशासमोर हात जोडून ओरडूं लागले.

कोर्टांत विलक्षण खळबळ उडाली. शेवटीं शिपायांनीं गोहाडांना मोठ्या कष्टानें उचलून बाहेर नेलें. सेशन कोर्टांत खुनाच्या खटल्याचें काम चालू असतां शिरस्तेदाराला वेड लागलें, ही बातमी मोठमोठ्या मथळ्यांनीं दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली.

त्याच दिवशीं खटल्याचा निकाल लागला. खुनाचा आरोप मात्र सिद्ध झाला नाहीं. प्राणघातक जखम केल्याचा आरोप फक्त चंद्रीवर शाबीत झाला. चांगुणा निर्दोषी आहे असा हरिणटोपीवाल्याखेरीज बाकीच्या साऱ्या पंचांनीं अभिप्राय दिला.

न्यायाधीशांनीं चंद्रीला तीन वर्षांची शिक्षा सांगितली. आणि चांगुणेला निर्दोषी म्हणून सोडून दिलें. पोलिस जेव्हां चंद्रीला पिंजऱ्यांतून घेऊन जाऊं

लागले, तेव्हां तिच्या कमरेला मिठी मारून चांगुणेनें हंबरडा फोडला.

"मलावी तिच्यासंगं घेऊन चला—मी येकटी कुटं जानार?"

पोलिसांनीं तिला सांगितलें, "अग, तूं निर्दोषी आहेस. तुला हिच्याबरोबर तुरुंगांत नाहीं जातां येणार!"

चांगुणा ओरडली, "ते मला काय बी समजत न्हाई. तिनं माझ्यासाटीं त्याला मारलं. तिला मी न्हाई सोडून जानार. तुरुंगांत मी तिच्या संगं राहीन. अन् तिला सैपाक करून खाऊं घालीन."

शेवटीं पोलिसांना तिला चंद्रीपासून जबरदस्तीनें ओढून काढावें लागलें. चंद्रीचें नांव घेऊन चांगुणा मोठमोठ्यानें रडूं लागली. तिच्या शोकानें कोर्टाचें सारें दालन दणाणून गेलें. शेवटीं हवालदारानें दंडाला धरून तिला बाहेर काढलें. कोर्टाच्या आवारांतल्या एका गुलमोहराच्या झाडाखालीं चांगली संध्याकाळ होईपर्यंत ती गुडघ्यांत मान घालून एकटीच रडत बसली होती.

अंधार पडूं लागला. तशी ती भानावर आली. आणि मान वर उचलून इकडे तिकडे बघूं लागली. इतक्यांत समोरून येणाऱ्या एका माणसाकडे तिची दृष्टि गेली. त्याचा चेहरा तिला ओळखीचा वाटला.

"कोन दाजी? तुम्ही कवां आलां?" तो माणूस जवळ आल्यावर चांगुणा आश्चर्यानें उद्गारली. त्याला पाहून तिचा चेहरा एकदम उजळला. तिची मधली बहीण सुगुणा ह्याच दाजी पवाराला दिली होती.

चांगुणेच्या प्रश्नाला दाजीनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. तो मान खालीं घालून पलीकडे उकिडवा बसला. एक क्षणभर तो कांहीं बोललाच नाहीं.

चांगुणा त्याच्याकडे टकटक बघूं लागली.

"तुझी आई लई आजारी हाये!" थोड्या वेळानें दाजीच्या तोंडून एकेक शब्द बाहेर पडला.

चांगुणेच्या काळजांत धस्स झालें.

"तुझी सई करतेय सारखी—" दाजी थबकत थबकत पुढें म्हणाला, "म्हनती, चांगीला घेऊन या. तर मी सुखानं मरन! म्हून आलों. डोळ्यांत अक्षी परान आनून तुझी वाट पबती या ती!"

चांगुणेच्या पोटांत एकदम गलबलून आलें. शेवटीं आईला आपली आठवण झाली तर! आपल्या आईनें भाकरींत कांचा घातल्या, घरांतून मारून हाकून दिलें, हें ती पार विसरून गेली. कधीं पुन्हा आईला जाऊन भेटेन—कधीं

तिच्या गळयाला कडकडून मिठी मारीन, अन् कधीं तिच्या कुशींत तोंड खुपसून पोटभर रडेन असें तिला झालें.

तटकन् ती उठली. म्हणाली, "चला!"

तसा दाजी उठला अन् चालूं लागला. नानाच्या पेठेंत दाजीची एक चुलत बहीण दिली होती. तिच्या घरीं तीं गेलीं. बहिणीचें एक जुनें लुगडें अन् चोळी दाजीनें चांगुणेला दिली. ती चांगुणा नेसली. रात्रभर तीं तिथेंच राहिलीं.

दुसऱ्या दिवशीं सासवडला जाणारी बैलाची गाडी त्यांना मिळाली. त्यामुळें त्यांची अनायासेंच सोय झाली. उन्हें पडल्यावर तीं निघालीं. दाजीच्या बहिणीनें भाकर अन् बेसन बरोबर दिलें होतें. तें त्यांनीं वाटेंत हडपसरला गाडीतळावर खाल्लें. संध्याकाळच्या सुमारास तीं सासवडला पोहोंचलीं.

दाजी तिथेंच उतरला. चांगुणेला म्हणाला, "मी इथंच उतरतों. तूं पुढें जा. गाडीवाला आपल्या वळखीचाच हाये. मी असाच भिवडीला जातों. अन् उद्यां सगुणेला घेऊनशान चांबळीला येतों."

चांगुणा चांबळीला पोहोंचली, तेव्हां दिवेलागण होऊन गेली होती. गांव सोडून तिला एकच वर्ष झालें होतें. पण तिला असें वाटत होतें कीं, किती वर्षांनीं आपण आपल्या गांवीं येतों आहोंत.

आपल्या घराचें कुडूं बघून तर तिचें ऊर भरून आलें. गाडींतून ती खालीं उतरली. उंबरा ओलांडतांना तिचें काळीज धडधड करूं लागलें. आईचें आतां कसें असेल कोणास ठाऊक?

पडवींत दिवा नव्हता. माजघरांतही अंधारच होता. सैपाकघरांतला उजेड बघून पाय न वाजवतां ती दाराजवळ गेली. आणि हळूच आंत डोकावून बघूं लागली. चुलीजवळ आई शांतपणें भाकरी थापत बसली होती.

म्हणजे, हें काय? आई अतिशय आजारी होती ना? मग दाजीनें असें कसें सांगितलें? ती तर चांगली आहे. आई आजारी नाहीं हें बघून तिच्या काळजावरचें एक मोठें ओझें दूर झालें. समाधानाचा तिनें सुस्कारा सोडला. अन् ती आंत धावली.

"आय ग, मी आल्यें!"

राहीनें दचकून एकदम वर पाहिलें—चांगुणा? चांगी? बुबुळें ताठ करून ती चांगुणेकडे पाहातच राहिली. चांगुणेनें तिच्या गळयाला जाऊन घट्ट मिठी मारली. राहीच्या डोळयांतून पाणी वाहूं लागलें. तिला काय बोलावें हेंच मुळीं कळेना.

"चांगे, पोरी—" चांगुणेचें तोंड दोन्ही हातांत धरून राही स्फुंदत म्हणाली, "कशाला मराया तूं इथं आलीस? तुझ्या बापानं पघितलं तुला, म्हंजी त्यो तुझीं खांडोळी करील! त्ये यायच्या अदुगर जा पळून इथून!"

चांगुणा संथपणें म्हणाली, "मला न्हाई मरायचं भ्या वाटत. नवऱ्याच्या हातून मी न्हाई मेलें. तुझ्या हातून बी न्हाई मेलें. आतां दादाच्या हातून तरी मला मरूं दे! म्हंजी मी सुटंन अन् तुमी बी सारीं सुटाल!"

चांगुणेला हृदयाशीं धरून राही ढसढसा रडूं लागली. "इतकी गुनाची व्हतीस तूं, अन् इकती वंगाळ कशी ग झालीस पोरी! त्या चंद्रीच्या नादाला लागून तूं बी पुन्यांत दुकान घातलंस. अन् समद्या जगांतनं आपल्या घराचं नांव उठवलंस!"

आईचे ते शब्द शिशाच्या रसासारखे चांगुणेच्या कानांत शिरले. तिनें एकदम तिचे पाय धरले. आणि ती गदगदून म्हणाली, "मीं न्हाई ग दुकान घातलं आई! तुझ्या गळ्याची शपथ? ज्ञानेश्वराच्या पिंडीची शपथ!"

चांगुणेच्या डोळ्यांतल्या पाण्यांत राहीला तिच्या हृदयाचें प्रतिबिंब अगदीं स्वच्छ दिसलें. चांगुणा बिघडली नाहीं—चांगुणा चांगली आहे, ह्याबद्दल तिची मनोमन खात्री झाली. आणि म्हणून चांगुणेबद्दल तिला जास्त भय वाटूं लागलें.

आई आजारी आहे असें सांगून सगुणेच्या नवऱ्यानें आपल्याला पुण्याहून इथें आणलें, हें जेव्हां चांगुणेनें थोड्या वेळानें तिला सांगितलें, तेव्हां तर राहीच्या काळजांत धस्स झालें. ह्यांत कांहीं तरी काळेंबेरें आहे हें तिनें ताबडतोब ओळखलें.

सकाळपासून राघू कुदळ घेऊन परड्यांत कांहीं तरी खांडीत बसला होता. अजूनही तो परत आला नव्हता. इतका वेळ तो शेतांत काय खांडतो आहे, ह्याची राहीला आतां शंका येऊं लागली.

राघू आला तेव्हां चांगुणा मान खालीं घालून भाकर खात होती. राहीच्या पोटांत गोळा उठला. राघू आतां काय करतो कुणास ठाऊक. पण राघू अगदीं शांत होता. त्यानें चांगुणेकडे नुसतें पाहिलें. तो कांहीं बोलला नाहीं. त्यानें हातपाय धुतले. अन् धोतरानें तोंड पुशीत तो बायकोला म्हणाला, "मला भूक न्हाई. मी जरा बाहेर जातों. रात व्हईल. तूं पडवीमंदीच झोप."

पुन्हा एकदां राघूनें चांगुणेकडे पाहिलें. आणि तो निघून गेला.

तिन्‍चांगुणेच्या खटल्याची बातमी पुण्याहून आल्यापासून राघू घराच्या बाहेर कधीं पडत नसे. चांगुणेची आठवण झाली कीं त्याच्या अंगाचा संतापानें भडका होई. तिचें नांव कुणीं काढलें कीं तो वाघासारखा चवताळून उठे. तोच आपला नवरा चांगुणेला प्रत्यक्ष डोळ्यांनीं बघूनही थंड राहिला, भडकला नाहीं, तिच्या अंगावर धावून गेला नाहीं, हें बघून राही अतिशय अस्वस्थ झाली.

तिच्या तोंडचें पाणी पळालें. राघूच्या डोक्यांत काय चाललें असावें ह्याचा ती विचार करूं लागली. आई आपल्याशीं एकसारखी कां बोलत नाहीं? मधून मधून ती आवंढे कां ळते? आणि असा चमत्कारिक चेहरा कां करते? ह्याचा चांगुणेला अचंबा वाटून राहिला.

राहीला भाकर कांहीं गिळवेना. दोन घास खाऊन ती उठली. दिवसभर उन्हांतल्या प्रवासानें चांगुणा अगदीं गळून गेली होती. ती माजघरांत आपल्या नेहमींच्या ठिकाणीं जाऊन पडली. राही आपली गोधडी घेऊन बाहेर पडवींत गेली. पण थोड्या वेळानें ती माजघरांत परत आली, आणि चांगुणेला तिनें उठवलें. चांगुणेचा जरा कुठें डोळा लागत होता.

"चांगे, तूं बाहेर पडवींत झोंप येऊन माझ्याजवळ."

आईच्या जवळ आपल्याला निजायला मिळतें, ह्या कल्पनेनें चांगुणेला फार आनंद झाला.

तारवटलेल्या डोळ्यांनीं ती बाहेर आली. आणि आईच्या गोधडींत शिरली. थोड्या वेळानें ती गाढ झोपली. राही जागीच होती.

बाहेरचें दार लोटून राघू जेव्हां हळूच आंत आला, तेव्हां रात्रीचे दोन वाजून गेले होते. अवसेची रात्र होती ती. चहूंकडे अंधार गुडुप होता. घरांत अगदीं सामसूम होतें. पाय न वाजवतां राघू पडवींत आला. गोधडी अंगावर घेऊन आपली बायको गाढ झोपीं गेली आहे, हें त्यानें पाहिलें. तसा तो गोठ्यांत गेला आणि पहार घेऊन परत आला. इकडे तिकडे त्यानें पाहिलें. अन् चटकन् तो माजघरांत शिरला.

थोड्या वेळानें माजघराच्या अंधारांतून एवढ्या तारस्वरानें एक किंकाळी उठली, कीं सारें घर हादरून गेलें. एवढेंच नव्हे तर ती किंकाळी त्या घराच्या भिंतीमधून आरपार बाहेर पडून रस्त्याच्या पलीकडे राहणाऱ्या दोनचार घरांमध्येंही घुसल्यावांचून राहिली नाहीं.

अंगावरची गोधडी फेकून देऊन चांगुणा ताडकन् उठली. आणि पडवींतून बाहेर अंगणांत पळाली. ती किंकाळी तिचें काळीज करवतीप्रमाणें कापीत गेली. आणि तिच्या सर्वांगाचा थरकांप उडाला. काय करावें अन् कुठें पळावें हेंच तिला मुळीं कळेना.

इतक्यांत रस्त्यावरून माणसांचा आवाज आला. पावलें वाजलीं. आणि उजेड दिसला.

तशी अंगणाच्या कडेला असलेल्या कमरेएवढ्या उंच भिंतीवर चढून चांगुणेनें पटकन् पलीकडच्या बखळींत उडी मारली. आणि तशीच खालीं ती अंधारांत बसून राहिली.

समोरच्या घरांतलीं चारपांच माणसें हातांत कंदील घेऊन घाईघाईनें राघूच्या घरांत घुसलीं. दाराला आंतून कडी नव्हती.

"राघूदा—राघूदा—" सीताराम कटक्यानें अंगणांतूनच हाक मारली. पण आंतून कांहीं उत्तरच आलें नाहीं. तशीं तीं माणसें पडवींतून माजघरांत शिरलीं.

कंदिलाच्या उजेडांत माजघरांतलें दृश्य बघून तर सारेजण मटकन् खालींच बसले. त्यांच्या डोळयांच्या कवड्या झाल्या. रक्ताच्या थारोळयांत राहीचें प्रेत पडलें होतें. नडघीभोवतीं हात आवळून अन् गुडघ्यावर डोकें टेकून राघू स्वस्थ बसला होता. त्याचे कपडे रक्तानें भरून गेले होते. आणि त्याच्या उजव्या बाजूला एक पहार पडलेली होती.

सीताराम कटके तर रडूं लागला. त्याच्या बायकोवर राहीचा लई जीव होता.

"राघूदा, काय केलंत हें?" महादू शेंडकर तळमळून म्हणाला.

राघूनें कपाळावर हात मारून घेतला.

"पोरीला मारायला गेलों, अन् बायको मारून बसलों हो!"

दहापंधरा मिनिटें कोणीच कांहीं बोललें नाहीं. सारे माना खालीं घालून तसेच आपले स्वस्थ बसले. बोलायचं तरी काय?

शेवटीं विठोबा कामटे म्हणाले—ते राघूचे चुलत चुलते होते. वयानेंही ते वृद्ध होते.

"आतां पुढं काय करायचं राघूदा?"

गुडघ्यावरून मान न उचलतां राघू शांतपणें म्हणाला, "पाटलाला वर्दी देऊन या."

विठोबांनीं सितारामाला डोळ्यांनीं खुणावलें. त्यानें मानेनें नाहीं सांगितलें. तेव्हां महादू शेंडकर म्हणाला, "मी जातों."

अर्ध्या-पाऊण तासाच्या आंत पोलिसपाटील, पंच, महार—ही सर्व मंडळी आली. त्यांच्याबरोबर इतर दहापंधरा माणसेंही आलीं.

पडवी अन् अंगण भरून गेलें. आपल्या घरांत कांहीं तरी भयंकर प्रकार घडलेला आहे, एवढें चांगुणेला आधींपासून कळून चुकलें होतें. पण अंगणांतल्या लोकांची बडबड जशी सुरू झाली, तसा आपल्या बापानें आपल्या आईचा खून केला ही गोष्ट तिला समजली.

रडतां रडतां तिची पुरेवाट झाली. आपल्याला जन्म देणारी आपली लाडकी आई मेली. आणि आपण इतकें तिच्याजवळ असून तिच्यासाठीं धाय मोकलून मोठ्यानें आपल्याला रडतां येत नाहीं, ह्याचें चांगुणेला सर्वांत जास्त दुःख झालें.

अंगणांतल्या लोकांचा शब्दन् शब्द तिला ऐकूं येत होता. त्यावरून आपलाच खून करण्याचा आपल्या बापाचा विचार होता, पण चुकून त्यानें आपल्या आईला ठार मारलें, हें तिला समजलें.

तेव्हां आईनें आपल्याला बाहेर पडवींत आणून कां निजविलें ह्याचा आपोआप तिला उलगडा झाला. आपल्याला झोप लागल्यानंतर आपल्या शेजारून उठून ती माजघरांत आपल्या अंथरुणावर जाऊन झोपली असली पाहिजे हें तिच्या लक्ष्यांत आलें.

केवळ आपले प्राण वांचविण्यासाठीं आईनें स्वतःच्या प्राणांचा बळी दिला हें जेव्हां तिला उमगलें, तेव्हां आपल्या बापानें आईचा खून केला नसून, तो आपणच केला आहे, अशी तिची खात्री झाली.

कशाला आपण जन्माला आलों? कशाला आत्तांपर्यंत जगलों? त्यापेक्षां शेजारच्या दगडावर डोकें आपटून ह्याच क्षणीं आपण प्राण देऊन कां टाकूं नये असें तिला वाटलें.

पाटलानें प्रेताचा ताबा घेतला. राघूला अटक करून बाहेर पडवींत आणून बसविलें. आणि फौजदाराला बोलावून आणण्यासाठीं त्यानें महाराला सासवडला धाडलें.

रात्र जशी निवळायला लागली, तशी चांगुणा घाबरली. लोकांनीं आपल्याला पाहिलें तर? पलीकडे एक गोंधनीचें मोठें झाड होतें. क्षणाचाही विचार न करतां त्याच्यावर ती चढली. अन् उंच फांद्याच्या एका बेचक्यांत जाऊन

बसली. झाडांच्या हिरव्या दाट पानांमध्यें ती झाकून गेल्यामुळें रस्त्यावर आणि अंगणांत काय चाललें आहे हें तिला तेथून नीट दिसत होतें, पण खालून मात्र ती मुळींच दिसत नव्हती.

सकाळीं उन्हें पडायच्या सुमारास फौजदार पांचसहा पोलीस घेऊन सासवड-हून आले. बाहेर रस्त्यावर लोकांची गर्दी जमूं लागली. फौजदारानें प्रेताची पाहणी करून रीतसर पंचनामा केला. आणि मग जाळण्यासाठीं तें नातेवाइकांच्या ताब्यांत दिलें.



राघूच्या हातांत बेड्या ठोकून पोलिस जेव्हां त्याला अंगणांतून घेऊन जाऊं लागले, तेव्हां चांगुणेला भडभडून आलें. तिनें आपले डोळे झाकून घेतले.

फौजदार अन् पोलीस निघून गेले. प्रेताच्या बांधाबांधीचें सामान हळूहळू अंगणांत येऊं लागलें.

एवढ्यांत कोडिताहून पर्वती बडवे अन् भिवडीहून दाजी पवार आपापल्या बायकांना घेऊन आले. गोजा अन् सगुणा गुरासारख्या ओरडत अंगणांतून आंत धावल्या. त्या वेळीं गळा काढून मोठ्यानें रडावें असें चांगुणेला वाटलें. आपल्या लुगड्याच्या पदराचा बोळा घट्ट तोंडांत धरून ती आंतल्या आंत स्फुंदूं लागली.

ताटीवर बांधण्यासाठीं जेव्हां आईचें प्रेत आंतून बाहेर आणलें, तेव्हां तिचें रक्तबंबाळ आणि छिन्नविछिन्न झालेलें तोंड चांगुणेच्या दृष्टीस पडलें. तें बघून तिला एकदम झीटच आली. झाडाची फांदी दोन्ही हातांनीं तिनें आवळून धरली होती म्हणून. नाहीं तर तोल जाऊन ती त्याच वेळीं खालीं पडायची. थोड्या वेळानें ती भानावर आली. पण पुन्हा तिनें खालीं अंगणांत म्हणून बघितलेंच नाहीं. झाडाच्या फांदीवर मान ठेवून ती आपली स्वस्थ पडून राहिली.

गोजानें न् सगुणेनें पुन्हा मोठ्यानें हंबरडा फोडला, तेव्हां आईचें प्रेत अंगणामधून बाहेर चाललें आहे हें तिच्या ध्यानांत आलें. तिनें मान वर उचलली आणि डबडबलेल्या डोळ्यांनीं आपल्या आईला शेवटचा नमस्कार केला.

आजूबाजूची गर्दी ओसरली. गडबड थांबली. रडारड कमी झाली. एकदम सगळीकडे सुनेंसुनें झालें. उन्हेंही हळूहळू उतरूं लागलीं. सावल्या वाढूं लागल्या. फांदीवर मान ठेवून शून्य मनानें चांगुणा खालीं बघत होती.

झाडाच्या तळाशीं एक करड्या रंगाचा साप अर्धवट विळखा घालून पडला होता. मधून मधून तो तोंड वर करून झाडावर चढण्याचा प्रयत्न करीत होता. चांगुणा त्याच्याकडे किती वेळ तरी पाहात होती. तिला त्याचें भय वाटलें नाहीं. उलट त्याच्या अंगावरची नकशी तिला फार आवडली.

तो वर आला न् आपल्याला डसला तर किती छान होईल, असा विचार तिच्या मनांत आला. मग आईची न् आपली आजच रात्रीं भेट होईल. अन् काल रात्रीं आपण दोघी जशा एका गोधडींत निजलों, तसें आजही रात्रीं आपल्याला एका गोधडींत, एकमेकींच्या गळ्याला मिठी मारून निजतां येईल. नाहीं?—पण साप कसला? तो थोड्या वेळानें कंटाळून आपल्या बिळांत निघून गेला.

दिवेलागण झाली, तशी चांगुणा झाडावरून खालीं उतरली. पहाटेपासून तों

संध्याकाळपर्यंत पंधरा तास ती झाडाच्या फांदीवर बसून होती. तिचे हातपाय आखडून गेले होते. साऱ्या अंगाला मुंग्या आल्या होत्या. पाठीच्या कण्यांतला मणकान् मणका ठणकत होता. दिवसभर पोटांत अन्नाचा एक कण गेला नव्हता, कीं तोंडांत पाण्याचा एक थेंब पडला नव्हता. पायाला जमीन लागतांच तिथेंच ती मटकन् बसली. अन् आडवी झाली. हातपाय हालवण्याची तिच्या अंगांत शक्तीच उरली नव्हती.

सबंध चांबळी गांव अंधारांत मरून पडलें आहे असें तिला वाटलें. झाडें मेलीं आहेत. भिंती मेल्या आहेत. घरें मेलीं आहेत. नदी मेली आहे. बाणेश्वराचें देऊळ—तिच्या काळजांत धस्स झालें. अन् कान एकदम जिवंत झाले.

देवळांतली घंटा कां घणघणत नाहीं ? नगारा कां वाजत नाहीं ? का घंटा मेली ? नगाराही मेला ? अन् शंकर ?

ती तटकन् उठून बसली. शंकर आजारी तर नसेल ? आपली आई मेली. बापाला पोलिसांनीं नेलें. शंकरशिवाय जगांत आपल्या जिव्हाळ्याचें आतां कोण आहे ? पण आज शंकर देवळांत कां गेला नाहीं ? मग घरींच तो असेल ! म्हणूनच बाणेश्वराची घंटा आज वाजली नाहीं.

तशीच ती उठली. आणि हळुहळू चालूं लागली. वखळींतून रस्त्यावर आली. रस्त्यांत चिटपांखरूंही नव्हतें. आणि अंधारांत आतां ओळखणार कोण तिला ? पावलें झपझप चालूं लागलीं. तिला आश्चर्य वाटलें—शंकर कुठें राहतो हें तिला आठवेना. पण पावलांना त्याचें घर माहीत होतें. त्यांनीं तिला शंकरच्या उंबऱ्यांत आणून सोडलें. आणि हातांनीं दारही पण ढकललें.

आंत दिवा मिणमिणत होता. अन् त्याच्या उजेडांत एक अनोळखी मुलगी पत्रावळी टाचीत बसली होती. शंकरची ती बायको होती, हें चांगुणेच्या डोळ्यांनीं चटदिशीं ओळखलें. कोपऱ्यांत एका रकट्यावर शंकरचा बाप उताणा पडला होता. चांगुणेच्या डोळ्यांनीं भरकन् सारी खोली धुंडाळली. पण त्यांना शंकर तिथें कुठें दिसला नाहीं.

"शंकर कुठंय ?" चांगुणेच्या जिभेनें विचारलें.

पण त्या मुलीनें 'ऊं–ऊं–ऊं' करून मान जोराजोरानें हालवली. शंकरच्या बापाचें लाळेनें भरलेलें तोंड 'व्या–व्या' करूं लागलें. चांगुणेला कांहीं उमजेना. कांहीं समजेना. तिचीं पावलें तशींच मुकाट्यानें मागें वळलीं.

तिच्या डोळ्यांपुढें अंधारी आली. बाहेर किट्ट काळोख होता. रस्त्यांतले खडे तिच्या पायांना खुपत होते. पण डोळ्यांना कांहीं दिसत नव्हतें. आपण चाललों आहोंत का रस्ता आपल्या पायांखालून सरकतो आहे, हेंहीं तिला समजत नव्हतें.

एकाद्या घागरींत पाणी शिरावें तसा आपल्या सार्‍या अंगामधून काळोख शिरतो आहे अन् आंतून काळोख भरतो आहे असें तिला वाटूं लागलें. डोक्यांतल्या मुंग्या पायांत उतरताहेत असा तिला भास झाला. पोटांतलीं आंतडीं आपल्या जिभेला हळूहळू आंत ओढत आहेत अशी तिला जाणीव होऊं लागली.

उजव्या बाजूकडून उजेडाचें एक लहानसें किरण येतें आहे असें तिला दिसलें. त्याबरोबर तिचे पाय थांबले. तें किरण पकडण्यासाठीं तिचे व्याकुळ हात पुढें झाले.

पण त्याच क्षणीं तिच्या पायाखालची जमीन एकदम गरगर फिरायला लागली. आणि काळोखाच्या खोलखोल बिळांतून आपलें शरीर उलटेंपालटें होऊन खालीं कुठें तरी कोसळतें आहे एवढें एकच स्मरण तिला राहिलें.

● ● ●

# .१३.



तिसऱ्या दिवशीं सकाळीं चांगुणेनें डोळे उघडले.

बाहेर अंधुक उजेड दिसत होता. एका फाटक्या लुगड्यावर ती पडली होती. तिच्या शेजारीं एक म्हातारी बसली होती, आणि भाकरीचा एकेक तुकडा तिच्या तोंडांत घालीत होती. चांगुणा हळूहळू चावत होती.

भाकरी संपली. म्हातारीनें नरोटीमधून तिच्या तोंडांत पाणी सोडलें. चांगुणा

गटगट तें प्याली. तिला थोडें बरें वाटलें. तिनें आणखीन् डोळे उघडले. आणि म्हातारीच्या तोंडाकडे पाहिलें. म्हातारी तिच्याकडे पाहून हसली. तशी चांगुणाही थोडीशी हसली.

इतक्यांत लंगोटी नेसलेला एक हाडकुळा म्हातारा ठेंगण्या दारांतून वाकून आंत आला. चांगुणा टकटक त्याच्याकडे बघूं लागली. चांगुणेनें डोळे उघडलेले पाहतांच म्हाताऱ्यानें मोठा सुस्कारा टाकला. आणि तिच्या पायाजवळ बसत तो म्हणाला, "मरिआईची किरपा म्हून वाचलीस ग तूं पोरी. उदंड औक्ष हाय तुला."

चांगुणा कांहीं बोलली नाहीं. तिनें डोळे मिटले. तिच्या डोक्यांत अजून झिणझिण्या उठत होत्या. आपण कुठें आहोंत, कुणाच्या घरांत आहोंत, हा म्हातारा न् ही म्हातारी कोण, ह्याचा कांहीं तिला उमज होत नव्हता.

चांगुणेनें पुन्हा डोळे उघडले. म्हातारा वाकून तिच्या चेहऱ्याकडे बघत होता.

"बरं वाटतंय ना?" म्हाताऱ्यानें मान हलवीत हळूच विचारलें.

चांगुणा बोलली नाहीं. ती त्याच्याकडे नुसती बघत राहिली.

"मला वळखलं न्हाईस तूं पोरी!" म्हातारा हसून म्हणाला, "अग, मी धुऱ्या महार, इथलाच चांबळीचा. तुमचा त्यो राख्या बैल म्येला. त्याला म्यांच न्हाई का वोढला? तवा तूं ल्हान व्हतीस!"

चांगुणेला थोडें थोडें आठवलें. राख्या बैल मेला तेव्हां ती न् सगुणा खूप रडल्या होत्या. कित्ती वरसें झालीं त्याला?

"हितं कुनी आनलं मला?" चांगुणा निर्जीव स्वरांत विव्हळली.

"आनलं कुनी?" कानावरचे हात खालीं फेकीत धुऱ्या म्हणाला, "त्वांच न्हाई का त्या रातीं आमच्या खोपटाच्या दारामंदी येऊन पलडीस? म्हातारी म्हंगाली, काय·व पलडं? मी म्हंगालों, कुटं काय? तवा म्हातारी उठली न् भायेर गेली. तिच्या पायाला तुझं डोकसं लागलं, तशी ती वराडली! मंग मी धावलों. पघतों तों लांकडावानी त्वां पलडी व्हतीस! म्हातारी घाबरली. मी बी घाबरलों. म्हंगालों, कुनी मारून बिरून त न्हाई टाकलं पोरीला आपल्या दारामंदी? म्हातारीनं चाचपून पधितलं. म्हंगाली, धुगधुगी हाये. तसं दोघांनीं उचलून तुला खोपटांत आनलं. दोन राती अनी एक दिस झाला. म्हातारी हित्त तुझ्या डोकशापाशीं बसून हाये. तिनं भाकरबी न्हाई खाल्ली. अन् ती पानीबी न्हाई प्याली. म्हंगाली पोरगी डोळं उघडंल तवा खाईन!"

चांगुणेचे डोळे भरून आले. ती म्हातारीकडे बघूं लागली. पांढऱ्या झिंज्या अन् पिंगट सुरकुत्या ह्यांच्यामधून दोन ठिणग्या लखलखतांना तिला दिसल्या.

दोनचार दिवसांनीं चांगुणा चांगली उठून बसूं लागली. बोलूं लागली. बारकें सारकें काम करूं लागली. पुष्कळ हुषारी वाटूं लागली तिला. म्हातारीचा तिला फार लळा लागला.

एक दिवस तिनें बसल्या बसल्या म्हातारीच्या झिंज्या उकलल्या. त्यांतला केस न् केस नखांनीं विंचरून काढला. आणि मागें त्यांची गांठ बांधली. तर एक दिवस ऊन पाण्यानें म्हातारीला तिनें न्हाऊं घातलें. तिचें अंग न् अंग चोळून काढलें. किती वरसांत म्हातारीच्या अंगाला पाणी लागलें नव्हतें. तिला असें हलकें हलकें वाटूं लागलें त्या दिवशीं. ती चांगुणेकडे बघून सारखी हसत होती.

दिवसभर धुऱ्या बलुत्याच्या कामाला बाहेर जाई. म्हातारी शेणकाटक्या गोळा करीत गांवाभोवतीं फिरे. चांगुणा खोपटांत एकटीच बसे. खोपटाला कुडाच्या भिंती होत्या. त्यांना जागजागीं भोकशीं पडलीं होतीं. तीं चांगुणेनें चिखलानें सारीं लिंपून काढलीं. जाड शेणानें खालची जमीन सारवली. कोपऱ्यांत चारदोन बिळें होतीं. तीं बुजवलीं. हाडकें, खापरें न् चिंध्या ह्यांचा खोपटांत उकिरडा माजला होता. तो सगळा उंपसून तिनें बाहेर फेकून दिला. आठदहा दिवसांत तें खोपटें तिनें अगदीं आरशासारखें लख्ख करून टाकलें.

डोळ्यांत पाणी आणून धुऱ्या रोज म्हणायचा, "लकशुमी हायेस ग पोरी तूं. माझं महाराचं घर तूं सोन्याचं केलंस. आतां गेलीस हितून म्हंजी कशाला पाय लागायचंत तुजं फुना?"

एक दिवस चांगुणा कळवळून म्हणाली, "मला न्हाई जायचं हितून. मपली हितंच राहतें. मला आय न्हाई. बाप गेला. तुमच्याबिगर मला कोन हाये? तुम्हीच माझं आयबाप!"

सुस्कारा टाकून धुऱ्या म्हणाला, "तसं कसं व्हईल पोरी? आमी महार. तूं मराठ्याची. तुला कोन राहून दील हितं? तुझं जातवालं फाडून खात्याल मला."

"मंग मला कराना महार." धुऱ्याच्या गुडघ्यावर हात ठेवून दीनवाण्या स्वरानें चांगुणेनें त्याला विचारलें.

खिन्न तोंड करून धुन्या हसला. "त्ये का मानसाचं काम हाये? देवाचं काम हाय त्ये. महार, मराट, बामन हे समदं त्यो करतो."

त्यावर चांगुणा काय उत्तर देणार? धुन्याच्या खोपटांत आपल्याला फार दिवस राहतां यायचें नाहीं ह्या विचारानें तिचें डोकें सुंद होई. तिला कांहीं सुचत नसे.

इथें राहायचें नाहीं तर मग इथून कुठें जायचें? कुठें? हो, कुठें?

तिच्या डोळयांपुढें अंधार दिसूं लागे. पुढें तिचें डोकें चालत नसे.

धुन्या महाराच्या खोपटापासून चार घरें पलीकडे हमज्या नालबंदाचें मकाण होतें. गांवांत तेवढेंच एक मुसलमानाचें घर. बैलांना नालपत्र्या मारायचें काम हमज्या करी. गांवाबाहेर एक पडकी मशीद होती. त्याचा मुलाणीपणाही पण तोच करी. फावल्या वेळीं त्याची बायको सावण्या अन् रेवड्या करून विकी.

बलुत्याच्या तीन पाचुंदे पेंढ्या एकदां धुन्या घेऊन आला. खोपटाचें छप्पर विस्कटलें होतें. आंत उन्ह येत असे. म्हणून दुपारच्या वेळीं बाहेर कोणी नाहीं असें पाहून चांगुणा छपरावर चढून पेंढ्या पसरूं लागली. तेवढ्यांत हमज्याच्या बायकोनें तिला पाहिलें. ती उन्हांत सावण्या वाळवायला घालीत होती.

दुसरे दिवशीं सकाळीं धुन्या हमज्याच्या घरावरून चालला होता. तितक्यांत हमज्यानें त्याला हटकलें.

"धुन्या, लेका इकडं ये रे. ही बाई कुठली आणलीस आपल्या घरांत?"

धुन्याच्या छातींत धसकाच बसला. तो गांगरून हमज्याकडे पाहात राहिला.

"म-माझ्या भ-भनीची ल्येक हाय ती." धुन्या चाचरत म्हणाला. त्याच्या अंगाला घाम सुटला.

हमज्या मोठमोठ्यानें हसूं लागला.

"महाराच्या बहिणीला मराठ्याची लेक कधींपासून होऊं लागली रे?"

धुन्याची बोबडीच वळली. हमज्याला आतां काय उत्तर द्यावें हें त्याला कळेना.

"थांब, उद्यां पाटलालाच सांगतों. अन् तुझ्या मुसक्या बांधतों. हे धंदे करायला लागलाय होय आतां?" हमज्यानें धुन्याला शेवटचा दम भरला.

मान खालीं घालून धुन्या पुढें चालूं लागला. त्याच्या तोंडचें पाणीच पळालें. हमज्या म्हणाल्याप्रमाणें पाटलाला सांगायला कधीं कमी करायचा

नाहीं, ह्याची धुऱ्याला अगदीं खात्री होती. तसें झालें म्हणजे गांवांतलें आपलें बलुतेंही जायचें अन् पोरगीही बिचारी जातीबाहेर पडायची.

काय वाटेल तें करून पोरीला रातोरात कुठें तरी घेऊन जायला पाहिजे. पण कुठें नेणार? धुऱ्याचा मुलगा चोखू हा पुण्याच्या मालधक्क्यावर नोकरीला होता. पोरीला नेऊन ठेवायला तेवढीच एक जागा धुऱ्याच्या डोळ्यांसमोर दिसत होती. पण इतक्या लांब जायचें कसें? धुऱ्याच्या जवळ तर एक दमडी नव्हती.

खळ्यावरून दाणे गोळा करूण धुऱ्या दुपारचाच परत आला. सकाळीं हमज्या नालबंद काय बोलला तें त्यानें आपल्या बायकोला आणि चांगुणेला सांगितलें. चांगुणेचें तोंड खर्रकन् उतरलें. इतकी सुखानें राहात होती ती त्या खोपटांत. कुणाच्या अध्यांत नाहीं कीं मध्यांत नाहीं. कसा पंधरवडा गेला हें कळलंसुद्धां नाहीं. हमज्याचें काय तिनें घोडें मारलें होतें?

म्हातारीनेंही आपल्या नवऱ्याला तोच सल्ला दिला. "तुम्ही रातोरात पुन्याला घेऊन जा हिला चोखूकडं."

"माझ्या बी मनांत त्येच हाय!" धुऱ्या मान हलवून म्हणाला.

पुण्याला परत जायचें ह्या विचारानें चांगुणेच्या अंगावर कांटा उभा राहिला. पुण्याचें तिला भय वाटत होतें. पण ती कांहीं बोलली नाहीं. गपचिप पडली.

संध्याकाळपर्यंत म्हातारीनें दोन मडकीं दाणे दळून काढले. आणि ती भाकऱ्या करायला बसली. चांगल्या सातआठ भाकऱ्या तिनें भाजल्या.

चांगुणेनें विचारलें, "इकल्या कशाला?"

"पुन्याला जायाचं. किती दिस लागत्याल काय सांगावं?" म्हातारी म्हणाली.

"तीन दिस लागत्याल?" पडल्या पडल्या धुऱ्या म्हणाला.

"पन बैलगाडीनं एकच दिस लागतो." चांगुणेनें सांगितलें.

"महाराला कुठली आली बैलगाडी?" धुऱ्या कळवळून बोलला.

"म्हंजी, पायांनीं जायाचं पुन्याला?" चांगुणा आश्चर्यानें धुऱ्याकडे बघूं लागली.

"मंग काय तर?" भुंवया वर ताणीत धुऱ्या म्हणाला.

"महाराला कां न्हाई बैलगाडी?" चांगुणेच्या मनांत कांहीं तरी एकदम खटकलें.

धुऱ्या कांहीं बोललाच नाहीं. त्यानें एक सुस्कारा टाकला. आणि व्याकुळ

स्वरांत तो म्हणाला, "महाराची बैलगाडी निघाया अजून येळ आहे पोरी!"

लसणाचें दोन मुठी तिखट तेलांत भिजवून म्हातारीनें भाकरीच्या चवडीमध्यें घातलें, अन् गांठोडें बांधलें. दोन भाकरी वर राहिल्या. त्या तिघांनीं खाल्ल्या. धुन्यानें मुंडासें बांधलें. खांद्यावर घोंगडी टाकली. एका हातांत घुंगराची काठी न् दुसऱ्या हातांत भाकरीचें गांठोडें घेतलें.

म्हातारीनें आपल्या कानशिलावर कटकट बोटें मोडलीं आणि चांगुणेच्या डोक्यावर हात ठेवला.

"संभाळून न्या व पोरीला!" दारांतून म्हातारी ओरडली.

बाहेर चांगलाच अंधार पडला होता. चिनचिन्या चिर्र करायला लागल्या होत्या. धुन्यानें बाहेरूनच कुठली तरी एक पायवाट काढली. नेहमींचा रस्ता सोडला. त्याच्या काठीच्या घुंगुरतालावर दोघेंही अंधारांतून हळूहळू चालूं लागलीं.

धुन्या पुढें चालला होता. चांगुणा त्याच्या मागून जात होती. कोणी कोणाशीं बोलत नव्हतें. गांवाची हद्द संपली. शेतें, कुंपणें, झाडें मागें राहिलीं. एका ओसाड माळाचा उंचवटा तीं चढूं लागलीं.

वाऱ्याच्या झुळुका त्यांच्या तोंडांना गुदगुल्या करूं लागल्या. थोड्या वेळानें डाव्या बाजूचें आभाळ एकदम निवळलें. आणि चतकोर चांदोबा डोंगराआडून त्यांच्याकडे डोकावून बघूं लागला. त्याबरोबर धुन्या महारानें एकदम ललकारी दिली—

जोहार मायबाप, जोहार
माझं नांव इठू महार!

पंढरीला नदीकांठीं,
उभा आहें वाळवंटीं
हात ठेवोनी मी कटीं
करतों जगाचा कारभार!
जोहार मायबाप जोहार

खातों सव्यांचीं मी उष्टीं
पापं घेतों समदीं पाठीं
काळा दोरा माझ्या कंठीं

तुमच्या पायाची मी पैजार
जोहार मायबाप जोहार

दामाजीचा गडी झालों
नाम्याहातीं दूध प्यालों
भक्तासाठीं उभा राहिलों

समदे संत मला प्यार
जोहार मायबाप जोहार

धुऱ्या म्हातारा होता. पण त्याचा आवाज चांगला खडा होता. आणि त्यांत प्रेमळपणाची आणि भाविकतेची गोडी होती. भावनेच्या जिव्हाळ्यानें प्रत्येक ओळ तो घोळून घोळून अन् आळवून आळवून म्हणत होता.

पुढें पुढें तर त्याचा आवाज इतका चढत गेला कीं त्याचें गाणें संपून गेलें, तरी सारा माळ 'जोहार मायबाप जोहार' हें त्या गाण्याचें पालुपद किती वेळ तरी स्वतःशींच गुणगुणत बसला होता.

चांदोबा तळहाताएवढा आतां झाला होता. अन् डोंगरमाथ्यापासून चांगला अर्धा कासरा वर चढला होता. चांदणें आभाळभर पसरून खालीं पाझरायला लागलें होतें.

दिवेघाटाच्या माथ्यावर पोहोंचायला त्यांना मध्यरात्र झाली. तिथें थोडा वेळ तीं टेकलीं. पाण्याचें एक टाकें आहे तिथें. त्याचें थंडगार पाणी प्यालीं. आणि हळूहळू घाट उतरूं लागलीं.

रस्ता उताराचा होता. अन् चांगलाही होता. म्हणून तासाभरांतच तीं घाटाच्या पायथ्याशीं आलीं. तिथें एक धर्मशाळा आहे. त्या ठिकाणीं त्यांनीं मुक्काम केला.

धुऱ्या म्हणाला, "पोरी, तूं आंतमंदी झोप, मी भायेरच्या अंगाला हितं पडतों. दोन घंटं निजूं. अन् कोंबडरातीं निघूं."

चांदणें आतां टिपूर पडलें होतें. चांदोबा डोक्यावर आला होता. आणि त्याला खळें पडलें होतें.

चांगुणा म्हणाली, "चला कीं बाबा फुडं! कशाला हितं थांबायचं? मी न्हाई दमल्यें!"

"नग!" गंभीर चेहरा करून धुऱ्या म्हणाला, "फुडं बाभळबन हाये. माझ्या बापाला तिथं हडळीनं झपाटलं व्हतं!"

तेव्हां चांगुणा गप्प बसली. अन् धर्मशाळेंत जाऊन पडली. तिला खालीं अंथरायला कांहींच नव्हतें. ती तशी जमिनीवरच झोपली.

धुऱ्यानें तिला हाक मारून उठवलें, तेव्हां चांगलेंच फटफटलें होतें. पहाटेच्या वाऱ्यानें चांगुणेला गाढ झोप लागली होती. पदरानें तोंड पुशीत ती बाहेर आली. आणि धुऱ्याच्या मागून चालूं लागली.

सकाळीं दोन तीन घंटेच चालणें झालें. उन्हाचे चटके वाढूं लागले, तशी चांगुणा गोरीमोरी झाली. अन् म्हाताऱ्याला तिरीमिरी आली.

सबंध दुपार त्यांनीं झाडाच्या सावलींत बसून काढली. उन्हें उतरलीं अन् वारा सुटला तशीं फिरून तीं चालूं लागलीं. हडपसराला पोहोंचली, तेव्हां तिन्हीसांजा झाल्या होत्या. तिथेंच गाडीतळावर त्यांनीं भाकर खाल्ली अन् रात्रीचा मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशीं पुण्याला तीं पोहोंचलीं तेव्हां दिवेलागण झाली होती. ती रात्र त्यांनीं स्टेशनाबाहेरच झोपून काढली.

धुऱ्या म्हणाला, "चोखूचं घर रातचं कुटलं मला गवसायचं?"

सकाळ झाल्यावर विचारीत विचारीत तीं मंगळवारच्या गाडीतळावर जाऊन पोहोंचलीं. तिथें नागझरीच्या कडेला एका पत्र्याच्या खोपटांत चोखू राहात होता.

निळे कपडे घालून चोखू कामालाच निघाला होता.

मराठ्याच्या एका तरण्याताठ्या बाईला घेऊन आपला बाप आपल्या दारासमोर उभा आहे, हें बघून चोखू त्यांच्याकडे टकाटका पाहात राहिला. बापाशीं थोडेंसें बोलून तो तसाच घाईघाईनें निघून गेला.

खोपटांत अंधार होता. चोखूची बायको राधी तान्ह्या पोराला मांडीवर घेऊन तीन वरसाच्या आपल्या मुलीला जेवूं घालीत होती. ती म्हाताऱ्याशीं कांहीं बोललीच नाहीं. चांगुणेकडे तर तिनें बघितलेंही नाहीं.

म्हाताऱ्याला बघून पोरीनें एकदम भोकाडच पसरलें. राधीनें तिच्या पाठींत असा धपाटा मारला कीं जमिनीवर उलथीपालथी होऊन ती गडबडा लोळायलाच लागली. तेव्हां चांगुणा तिला उचलून बाहेर घेऊन गेली.

गांठोड्यांत दोनतीन भाकरी उरल्या होत्या. त्यांतली एक भाकर धुऱ्यानें अन् चांगुणेनें बाहेर बसून खाल्ली. राधीनें त्यांची विचारपूसही केली नाहीं.

संध्याकाळीं कामावरून चोखू परत आला. म्हाताऱ्याचें न् त्याचें पुष्कळ बोलणें झालें. चोखू आपला 'हूं–हूं' करीत विडी फुंकत होता.

धुऱ्या आणि चांगुणा बाहेरच झोपलीं. खोपटांत माशा फार, तर बाहेर डासांचा कहार. रात्रभर डास डसत होते. उभी रात्र म्हातारा खराखरा अंग खाजवीत होता. चांगुणा तर रडकुंडीला आली.

दुसऱ्या दिवसापासून राधीची पोरगी चांगुणेलाच चिकटून बसली. पोरगीच्या साऱ्या अंगाला खरूज झाली होती. आणि केसांत खवडे झाले होते. पण चांगुणेला कधीं तिची किळस वाटली नाहीं. तिला आपल्या दत्ताची सई व्हायची. दत्ता आतां कुठें असेल. किती महिन्यांचा झाला असेल. तो कसा दिसत असेल ह्याच विचाराच्या भ्रमांत ती इरभळ असे.

दोनचार दिवसांनीं धुऱ्या चांबळीला निघून गेला.

पोरगी सांभाळायला लागल्यापासून राधी चांगुणेशीं बोलूं लागली. वेळच्या वेळीं तिला भाकरतुकडा देऊं लागली.

एक दिवस तिनें आपलीं रकटीं नागझरींतून धुवून आणायला चांगुणेला सांगितलें. नागझरीच्या पाण्यानें चांगुणेच्या हातापायाला तीन दिवस खाज सुटली होती.

दोनचार दिवसांनीं राधी चांगुणेला म्हणाली, "बाई, आतां किती दिस घरामंदी तूं अशी बसून रहनार? कुठं कामबीम बघ!"

चांगुणा म्हणाली, "कुटं बघूं?"

पलीकडच्या खोपटांतल्या बाईची वीस-बावीस वर्षांची एक मुलगी विड्यांच्या कारखान्यामध्यें कामाला होती.

राधीनें तिला विचारलें, "यह्ले, तुझ्या कारखान्यांत मिळेल का ग काम हिला?"

यह्ली चांगुणेला म्हणाली, "चल माझ्यासंगं. इच्यारूं छोट्या शेटला."

नानाच्या पेठेंत गफूरशेटचा विड्यांचा कारखाना होता. पंधरावीस बाया तिथें कामाला होत्या. गफूरशेट कारखान्यांत कधीं येत नसत. त्यांचा थोरला मुलगा कादरच सगळें कामकाज पाही. कादरची उमर पंचवीस-सव्वीस वर्षांची होती.

पण त्याची वागणूक मोठी अदबशीर होती. कारखान्यांतल्या नोकरांशीं तो हसून खेळून वागे. त्याला सारे नोकर 'छोटे शेट' म्हणत.

यल्लीनें चांगुणेला नेऊन छोट्या शेटच्या समोर उभें केलें. कादर तिच्याकडे पाहातच राहिला. त्याच्या कारखान्यांत काम करणाऱ्या बायकांपेक्षां ती अगदीं निराळी दिसत होती. खालीं मान घालून अशा गपचिप त्या कधींच उभ्या राहिल्या नसत्या.

कादरनें क्षणभर विचार केला. आणि तो यल्लीला म्हणाला, "जा, तुझ्याजवळ बसव तिला."

दुकानाच्या मागच्या बाजूला एका त्रिकोणी खोलींत जमिनीवर पसरमांड्या घालून पंधरावीस बायका दाटीवाटीनें बसल्या होत्या. त्यांचीं बोटें झपाझप चाललीं होतीं, अन् जिभा वटवट करीत होत्या.

यल्लीला थोडासा उशीर झाला होता. त्या वेळीं एक बाई तिच्या अंगावर खेकसलीसुद्धां. वाळलेल्या पानांचा जुडगा अन् तंबाकूचें टोपलें घेऊन खालीं बसतांना यल्ली म्हणाली,

"मंग! छोट्या शेटकडे गेलेतें मी!" तेव्हां सगळ्या बायका एकदम मोठ्यानें हसल्या. चांगुणेच्या अंगावर शहारा आला.

यल्लीच्या शेजारीं अंग चोरून अन् डोक्यावर पदर घेऊन चांगुणा गरिबा-सारखी बसली होती. त्या बायका बघून ती अगदीं बुजून गेली. असे चेहरे तिनें कधीं पाहिलेच नव्हते.

कोणाच्या तोंडावर गोंदलें होतें, तर कोणाच्या हातावर गोंदलें होतें. कोणाचे ओठ तांबडे लाल होते, तर कोणाचे दात काळेकिट्ट होते. कोणाच्या नाकांत चमक्या होत्या, तर कोणाच्या कानांत डुलक्या होत्या. त्या कोणत्या भाषेंत अन् काय बोलत होत्या ह्याचा मात्र चांगुणेला उमज पडला नाहीं.

तिचें लक्ष सारखें त्यांच्या बोटांकडे लागून राहिलें होतें. अशीं वळवळ हलत होतीं सारीं बोटें. पानें कातरत होतीं. तंबाखू भरत होतीं. विड्या वळत होतीं. टोकें मुडपत होतीं. दोरा गुंडाळीत होतीं. बघतां बघतां प्रत्येक बाईच्या पुढ्यांत विड्यांचे ढीग पडत होते.

चार-आठ दिवसांत बघून बघून चांगुणेला सगळी माहिती झाली. हलके-हलके ती एकेक विडी वळूं लागली. तसे कांहीं तें काम अवघड नव्हतें. पण त्या कामावर दिवसाची आठ दहा आणे मजुरी कमवायची म्हणजे संध्याकाळच्या आंत सातआठशें विड्या तरी वळून व्हायला हव्यात.

मजुरीचा भाव त्यावेळीं दीड आणा शेकडा होता. बाकीच्या बायकांचीं बोटें



जशीं भरभर चालत, तशीं चांगुणेचीं चालत नसत. संवय असल्यावांचून तीं कशीं चालणार? सबंध दिवस मेहनत करून आरंभीं आरंभीं दोन आणे मजुरी देखील चांगुणेच्या पदरांत पडत नसे.

संध्याकाळीं कामाचा हिशेब द्यायचा अन् मजुरी घ्यायची असा रोजचा शिरस्ता असे. पैसे देण्याचें काम स्वतः छोटे शेट करीत. कामाला लागून महिना झाला तरी चांगुणेच्या मजुरीची मजल दोन-तीन आण्यांच्या पलीकडे गेली नाहीं हें बघून कादरला वाईट वाटे.

त्याला तिची दया येई. दोन-तीन आणे रोजांत ही मुलगी आपलें पोट काय भरणार? तिचें लुगडें किती जुनें होतें. ठिकठिकाणीं फाटून गेलें होतें. पण नवीन लुगडें किंवा पातळ घ्यायची तिची कुठून ऐपत असणार?

हिशेबाच्या वेळीं बाकीच्या बायका छोट्या शेटच्या भोवतीं गर्दी करीत. एकमेकींना धक्के देऊन पुढें जात. चांगुणा आपली बाजूला उभी राही. म्हणून तिचा हिशेब सर्वांच्या शेवटीं होई. त्या वेळीं बाकीच्या बायका आपापली मजुरी घेऊन निघून गेलेल्या असत. त्यामुळें चांगुणेशीं एकटें बोलायची कादरला रोज संधि मिळे.

तो तिच्याशीं हसून एकाद-दुसरा शब्द बोलल्यावांचून राहात नसे. कधीं

कधीं मजुरीपेक्षां चारआठ आणे अधिक तो तिच्या हातावर ठेवी. त्या वेळीं चांगुणा गोंधळून त्याच्याकडे बघूं लागे. पण तेवढ्यांत तो दुसऱ्या कुठल्या तरी कामाकडे लक्ष देई. मग चांगुणा मुकाट्यानें निघून जाई.

इतरांपेक्षां छोटे शेट चांगुणेकडे निराळ्या तऱ्हेनें बघतात, गालांतल्या गालांत हसून तिच्याशीं कांहीं तरी हलक्या आवाजांत बोलतात, ही बातमी कारखान्यांतल्या बायकांमध्यें पसरायला कांहीं फार वेळ लागला नाहीं. त्यामुळें चांगुणेकडे बघून त्या एकमेकींच्या कानांत कुजबुजत अन् डोळे मिचकावून चमत्कारिक तऱ्हेनें हसत. पण चांगुणेला कांहीं त्याचा अर्थ समजत नसे. ती खालीं मान घालून आपलें काम करीत असे.

एक दिवस संध्याकाळीं कागदांत गुंडाळलेलें पांचसात रुपयांचें एक नवें पातळ कादरनें हळूच चांगुणेच्या हातावर ठेवलें. तिच्या डोळ्यांत पाणी आलें. तिला तें घ्यावें कीं न घ्यावें हें समजेना. पण तेवढ्यांत कादर निघूनही गेला.

घरीं आल्यावर चांगुणेनें तें राधीला दाखविलें. "छोट्या शेटनीं मला दिलें!" चांगुणा म्हणाली. राधी हसली. तिनें ती बातमी यल्लीला सांगितली.

दुसरे दिवशीं ती बातमी चांगुणा कामाला यायच्या पूर्वींच यल्लीनें साऱ्या बायकांमध्यें पसरवली होती. त्यामुळें चांगुणेला पाहिल्याबरोबर साऱ्या एकदम खिकाळल्या. चांगुणा गोंधळली. ओशाळली. अन् त्यांच्या तोंडांकडे पाहूं लागली. तशा त्या जास्तच हसूं लागल्या.

मान खालीं घालून चांगुणा नेहमींप्रमाणें काम करूं लागली. थोड्या वेळानें तिच्या शेजारीं बसणाऱ्या एका बाईनें वात्रटपणें तिला विचारलें. अगदीं सगळ्यांना ऐकूं जाईल एवढ्या मोठ्या स्वरांत—

"काय किंमत या पातळाची?"

"मला न्हाई माहीत!" वर बघून चांगुणा म्हणाली, "छोट्या शेटना माहीत!"

त्याबरोबर पोट धरधरून साऱ्या बायका हसूं लागल्या. एवढें त्यांत हसण्या-सारखें काय आहे हें चांगुणेच्या लक्षांत येईना.

कांहीं दिवसांनीं कादर चांगुणेच्या हातावर रोजचे आठ आणे ठेवूं लागला. तेवढी अर्थात्‌च तिची मजुरी होत नसे. चारपांच आण्यांपलीकडे तिची मजल कधींच गेली नाहीं.

मजुरीचे मिळतील तेवढे पैसे रोज घरीं आल्यावर चांगुणा राधीच्या हातावर

ठेवी. राधीची चैन झाली. तिचा नवरा देखील रोजच्या रोज आठ आणे तिला कधीं देत नव्हता. पण चांगुणेकडून एवढी मिळकत होत असूनही कधीं राधीनें तिच्या पोटाला चांगलें करून घातलें नाहीं.

आधल्या रात्रीची शिळी भाकर आणि चटणी खाऊन चांगुणा रोज सकाळीं कामाला जाई. आणि दुपारीं भाजलेली भाकर तिला रात्रीं मिळे. कधीं कालवण आहे तर आहे. नाहीं तर नुसती भाकर आणि चटणी. आठवड्यां-तून एखादे दिवस बोंबलाची काडी मिळाली तर नशीब.

रात्रीं चांगुणा खोपटाच्या बाहेर वळचणीला पडे. आंत नवरा-बायको झोपत. तिथें निजायची तिला लाज वाटे. राधीनें तिला अंथरायला एक तरट अन् पांघरायला फाटकें लुगडें दिलें होतें. पंचवीस-तीस पावलांवरून नागझरी वहात असे. तिच्या घाणीनें तर चांगुणेचें डोकें उठून जाई. चिलटें, डास अन् पिसवा ह्यांचा रात्रभर तिथें उरूसच भरे. सकाळपर्यंत अंगाची अगदीं चाळण होऊन जात असे. मग झोप कसची येणार ?

चोखूच्या खोपटांत येऊन चांगुणेला चार महिने देखील पुरे झाले नसतील. तोंच एक दिवस सकाळीं तिला असा कांहीं थडथडून ताप भरला कीं तिच्या नाकातोंडांतून वाफा निघूं लागल्या. आणि तोंड निवडुंगाच्या बोंडाप्रमाणें लालजर्द झालें.

तिला मुळीं कशाची शुद्धच राहिली नाहीं. अर्धवट ग्लानीमध्यें ती तशीच आपल्या रकट्यावर कण्हत पडून राहिली. तिच्याकडे बघणार कोण आणि 'तुला काय होतं आहे' म्हणून तिला विचारणार तरी कोण ?

राधी एकदोन वेळां आंतून ओरडली, "ए, अग तुला कामाला जायचं न्हाय का ?" पण बाहेर येऊन कांहीं तिनें पाहिलें नाहीं, कीं ही कां उठत नाहीं अन् कां बोलत नाहीं.

शेजारच्या खोपटांतली यल्लीची आई चांगुणेचें कण्हणें ऐकून तिच्या जवळ आली. आणि तिच्या कपाळाला हात लावून बघूं लागली. तिच्या हाताला जसा चटका बसला तशी ती कळवळून म्हणाली, "आयाय ग, काय ताप आलाय पोरीला ?" तेव्हां खोपटाच्या दारांत येऊन राधीनें चांगुणेकडे नुसतें एकदां पाहिलें अन् ती पुन्हा आंत गेली.

राधीनें त्या दिवशीं चांगुणेला भाकरीचा तुकडा दिला नाहीं कीं प्यायला पाणी हवें का म्हणून विचारलें नाहीं. चांगुणा कामाला गेली नाहीं अन् आज संध्या-

काळीं आपल्याला तिचे आठ आणे मिळणार नाहींत, एवढी एकच गोष्ट तिच्या डोळ्यांना दिसत होती. अन् त्यामुळें तिच्या अंगाचा तिळपापड झाला होता.

दिवसभर चांगुणा माशासारखी तडफडत होती. तिच्या अंगाची अगदीं काहिली झाली होती. दुपारपासून तिच्या घशाला कोरड पडली. अन् ती 'पाणी-पाणी' करूं लागली. पण राधी आंत पाय पसरून खुशाल झोपली होती. शेवटीं यल्लीच्या आईनें मडकेंभर पाणी तिला पाजलें. तेव्हां तिची तडफड थोडीशी निवली.

चांगुणेच्या तापाला जसे तीनचार दिवस होऊन गेले अन् ती आपल्या जागेवरून इकडची तिकडे हललीसुद्धां नाहीं, तसें आजूबाजूच्या खोपटांतल्या माणसांचें तिच्याकडे लक्ष गेलें. तिच्या अंगावरून जातां येतां क्षणभर थबकून ते तिच्याकडे बघत. अन् तिची विचारपूस करीत.

मग राधीला लाजेकाजेस्तव कांहीं तरी बोलावेंच लागे. तिच्या उशाशीं राधीनें चारदोन भाकरीचे तुकडे आणून ठेवले. जाणाऱ्या-येणाऱ्यानें कुणीं विचारलें कीं तीच त्या तुकड्यांकडे हात करून सांगे, "चार दिस झाले. भाकरीचा एक तुकडाबी ती न्हाई खात."

चार दिवस झाले. चांगुणा कामाला कां येत नाहीं, ह्या विचारानें कादर अस्वस्थ झाला. काम सोडून ती गेलीबिली तर नाहीं कुठें ? दुसऱ्या दिवशीं संध्याकाळींच तो यल्लीला विचारणार होता. पण त्याला जरा लाज वाटली. पण पांचव्या दिवशीं सकाळीं देखील ती कामाला आली नाहीं, हें जसें त्याच्या लक्षांत आलें तसें त्यानें यल्लीला बोलावून विचारलें. तिनें सांगितलें. तेव्हां यल्लीला घेऊन तो तसाच तडक तिच्या खोपटावर गेला.

यल्लीनें राधीला सांगितलें, "छोटे शेट आलेत."

तसा राधीनें खोपटाच्या दारांत येऊन डोळ्याला पदर लावला. "आज चार दिस झालं. रोज चारआठ आन्यांचा दवा चाललाय. पण तिचा ताप कांहीं जात न्हाई."

चार दिवसांच्या तापानें चांगुणेचा चेहरा भाजून निघाला होता. डोळे तळावून गेले होते. ओठाची साल उकलली होती. अन् पोटाची करवड वाळून गेली होती.

धुंद डोळ्यांनीं तिनें कादरकडे एकदां पाहिलें. पण ती बोलली नाहीं. तिनें त्याला ओळखलेंही नाहीं. ती भानावरच नव्हती. तोंडावर बसणाऱ्या माशा मारायचें देखील बळ तिला नव्हतें.

तिच्याखालचें फाटकें रकटें, उशाला पडलेले शिळ्या भाकरीचे तुकडे, आजुबाजूची दुर्गंधि अन् घोंघावणाऱ्या माशा बघून कादरच्या अंगावर कांटा उभा राहिला.

तसाच तो उठला. अन् टांगा घेऊन आला. यल्लीनें न् त्यानें चांगुणेला उचलून टांग्यांत ठेवलें.

"माझं दव्याचं दोन रुपये झालंत—" असा राधीनें जेव्हां गळा काढला, तेव्हां तिच्या अंगावर दोन रुपये फेकून कादर टांग्यांत चढला.

गफूरशेटचीं गांवांत दोन तीन घरें होतीं. त्यांची भाडेवसुली आणि व्यवस्थाही कादरच पाहात असे. त्यांतलें एक घर गणेश पेठेंत लक्कड गल्लीमध्यें होतें. तीन-खणी अन् दुमजली. त्यांतल्या वरच्या मजल्यावरच्या दोन खोल्या रिकाम्याच होत्या. तिथें कादरनें चांगुणेला नेऊन ठेवलें.

पलीकडे एका खिस्ती डॉक्टराचा दवाखाना होता. त्याला लागलेंच त्यानें बोलावून आणून तिला दाखवलें. आणि ताबडतोब त्याचें औषध सुरू केलें. त्याच्या ओळखीची एक गरीब म्हातारी मुसलमान बाई होती. तिला त्यानें तिथें राहायला आणून ठेवलें. चांगुणेच्या औषधपाण्याची अन् खाण्यापिण्याची सारी व्यवस्था तीच करी.

दुसऱ्या का तिसऱ्या दिवशीं चांगुणेचा ताप उतरला. पण दोन दिवस थांबून तो एका सकाळीं पुन्हा पहिल्यासारखाच चढला. इतका कीं त्याची आग सहन न झाल्यामुळें ती हातपाय पाखडून मोठमोठ्यानें ओरडूं लागली.

म्हाताऱ्या खैरूबीनें धावत जाऊन डॉक्टराला बोलावून आणलें. त्यानें कसल्याशा पुड्या तासातासानें तिला द्यायला सांगितल्या. तेव्हां दुपारपर्यंत तिची तगमग कमी झाली. पण ताप उतरायला मात्र पुन्हा चारपांच दिवस लागले.

असा तिच्या तापानें प्रकार सुरू केला. तीन दिवस तो चढायचा अन् दोन दिवस उतरायचा. पण चढला म्हणजे असा चढायचा कीं अंगांत जणुं कांहीं निखारे भरले आहेत असें वाटायचें. तिची शुद्धच जायची.

सहा महिने त्याचा हा असा क्रम चालू होता. तिच्या औषधपाण्यांत कादरनें एवढेंसें सुद्धां कमी पडूं दिलें नाहीं. सकाळ-संध्याकाळ तो तिच्याजवळ येऊन तासतास बसायचा. तिला आपल्या हातानें दूध पाजायचा. मुसुंब्याची एखादी फोड सोलून तिला खाऊं घालायचा.

नागझरीच्या डासांनीं तिच्या अंगांत टोचलेलें विष समूळ नष्ट व्हायला तब्बल सहा महिने लागले. त्यानें तिचीं अगदीं हाडें हाडें काढलीं. मग ती उठून हळू हळू बसूं लागली. घरांत हिंडूंफिरूं लागली. दोन वेळ जेवूं लागली. दीड दोन महिन्यांच्या आंत तिची आजारीपणाची कळा नाहींशी झाली. आणि पुन्हा तिनें पहिल्यासारखें अंग धरलें.

ह्या सातआठ महिन्यांत तिचें जीवनच बदलून गेलें होतें.

घर बदललें. कपडे बदलले. अन्न बदललें. वस्तू बदलल्या. भांडीं बदललीं, बोलणें-चालणेंही बदललें. मागलें आयुष्य ती अजिबात विसरून गेली. ह्याच घरांत जणुं आपला जन्म गेला. हेंच आतां आपलें घर. अन् हींच आतां आपलीं माणसें असें आपोआपच तिला वाटूं लागलें.

कादर आपला 'छोटा शेट' आहे, हें ती कधींच विसरून गेली होती. आपण त्याच्या दुकानांत विड्या वळत होतों, ह्याची आठवणही तिची जवळ जवळ बुजून गेली.

एके दिवशीं रात्रीं तिला तो ताबूताची आरास दाखवायला टांग्यांतून घेऊन गेला. परत येतांना टांगा दुकानावरून जाऊं लागला. दुकान बंद होतें. तें चांगुणेला दाखवून तो म्हणाला, "हें आपलं दुकान!" तेव्हां तिला त्याची आठवण झाली.

तिनें हळूच विचारलें, "मीं कामाला कधीं जायचं आतां?"

तेव्हां कादर हसून म्हणाला, "कामाला कशाला जायचं? तुझंच तर दुकान आहे तें!"

कादरचें हसणें तिला अतिशय ओळखीचें वाटलें. कोणासारखा बरें तो हसतो? बरोबर, शंकरसारखा. पूर्वी तिला तसें कधीं वाटलें नाहीं. त्या दिवशीं प्रथम तिच्या तें ध्यानांत आलें.

रात्र बरीच झाली होती. चांगुणा कादरला म्हणाली, "इतक्या रात्रीं आतां कशाला घरीं जातां? राहा ना इथं?"

त्या दिवसापासून रोज रात्रींचा कादर चांगुणेच्याच घरीं राहूं लागला.

● ● ●

# .१४.



वर्षानें चांगुणेला मुलगा झाला.

आपला दत्ताच देवानें आपल्याला परत आणून दिला, असें तिला वाटलें. खैरूबी त्याला 'मुन्ना' म्हणायची. पण ती आपली त्याला दत्ताच म्हणायची.

दिवसभर दत्ताच्या नांवानें तिचा जप चालायचा. दत्ता असा बघतो. दत्ता असा हसतो. दत्ताला वारा बाधेल. दत्ताला दृष्ट लागेल. अशी खैरूबीजवळ सारखी तिची कांहीं ना कांहीं तरी बडबड चालायची.

उन्ह पडलें म्हणजे जसा अंधार मावळतो, तसा मुलगा झाल्यापासून तिचें सारें दुःख नाहींसें झालें. पूर्वीच्या सर्व वेदना आणि यातना ती विसरून गेली. एवढेंच नव्हे, तर मुलाच्या प्रेमांत बाहेरचें तिचें जगही विरघळून गेलें. तृप्तीचें तेज तिच्या चेहऱ्यावर झळकूं लागलें. आणि वात्सल्याच्या हर्षाला जणुं

हृदयच अपुरें पडूं लागलें म्हणून, तो तिच्या डोळ्यांतून ओसंडूं लागला.

कोणत्याही गोष्टीची आतां तिला कमतरता नव्हती. जें पाहिजे तें कादर तिला आणून देई. पण तिकडे चांगुणेचें लक्षच कुठें होतें? कादर महिन्याच्या महिन्याला तिला जे पैसे देई ते ती खैरूबीकडेच ठेवी. खैरूबीच सगळें घर चालवी. काय हवें, काय नको हें सगळें खैरूबीलाच माहीत असे. बाजारांतून आज काय आणलें अन् आज सैंपाक काय केला हें अक्षरानें देखील ती खैरूबीला विचारीत नसे. खैरूबीनें जेवायला वाढलें म्हणजे ती मुकाट्यानें जेवी.

संध्याकाळीं कादर आला अन् कांहीं गमतीचें बोलायला लागला कीं ती गालांतल्या गालांत हसे. पण त्याच्याकडे तिचें लक्ष नसे. ती नेहमीं आपल्या दत्ताच्या गुंगींत असे.

आतांपर्यंतचा तिचा जन्म दुसऱ्याला भिण्यांत गेला होता. लहानपणीं बापाचें भय. लगीन झाल्यावर नवऱ्याचें भय. नवऱ्याचें घर सुटल्यावर जगाचें भय. अन् आईबापांनीं टाकून दिल्यावर स्वतःचें भय.

ह्या भयाभयानें तिला जन्मभर चावून घेतल्यानें, तिला आपलें जीवन विफल वाटत होतें. तें भय आणि वैफल्य आतां तिच्या जीवनांतून समूळ नाहींसें झालेलें होतें. कादरनें आयुष्यांत तिला निर्धास्त केलें. आणि दत्तानें तिचें जीवन सफल केलें.

चार वर्षांनीं तिला एक मुलगी झाली. आईचें नांव आपल्या तोंडांतून निघावें म्हणून मुलीचें नांव तिनें राही ठेवलें. दत्ताचा तोंडवळा आपल्या बापासारखा होता, तर राही आपल्या आईवर पडली होती. आणि स्वभावानेंही राही पुढें आपल्या आईचाच नमुना होईल असें तिच्या लक्षणांवरून दिसत होतें.

तान्हेपणीं दत्ता भारी रडका होता. पण राही पहिल्यापासून अगदीं शांत आणि हसतमुख असे. तिला सांभाळायचा मुळीं त्रासच नसे. कुठेंही ठेवली तरी ती एकटी स्वतःशींच खेळत राही.

तळमजल्यावर एक मराठ्याचें आणि एक शिंप्याचें अशीं दोन बिऱ्हाडें होतीं. त्या बिऱ्हाडांत दत्ताच्याच वयाचीं दोन-तीन मुलें होतीं. दत्ता दिवसभर त्यांच्यामध्येंच खेळत बसे. राहीला मांडीवर घेऊन चांगुणा खिडकींत बसे. आणि वरून दत्तावर सारखी पाळत ठेवी.

'अरे, जोरानें धावूं नकोस. पडशील!' 'तो बघ मागून टांगा आला.' अशी तिची आपली सारखी वरून ओरड चालायची.

दत्ता चांगला सात वर्षांचा झाला. तरी त्याला शाळेंत घालण्याचा विचार कादरच्याही डोक्यांत आला नाहीं किंवा चांगुणेलाही सुचला नाहीं. कादर तर दिवसचे दिवस चांगुणेच्या घरांत पुढें येईनासा झाला. दुकानांत फार काम असतें असें तो चांगुणेला सांगे. तिला काय लागतील ते पैसे तो दुकानाच्या दिवाणजीबरोबर पाठवून देई.

विड्याचीं पानें किंवा तंबाकू खरेदी करण्यासाटीं त्याला मधून मधून बाहेर-गांवीं जावें लागे. आणि असा तो परगांवीं गेला म्हणजे दोन दोन महिने तिकडेच राहात असे. अशा वेळीं मग खैरूबीच दुकानावर जाऊन पैसे आणी.

दत्ताशीं खेळणारीं मुलें म्युनिसिपालिटीच्या शाळेंत जाऊं लागलीं तसा दत्तानेंही आपल्याला शाळेंत जायचें असा आईपाशीं हट्ट धरला. चांगुणेनें खैरूबीला सांगून त्याला पाटी-पेन्सिल अन् अंकलिपीचें एक पुस्तक आणून दिलें. आणि फीचे पैसे देऊन त्याला खालच्या मुलांबरोबर शाळेंत पाठविलें.

चारदोन दिवस तो त्या मुलांच्या बरोबर नीट शाळेला गेला. पण पुढें पुढें तो आपला एकटाच शाळेला जाऊं लागला. आणि त्या मुलांशीं बोलेनासा झाला.

असे चांगले पांचसहा महिने गेले. शाळेंत जाऊन तूं काय करतोस अन् काय शिकतोस हें चांगुणेनें त्याला एका अक्षरानें विचारलें नाहीं. तो शाळेंत जातो आहे, एवढ्यावरच ती आपली खूष होती.

एक दिवस खालचीं मुलें तासाभरानेंच शाळेंतून परत आलीं. आणि रस्त्यावर खेळूं लागलीं.

चांगुणेनें त्यांना वरूनच विचारलें, "काय रे, आज शाळेला न्हाई गेलांत तुम्ही?"

मुलें म्हणालीं, "एक कोणी तरी बुवा मेला म्हणून आमच्या शाळेला आज सुट्टी मिळाली!"

"मग दत्ता कसा आला न्हाई अजून?" चांगुणेनें विचारलें.

"आम्हांला काय ठाऊक?" एकजण म्हणाला.

"तो कुठें येतो शाळेंत?" दुसरा म्हणाला.

चांगुणा चकितच झाली. दत्ता शाळेंत जात नाहीं? मग रोज अकरा वाजतां तो पाटी न् पिशवी घेऊन कुठें जातो? ती कांहीं बोललीच नाहीं.

संध्याकाळीं दत्ता परत आला. तेव्हां तिनें विचारलें, "का रे, एढवळ काय करीत व्हतास ?"

"शाळा आत्तां सुटली !" दत्ता म्हणाला.

"शाळेला आज सुट्टी व्हती ना ?" चांगुणेनें विचारलें.

"मुळींच नाहीं. कोण म्हणालं ?" दत्ता जरा चिडून म्हणाला.

"त्या पोरांनींच मला सांगितलं !" चांगुणा म्हणाली, "अन् तो शिंप्याचा पोरगा म्हणाला कीं तूं शाळेंत न्हाई जात."

दत्ता कांहीं बोललाच नाहीं. तो खालीं पाहूं लागला. तेव्हां चांगुणेच्या लक्षांत आलें कीं खालच्या पोरांनीं सांगितलें तें बरोबर आहे.

दत्ताच्या पाठीवर प्रेमानें हात फिरवून चांगुणेनें विचारलें, "कां न्हाई जात तूं शाळेला ?"

"शाळेंतलीं पोरं अन् मास्तर फार वाईट आहेत." दत्ता संतापून म्हणाला. रागानें त्याचा ओठ थरथर कांपूं लागला. "ते मला हसतात. म्हणतात, तुझं नांव दत्ता न् तुझ्या बापाचं नांव कादर कसं ? मला नाहीं जायचं शाळेंत. मी आपला रोज त्या मारुतीच्या देवळांत जाऊन बसतों."

बोलतां बोलतां दत्ताचे डोळे डबडबले. मुलाचें नांव दत्ता असलें आणि बापाचें नांव कादर असलें तर त्यांत हसण्यासारखें काय आहे हें कांहीं चांगुणेच्या लक्षांत आलें नाहीं.

दत्ताचे डोळे आपल्या पदरानें पुशीत चांगुणा म्हणाली, "तूं आपला इथंच बसत जा माझ्यापाशीं. नगं जाऊस कुठं ?"

दत्ता आठ वर्षांचा झाला. राही चार वर्षांची झाली. आणि चांगुणेचें सुखाचें स्वप्न एकदम एके दिवशीं अचानक समाप्त झालें.

चांगुणा राहीला न्हाऊं घालत होती. इतक्यांत दुकानांतले दिवाणजी घाबऱ्या घाबऱ्या वर आले. आणि आधल्या रात्रीं दुकानासमोर झालेल्या एका मारामारींत 'छोट्या शेट'ला कुणीं तरी सुऱ्यानें भोसकल्याची बातमी त्यांनीं चांगुणेला सांगितली.

"त्यांना इस्पितळांत नेलंय. तिकडंच मी चाललों आहें." असं सांगून दिवाणजी घाईघाईनें निघून गेले.

चांगुणेला काय झालें हेंच मुळीं कळेना. गरम पाण्याचें भांडें तसेंच हातांत धरून ती खैरूबीकडे पाहात राहिली. थंडी वाजली म्हणून राही ओरडूं

लागली, तेव्हां ती भानावर आली. आणि मग राहीच्या अंगावर पाणी ओतूं लागली. खैरूबी कपाळाला हात लावून जी तोंड मिटून बसली ती कांहीं बोलेनाच.

दुपारीं चार वाजतां दिवाणजींनीं खालून रस्त्यावरून ओरडूनच सांगितलें कीं, "छोटे शेट दुपारींच गेले! त्यांच्या दफनालाच मी हा चाललों आहें."

खैरूबीनें मोठ्यानें हंबरडा फोडला. तेव्हां दिवाणजींनीं सांगितलेल्या बातमीचा अर्थ चांगुणेला उमगला.

पण तिला कांहीं रडूं आलें नाहीं. दत्ताला आणि राहीला दोन्ही हातांनीं हृदयाशीं धरून ती किती वेळ तरी शून्य दृष्टीनें खिडकीबाहेर पहात तशीच बसून राहिली.

त्या रात्रीं खैरूबीनें सैंपाक शिजवला नाहीं. ती रडून ओरडून थकली आणि तशीच सैंपाकघरांत झोपी गेली. चांगुणाही बसल्या जागीं जी लवंडली, तिला तिथेंच झोप लागली.

सकाळीं चांगुणा उठून जों पहाते, तों घरांतली सगळी चीजवस्त गुंडाळून खैरूबी पसार झाली होती. चांगुणेचीं पातळें, मुलांचे कपडे, चांगलीं चांगलीं भांडीं सगळीं चुकतीं नाहींशीं झालेलीं होतीं.

कादर गेल्याचें दुःख त्या वेळीं तिला प्रथम झालें. आणि आतां मात्र आपण ह्या जगांत असहाय झालों आहोंत, ह्या जाणिवेनें ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

दोन चार दिवसांपुरत्या खाण्याच्या वस्तू खैरूबीनें ठेवून दिल्या, एवढीच काय ती जातां जातां तिनें खैर केली होती.

नेसल्या पातळाखेरीज फक्त एकच जुनें पातळ काय तें चांगुणेजवळ आतां उरलें होतें. आठनऊ वर्षांत नेहमींच्या खर्चापेक्षां कादरनें चांगुणेला तसें कांहीं फारसें दिलें नव्हतें. कधीं लहर आली तर तो तिला एकादें पातळ घेऊन येई किंवा चांगलेंसें कापड आणून देई.

चांगुणेला कपड्यांचा फारसा नाद नव्हता. घरांत ती जुनेच कपडे वापरी. आणि चांगले कपडे गाठोड्यांत बांधून ठेवी. मुलांच्यासाठीं मात्र आपल्या जवळच्या शिलकी कापडाचे ती खालच्या शिंप्याकडून वरचेवर कपडे शिवून घेई. पण तेही तिनें गाठोड्यांतच ठेवून दिले होते.

तें गाठोडेंच्या गाठोडेंच खैरूबीनें एका रात्रींत पसार करून टाकल्यानें चांगुणेजवळ आतां एक चिंधी देखील उरली नव्हती. वरकड जें पैसेनाणें होतें

तेंही खैरूबीजवळच असल्यानें तें तिच्या बरोबरच गेलें.

एकदां केव्हां तरी कादरनें तिच्यासाठीं सोन्याच्या दोन दोन बांगड्या आणि कानांत बारोकशा कुड्या करवल्या होत्या. त्यांची किंमत काय शंभर-सवाशें रुपयांच्या आंतबाहेर असेल नसेल इतकेंच. हो, अन् राहीच्या गळ्यांत पांच-दहा रुपयांची चांदीची एक हसळी होती. त्याखेरीजकरून चांगुणेजवळ मौल्यवान् असें कांहींही आतां उरलें नव्हतें.

चारपांच दिवसांनीं एके दिवशीं सकाळीं कादरचे वडील गफूरशेट स्वतःच तिथें आले. अन् चांगुणेला आणि तिच्या दोन्ही मुलांना अक्षरशः रस्त्यावर काढून त्यांनीं माडीवरच्या जागेला आपल्या स्वतःच्या हातांनीं टाळें मारून टाकलें.

तळमजल्यावरच्या शिंप्यानें चांगुणेच्या वतीनें गफूरशेटला खूप समजावून सांगितलें. पण म्हाताऱ्यानें कांहीं त्याची दाद घेतली नाहीं. प्रत्येकाला दहा दहा रुपये अशा तीस रुपयांच्या तीन नोटा मेहरबानगीदाखल चांगुणेच्या अंगावर फेकून तो चालता झाला.

आतां पुढें कुठें जायचें ?

नऊ वर्षें झोपीं गेलेलें तिचें दुर्दैव पुन्हा जागें होऊन भुतासारखें तिच्यापुढें उभें राहिलें. आणि दांत विचकून त्यानें तिला प्रश्न केला.

पुण्यांत तिच्या ओळखीचीं दोनच माणसें होतीं. राधाबाई आणि गऊबाई. पण त्यांना भेटल्याला आतां दहा वर्षें होऊन गेलीं होतीं. त्या आपल्याला ओळखतील कीं नाहीं कुणास ठाऊक ? शिवाय त्या आतां तिथें असतील तरी का ?

पहिल्यानें गऊबाईकडेच जावें, असें चांगुणेला वाटलें. जातांना शिंपीण-बाईनीं तिला आणि तिच्या मुलांना चहा दिला. राहीला कडेवर घेऊन आणि सामानाचें लहानसें गाठोडें दत्ताच्या डोक्यावर देऊन अश्रुपूर्ण नेत्रांनीं चांगुणेनें तळमजल्यावरील बिऱ्हाडकरूंचा आणि त्या जागेचा निरोप घेतला.

गऊबाई ज्या चाळींत रहात होती, ती नव्या पेठेंतली 'वाण्याची चाळ' नाहींशी झाली होती. आणि तिथें तीन मजल्यांची एक मोठी दगडी इमारत उभी राहिली होती. चांगुणा तर गोंधळूनच गेली. कोणाला काय विचारावें हेंच तिला कळेना. इकडेतिकडे तिनें जरा पाहिलें. आणि ती तशीच परतली.

गऊबाईच्या पलीकडे राहणारी चणेवाली मात्र डोक्यावर टोपलें घेऊन रेंगाळत

असलेली तिला रस्त्यावर दिसली. ती आतां फार म्हातारी झाली होती. गऊबाई मरून पांच वर्षं झाल्याचें तिनें हळहळून सांगितलें.

चांगुणेला वाईट वाटलें. बिचारी गऊबाई. तिनें त्यावेळीं एवढें आपलें केलें. आणि आपण एका गांवांत असून ती कधीं गेली हें सुद्धां आपल्याला कळालें नाहीं. तिला नकळत तिचीं पावलें हळूहळू मंडईचा रस्ता चालूं लागलीं.

राधाबाईची खाणावळ मात्र होती तशीच होती. ती पाहून चांगुणेला धीर आला. दारापाशीं थबकून ती आंत डोकावून बघूं लागली. पण आंतली व्यवस्था बदलली होती. अन् माणसें मात्र कोणीच तिच्या ओळखीचीं दिसेनात.

"राधाबाईची खाणावळ हीच ना?" पुन्हा एकदां खात्री करून घेण्यासाठीं म्हणून चांगुणेनें विचारलें.

पत्र्याच्या टेबलावर खात बसलेल्या गिऱ्हाइकांकडे हातांत बशा घेऊन जाणाऱ्या एक नोकरानें "हो, हीच!" म्हणून मोठ्यानें सांगितलें.

"राधाबाई कुठैत?" चांगुणेनें पुन्हा भीत भीत विचारलें.

तेव्हां तो नोकर चांगुणेकडे आश्चर्यानें बघूं लागला.

"राधाबाई इथं कुठं असत्यात? त्या मुंबईला जाऊन किती तरी वरपं झालीं?"

भकास डोळ्यांनीं चांगुणा त्या नोकराकडे पहात उभी राहिली. शेवटचा एक तंतू होता आशेचा. तो सुद्धां तुटला.

इतक्यांत दत्ता म्हणाला, "आयग, मला भूक लागली." दुकानांतल्या मटनाच्या वासानें त्याच्या तोंडाला पाणी सुटलें होतें.

मुलांना घेऊन चांगुणा दुकानांत गेली आणि बांकावर बसून तिनें नोकराला मटनाची एक बशी अन् दोन पाव आणायला सांगितलें. दत्ता नि राही अशा दुकानांत पूर्वीं कधीं आलीं नव्हतीं. म्हणून त्यांना खूप गंमत वाटली.

टेबलावर बशी ठेवतांना नोकरानें आणखी माहिती सांगितली, "पहिली ही खानावळ राधाबाईची होती. ती तिनं आमच्या मालकाला इकली. तिनं तिकडं मुंबईला मोठी खानावळ काढली म्हनत्यात."

"मुंबईला कुटं?" कांहीं तरी विचारायचें म्हणून चांगुणेनें विचारलें.

"त्ये काय आपल्याला माहीत न्हाई." तोंड वाईट करीत नोकर म्हणाला.

"भायखळ्याला—सातरस्त्यावर!" कोपऱ्यांतल्या टेबलावर 'नळी' आपटीत बसलेला एक माणूस म्हणाला.

चांगुणा वळून त्याच्याकडे बघूं लागली. त्याचा चेहरा हाडकुळा होता. चारआठ दिवसांची त्याची दाढी वाढली होती. त्याच्या तोंडावर पांढऱ्या कोडाचे दोनतीन डाग उठले होते. अन् खादीच्या मळक्या पैरणीवर त्यानें एक काळें जाकीट घातलें होतें.

चांगुणेच्या डोळ्यांत कांहीं प्रकाश पडला नाहीं. भायखळा काय अन् सात रस्ता काय ?

मुलांचें खाणें संपलें. पाव एक उरला. तो चांगुणेनें आपल्या गाठोड्यांत बांधून घेतला. खाण्याचे पैसे तीन का चार आणे झाले. चांगुणेजवळ सुटे पैसे नव्हते. गफूरशेटनें दिलेल्या तीन दहा दहा रुपयांच्या नोटा काय त्या तिजजवळ होत्या. त्या तिनें आपल्या पदरांत बांधलेल्या होत्या.

त्यांतली एक नोट काढून तिनें नोकरापुढें धरली. अन् त्याला विचारलें, "धा रुपयाची मोड हाय का रे ?"

नोकर मान हलवीत म्हणाला, "छा, इतक्यांत कुठलं जमत्याल दहा रुपये?"

कोपऱ्यांतल्या माणसाचें खाणें संपलें होतें. नोकराला पैसे देऊन तो जाऊं लागला.

"दहा रुपयांची मोडच पाहिजे ना तुम्हांला ?" चांगुणेच्या पुढें किंचित् थबकून तो म्हणाला, "थांबा, मी घेऊन येतों."

असें म्हणून चांगुणा बोलायच्या आधींच तो तिच्या बोटांतली नोट पटकन् घेऊन दुकानाच्या बाहेर पडला. चांगुणा त्यांच्याकडे बघतच राहिली. क्षणानें तिच्या मनांत विचार आला कीं हा माणूस नोट घेऊन गेला खरा, पण तो परत नाहीं आला तर ?

तिनें भीत भीत नोकराला विचारलें, "काय ह्याचं नांव ?"

"कुनास ठावं ?" नोकर आपल्या कानांवर हात ठेवून म्हणाला, "कधीं तरी चार दोन येळा आला असल इथं. मला वाटलं तुमची वोळख असल."

त्यामुळें चांगुणेला आणखीनच काळजी लागली. भिरभिर डोळे करून ती बाहेर बघूं लागली. पण पांचसात मिनिटांनीं तो माणूस हातांत पैसे घेऊन परत येतांना तिला दिसला. तेव्हां तिला हायसें वाटलें.

चांगुणेचा थोडासा घाबरलेला चेहरा पाहून तो हसून म्हणाला, "तुम्हांला वाटलं असंल मी नोट घेऊन बाहेरच्या बाहेर पळालों कीं काय ?"

चांगुणा खजील होऊन खालीं बघूं लागली. दहा रुपयांची मोड मोजून

तिच्या हातांत देत तो म्हणाला, "माझं नांव शिंदेमामा. आपन जलमांत कधीं कुनाचा पैसा इकडचा तिकडं केला नाहीं. अन् बायामानसांचा पैसा? अरे, राम-राम-राम—"

तोंडांतून अर्धवट जीभ बाहेर काढून त्यानें डाव्या हातानें आपल्या गालावर हलकेच चापट मारली. चांगुणा आदरानें त्याच्याकडे बघूं लागली.

चांगुणेनें नोकराच्या हातावर पैसे ठेवले. बाकीचे सारे पैसे तिनें आपल्या पदरांत नीट बांधले. अन् मुलांना घेऊन ती बाहेर पडली. दुकानाच्या बाहेर शिंदेमामा विडी फुंकीत आपला उभा होता. पण त्याचें लक्ष दुसरीकडे होतें.

रस्त्यावर पेपरमिंटाच्या का लिमलेटच्या रंगीत गोळ्या फडक्यावर मांडून एक म्हातारी विकत बसली होती. त्या राहीनें पाहिल्या.

"मला गोळ्या पाहिजेत." म्हणून तिनें हट्ट धरला.

चांगुणेनें म्हातारीला विचारलें, "कशा ग दिल्या गोळ्या?"

म्हातारी म्हणाली, "पैशाला पांच."

आतां एक पैशासाठीं पुन्हा रस्त्यांत उभें राहून पदराची गांठ सोडायची अन् त्या मोडींतून पैसा बाहेर काढायचा चांगुणेला कंटाळा आला. ती राहीला म्हणाली, "इथं नको. तिकडं चांगल्या मिळत्यात त्या घेऊं."

पण राही कुठली ऐकायला? ती मोठ्यानें रडूं लागली. तसा शिंदेमामानें आपल्या जाकिटांतला एक पैसा काढून त्या म्हातारीच्या अंगावर टाकला. अन् पांच गोळ्या उचलून राहीच्या हातांत दिल्या.

चांगुणा ओशाळीं झाली. शिंदेमामाचा पैसा देण्यासाटीं तिचा हात आपो-आप पदराच्या गांठीकडे गेला.

तसा तो डावा पंजा हालवीत हसून म्हणाला, "छा, छा, असं कुठं झालंय? राहूं द्या. आपला मामाचा पोरीला खाऊच म्हना ना!"

चांगुणेच्या डोळ्यांच्या कडा थोड्या ओल्या झाल्या. मुलीचा मामा म्हणजे आपला भाऊ. अजूनपर्यंत तिला बहीण म्हणून कोणी म्हणालें नव्हतें. थर-थरत्या ओठानें ती समोर बघूं लागली.

"तुम्हांला मुंबईला राधाबाईकडंच जायचं ना? मग मी घेऊन जातों कीं!" दुसरी विडी पेटवीत शिंदेमामा म्हणाला, "मी आतां बाराच्या गाडीनं मुंबईलाच निघालों आहें."

"लई उपकार व्हतील!" चांगुणेच्या तोंडून सहज शब्द निघून गेले.

तिच्या शून्य दृष्टीसमोर पुन्हा आशेचा एक लांबलचक तंतू लोंबूं लागला. तो तिच्या कल्पनेनें पटकन् पकडला.

मुंबईला राधाबाईकडे गेलें तर तीच काय ती आपली आणि आपल्या मुलांची सोय लावील, हें एकदम तिच्या मनानें घेतलें.

इतक्यांत समोरून जाणाऱ्या एका टांग्याला शिंदेमामानें थांबवलें सुद्धां. चांगुणेच्या कडेवरून राहीला घेऊन तो तिच्यासह टांग्याच्या पुढल्या बाजूला बसला. तसा दत्ताही मागल्या बाजूकडे धावत गेला. तेव्हां चांगुणेला टांग्यांत जाऊन बसण्याखेरीज इलाजच राहिला नाहीं.

ठेशनापर्यंत जातांना शिंदेमामा राहीला न् दत्ताला एकसारख्या मुंबईच्या गोष्टी सांगत होता. आगगाडींत बसून आपण आतां मुंबईला जाणार ह्या विचारानें त्या दोघांना खूप आनंद झाला होता. शिंदेमामाच्या बोलण्याकडे चांगुणेचें लक्ष नव्हतें. तिच्या डोळ्यांपुढें फक्त राधाबाई उभी होती.

ठेशनाच्या घड्याळांत बाराला पंधरा मिनिटें कमी होतीं. शिंदेमामानें टांगेवाल्याचे पैसे दिले.

"किती आहेत तुमच्याजवळ पैसे?" टांग्यांतून उतरून तिकीट हपिसाकडे जातांना शिंदेमामानें चांगुणेला विचारलें.

"दोन धाच्या नोटा. अन् मघाशीं तुम्हीं आनलेली मोड. त्यांत तीन आने कमी." आपल्या पदरांत बांधलेले पैसे सोडून ते सारे शिंदेमामाच्या हातावर ठेवीत चांगुणा म्हणाली.

"एवढे कशाला?" शिंदेमामा दचकून म्हणाला, "काय तीनचार रुपये लागतील!"

"असूं द्या. तिकटी काढल्यावर काय राहत्याल ते द्या मंग मला!" चांगुणा विश्वासानें म्हणाली.

शिंदेमामा तिकिटें घेऊन आला. आंत फलाटावर गाडी उभीच होती. बायकांच्या डब्यांत शिंदेमामानें त्यांना नेऊन बसविलें.

"हीं तुमचीं दोन तिकिटं भायखळ्याचीं!" खिशांतून सगळे पैसे न् तिकिटें बाहेर काढीत शिंदेमामा म्हणाला, "तुमचं एक अन् दोन्ही मुलांचं मिळून एक. साडेतीन रुपये झाले. ह्या दोन दहाच्या नोटा. अन् हे सहा रुपये चार आने. नीट सांभाळून ठेवा हं. मुंबईच्या गाडींत दिवसाढवळ्या चोऱ्या होतात म्हनून म्हनतों."

"मंग राहूं द्या तुमच्यापाशीं—" तिकिटें हातांत घेत चांगुणा म्हणाली, "भायखळ्याला पोहोंचल्यावर मंग द्या—"

"तरी हरकत नाहीं!" जाकिटाच्या आंतल्या खिशांत पैसे ठेवीत शांतपणें शिंदेमामा म्हणाला, "मी पुढच्या डब्यांत बसलों आहें."

गाडी सुटायच्या सुमारास शिंदेमामानें राहीला अन् दत्ताला दोन दोन साखरेचीं बिस्किटें आणून दिलीं.

डब्यांत खूप गर्दी होती. मुलांना घेऊन चांगुणा कोपऱ्यांत दाटीवाटीनें बसली होती. त्यामुळें प्रवासांत तिला इकडचें तिकडे हलायला मिळालें नाहीं.

आगगाडीमध्यें बसण्याची ही तिची पहिलीच वेळ होती. वाटेंत कुठेंहि स्टेशनावर गाडी थांबली कीं चांगुणा घाबरून कुणा तरी बायकांना विचारायची, "आलं भायखळा ?"

कांहीं वेळानें पलीकडे बसलेली एक माळ्याची बाई म्हणाली, "भायखळ्याला मस येळ हाये बाई. मी सांगंन तुला. मला बी तिथंच जायाचंय." तेंव्हां चांगुणा निर्धास्त झाली.

भायखळा यायला संध्याकाळचे सात वाजले. निम्मा डबा तिथेंच मोकळा झाला. भायखळ्याच्या नांवानें बाहेर हमाल ओरडूं लागले. माळ्याची बाई आपलें सामान घेऊन उठली. तसें चांगुणेनें राहीला अन् दत्ताला घाईघाईनें उठविलें. तीं कधींचींच झोंपीं गेलीं होतीं. दत्तानें गांठोडें घेतलें. राहीला चांगुणेनें कडेवर घेतलें. आणि गाडींतून उतरून तीं बाहेर आलीं.

फलाटावर खूप गर्दी होती. शिंदेमामा कुठें दिसतो आहे का म्हणून पुढच्या डब्याकडून येणाऱ्या माणसांच्या गर्दीकडे चांगुणा डोळे ताणताणून बघूं लागली. पण शिंदेमामा कुठें दिसलाच नाहीं.

पांच मिनिटांनीं गाडी ठेशनांतून निघून गेली. फलाटावरची गर्दीही पार वितळली. अन् लांबलचक मोकळ्या फलाटाच्या मधोमध चांगुणा आपलें गाठोडें अन् दोन मुलें ह्यांना जवळ घेऊन एकटीच बसलेली आहे असें दृश्य दिसूं लागलें.

तिकीटकलेक्टराचें तिच्याकडे लक्ष जायला कांहीं फार वेळ लागला नाहीं.

"ए बाय, तिथं कसाला बेसलीस? तिकिट कुथय तुझं?" एक पारशी तिकिट-कलेक्टर तिच्याजवळ येऊन विचारूं लागला.

चांगुणेनें आपल्या पदरांत बांधलेलीं दोन तिकिटें चटकन् सोडून त्याच्या हातीं दिली.

तिकिट कलेक्टर त्या तिकिटांकडे अन् चांगुणेकडे आळीपाळीनें टवकारून पाहूं लागला. "कुथून आलीस तूं बाय?" त्यानें विचारलें.

"पुन्याहून!" चांगुणेनें सांगितलें.

"अन् ज्यायचंच कुथं तुला?" जरा मोठ्यानें त्यानें विचारलें.

"भायखळ्याला!" चांगुणा बिचकल्यासारखी त्याच्याकडे पहात म्हणाली.

"कुनी काढून दिल्या तुला ह्ये तिकटा?" आणखी मोठ्यानें त्यानें विचारलें.

"शिंदेमामानं!" चांगुणा घाबरून म्हणाली, "तो म्हनाला मी पुढल्या डब्यांत बसतों. माझं पैसं पन त्याच्यापाशींच हायेत. त्यालाच मी बघतें आहें मघापून!"

"तो तुझ्या शिंदेमामा राहिला तिकडं पुनाला!" तिकीट कलेक्टर आपला डावा हात उंच करीत म्हणाला, "त्यानं तुला च्यांगला फशवला! ही भायखल्याची तिकटा नाय. खरकीची हाय! च्यल, तीन रुपया चार आना आप!"

चांगुणा त्याच्यापुढें गयावया करून दीनवाण्या स्वरानें म्हणाली, "माझ्याकडं एक पैसावी न्हाई साहेब. जें व्हतं तें शिंदेमामाला दिलं!"

तिकिट कलेक्टरनें तिच्याकडे क्षणभर पाहिलें. तिचें म्हणणें त्याला खरें वाटलें.



"ज्या–ज्या— बाहेर ज्या. इथं वेसूं नको!" असें तोंडांतल्या तोंडांत म्हणून तो निघून गेला.

तशी चांगुणा उठली. आणि आपल्या मुलांना घेऊन हळू हळू ठेशनाच्या बाहेर आली.

तिनें जलमांत मुंबई कधीं पाहिली नव्हती. जिकडे

तिकडे विजेच्या दिव्यांचा झगझगाट, ट्रॅम गाड्यांचा खडखडाट नि रस्त्यावरील मोटारींची, घोड्यांच्या गाड्यांची आणि लोकांची गर्दी पाहून ती अगदीं बुजून गेली. तिला कुठें जावें अन् कुणाला विचारावें हेंच मुळीं कळेना.

इकडे तिकडे पहात हळूहळू डाव्या हातानें ती जाऊं लागली. पुढें रस्त्याच्या कडेची दगडी फूटपायरी लागली. तिच्यावरून जावें कीं नाहीं ह्याचा तिला विचार पडला. पण सगळीं माणसें जाताहेत हें बघून तीही जाऊं लागली. कुठें जायचें हा विचारहि तिच्या डोक्यांत नव्हता. सगळे जाताहेत, तसें आपण जायचें. एवढेंच तिला माहीत होतें.

कोपऱ्याच्या एका दुकानांत दिव्यांचा फारच झगझगाट अन् गर्दी आहे असें बघून ती दहा पावलें अलीकडेच थांबली. डाव्या बाजूला पुष्कळशी मोकळी जागा होती. तिथें अंधार होता. अन् मधोमध पाण्याची तोटी होती. तिथें कांहीं माणसें हातपाय धूत होतीं.

पाण्याचा आवाज ऐकल्यानंतर आपल्याला तहान लागल्याची चांगुणेला आठवण झाली. सकाळीं तिनें मुलांना खाऊं घातलें होतें. पण स्वतः तिनें कांहींच खाल्लें नव्हतें. सकाळचा उरलेला एक पाव आपण गाठोड्यांत ठेवला आहे ह्याची तिला आठवण झाली. मुंबईची गर्दी न् उजेड बघून राही भेदरून गेली. अन् दत्ता आपली तहानभूक विसरून गेला होता.

पुढें जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असा विचार करून एका इमारतीच्या भिंतीच्या आडोशाला अंधारांत ती थांबली. गाठोडें सोडून त्यांतलें आपलें जुनें लुगडें तिनें खालीं अंथरलें. गाठोड्यांत तपेली होती, ती नळावरून भरून आणली. अर्धा पाव तिनें दत्ताला दिला. राहीनें त्यांतला निम्माच खाल्ला. पाणी पिऊन मुलें तिथल्या तिथेंच कलंडलीं.

राहीच्या उरलेल्या पावांतला तुकडा चांगुणेनें आपल्या ओटाजवळ नेला. तोंच—

"अन्न वाढा वो माय—"



अशी एका भिकाऱ्याची हृदयभेदक आरोळी शेजारून उठली.

चांगुणेच्या काळजांत एकदम थर्र आलें. तिच्या अंगावर शहारा उठला. त्या भिकाऱ्याला हांक मारून तो पावाचा तुकडा तसाच तिनें त्याच्या हातांत दिला.

अन् पाण्याची तपेली तोंडाला लावली.

● ● ●

. १५.



झोपलेल्या पिलांवर पाहरा करीत चिमणी जशी घरट्यांत डोळे मिटवून स्वस्थ बसलेली असते, तशी आपल्या निजलेल्या मुलांच्या उशाशीं सारी रात्र चांगुणा बसून होती.

एकदोन वेळां उठून ती नळावर पाणी पिऊन आली असेल तेवढीच. पहाटे थोडा वेळ तिला डुलकी आल्यासारखें वाटलें. पण इतक्यांत ट्रामची खडबड सुरू झाली. तशी तिची पेंग उडाली.

आधल्या रात्रीं कोपऱ्याच्या ज्या दुकानांत तिला दिव्यांचा झगझगाट अन् माणसांची गर्दी दिसली, तें हॉटेल होतें. तिथें चहाबशांचा खणखणाट वाजायला अगदीं सकाळपासूनच सुरुवात झाली.

चांगलें उजाडलें. उन्हें पडलीं. तेव्हां मुलें जागीं झालीं. नळाच्या मागल्या बाजूला कांहीं अंतरावर सार्वजनिक शौचकूप होता. तिथें चांगुणेनें त्यांना नेऊन आणलें. नळावर हातपाय धुतले. अन् पुन्हा तिघेंजणें गरिबासारखीं

आपल्या जागेवर जाऊन बसलीं.

समोरच्या भिंतीच्या आडोशाला एक म्हातारा चांभार आपलें लहानसें दुकान मांडून बसलेला त्यांना दिसला. त्यानें कपाळाला गोपीचंदनाचा पांढरा टिळा लावला होता. अन् त्याच्या गळ्यांत तुळशीची माळ होती. त्याच्या डाव्या बाजूला हॉटेलांत जाण्याचा रस्ता होता.

अरणीवर कातडें ठेवून तें रापीनें कापीत कापीत तो तोंडानें तुकोबाचा अभंग गुणगुणत होता.

**होईन मोचे वहाणा । पायीं सकळा संतजना**

कांहीं वेळानें शेजारच्या हॉटेलांतला एक पोऱ्या चहाचा कप घेऊन आला. आणि चांभाराच्या भांड्यांत वरून त्यानें तो ओतला. तेव्हां हातांतलें काम क्षणभर थांबवून चांभार चहा पिऊं लागला.

दत्तानें आणि राहीनें तें पाहिलें.

"आयग, आम्हांला दे चहा!" दोघांनीं दोहींकडून एकदम गजर केला.

चांगुणेचे डोळे एकदम भरून आले. ह्या वेळीं जमीन दुभंग होऊन जर आपल्याला पोटांत घेईल तर बरें, असें तिला वाटूं लागलें.

जोगेश्वरीच्या देवळांत तिचा पहिला मुलगा ठेवून आल्यावर गऊबाई तिला जें म्हणाली होती, कीं 'बाई, पोरांना जलम देणं सोपं आहे. पण पोरांना सांभाळण्याचं दुःख लई कठिण आहे!' ते शब्द तिला ह्या वेळीं आठवले. अन् कशाला आपण ह्यांना जन्म दिला असा विचार एक क्षणभर तरी तिच्या मनांत येऊन गेला.

आपण एवढें आरडतों ओरडतों आहोंत, अन् आई आपलें ऐकत नाहीं, हें बघून मुलांनीं मोठ्यानें रडायला सुरुवात केली. तेव्हां समोरचा चांभार त्यांच्याकडे बघूं लागला.

"कां रडतात बाय मुलं?" चांभारानें विचारलें, "काय हवं त्यांना?"

"च्या!" निर्जीव स्वरांत चांगुणेनें उत्तर दिलें.

"मग कां नाय देत त्यांना च्या?" चांभार कळवळून म्हणाला.

"च्याला पैसं कुठून आनूं मी दादा?" चांगुणा दीनवाण्या मुद्रेनें म्हणाली, "माझ्याजवळ होतं नव्हतं तेवढं पैसं काल एका मानसानं लुबाडलं! अन् म्यां एवढ्या मोठ्या गांवांत अशी इथं रस्त्यावर येऊन पडले."

"रामकृष्ण हरि, रामकृष्ण हरि" चांभार हळहळून म्हणाला.

इतक्यांत चांभाराला दिलेल्या चहाचे पैसे घ्यायला हॉटेलचा पोऱ्या परत आला. त्याला तीन कप चहा आणायला चांभारानें सांगितलें. आणि तो हातांतलें काम सोडून चांगुणेच्या समोर येऊन बसला.

चहा मिळाल्यावर दत्ता आणि राही हसूं लागलीं. बशींत चहा ओतून दत्ता फुरूफुरू पिऊं लागला. ओशाळ्या नजरेनें चांभाराकडे पाहात चांगुणा राहीला चहा पाजूं लागली.

चहा पिऊन झाल्यावर तिनें आपली थोडीशी हकीकत चांभाराला हळूहळू सांगितली.

"राधाबाईची खानावळ सांपडली म्हंजे सगळं व्हईल माझं काम!" चांगुणा आशेनें म्हणाली, "ती बाई म्हंजे देवमावली हाये!"

चांभारानें आजूबाजूला इकडे तिकडे फिरून अन् विचारपूस करून राधाबाईच्या खानावळींची चौकशी केली. पण त्याला कुठें कांहीं तिचा पत्ता लागेना.

"एवढ्या शहरांत कुठं पत्ता मिळायचा त्या खानावळीचा!" निराश चेहरा करून चांभार परत आला. इतक्यांत त्याच्याकडे एक गिऱ्हाईक आलें. तसा तो आपल्या कामाला लागला.

दत्ताच्याच वयाचीं दोनतीन पोरें हॉटेलांतून चहाच्या कपबशा घेऊन आंतबाहेर जात-येत होतीं. त्यांना पाहून चांगुणेच्या डोक्यांत एक विचार आला.

ती चांभाराला म्हणाली, "दादा, माझ्या दत्ताला मिळेल का हो त्या हाटेलांत काम?"

"मी इचारून पहातों अन्नाला!" असें म्हणून चांभार हॉटेलाच्या दारांत गेला. आणि आंत गल्ल्यावर बसलेल्या मालकाला त्यानें मोठ्या अजीजीनें हाक मारली, "अन्ना, जरा भायेर या वो—"

हॉटेलचा मालक जसा दारांत आला, तसें दत्ताला तिकडे घेऊन यायला चांभारानें चांगुणेला सांगितलें.

कपाळाला काळी रेघ, डोक्यावर मोठा घेरा नि शेंडी अन् कानांत सोन्याच्या दोन लहान फुल्या असे अण्णा हॉटेलच्या दारांत आले आणि त्यांनीं चांभाराला विचारलें, "काय रे दुधा?"

दत्ताकडे बोट दाखवून दुधा चांभार विव्हळून म्हणाला, "अन्ना, मराठ्याचा पोरगा हाय हा. ह्याची ही आई. एकानं हिला फसावलं. हिचं समदं पैसं

चोरलं. काल रात्रीपासून पोरं घेऊन इथं रस्त्यावर ही बसली हाये. म्यांच मघाशीं त्यांना च्या पाजला. तुमच्या हॉटेलांत ह्या पोराला कामाला ठिवाल तर लई उपकार होतील या बाईवर!"

चांगुणा हात जोडून अण्णाच्या चेहऱ्याकडे केविलवाण्या दृष्टीनें पाहात होती. अण्णानें पायापासून डोक्यापर्यंत तिच्याकडे पाहिलें. क्षणभर विचार केला. अन् ते म्हणाले, "ठीक आहे. ठेवतों मी त्याला. जेवून खाऊन तीन रुपये देईन. रात्रीं त्याला इथंच झोपावं लागेल! चल रे, ये आंत."

दत्ता आनंदानें उड्या मारीत आंत गेला. जातांना आईकडे त्यानें पाहिलें देखील नाहीं.

"अन् अन्ना—" अण्णा आंत जाण्यासाठीं वळूं लागले, तोंच दुधा त्यांना म्हणाला, "पोराच्या आईजवळ एक पैसा बी न्हाई. अंगावर हें लेकरूं हाये. रुपया आठ आने कांहीं द्याल तर—"

अण्णाच्या हातांत रुपया सव्वा रुपयाचें कांहीं चिल्लर नाणें होतें. तें त्यांनीं तसेंच चांगुणेला देऊन टाकलें.

मनांत विचार आला नाहीं तोंच दत्ताला नोकरी देखील मिळाली. इतका आनंद झाला चांगुणेला. आघल्या रात्रीपासून तिचा चेहरा उतरून गेला होता. तो एकदम उजळला.

"दादा," कृतज्ञतेनें ती दुधाला म्हणाली, "तुम्ही नसतां तर—"

"मी कोन बाई?" दुधा हात जोडून म्हणाला, "हें सगळं पांडुरंग करतो."

संध्याकाळपर्यंत चांगुणा दुधा चांभाराच्या जवळच बसून होती. दुपारीं चार आण्याची पाव न् भाजी तिनें हॉटेलांतून मागवली. दत्ताच ती घेऊन आला. त्याला आतां अशी ऐट चढली होती. आईकडून पैसे घेतांना तो खालीं पाहून गालांतल्या गालांत नुसता हसला.

दुधानें आपलें दुकान आवरलें. तो म्हणाला, "बाई, चल तूं माझ्यासंगं. रातची राहा माझ्या इथंच. मंग उद्यां बघूं."

दत्ताला पोटाशीं धरून चांगुणेनें त्याचा निरोप घेतला. आणि "पोराला नीट सांभाळा" असें डबडबलेल्या डोळ्यांनीं अण्णा हॉटेलवाल्याला विनवून चांगुणा दुधाबरोबर गेली.

दुधाची जागा चांगली दीड-दोन मैल लांब होती तेथून. 'डबक्याच्या चाळीं'त राहात होता तो. त्यांना घरीं पोहोंचायला पुष्कळ अंधार झाला.

दुधाची बायको नवऱ्यासारखीच प्रेमळ होती. त्यांचें घर लहानच होतें. पण भारी नीटनेटकें अन् स्वच्छ होतें. दाराबाहेर पत्र्याचा त्यांनीं एक आडोसा केला होता. अन् जमीन शेणानें सारवली होती. तिथेंच चांगुणेची त्या रात्रीं त्यांनीं सोय केली.

दुधाच्या बायकोनें थोडीशी भाकर नि भाजी दिली. ती खाऊन चांगुणा नि राही झोपल्या. चांगुणेला रात्रभर दत्ताची आठवण होत होती. आठ वर्षांत एकदांही त्याला सोडून ती कधीं दूर निजली नव्हती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दुधा चांभार आपल्या ओळखीच्या एका मारवाड्या-कडे तिला घेऊन गेला. तिच्या कानांतल्या कुड्या अन् हातांतल्या बांगड्या मारवाड्यानें विकत घेऊन तिला साठ रुपये दिले. ते पैसे हातांत पडल्यावर तिला मोठा धीर आला.

दुधाच्या जवळच तीन रुपये भाड्याची एक लहानशी खोली होती. चाळीच्या भय्याला दहा रुपये 'पागडी' देऊन ती त्यानें तिला मिळवून दिली. चारपांच रुपयांचीं भांडींकुंडीं अन् सामान आणून त्या दिवशीं संध्याकाळीं तर तिनें आपली चूल पेटवली. त्या वेळीं तिला असें धन्य वाटलें.

आजूबाजूला राहणाऱ्या बिऱ्हाडांतल्या पुष्कळशा बाया गिरणींत काम करीत होत्या. त्यांच्या ओळखीनें आठवड्याच्या आंत चांगुणेला एका गिरणींत काम लागलें. पगार तीस रुपये मिळाला. चांगुणा रोज सकाळीं कामावर जाऊं लागली. राही दुधा चांभाराच्या बायकोजवळ आनंदांत बसे. किंवा आजू-बाजूच्या मुलांमध्यें खेळे. त्यामुळें चांगुणेला निर्धास्त मनानें कामावर जातां येई.

दोनतीन महिने असेच गेले. काम करायला लागल्यापासून चांगुणेला मोठा धीर आला. जीवनांत एक नवीन बळ मिळालें. पण त्याचबरोबर तिच्या जीवनांत एक नवीन दुःख निर्माण झालें. पोटासाठीं श्रम करण्याचा तोंपर्यंत तिला अनुभव नव्हता. त्यामुळें आयुष्यांत कधीं कोणत्याही गोष्टीचा तिनें विचार केला नाहीं.

पण गिरणींत आठ तास उभें राहून काम करावें लागे. अंगाचा घाम घाम होई. संध्याकाळीं घरीं परत आल्यानंतर हाडें ठणकूं लागत. आणि मग तिच्या डोक्यांत नाना तऱ्हेचे विचार आळ्यांसारखे वळवळूं लागत. ह्या विचारांच्या वेदना आजपर्यंत आयुष्यांत कधीं तिला झाल्या नव्हत्या.

हें काम मी किती दिवस असें करणार? एवढे कष्ट एकसारखे माझ्या

हातून कसें होणार? माझ्या हातून हें उद्यां नाहीं रेटलें तर? मध्येंच माझें बरेंवाईट झालें, म्हणजे माझा दत्ता जन्मभर काय हाटेलांत कपबशा धूत राहणार? अन् माझ्या राहीचें—तिच्या तर नशिबांत काय आहे कुणास ठाऊक? का ती माझ्यासारखीच—

'पोरांचं दुःख लई मोठं असतं!' हे गऊबाईचे शब्द रात्रंदिवस तिच्या कानांत घुमत असत. आपलें काय वाटेल तें झालें तरी चालेल, पण आपल्या पोरांचें कसें होणार? हा एकच विचार अष्टौप्रहर तिच्या काळजांत सलत राहिल्यामुळें, तिला अगदीं चैन पडेनासें झालें.

दर पांचसहा दिवसांनीं ती दत्ताला भेटायला त्याच्या हॉटेलावर जाई. पहिल्या दिवशीं ज्या वेगानें आणि उत्साहानें तो आपल्या कामाला गेला होता, तो त्याचा आनंद दोनतीन महिन्यांत पार मावळून गेला.

आठ-नऊ वर्षांचें मूल तें. दिवसभर त्याला पायांवर उभें राहावें लागे. त्याच्या तोंडावरचें कोमल बाळसें पार नाहींसें झालें होतें. वाढलेले केस, डाग पडलेले कपडे, आणि कपाळावर वाहणारे घामाचे ओघळ अशी त्याची ती चिमुकली मूर्ति टेबल पुसतांना, खरकट्या बशा उचलतांना अन् पाण्याचीं गलासें इकडून तिकडे नेतांना बघून चांगुणेला एकदम भडभडून येई.

आई दिसली कीं त्याचे डोळे भरून येत. "मला तुझ्याबरोबर तिकडं घरीं घेऊन चल. मला नाहीं इथं राहायचं." अशी सारखी तिच्याकडे त्याची भुणभुण चाले. पण ती ऐकल्या न ऐकल्यासारखें करी.

तीन महिन्यांत त्याला पगारही मिळाला नव्हता. त्याच्या हातून गलासें अन् कपबशा फुटत. त्यांची किंमत अन् दंड त्याच्या पगारापेक्षां जास्त होई. उलट त्याच्या अंगावरच तीनचार रुपये जास्त झाले होते.

एकदां चांगुणा त्याला भेटायला गेली असतां, दोनतीन उष्टीं भजीं पुड्यांत गुंडाळून राहीसाठीं त्यानें हळूच आपल्या आईच्या हातांत दिलीं. तें एका नोकरानें पाहिलें. त्याबरोबर त्यानें दत्ताच्या हातांतला पुडा हिसकावून घेऊन काडकन् त्याच्या मुस्काडींत मारली. अगदीं चांगुणेच्या समोर. पोर इतकें कळवळलें. पण त्याला रडतांही येईना. चांगुणेच्या जिवाचें नुसतें पाणी होऊन गेलें.

दुकानांतले नोकर असे कोणत्या ना कोणत्या तरी कारणावरून दत्ताला मारीत. त्यामुळें तो फार रडकुंडीला आला. दर वेळेला तो आपल्या आईला

गाऱ्हाणें सांगे. पण मालकाकडे तक्रार करायचा तिला धीर होत नसे. एक-दोनदां तिनें अण्णाला सांगण्याचा प्रयत्न केला. पण ते तिच्याकडे चमत्कारिक दृष्टीनें पाहात. अन् भलत्याच गोष्टी काढीत. त्यामुळें त्यांच्याकडे जाणें नको असें तिला वाटे.

एक दिवस ती दत्ताला भेटायला गेली असतां, तो लंगडतांना तिनें पाहिला. त्याच्या पायाला फडकें बांधलें होतें. आईला पाहतांच तो तोंड झाकून रडूं लागला. सैंपाकघरांतल्या एका नोकरानें शेगडींतला जळता कोळसा आपल्या पायावर टाकला असें त्यानें सांगितलें.

तेव्हां मात्र अण्णा हॉटेलवाल्यांना जाऊन ती गोष्ट तिनें सांगितली. अण्णा कांहीं बोललेच नाहींत. ते आपले नेहमींप्रमाणें तिच्या तोंडाकडे टकटक बघूं लागले. चांगुणेला असें चोरट्यासारखें झालें.

"मीं दोनचार वेळां तुला सांगितलें!" कांहीं वेळानें अण्णा म्हणाले. भोंवतालीं कपबशांचा खडखडाट, गिऱ्हाइकांची बडबड अन् नोकरांची आरडा-ओरड मोठ्यानें चालू होती. "पण तूं लक्षच देत नाहींस. तुझ्याबद्दल किंवा तुझ्या मुलाबद्दल मला कांहीं तरी वाटायला पाहिजे ना? त्याखेरीज हें कसें होणार?"

त्याबरोबर चांगुणेनें चटकन् त्यांच्या पायाला हात लावले अन् ती म्हणाली, "अन्ना, असं नका बोलूं. बापावानी आहांत तुमी!"

अण्णा डोळे वटारून तिच्याकडे पाहताहेत, तों ती निघूनसुद्धां गेली.

त्यानंतर चारपांचच दिवस झाले. चांगुणा संध्याकाळची गिरणींतून परत येत आहे, तोंच घोड्याच्या चारचाकी गाडींतून दुधा चांभार दत्ताला खांद्यावर घेऊन उतरतो आहे असें तिनें पाहिलें. दत्ताच्या डोक्याला फडकें बांधलें होतें. अन् रक्तानें तें भरून गेलें होतें.

चांगुणेच्या तोंडचें पाणीच पळालें. वाऱ्यासारखी ती धावली. अन् दुधाच्या हातून तिनें दत्ताला घेतलें. हॉटेलांतल्या एका नोकरानें दत्ताला जोरानें ढकलल्या-मुळें टेबलाच्या कोपऱ्यावर त्याचें डोकें आदळून त्याला मोठी खोक पडल्याचें दुधानें सांगितलें.

दत्ता शुद्धीवर होता. पण त्याच्या अंगांत त्राण नव्हतें. त्याची ती स्थिति पाहून चांगुणा ढसाढसां रडूं लागली. तिनें दत्ताला आपल्या खोलींत नेऊन निजविलें. आणि गाडीचे दोन रुपये देऊन टाकले.

दुसऱ्या दिवसापासून चांगुणेची गिरणी सुटली. दत्ताच्या जखमेंतून पुष्कळच रक्तस्राव झाला असल्यामुळें त्याच्या अंगांत शक्ति नव्हती. आणि त्यांत त्या जखमेच्या कळा सर्व डोक्यांतून निघूं लागल्यामुळें त्याला कण्हण्याच्या यातनासुद्धां असह्य होऊं लागल्या. त्याच्या जिवाची तडफड होऊन तो पांच पांच मिनिटांनीं डोळे पांढरे करूं लागला. त्यामुळें त्याला सोडून एक क्षण दूर राहणें चांगुणेला अशक्य होतें. काय या पोराचें आतां होतें आहे ह्या भीतीनें तिच्या काळजाचा ठावच सुटला.

दत्ताला बरें व्हायला चांगले दोन-अडीच महिने लागले. ह्या काळांत चांगुणेला इकडचें तिकडे होतां आलें नाहीं. दागिने विकून आलेले आणि तीनचार महिन्यांचे पगाराचे शिल्लक उरलेले साठ-सत्तर रुपये औषधपाण्यांत आणि नेहमींच्या घरखर्चांत सरून गेले.

दत्ता घरांत हिंडूंफिरूं लागला, तेव्हां चांगुणा पुन्हा कामावर गेली. पण गिरणींतली तिची जागा केव्हांच भरून गेली होती. सातआठ दिवस इकडे तिकडे पायपिटी केल्यावर दुसऱ्या एका गिरणींत तिला काम मिळालें.

पण इतक्यांत पावसाळा आला. मुसळधार पाऊस सुरू झाला. आणि डबक्याच्या चाळींत सर्वत्र गळयाइतकें पाणी झालें. पुरुष माणसें आपल्या भाकरी डोक्यावर घेऊन रोज त्या पाण्यामधून जात. बायकांना थोडेंच जातां येतें? दोन-दोन तीन-तीन दिवस चांगुणेला खोलीबाहेर पडतां येत नसे.

कामाचे खाडे होऊं लागले. तसें तेंही काम सुटलें. आणखीन् कांहीं दिवसांनीं तिसरीकडे काम मिळालें. काम मिळण्याची पंचाईत नसे. पण रोज पावसांत भिजत जायचें. ओल्या लुगडयानें तसेंच दिवसभर काम करायचें. अन् संध्याकाळीं पुन्हा भिजत परत घरीं यायचें. आणि चाळींत गळयाइतकें पाणी झालें कीं दोन दोन दिवस घरांत अडकून पडायचें.

त्यामुळें चांगुणेला रोज ताप येऊं लागला. अंगावर ताप घेऊन काम करीत राहिल्यानें चारआठ दिवसांत एक दिवस असा उगवे, कीं तिला उठून देखील बसवत नसे. मग दोनतीन दिवस तिला निजून राहावें लागे. कामांत सारखे खाडे होऊं लागले कीं काम सुटे.

आज हातांत पैसा आहे, तर उद्यां नाहीं. अशी स्थिति झाल्यानें आजारांत उपासमारीची भर पडूं लागली. तरी पण स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन तिनें मुलांना कधीं कमी पडूं दिलें नाहीं. पण हा ताण अशा रीतीनें ती कोठपर्यंत

सहन करणार? कष्ट, आजार, उपासमार आणि काळजी ह्यांची बेरीज एकदां शरीरांत होऊन बसली, म्हणजे मग त्याची चाळण व्हायला कितीसा उशीर लागणार?

पावसाळा संपला. चांगुणेला एके ठिकाणीं काम मिळून दहापंधरा दिवस झाले, तोंच डबक्याच्या चाळींत डांग्या खोकल्याची सांथ पसरली. त्या सांथींत राही सांपडली.

चांगुणेला आपलें काम सोडून चोवीस तास तिला सांभाळीत बसावें लागलें. दहा दहा मिनिटांनीं राहीला खोकल्याची उबळ येई. आणि एकदां आली म्हणजे दोन दोन मिनिटें ती टिकून राही. त्या वेळीं पोरीचा जीव जातो कीं राहतो असें होऊन जाई.

दोन महिन्यांनीं राहीचा डांग्या खोकला एकदांचा गेला. पण त्यामुळें चांगुणेला दोन महिने जवळ जवळ सतत रोजचें जागरण घडल्यानें आधींच तिचा कळाहीन झालेला चेहरा अधिकच भेसूर दिसूं लागला. पाहणाराला हिच्या हातून कष्टाचें कांहीं काम होणार नाहीं असेंच वाटे. त्यामुळें पुढें पुढें कोणी तिला कामावरही ठेवीना.

आजूबाजूला ओळखीच्या माणसांकडून रोजचे चारदोन आणे मागून आणायचे. अन् कशी तरी एक वेळची चूल पेटवायची असें कित्येक दिवस चांगुणेनें चालविलें.

कमींत कमी पैशांत जास्तींत जास्त वेळपर्यंत भूक कशी मारतां येईल ह्याचे ती निरनिराळे इलाज शोधून काढूं लागली. एक आण्याचीं भजीं आणून, तीं दोन तास पाण्यांत घालून खूप फुगवायचीं अन् मग खायचीं म्हणजे सबंध रात्रभर पोट डब्ब होऊन बसतें, असें तिला आढळून आलें. तेव्हांपासून जेवणाचा खर्च तिनें एक आण्यावर आणून ठेवला.

दत्ताला कांहीं उद्योग नसल्यानें दिवसभर तो बाहेरच भटके. डबक्याच्या चाळींत त्याला समवयस्क दोस्त मिळायला कांहीं अडचण पडली नाहीं. पतंग, गोट्या, जुगार ह्या खेळांत, विडयांचीं थोटकें जमा करून तीं ओढण्यांत आणि लहानसहान चोऱ्या करण्यांत तो लवकरच तरबेज झाला.

एक दिवस रस्त्यावरच्या एका पोलिसानें त्याचा कान पकडून त्याला चांगुणे-समोर आणलें. आणि तिला सांगितलें, "बाई, ह्या तुमच्या मुलाला सांभाळा. मीं त्याला चारदोन वेळां बजावलेंही आहे. पण तो कांहीं ऐकत नाहीं.

तुरुंगांत जाण्याची त्याची तयारी चालली आहे."

तें ऐकून चांगुणेच्या काळजांत धसकाच बसला. हा एक नवीनच हृद्रोग दत्तानें तिला लावला. दत्ताच्या डोक्याला स्त्रोक पडली, तेव्हां देखील इतकें दुःख तिला झालें नाहीं.

एवढ्यांत एक दिवस चारपांच महिन्यांचें भाडें थकल्यामुळें चाळीच्या भय्यानें चांगुणेला अन् तिच्या मुलांना खोलीबाहेर काढलें. एक गाठोडें अन् दोन मुलें—अशी पुन्हा ती मुंबईच्या रस्त्यावर येऊन पडली.

आपलें काय होईल हा विचारच तिनें डोक्यांतून काढून टाकला. आपल्या मुलांचें आतां काय करायचें हा एकच विचार ती आतां करूं लागली.

दुधा चांभाराला तिनें विचारलें, "दादा, मी कुठंबी रस्त्यावर पडंन, नाय तर मरंन. पन ह्या पोरांचं काय करूं हो? त्यांचे हाल मी उघड्या डोळयानं कसं बघूं? या मुंबईंत इकतीं श्रीमंत हायेत. तीं नाय का कुनी घेनार ह्यांना? इकतीं घरं हायेत इथं मोटीं मोटीं. त्यांच्यांत कुटंबी जागा नसल का हो या माझ्या दोन पांखरांना?"

दुधाचे डोळे भरून आले. त्यानें क्षणभर विचार केला. रस्त्यावर एक म्युनिसिपालिटीची शाळा होती. तिथल्या एकाद्या मास्तराला विचारून यावें म्हणून तो उठला. दहापंधरा मिनिटांनीं तो हातांत एक कागद घेऊन आला.

"वरळीला एक 'अनाथघर' हाये. त्याचा मास्तरांनीं हा पत्त्या दिलाय." चांगुणेच्या हातांत तो कागद देऊन दुधा म्हणाला, "तिथं ते म्हनाले ह्या मुलांना घेत्याल."

तें ऐकून चांगुणेला आनंद झाला. जणुं कांहीं त्या 'अनाथघरां'त आपल्या मुलांना घेतलें असेंच तिला वाटलें. दुधाचा निरोप घेऊन ती निघाली. ह्याला विचार त्याला विचार असें करीत करीत ती तासाभरानें वरळीच्या 'अनाथघरां'त येऊन पोहोंचली.

'अनाथघरा'चें आवार पुष्कळ मोठें होतें. आणि त्याची इमारतही प्रशस्त अन् शोभिवंत होती. मुलांना घेऊन भीत भीत चांगुणा आंत गेली. दारावरच्या शिपायानें तिला हटकलें,

"काय पाहिजे?"

चांगुणा हात जोडून म्हणाली, "ह्या मुलांना इथं ठिवायचंय!"

"थांबा जरा!" असें म्हणून तो शिपाई आंत गेला, आणि दोन तपकिरी

रंगाचे कागद घेऊन आला. "हे कागद भरून आणा जा."

"मला काय त्यांतलं समजनार दादा?" चांगुणा दीनवाणें तोंड करून म्हणाली.

"तो समोर रस्त्याच्या पलिकडं पोष्टापाशीं माणूस बसलाय पत्र लिहिणारा." हातानें दाखवीत शिपाई म्हणाला, "तो देईल हे कागद भरून."

'अनाथघरा'समोरचा रस्ता ओलांडून चांगुणा पलीकडे गेली. पोष्टाच्या बाहेरच्या बाजूला दगडी फूटपायरीवर एक हाडकुळा माणूस समोर लाकडाची पेटी घेऊन बसला होता.



चांगुणेनें ते दोन कागद त्याच्या पेटीवर ठेवले.

"दादा, हे कागद लिहून द्या वो!"

"दोन कागद आहेत. मग दोन आणे पडतील." तो माणूस नाकपुड्या हलवीत म्हणाला.

चांगुणेजवळ फक्त दोनच आणे उरले होते. ते पटकन् तिनें त्याच्या पेटीवर ठेवले. अर्ध्या-पाऊण तासांत त्यानें ते कागद भरून दिले.

ते घेऊन पुन्हा चांगुणा 'अनाथघरां'त गेली. शिपायानें तिला अन् तिच्या मुलांना आंतमध्यें एका बाकावर नेऊन बसविलें. थोड्या वेळानें 'अनाथघरा'च्या चिटणिसानें त्यांना आपल्या कचेरींत बोलावलें. अन् डोळ्यांवर चष्मा चढवून त्यांचे कागद ते वाचून बघूं लागले.

कागद वाचतां वाचतां मधून मधून ते चांगुणेकडे आणि तिच्या मुलांकडे बघत होते.

"चांगुणा म्हणजे हिंदु—अन् कादर म्हणजे मुसलमान—" चष्म्यावरून चांगुणेकडे बघत ते स्वतःशींच पुटपुटले. आपण हिंदु आहोंत अन् कादर

हा मुसलमान आहे हा विचार तोंपर्यंत चांगुणेच्या कधीं डोक्यांतही आला नव्हता.

कागद वाचून झाल्यानंतर डोळ्यावरचा चष्मा काढीत गंभीर चेहरा करून चिटणीस म्हणाले, "बाई, हें अनाथघर आहे. इथें ज्या मुलांचे आईबाप मेले असतील त्यांनाच आम्ही घेतों—"

"पन् दादा, ह्या मुलांना बाप न्हाई!" चांगुणा कळवळून म्हणाली.

"तें खरं, पण आई आहे ना—" दाढीचे केस खाजवीत चिटणीस म्हणाले.

डबडबलेल्या डोळ्यांनीं मान हलवीत चांगुणेनें चिटणिसांच्या म्हणण्याला होकार दिला.

"तरी पण हे तुमचे अर्ज मी कमिटीपुढें ठेवतों." चिटणीस नाकाचें बोंड आंगठ्यानें चोळीत म्हणाले, "ते तुमच्या आर्थिक परिस्थितीची चौकशी करतील. मग त्यांचा जो कांहीं निर्णय होईल, तो तुम्हांला आम्ही कळवूं. तुम्ही आणखी आठ दिवसांनीं फेरी टाका."

"आठ दिस कुठं ह्यांना मी रस्त्यावर उपाशी ठिवूं दादा?" चांगुणा आवंढा गिळून म्हणाली, "आम्हांला राहायला न्हाई—खायाला न्हाई—"

"सगळें खरें, पण हे अर्ज आमच्या नियमांच्या चौकटींत बसत नाहींत ना?" नाकांतला एक केस डाव्या चिमटीनें कटकन् उपटीत चिटणीस म्हणाले, "तुम्ही नसतां ना, तर या दोन्ही मुलांना ह्या क्षणाला मीं इथं प्रवेश दिला असता! मग मीं कमिटीलाही विचारलं नसतं!"

जड पावलांनीं आणि सुंद डोक्यानें आपल्या मुलांना घेऊन चांगुणा अनाथ-घरांतून बाहेर पडली.

आतां कुठें जायचें? आठ दिवस काय करायचें?

समोर रस्त्याच्या पलीकडे पोस्ट ऑफिसला लागूनच नीलकंठेश्वराचें मंदिर होतें. पोस्ट ऑफिसापासून रस्त्याच्या कडेची जी रुंद फूटपायरी सुरू झाली होती, ती मंदिराच्या आवाराच्या लांबलचक भिंतीला लागूनच पुढें मंदिराच्या द्वारापर्यंत गेली होती. मंदिराच्या आवारांतल्या मोठमोठ्या झाडांच्या फांद्यांची सावली ह्या बाहेरच्या फूटपायरीवर पडलेली असे. त्यामुळें भिकाऱ्यांना बसायची त्या ठिकाणीं चांगलीच सोय झाली होती.

मंदिराच्या द्वारासमोर रस्त्याच्या पलीकडे इराण्याचें एक हॉटेल, दुसऱ्या कोपऱ्याला मंदिर आणि समोर 'अनाथघरा'चें आवार असा एक ऐसपैस

त्रिकोणाकृति चौकच तिथें बनला होता.

पोस्टासमोर पत्रें लिहिणाऱ्या त्या माणसाच्या आणि मंदिराच्या भिंतीला लागून बसलेल्या भिकाऱ्यांच्या मध्यें फूटपायरीची पुष्कळशी जागा मोकळी होती. तिथें आपल्या मुलांना घेऊन चांगुणा जाऊन बसली.

तिच्या डोक्यांतले विचार आणि पोटांतलीं आंतडीं कधींच मरून गेलीं होतीं. दुपार टळून चालली होती. सबंध दिवसांत तिच्या आणि तिच्या मुलांच्या पोटांत अन्नाचा एक कणही गेला नव्हता. सकाळपासून दत्तानें आणि राहीनें भूक लागल्याचें एक अक्षर तोंडांतून काढलें नव्हतें. आपल्या आईचा चेहरा आणि डोळे बघून मनांतल्या मनांत तीं अतिशय भेदरून गेलीं होतीं.

समोर 'अनाथघरा'च्या फाटकावर लागलेल्या नांवाच्या मोठ्या पाटीवरील एकेका अक्षरावरून आपली शून्य दृष्टि फिरवीत चांगुणा किती वेळ तरी निश्चल बसली होती.

इतक्यांत डाव्या बाजूकडून गोड आवाजांत कुणीं तरी विचारलें, "आई, चहापानी झालं?"

चांगुणा भानावर आली. आणि वळून पाहूं लागली.

एक फोडेल्या लाल नाकाचा, फाटलेल्या तोंडाचा आणि हातापायांचीं बोटें झडून गेलेला महारोगी खुरडत खुरडत तिच्याकडे येत होता. त्याचे डोळे हसल्यासारखे वाटत होते. कारण हसायला खालीं त्याला फारसें तोंडच उरलें नव्हतें.

हा माणूस आपल्या चहापाण्याची एवढ्या आपुलकीनें चौकशी करतो आहे हें बघून चांगुणा गहिंवरून आली. ती बोलली नाहीं. तिनें नाहीं म्हणून नुसती मान हलवली.

तशी त्या महारोग्यानें मागें मान वळवून मोठ्यानें हाक मारली, "झिंगे— ये झिंगे—"

त्याबरोबर दहा वर्षांची एक काळी कुळकुळीत अन् हसऱ्या तोंडाची मुलगी एका पायावर टुणटुण नाचत मागून आली. तिचा डावा हात न् उजवा पाय मुळापासून तुटलेले होते.

"काय झड्यामामा?" किनरीसारख्या आवाजामध्यें झिंगीनें विचारलें.

"झिंगे," झड्यामामा म्हणाला, "इराण्याला जाऊन सांग, तीन कोप च्या पाटव म्हनावं हितं!" चांगुणा 'नको' म्हणण्याच्या आंतच टुणटुण उड्या

मारीत झिंगीनें पाहतां पाहतां रस्ता ओलांडला. दत्ता आणि राही तिच्याकडे नुसतीं पाहातच राहिलीं.

"माज्याजवळ एक पैसाबी न्हाई मामा!" चांगुणा विव्हळून म्हणाली.

"पन आई, तुझ्याजवळ पैसा मागितलाय कुनी?" झड्यामामा म्हणाला, "ही झड्यामामाची पायरी हाये. हितं कुनी बी आलं कीं त्याला झड्या-मामाचा च्या पहिल्यानं प्यावा लागतो."

थोड्या वेळानें तीन कप चहा हातांत घेतलेल्या इराण्याच्या नोकराला पुढें घालून झिंगी टुणटुण करीत आली.

दत्ताला अन् राहीला भूक लागली होती. चहा आला तशी राही तोंडाचा चंबू करून आईला म्हणाली, "मला पाव पायजे."

त्याबरोबर झड्यामामानें इराण्याच्या नोकराला तीन पाव घेऊन यायला सांगितलें.

"कशीं सोन्यासारखीं पोरं हायेत, आई!" मुलांकडे कौतुकानें पाहात झड्या-मामा म्हणाला.

झड्यामामाच्या तोंडावरचा न् हातापायाचा महारोग चांगुणेला दिसेनासा झाला. एखाद्या सुंदर माणसाकडे अधाशी नजरेनें जसें पाहावें, तसें झड्या-मामाकडे पाहात चांगुणा म्हणाली, "समदं लोक मला आई म्हनत्यात मामा; पन आई म्हननारे तुमीच पहिलं भेटलांत."

"तें समजाया म्हारोग व्हावा लागतो आई!" झड्यामामा लाजल्यासारखा खालीं पाहात म्हणाला, "म्हारोग झाला म्हंजी डोळ्याला मानसांची शरीरं न्हाई दिसत. निसता जीवच दिसाया लागतो. तुमच्या डोळ्यांतल्या आईविगर मला कायबी दिसत न्हाई तुमचं तोंड!"

व्याकुळ नेत्रांनीं आपल्या मुलांच्या पाठीवरून हात फिरवीत चांगुणा म्हणाली, "ह्या पोरांना समोरच्या घरांत ठिवलं म्हंजी सुखानं मरंन मी!"

"असं नका बोलूं आई—" झड्यामामा कळवळून म्हणाला, "पोरांसाठीं जगाया हवं तुम्हांला."

शेजारीं बसलेल्या झिंगीकडे वात्सल्यानें बघत अन् पलीकडे फूटपाथरीवर इथें तिथें पडलेल्या लुळ्यापांगळ्या अन् थोट्या भिकाऱ्यांकडे आपला बिन-बोटांचा हात वळवून झड्यामामा पुढें म्हणाला, "हीं—हीं बघा माझीं पोरं. लोक म्हनत्यात, लेका झड्या, तुला म्हारोग झाला. तूं मरत कां न्हाईस? पन

मला मराया वेळ हाय कुटं ? तुम्हीच सांगा आई, मी मेलों म्हंजी या पोरांना कोन सांभाळनार ? "

" कसं देवावानी बोलतां मामा तुम्ही ? " झडयामामाकडे कौतुकानें पाहात चांगुणा म्हणाली, " अन् तुम्हांला व कसा म्हारोग झाला ? "

" मला कुटं झालाय म्हारोग ? " मोठ्यानें हसत झडयामामा म्हणाला, " अवो, या समद्या गांवाला झालाय म्हारोग ! त्यांचा त्यो म्हारोग सांभाळत बसलोय आम्ही इथं ह्या फूटपायरीवर ! "

थोडया वेळानें 'अनाथघरां' तील मुलें आणि मुली एका रांगेनें फाटकांतून बाहेर पडलीं. पुढें शिपाई, मागें शिपाई. एका रंगाच्या कापडाचे मुलामुलींचे गणवेष. चांगुणा आशाळभूत नजरेनें त्यांच्याकडे बघूं लागली. दत्ता अन् राही देखील अधाशासारखीं त्या मुलामुलींकडे बघत राहिलीं.

" आई, आम्हांला कां ग घेतलं नाहीं त्यांनीं ? " दत्ता रडवें तोंड करून म्हणाला.

चांगुणेचे डोळे भरून आले. ती काय सांगणार दत्ताला—कीं तुमची आई जिवंत आहे म्हणून घेतलें नाहीं तुम्हांला त्यांनीं ? तुम्ही अनाथ असतां तर आतां त्याच रांगेंत तसले पोषाख करून तुम्ही चाललेले असतां ?

त्यांनीं आठ दिवसांनीं पुन्हा यायला सांगितलें ! पण कोणास ठाऊक आठ दिवसांनीं मुलांना ते घेतील कीं नाहीं ? अन् नाहीं घेतलें तर ? पण मुलें अनाथ असतीं, तर 'ह्याच क्षणीं तुमच्या मुलांना मीं घेतलें असतें' असें ते म्हणाले. खरेंच, त्याच क्षणीं जर आपण मेलों असतों तर किती छान झालें असतें !

मुलांच्या वाटेंतला आपण एक मोठा अडथळा आहोंत असें चांगुणेला वाटायला लागलें. आपण मेलों तरच मुलें सुखी होतील. तरच मुलांचें कल्याण होईल. हा एकच विचार तिच्या डोक्यांत सारखा वाढूं लागला.

रात्रीं मुलांना हृदयापाशीं धरून ती फूटपायरीवर झोपली. पाठ टेकल्यावर मुलांना झोप लागली. पण तिचा कांहीं डोळा लागला नाहीं. आपण मेलों असतों, तर उघडया दगडावर थंडीवाऱ्यांत उपाशीं झोपलेलीं आपलीं हीं दोन गोजिरवाणीं पिलें, आतां त्या समोरच्या घरांतल्या उबदार पांघरुणांत झोपलेलीं असतीं. नाहीं का ? हें चित्र तिच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें.

आणि त्या चित्राच्या मागोमाग तिच्या आयुष्यांतलीं दुसरीं चित्रें तिच्या

डोळ्यांपुढून सरकूं लागलीं.

आपल्यामुळें कोणाचें बरें झालें? नवरा आपल्याला घेऊन जेजुरीला गेला, त्याचें वाटोळें झालें. आई आपल्याला वांचवायला गेली, तिचा जीव गेला. आपल्यामुळेंच बापाला न् चंद्रीला तुरुंगांत जावें लागलें. आठ वर्षें कादरनें आपल्याला सुखांत ठेवलें. त्याचाही खून झाला. आणि आतां देखील आपण जिवंत आहोंत, म्हणूनच मुलांचें चांगलें होत नाहीं. तेव्हां, आपण मेल्याखेरीज—

इतक्यांत वाऱ्याची झुळूक आली अन् वरच्या झाडाच्या फांदीवरून तीन-चार लहान लहान फुलें टपकन् तिच्या कपाळावर पडलीं. बकुळीचीं फुलें होतीं तीं. इथें बकुळीचें झाड असेल असें नव्हतें वाटलें तिला. त्या फुलांच्या सुवासानें एकदम धुंद झालें तिचें डोकें. अन् शंकरची तिला आठवण झाली.

'तुम्ही मेल्यावर तुमच्या या पोरांना कोण सांभाळील?' हे झड्यामामांचे शब्द तिच्या कानांत घुमले. खरेंच, आपण मेल्यानंतर आपल्या मुलांची प्रेमानें विचारपूस कोण करील? शंकरखेरीज दुसरें कोण आहे आपल्याला या जगांत? तो खात्रीनें आपल्या मुलांना येऊन नवेल. मग त्याला पलीकडच्या माणसां-कडून आपण उद्यां चिठ्ठी लिहवली तर—

बकुळीच्या वासानें चांगुणेचें डोकें निवलें. मुठींत फुलें धरून ती शांतपणें झोपीं गेली.

सकाळीं ती उठायच्या आंत दत्ता आणि राही चहांत पाव बुडवून खात बसलेलीं तिला दिसलीं. पलीकडे झड्यामामा त्यांच्याकडे कौतुकानें पाहत बसला होता. चांगुणा उठलेली पाहतांच झड्यामामानें झिंगीला 'एक च्या अन् पाव' आणायचा हुकूम सोडला.

"अन् तुम्हांला मामा?" चांगुणेनें विचारलें.

"आज शिवरात्र आई. मला उपास असतो." झड्यामामा म्हणाला, "आज आमचा लई कामाचा दिस."

नीळकंठेश्वराच्या दर्शनाला येणाऱ्या लोकांची सकाळपासून नुसती रीघ लागून राहिली होती. झड्यामामानें आपल्या 'पोरां'ची पलटण मंदिराच्या दाराच्या दोन्ही बाजूंना एकजात अशी जय्यत बसवून ठेवली होती, कीं काय बिशाद आहे मंदिरांत जाणारा एक माणूस त्यांच्या हातांतून निसटेल?

पोस्टाला सुटी होती. पण पत्रें लिहिणारा माणूस आपल्या ठरलेल्या वेळीं

लाकडी पेटी घेऊन फूटपायरीवर येऊन बसला होता. त्याला पाहिल्यावर शंकरला पत्र लिहायची चांगुणेला आठवण झाली.

"दादा, एक पत्र लिवायचंय!" चांगुणा त्याच्याजवळ जाऊन म्हणाली.

"एक आणा टाका." तपकिरीची चिमूट नाकपुडींत कोंबीत तो म्हणाला. चांगुणेजवळ पैसे कुठें होते? तिनें मागें वळून पाहिलें. दहापंधरा पावलांवर झड्यामामा बसला होता, त्याच्या पुढच्या धोतरावर पैशांचा सडा पडला होता.

"मामा, एक आना द्या हो." एकदम चांगुणा बोलून गेली.

बोटें झडलेल्या आपल्या दोन पंजांत आणेली उचलून झड्यामामा खुरडत तिच्याजवळ आला.

"त्या महारोग्याचे पैसे चालणार नाहींत!" एका हातानें नाक शिंकरीत अन् दुसरा हात विश्वामित्रासारखा वर उचलीत पत्र लिहिणारा माणूस मोठ्यानें ओरडला.

ते शब्द सुरीसारखे चांगुणेच्या काळजांत घुसले. तिच्या डोळ्यांत चटकन् पाणी आलें. झड्यामामा कांहीं बोलला नाहीं. मान खालीं घालून तो मुकाट्यानें मागें वळला.

एक आणा देणाऱ्या बिनबोटांच्या हाताला महारोग झाला, का ते नको म्हणणाऱ्या धड बोटाच्या पिंजारलेल्या पंज्याला महारोग झाला आहे ह्याचा चांगुणेला भ्रम पडला.

देवळांत येणाऱ्यांची दिवसभर गर्दी न् गलगा चालू होता. त्यामुळें चांगुणेला आपल्या दुःखाचा विसर पडला. दिवस कसा गेला हें तिला मुळीं कळलेंच नाहीं.

रात्र झाली. अंधार पडला. रस्त्यावर शुकशुकाट झाला. फूटपायरीवर झड्यामामा आपल्या 'पोरां' कडून दिवसाच्या कमाईचा हिशेब घेत होता. सगळ्यांचे पैसे न् फळें त्यानें एकत्र केलीं, अन् सगळ्यांना सारखीं सारखीं वांटून टाकलीं. सगळे खूश झाले.

"झोपायच्या आधीं देवाचं नांव घ्याया इसरूं नका बरं का र पोरांनों?" झड्यामामानें सर्वांना बजावून सांगितलें, "आज शिवरात्र आहे. आज महादेवाला जें मागाल तें तुम्हांला मिळल."

त्या शब्दांनीं अंधारांतसुद्धां चांगुणेच्या डोळ्यांपुढें लखकन् प्रकाश पडला. शिवरात्रीच्या दिवशीं महादेवाला जें मागावें तें मिळतें, हें तिला माहीत

नव्हतें. मग तिला जें पाहिजे तें महादेवाकडून आजच नाहीं का मिळणार? मग आतां उशीर कशाला?

झड्यामामानें दिलेलीं फळें खाऊन दत्ता आणि राही कधींच झोपीं गेलीं होतीं. चांगुणेनें त्यांच्या साऱ्या अंगावरून ममतेनें एकदां हात फिरवला. थरथरत्या ओठांनीं त्यांचे मुके घेतले. आणि छातीवर हात जोडून अन् डोळे गच्च मिटून सद्गदित कंठानें मनांतल्या मनांत महादेवाला तिनें आपलें मागणें मागितलें, "देवा—महादेवा—"

मंदिरांतल्या घंटा न् नगारा एकदम वाजायला लागलीं. त्याबरोबर बकुळीच्या झाडावरचीं चारपांच फुलें पटपट तिच्या अंगावर पडलीं. अन् तिच्या सर्वांगांतून झिणझिण्या उठून त्या सरसर तिच्या डोक्यांत चढत गेल्या.

समोर नंदादीपाच्या प्रकाशांत झळकणारी आडव्या गंधाची बाणेश्वराची पिंडी तिला दिसू लागली. अन् शंकर पाठमोरा उभा राहून मोठमोठ्यानें घंटा वाजवतो आहे—घण–घणाण–घण–घणाण—

ती एकदम दचकली. अन् घाबरून डावीकडे न् उजवीकडे बघूं लागली. एका बाजूनें मधमाशांचें ढगाएवढें काळेंभोर मोहोळ खालीं उतरत होतें. तर दुसऱ्या बाजूनें चांबळीच्या पुराचा प्रचंड लोंढा सों सों करीत येत होता. ती जीव खाऊन ओरडली—'अरे, शंकर पळ—'

एकमेकाच्या हातांत हात घालून दोघें जोरानें पळालीं. अन् कोपऱ्यांतल्या ओवरींत शिरलीं. आंत अंधार गुडुप होता. पण बेलाचा नि बकुळीचा घमघमाट सुटला होता. अंधारांतून तीं सारखीं धावत होतीं. काळोख वाढत होता. अन् ओवरी कांहीं संपत नव्हती.

काळोख—सुवास—काळोख—

का—ळो—ख!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उन्हें पडलीं तरी चांगुणा उठली नाहीं. दत्ता नि राही यांचा चहा न् पाव कधींच खाऊन झाला होता.

"आईला इतक्या हाका मारल्या. पण ती उठतच नाहीं—" दत्तानें झड्यामामाकडे तक्रार केली.

झड्यामामा चांगुणेच्या जवळ आला. तिच्या अंगाला त्यानें हात लावला. तो दचकला. त्यानें तिच्या तोंडाकडे पाहिलें. अन् लागलेंच तिच्या पायांवर डोकें ठेवून त्यानें तिला नमस्कार केला.

थोड्या वेळानें झड्यामामा खुरडत खुरडत दत्ताला न् राहीला घेऊन समोरच्या 'अनाथघरां'त गेला. चिटणीस दारांतच उभे होते. त्यांनीं मुलांना ओळखलें.

"मीं आठ दिवसांनीं सांगितलं होतं ह्यांना यायला. त्यांची आई कुठंय?"

"ती रातींच गेली!" डबडबलेल्या डोळ्यांनीं झड्यामामानें सांगितलें. "भाग्यवान माउली—शिवरात्रीला गेली!"

चिटणिसांचा चेहरा उजळला. "फार चांगलं! हेंच तर मी त्या बाईला सांगत होतों. शिपाई, अरे ह्यांना आंत घेऊन जा."



हसऱ्या चेहऱ्यांनीं दत्ता आणि राही शिपायाबरोबर 'अनाथघरां'त जाऊं लागलीं. जातां जातां राही वळून म्हणाली, "मामा, आई उठली म्हंजे तिला इथं घेऊन या बरं का?"

झड्यामामानें नुसती मान हलवली. त्याच्या डोळ्यांतुन आसवांच्या धारा वहात होत्या.


दि. मा.
२०९८४
ता. १३.५.५४
१३२०

तासाभरानें पोलिसांची मोटर आली. अन् फुटपायरीवर पडलेलें चांगुणेच्या जीवनाचें निर्माल्य उचलून घेऊन गेली.

चार सुकलेल्या बकुळींच्या फुलांखेरीज तिच्या अस्तित्वाची निशाणी त्या ठिकाणीं कांहीं राहिली नाहीं.

इतक्यांत एका बाजूनें खराट्याचा जोरानें फटकारा आला.

अन् तीं बकुळीचीं फुलेंही कुठल्या कुठें उडून गेलीं.



IRBK-0105322